


# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com


एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, ■ रविवार २२ मार्च २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठे १०+४






# '...तर आम्ही युद्ध थांबवू'



## मोदींसोबतच्या चर्चेत इराणच्या राष्ट्रपतींनी सांगितला संघर्ष थांबवण्याचा मार्ग

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज इराणचे राष्ट्रपती मसूद पेजेश्कियान यांच्याशी फोनवरून संवाद साधला. यावेळी दोन्ही नेत्यांनी द्विपक्षीय संबंधांसोबत आखाती देशातील तणावावर चर्चा केली. यादरम्यान, इराणच्या राष्ट्रपतींनी या युद्धाची सुरुवात इराणने नव्हे तर अमेरिका आणि इस्त्राइलने केल्याचे सांगत युद्ध थांबवण्याचा मार्गही सांगितला.

अमेरिका आणि इस्त्राइलने इराणविरोधात सुरू केलेल्या युद्धाला आज २२ दिवस लोटले आहेत. मात्र या कालावधीत हे युद्ध अधिकाधिक भीषण होत चालले असून, हा संघर्ष थांबण्याचे कोणतेही चिन्ह दिसत नाही आहे. यादरम्यान, भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज इराणचे राष्ट्रपती मसूद पेजेश्कियान यांच्याशी फोनवरून संवाद साधला. यावेळी दोन्ही नेत्यांनी द्विपक्षीय संबंधांसोबत आखाती देशातील तणावावर चर्चा केली. यादरम्यान, इराणच्या राष्ट्रपतींनी या युद्धाची सुरुवात इराणने नव्हे तर अमेरिका आणि इस्त्राइलने केल्याचे सांगत युद्ध थांबवण्याचा मार्गही सांगितला.

पंतप्रधान नरेंद्र मोदींशी संवाद साधताना इराणचे राष्ट्रपती मसूद पेजेश्कियान यांनी सांगितले की, इराणने नेहमीच आंतरराष्ट्रीय पातळीवर संवाद आणि पारदर्शकतेला तयारी दर्शवली आहे. त्यात संयुक्त राष्ट्रांच्या मंचावरील चर्चेचाही समावेश आहे. मोदींशी बोलताना पेजेश्कियान यांनी अमेरिका आणि इस्त्राइलने केलेली कारवाई अमानवी आणि अनैतिक असल्याचा आरोप केला. तसेच त्याचा तीव्र निषेध केला. त्याबरोबरच पश्चिम आशियामधील देशांमध्ये प्रादेशिक सहकार्याच्या माध्यमातून शांतता आणि स्थैर्य सुनिश्चित करण्यासाठी बाह्य हस्तक्षेप नसलेली प्रादेशिक चौकट आखण्याचाही प्रस्ताव दिला.

यावेळी युद्ध थांबवण्याच्या पर्यायाबाबत इराणच्या राष्ट्रपतींनी सांगितले की, या भागात शांतता प्रस्थापित करायची असल्यास अमेरिका आणि इस्त्राइलने त्यांच्याकडून होत असलेले हल्ले तत्काळ थांबवावेत, तसेच भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये याची हमी द्यावी. त्याबरोबरच पेजेश्कियान यानी ब्रिक्स परिषदेमधील भारताच्या अध्यक्षतेचा उल्लेख करत पेजेश्कियान यांनी या संघटनेच्या माध्यमातून इराणाविरोधातील हल्ले थांबवण्यासाठी प्रादेशिक शांतता कायम ठेवण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत, असे आवाहनही त्यांनी केले.

# अशोक खरातचा एन्काऊंटर होण्याची शक्यता

## तृप्ती देसाईंचा खळबळजनक दावा, तारीखही सांगितली!

**मुंबई/प्रतिनिधी :** अंकशास्त्राच्या नावाखाली महिलांची फसवणूक आणि लैंगिक शोषण करणाऱ्या तथाकथित अंकशास्त्रज्ञ अशोक खरात याच्या पापाचा घडा भरला आहे. एका पीडित महिलेने धाडस दाखवत तक्रार दिल्यानंतर पोलिसांनी खरातला बेड्या ठोकल्या आहेत. तपासादरम्यान पोलिसांच्या हाती धक्कादायक पुरावे लागले असून, एका पेनड्राइव्हमध्ये तब्बल ५८ आक्षेपार्ह व्हिडिओ सापडल्याने संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली आहे. यासंदर्भात भूमाता ब्रिगेडच्या अध्यक्षा तृप्ती देसाई यांनी याप्रकरणी खळबळजनक दावा केला आहे.



तृप्ती देसाई यांनी खरातचे अनेक बड्या मंत्र्यांशी आणि राजकारण्यांशी जवळचे संबंध असल्याचे म्हटले. त्या म्हणाल्या की, 'खरातकडे असलेल्या माहितीमुळे अनेक बड्या नेत्यांचे पितळ उघडे पडण्याची भीती आहे. त्यामुळे हे प्रकरण दडपण्यासाठी खरातचा काटा काढला जाऊ शकतो. अशोक खरातला २४ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. २४ तारखेला त्याला न्यायालयात हजर करताना त्याचे एन्काउंटर घडवून आणले जाऊ शकते, असा दावा देसाई यांनी केला आहे. राजकीय नेत्यांची नावे समोर☞(पान २ वर)




# '...तर मुंबई-दिल्लीवर बॉम्ब टाका'

## अब्दुल बासित यांचं वादग्रस्त विधान, भारत-पाक तणावात भर

**इस्लामाबाद /वृत्तसंस्था-** मध्यपूर्वेतील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, पाकिस्तानचे माजी उच्चायुक्त अब्दुल बासित यांनी भारताबाबत एक अत्यंत वादग्रस्त विधान केले आहे. एका काल्पनिक परिस्थितीचा दाखला देत बासित यांनी म्हटले की, 'जर अमेरिकेने पाकिस्तानवर हल्ला केला. तर, पाकिस्तानने प्रत्युत्तर म्हणून भारताला लक्ष्य केले पाहिजे.'




एका चर्चेदरम्यान बोलताना बासित यांनी ही गरळ ओकली. ते म्हणाले की, 'कल्पना करा, जर अमेरिकेने पाकिस्तानवर हल्ला केला. तर, पाकिस्तानने गप्प न बसता मुंबई आणि दिल्लीसारख्या भारतीय शहरांवर बॉम्बफेक करावी.' बासित यांच्या या विधानामुळे राजनैतिक वर्तुळात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. विशेष म्हणजे, एका जबाबदार पदावर राहिलेल्या माजी राजनैतिक अधिकाऱ्याने दोन अण्वस्त्रधारी शेजारी देशांमधील तणाव वाढवणारे असे विधान केल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

अमेरिकेच्या संभाव्य कारवाईचा बदला भारतावर काढण्याचे बासित यांचे विधान☞(पान २ वर)

## रोहित शेट्टी गोळीबार प्रकरणः

# १४ वा आरोपी गोलू पंडित याला अटक

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूडमधील प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक रोहित शेट्टी याच्या घरावर करण्यात आलेल्या गोळीबार प्रकरणातील आणखी एका आरोपीला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. या प्रकरणातील चौदावा आरोपी असलेल्या गोलू पंडित याला मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या पथकाने उत्तर प्रदेश एटीएसच्या मदतीने उत्तर प्रदेशमधून ताब्यात घेतले आहे. गोलू पंडित याला मुंबईत आणले जात असून, त्याला रविवारी न्यायालयात हजर केले जाणार आहे.



रोहित शेट्टी यांच्या जुहू येथील 'शेट्टी टॉवर' या निवास्थानाबाहेर गोळीबार झाल्याची घटना फेब्रुवारी महिन्यात घडली होती. तसेच या ☞(पान २ वर)

## एपस्टिन फाईल प्रकरणी

# सोमवारी काँग्रेस आणि वंचित काढणार मोर्चा

**मुंबई/प्रतिनिधी :** एपस्टिन फाईलमध्ये आलेला नरेंद्र मोदींच्या नावाचा उल्लेख व अमेरिकेशी तडजोड करणारे नरेंद्र मोदी यांना पंतप्रधानपदावर कायम का ठेवले? याचा जाब विचारण्यासाठी सोमवार दिनांक २३ मार्च रोजी काँग्रेस, वंचित बहुजन आघाडी व समविचारी पक्षांचा संयुक्त मोर्चा आयोजित करण्यात आलेला आहे. नागपुरातील संविधान चौक ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुख्यालयापर्यंत हा धडक मोर्चा काढण्यात येणार आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या प्रमुख नेतृत्वाखाली हजारो पदाधिकारी या मोर्चात सहभागी होणार आहेत.

अमेरिकेच्या न्याय विभागाने एपस्टिन फाईलची जी माहिती जाहीर केली आहे, त्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नावाचा उल्लेख झालेला आहे. मोदी यांच्या☞(पान २ वर)




## ऑनलाइन इलेक्ट्रिक शेगडा खरेदीच्या नादात ज्येष्ठाने ३ लाख गमावले



**पुणे/प्रतिनिधी :** गॅस टंचाईमुळे ऑनलाइन इलेक्ट्रिक शेगडी खरेदी करणाऱ्या एका ज्येष्ठ नागरिकाची सायबर चोरट्यांनी तीन लाख दहा हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला. या प्रकरणी कोथरूड पोलिसांनी सायबर चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत ८१ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाने कोथरूड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, तक्रारदार ज्येष्ठ नागरिक हे कोथरूड ☞(पान २ वर)



# संयम,त्याग आणि मानवतेचा संदेश देणारा सण म्हणजे ईद-आ.सुलभा खोडके

**अमरावती/प्रतिनिधी:-** भारतीय समाजाच्या सांस्कृतिक विश्वात विविध धर्म, परंपरा आणि श्रद्धा यांचे सुंदर सहअस्तित्व आढळते. या विविधतेतूनच एकात्मतेची खरी ताकद निर्माण होते. प्रत्येक सण हा केवळ एका धर्मापुरता मर्यादित नसून तो संपूर्ण समाजाला काही ना काही जीवनमूल्य देऊन जातो. अशाच मूल्यांनी समृद्ध असलेला संयम, त्याग आणि मानवतेचा संदेश देणारा सण म्हणजे ईद - उल - फितर, ज्याला आपण रमजान ईद म्हणून ओळखतो. रमजान महिन्याच्या अखेरीस येणारी ही ईद केवळ आनंदाचा उत्सव नाही. ती आहे एका महिनाभर चाललेल्या आत्मशुद्धीच्या, संयमाच्या तपस्येचा आणि मानवतेच्या जाणिवेचा उत्सव आहे. असे प्रतिपादन आमदार सुलभा संजय खोडके यांनी उपस्थितांना संबोधून केले.





शनिवार दिनांक २१ मार्च २०२६ रोजी अमरावती येथील पठाण चौक मार्ग परिसर स्थित ईद - उल - फितर निमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. रमजान हा केवळ धार्मिक विधी नसून सामाजिक संवेदनशीलता वाढवणारा कालखंड आहे. रमजान संपल्यानंतर येणारी ईद म्हणजे आनंद, उत्साह आणि कृतज्ञतेचा दिवस. एक महिनाभर केलेल्या साधनेनंतर हा दिवस येतो, या दिवशी मुस्लिम बांधव एकत्र येऊन नमाज अदा करतात,एकमेकांना आलिंगन देतात आणि ईद मुबारक म्हणत आनंद साजरा करतात. परंतु ईदचा खरा अर्थ केवळ नवीन कपडे, स्वादिष्ट पदार्थ किंवा उत्सव यात नाही. तर तो आपल्या मनातील कटुता विसरून एकमेकांशी प्रेमाने वागण्याचा संदेश. ईद - उल - फितर च्या निमित्त आमदार सुलभा खोडके, आमदार संजय खोडके तसेच यश खोडके यांनी यावेळी सर्व उपस्थितांना ईद मुबारक म्हणत शुभेच्छा दिल्यात.

आजच्या काळात समाज अनेक आव्हानांना सामोरा जात आहे. धार्मिक तणाव, सामाजिक विषमता, आर्थिक असमानता आणि वाढती असहिष्णुता. अशा परिस्थितीत रमजान ईद आपल्याला एक वेगळा मार्ग दाखवते संयमाचा, सहिष्णूतेचा आणि परस्पर आदराचा या शब्दसुमनांनी आमदार संजय खोडके यांनी ईद - उल - फितर निमित्ताने सर्व उपस्थितांना शुभेच्छा दिल्या. रमजान ईद म्हणजे संयम, समता आणि मानवतेचे प्रकाशोत्सव म्हणून ओळखला जातो. यावेळी मुस्लिम बांधवांनी पारंपरिक वेशभूषा धारण करीत आपला सक्रिय सहभाग नोंदवला होता. रमजान ईद हा सण केवळ आनंदाचा नाही, तो आहे आत्मपरीक्षणाचा संवेदनशीलतेचा आणि मानवतेचा उत्सव. हा सण आपल्याला शिकवतो, धर्माचा खरा अर्थ विधीमध्ये नाही, तर माणुसकीमध्ये आहे. आजच्या बदलत्या आणि कधी कधी तणावपूर्ण वातावरणात रमजान ईदचा संदेश अधिक महत्वाचा ठरतो. जर आपण या सणाच्या मूल्यांना आपल्या जीवनात स्थान दिले, तर समाज अधिक सुसंवादी, समताधिष्ठित आणि शांततापूर्ण होऊ शकतो. रमजान ईदच्या पवित्र पर्वानिमित्त सर्वांनाच प्रेम, बंधुभाव, समता आणि मानवतेच्या मूल्यांनी समृद्ध अशा हार्दिक शुभेच्छा! या शब्दात यश खोडके यांनी सर्व उपस्थितांना शुभेच्छा दिल्यात. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस परिवार सदस्य, पदाधिकारी तसेच मनपा नगरसेवक प्रामुख्याने उपस्थित होते.

# नगरपंचायतच्या सभेचे व्हिडिओ व ऑडिओ रेकॉर्डिंग करा स्वीकृत नगरसेवक अविनाश ब्राह्मणवाडे यांची मागणी

**नांदगाव खंडेश्वर/प्रतिनिधी:-** नगरपंचायत सभागृहातील कामकाज पारदर्शक, उत्तरदायी व्हावे, याकरिता नगरपंचायत मधील सभेच्या कामकाजाचे अधिकृत व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्यात यावे अशी मागणी नगरपंचायतचे स्वीकृत नगरसेवक अविनाश ब्राह्मणवाडे यांनी केली आहे.



या मागणीचे निवेदन मुख्याधिकारी यांना दिले. नगरपंचायत च्या सभेमध्ये जनतेच्या प्रश्नांवर चर्चा होते, विकासकामांचे निर्णय घेतले जातात, निधी कामकाज, विविध विषयावर भूमिका मांडल्या जातात. अशा परिस्थितीत सभागृहातील कामकाजाची अधिकृत नोंद असणे बंधनकारक असल्याने केवळ कागदी इतिवृत्तावर विसंबून न राहता प्रत्यक्ष ऑडिओ रेकॉर्डिंग झाल्यास चर्चेतील अचूकता प्रशासनाची जबाबदारी निवडून आलेल्या प्रतिनिधीची भूमिका जनतेसमोर स्पष्ट होईल असा मुद्दा ब्राह्मणवाडे यांनी निवेदनातून मांडला. तेव्हा प्रशासनाने अधिकृत रेकॉर्डिंगची व्यवस्था करावी अन्यथा नियमाच्या अधीन राहून वैयक्तिक स्तरावर रेकॉर्डिंग करण्यास परवानगी द्यावी अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

# अमरावती विद्यापीठात २४ मार्च रोजी 'शहीद दिन' व्याख्यान

**अमरावती/प्रतिनिधी:-** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार दिनांक २४ मार्च २०२६ रोजी शहीद दिनानिमित्त विशेष व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर कार्यक्रम दुपारी २.३० वाजता विद्यापीठ परिसरातील डॉ. श्रीकांत जिचकार स्मृती संशोधन केंद्र येथील सभागृहात संपन्न होणार आहे. 'शहीदांच्या स्वप्नातील भारत' या विषयावर श्री. व्यंकटेश महाविद्यालय, देऊळगाव राजा येथील मराठी विभागाचे प्रमुख प्रा. मधुकर बाळासाहेब जाधव अभ्यासपूर्ण व्याख्यान देणार आहेत. याप्रसंगी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे अध्यक्षस्थान भूषवणार असून याप्रसंगी विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. विजय नागरे, तसेच अधिसभा सदस्य नितीन टाले आणि कैलास चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

व्याख्यान कार्यक्रमाला सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन विद्यापीठाच्या वतीने कुलसचिव डॉ.अविनाश असनारे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ.राजीव बोरकर आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ.निलेश कडू यांनी केले आहे.

# 'स्वाधार' योजनेतील त्रृटी पूर्ण करण्यासाठी मुदतवाढ

**अमरावती/प्रतिनिधी:-** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी अर्ज केलेल्या, परंतु कागदपत्रांतील त्रुटींमुळे कार्यालयस्तरावर प्रलंबित असलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी दि. ३० मार्चपर्यंत त्रृटी पूर्ण कराव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.

राज्य शासनाने शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळाला नसलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील अकरावी, बारावी, तसेच बारावीनंतरच्या व्यावसायिक आणि अव्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना भोजन, निवास आणि इतर शैक्षणिक सुविधांसाठी थेट आर्थिक मदत देण्यासाठी 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना' सुरू केली आहे. सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी ज्या विद्यार्थ्यांनी अर्ज केले आहेत, त्यांच्यापैकी काही अर्ज कागदपत्रांतील कमतरतेमुळे कार्यालयात प्रलंबित आहेत. या प्रलंबित विद्यार्थ्यांची यादी कार्यालयाच्या दर्शनी भागात लावण्यात आली आहे. कार्यालयाकडून वेळोवेळी सूचना देऊनही अनेक विद्यार्थ्यांनी अद्याप त्रुटी पूर्तता केलेली नाही, ज्यामुळे त्यांचे अर्ज प्रलंबित आहेत.

विद्यार्थ्यांचे अर्ज त्रुटींमुळे प्रलंबित आहेत, त्यांनी शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार आवश्यक कागदपत्रे कार्यालयात संबंधित शाखेकडे जमा करावीत. या मुदतीत त्रुटी पूर्ण केली नसल्यास, याची सर्वस्वी जबाबदारी लाभार्थी विद्यार्थ्यांची राहील. तसेच दि. २३ ते ३० मार्च २०२६ या कालावधीत दुपारी ३ ते ५ यावेळेत स्वत: उपस्थित राहून त्रुटी पूर्तता करून घेण्यासाठी सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, अमरावती येथे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. याबाबत अधिक माहितीसाठी समाज कल्याण कार्यालय किंवा दुरध्वनी क्र. ०७२१-२६६१२६१ वर संपर्क साधावा, असे आवाहन समाज कल्याण सहायक आयुक्त आर. व्ही. जाधवर यांनी केले आहे.

# रूपाली चाकणकरांनी ताबडतोब राजीनामा द्यावा- सीमा बोके

**अंजनगाव सुर्जी/ प्रतिनिधी:-** महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर यांच्यामुळे एका महत्त्वाच्या संवैधानिक पदाचा दररोज अपमान होत आहे.एवढ्या मोठ्या पदाची त्यांनी कोणतीच किंमत ठेवली नसून त्यांना त्या पदाचे अजिबातही गांभीर्य नाही.त्यामुळे रूपाली चाकणकर आपल्या पदावर राहण्यास अजिबात पात्र नसून त्यांनी लवकरात लवकर राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष पदाचा राजीनामा द्यावा अशी मागणी जिजाऊ ब्रिगेडच्या प्रदेशाध्यक्ष सीमा बोके यांनी केली आहे.

महिला आयोग हा महिलांसाठी निर्माण झालेला अतिशय महत्त्वाचा आयोग आहे.महिलांच्या अडचणी, समस्या, प्रश्न या आयोगाच्या माध्यमातून ताबडतोब सोडविले गेले पाहिजे आणि ज्या ज्या ठिकाणी महिलांवर अन्याय,अत्याचार होत असतील, त्या त्या ठिकाणी महिला आयोगाने त्याची गांभीर्याने दखल घेऊन गुन्हेगारावर कठोर कारवाई केली पाहिजे यासाठी महिला आयोगाची स्थापना झालेली आहे.सध्या या आयोगाच्या अध्यक्ष असलेल्या रूपाली चाकणकर यांच्या काळात महाराष्ट्रात महिलांवर वेगवेगळ्या माध्यमातून होणारे अत्याचाराचे प्रमाण प्रचंड वाढलेले आहे. हुंडाबळी, ॲसिड हल्ला, महिलांची फसवणूक,भोंदू बाबांकडून सातत्याने होणारे महिलांचे शोषण यामुळे महिला भयग्रस्त झाल्या असून गुन्हेगारावर वचक राहिलेला नाही. कारण स्वतः



महिला आयोगाच्या अध्यक्ष अशोक खरात सारख्या महिलांचे शोषण करणाऱ्या आणि त्यांचे अश्लील व्हिडिओ बनविणाऱ्या भोंदू बाबाच्या भक्त आहे. या बलात्कारी भोंदू बाबाचे पाय धुवून त्याच्या डोक्यावर जर महिला आयोगाच्या अध्यक्ष छत्री धरत असेल तर महिलांना न्याय मिळणे खूप कठीण आहे. त्यामुळे महाराष्ट्रात रूपाली चाकणकर यांच्या विरोधात महिलांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. त्या या पदावर राहण्यास अजिबातही योग्य नाही.या असंतोषाचा स्फोट होण्याच्या अगोदर रूपाली चाकणकर यांनी ताबडतोब आपल्या पदाचा राजीनामा द्यावा आणि या महत्वपूर्ण पदाचा होणारा अपमान थांबवावा अशी मागणी जिजाऊ ब्रिगेड प्रदेशाध्यक्ष सीमा बोके यांनी सरकारकडे केली आहे.

## १ व १० वरील उर्वरित

### अशोक खरातचा एन्काऊंटर

येऊ नयेत यासाठी हे संपूर्ण प्रकरण कायमचे बंद करण्याचा कट रचला जात असल्याची शक्यता त्यांनी वर्तवली आहे.

पोलिसांनी केलेल्या कारवाईत खरातच्या ताब्यातून जो पेनड्राइव्ह जप्त केला आहे, त्यातील व्हिडिओ पाहून पोलीसही चक्रावून गेले आहेत. अनेक महिलांचे शोषण करून त्यांचे चित्रीकरण केल्याचा संशय बळावला आहे. या कृत्यामुळे आरोपीला कठोरातील कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी सर्व स्तरातून होत आहे. सध्या पोलीस या प्रकरणाचा सखोल तपास करत असून, खरातच्या संपर्कात कोणकोणते व्हिआयपी लोक होते, याचा शोध घेणे आता पोलिसांसमोर मोठे आव्हान असणार आहे.

### '...तर मुंबई-दिल्लीवर बॉम्ब

तर्कहीन मानले जात आहे. मध्यपूर्वेतील युद्धजन्य परिस्थितीमुळे आधीच जागतिक स्तरावर चिंतेचे वातावरण असताना, अशा विधानांमुळे दक्षिण आशियातील शांतता धोक्यात येऊ शकते. बासित यांनी थेट मुंबई आणि दिल्ली यांसारख्या मोठ्या महानगरांचा उल्लेख केल्याने भारताच्या सुरक्षा यंत्रणा अधिक सतर्क झाल्या आहेत.

अब्दुल बासित हे यापूर्वीही त्यांच्या भारतविरोधी वक्तव्यांसाठी चर्चेत राहिले आहेत. मात्र, थेट युद्धाची आणि बॉम्बफेकीची भाषा केल्यामुळे त्यांच्यावर टीकेची झोड उठत आहे. तज्ज्ञांच्या मते, पाकिस्तानमधील अंतर्गत अस्थिरतेवरून लक्ष भरकटवण्यासाठी अशा प्रकारची विधाने केली जात असावीत.

### रोहित शेट्टी गोळीबार

घटनेमुळे सिने जगतात एकच खळबळ उडाली होती. हा गोळीबार बिश्नोई गँग कडून करण्यात आल्याची माहिती समोर आली होती. तसेच या प्रकरणी पोलिसांनी आरोपींची घरपकड करण्यात आली होती.

या गोळीबार प्रकरणी कुख्यात लॉरेन्स बिष्णोई टोळीचा साथीदार शुभम लोणकर याच्यासह स्वप्निल सकट (२३), समर्थ पोमाजी (१९), सिद्धार्थ येनपुरे (१९) आणि आदित्य गायकी (१९) या चौघांना पोलिसांनी सुरुवातीलाच अटक केली होती. त्यानंतर तपासाची सुत्रे आणखी वेगाने फिरवत पोलिसांनी एकूण १३ आरोपींना बेड्या ठोकल्या होत्या. त्यानंतर आज गोलू पंडित याच्या रूपात पोलिसांनी चौदाव्या आरोपीला अटक केली आहे.

### एपस्टिन फाईल प्रकरणी

मंत्रिमंडळातील एक मंत्री हरदीप पुरी यांचेही अनेकवेळा एपस्टिन फाईलमध्ये नाव आलेले आहे. अमेरिकेशी केलेल्या व्यापारी करारानेही भारतातील शेतकरी व शेती क्षेत्राचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणार आहे. भारताने अमेरिकेशी तडजोड केली असून नरेंद्र मोदी यांनी भारताचे सार्वभौमत्व व स्वाभिमान गहाण ठेवल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

एपस्टिन फाईलच्या निमित्ताने नरेंद्र मोदी व भारतीय जनता पक्षाचे चाल, चलन, चेहरा व चारित्र्य उघड झाले आहे. रा. स्व. संघ ही भाजपाची मातृसंस्था असून भाजपासाठी निवडणूक प्रक्रियेत सक्रीय भाग घेत असते. भारताची जगात नाच्चकी होत असताना रा. स्व. संघाने नरेंद्र मोदी यांना पंतप्रधापदावर अद्याप का ठेवले आहे, या मागणीसाठी हा संयुक्त मोर्चा आयोजित करण्यात आल्याची माहिती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने दिली आहे.

### ऑनलाइन इलेक्ट्रिक शेगडा

भागात राहायला आहेत. त्यांनी, सोशल मीडियावर इलेक्ट्रिक बर्नरची जाहिरात पाहिली होती. गॅस टंचाईमुळे त्यांनी शेगडी खरेदी करण्याचे निश्चित केले. त्यानंतर त्यांनी जाहिरातीतील मोबाईल नंबरवर संपर्क साधला. सायबर चोरट्यांनी शेगडी खरेदीचे पैसे ऑनलाईन पद्धतीने जमा करावे लागतील, असे त्यांना सांगितले. त्यानंतर चोरट्यांनी त्यांच्या बँक खात्याची माहिती घेतली. या माहितीचा दुरुपयोग करुन चोरट्यांनी ज्येष्ठ नागरिकाच्या बँक खात्यातून तीन लाख दहा हजार रुपये दुसऱ्या एका खात्यात हस्तांतरित केले. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी नुकतीच पोलिसांकडे तक्रार दिली. याप्रकरणाचा पुढील तपास वरिष्ठ पोलिस निरीक्षक संदीप देशमाने करत आहेत.

### जिल्ह्यात संघटित गोतस्करी टोळया

आता ऐरणीवर आला आहे.

पत्रात खासदार बोंडे यांनी स्पष्टपणे नमूद केले आहे की, हिवरखेडमधील नागठाणा येथे गाई एकत्र करून त्या गाड्यांमध्ये भरल्या जातात. अब्दुल रहीम कुरेशी या व्यक्तीने शेत विकत घेऊन तेथे गाई जमा केल्या जातात आणि त्याच ठिकाणाहून गाड्या भरल्या जातात. गाई भरताना पोलिसांनी रेड करणे आवश्यक असल्याचे खासदारांनी पत्रात आवर्जून सुचवले आहे. मात्र पोलिसांचे या गंभीर बाबीकडे अक्षम्य दुर्लक्ष असल्याचे दिसत आहे.

### दहशत पसरविण्याच्या उद्देशाने

तपास एनआयएकडे सोपवण्यात आला. दहशत निर्माण करण्याच्या व्यापक कटाचा आरोप करत यूएपीए अंतर्गत गुन्हा दाखल केला.

बचाव पक्षाने हा गुन्हा साधा खून असून, त्यात दहशतवादाचा कोणताही हेतू नाही, असा युक्तिवाद केला होता. मात्र, न्यायालयाने तो फेटाळत म्हटले की, उपलब्ध पुराव्यांवरून एका विशिष्ट समाजात दहशत निर्माण करण्याचा स्पष्ट हेतू दिसून येतो. साक्षीदारांच्या जबाबांमध्ये खानने बैठकी दरम्यान आपत्ती जनक शब्दांचा वापर केल्याचे नमूद आहे. खान ज्या गटाचा सदस्य होता, त्या गटाने बैठका घेतल्या, लोकांना एकत्र केले आणि कोल्हे यांच्या हत्येचा कट रचला. तसेच हल्लेखोरांना आर्थिक व लॉजिस्टिक मदत पुरविली आणि त्यांना अटक टाळण्यास मदत केली, असा आरोप एनआयएने केला आहे.

**खानचा कोल्हेवर नाहीतर संपूर्ण हिंदू समाजावर राग-** खानचा राग फक्त कोल्हे यांच्यावर नव्हता, तर संपूर्ण हिंदू समाजाविरूद्ध होता. कोल्हे यांची हत्या करून व्यापक हिंदू समाजाला संदेश देण्याचा त्याचा उद्देश होता, असा निष्कर्ष न्यायालयाने काढला.तसेच, यूएपीएच्या कलम १५नुसार दहशतवादी कृत्य ठरवण्यासाठी बंदी घातलेल्या संघटनेचा सहभाग आवश्यक नसतो. व्यक्तीगत स्तरावर ही दहशत निर्माण करण्याच्या हेतूने असे कृत्य केले जाऊ शकते, असे न्यायालयाने स्पष्ट केले. साक्षीदारांचे जबाब आरोपीचा दहशतवादी हेतू सिद्ध करण्यासाठी पुरेसे आहेत.आरोपी रहेबर हेल्पलाइन या मुस्लिम समाजाच्या कल्याणासाठी कार्य करणाऱ्या संस्थेशी संबंधित होता, कोल्हे यांच्याशी त्याचे कोणतेही वैयक्तिक वैर नव्हते. तरीसुद्धा त्याने त्यांच्या हत्येच्या कटात सहभाग घेतल्याचे न्यायालयाने नमूद केले.

### शिव केसरी कुस्ती स्पर्धा

७१ हजार रुपये व चांदीची गदा, द्वितीय ४१ हजार रुपये देण्यात येणार आहे. वरिष्ठ पुरुष विदर्भस्तरीय गटात प्रथम पुरस्कार ३१ हजार रुपये व चांदीची गदा, द्वितीय २१ हजार रुपये बक्षीस ठेवण्यात आले आहे. याशिवाय वरिष्ठ महिला विदर्भस्तरीय गटात प्रथम पुरस्कार २१ हजार व चांदीची गदा, द्वितीय ११ हजार रुपये देण्यात येणार आहे. प्रत्येक वजन गटातील विजेता पैलवानांना रोख बक्षीस देण्यात येईल. स्पर्धा हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या कुस्ती विभागाचे प्रमुख डॉ.संजय तीरथकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार आहे. स्पर्धेसाठी विदर्भ व महाराष्ट्रातील सुमारे २५० ते ३०० नामांकित पैलवान सहभागीं होणार आहे. प्रेक्षकांच्या बसण्याची चांगली व्यवस्था करण्यात आली आहे. दोन दिवस रोमांचक कुस्ती सामने पाहण्याची पर्वणी शहरवासीयांना मिळत आहे. त्याचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पत्रकार परिषद मध्ये नगरसेवक डॉ. संजय तीरथकर , दीपक सम्राट एड.प्रशांत देशपांडे, कौशिक अग्रवाल, समीर डोंगरे, त्रिदेव डेडवाल, रोहित बकरे, अर्जुन डेडवाल, लखन शेरेकर, विशाल वले, कृष्णा श्रीवास नितीन इंगोले, उमेश संकत, राम अहरवार, गोलू पारडीकर, यश गुप्ता, प्रफुल श्रीवास, छोटू धोटे, राज डेंडवाल, तरुण डेडवाल, रिंकू काकडे, पियुष डेंडवाल, बिल्लू गोहर, सिद्धांत चावरे आदि उपस्थित होते.

### शहरात रमजान ईद उत्साहात साजरी

एकमेकांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. सकाळपासूनच रौनक पाहायला मिळाली. ईदगाह मैदानातून गल्लीबोळापर्यंत आनंदाचे वातावरण पसरले होते. लहान मुलांपासून वृद्धांमध्ये पण उत्साह होता. सुरक्षेच्या दृष्टीने पोलिसांचा तगडा बंदोबस्तही यावेळी होता. मेटल डिटेक्टर ने येणाऱ्या जाणाऱ्यांची तपासणी करण्यात येत होती. नवीन कपडे परिधान केलेली लहान मुले ईदीसाठी दिसत होते. घराघरात शीरखुर्मा बनविण्यात आला होता. त्याने सणाचा गोडावा अधिक वाढवला. हा सण माणवता आणि प्रेमाचा संदेश देतो. पोलिसांच्या सतर्कता आणि नागरिकांच्या सहकार्याने हा सण शांततेत आणि उत्साहात पार पडला.

**ईदगाह परिसरात ईद मिलन-** दरवर्षीप्रमाणे यावर्षीही राष्ट्रीय एकता मंच आणि पोलीस आयुक्तालयच्या वतीने ईद-मिलन सोहळा घेण्यात आला. यावर्षी हा सोहळा ईदगाहच्या समोर घेण्यात आला. पोलीस आयुक्त राकेश ओला आणि लोकप्रतिनिधींनी पुष्प देऊन समाज बांधवांना ईदची शुभेच्छा दिली. लहान मुलांना चॉकलेट देण्यात आले. यावेळी पोलीस आयुक्त राकेश ओला, उपायुक्त गणेश शिंदे, श्याम घुगे, ठाणेदार हनुमंत उरलागोंडावार, खासदार बळवंत वानखडे , माजी मंत्री यशोमती ठाकूर, भैया पवार ,विरोधी पक्षनेता विलास इंगोले, नगरसेवक बबलू शेखावत, सुरेश रतावा, जयश्री वानखडे आदि उपस्थित होते. अनेक मान्यवरांनी यामध्ये सहभागीं होत सामाजिक सालोख्याचा संदेश दिला.

### अचलपूर कृषी उत्पन्न बाजार

अनुदान दोन टप्प्यात दिले जाणार आहे. उर्वरित खर्च कृषि उत्पन्न बाजार समितीला स्वतःच्या निधीतून किंवा कर्जाद्वारे उभा करावा लागेल.

**विभागाच्या तांत्रिक मान्यतेचे बंधन -**

बांधकामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाची तांत्रिक मान्यता घेणे अनिवार्य आहे. कामाची निविदा प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने राबवूनच कार्यारंभ आदेश दिले जातील. भवनाची देखभाल आणि दैनंदिन वीज-पाणी देयकांचा खर्च संबंधित बाजार समितीलाच करावा लागेल. परिसरातील हजारो शेतकऱ्यांना दिलासा मिळणार असून, आधुनिक सुविधांनी युक्त असे हे भवन या भागातील कृषी विकासासाठी मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास व्यक्त होत आहे.

### मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांच्या

शक्यता व्यक्त केली जात होती. मात्र, आता समोर आलेल्या नव्या माहितीनुसार त्यांची तात्काळ बदली होणार नसून पुढील महिन्यात निर्णय होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, त्या २५ किंवा २६ मार्चपासून सुमारे १५ ते २० दिवसांच्या रजेवर जाणार असून, या काळात मनपाचा कारभार प्रभारी आयुक्तांकडे सोपवला जाईल. त्यांच्या रजेवरून परतल्यानंतर राज्य सरकारच्या जनरल ट्रान्सफरमध्ये त्यांच्या बदलीचा निर्णय होऊ शकतो, अशी चर्चा आहे.

दरम्यान, जर बदली झालीच तर त्यांच्या जागी नवीन आयुक्ताची नियुक्ती केली जाईल. अन्यथा, त्यांच्या मातृत्व रजेच्या काळात प्रभारी आयुक्तांमार्फतच प्रशासन चालवले जाईल.

एकूणच, आयुक्त सौम्या शर्मा यांच्या रजा आणि संभाव्य बदलीमुळे अमरावती महानगरपालिकेच्या कामकाजावर आणि सुरू असलेल्या विकास योजनांवर काय परिणाम होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. आता राज्य सरकारच्या आगामी निर्णयाकडेच सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

### उन्हाळ्यातील सुट्ट्यामध्ये धावणार

वातानुकूलित द्वितीय, सहा वातानुकूलित तृतीय, नऊ शयनयान, चार सामान्य द्वितीय आणि एक सामान्य द्वितीय श्रेणी-सह-गार्ड ब्रेक व्हॅन अशी गाडीची संरचना राहणार आहे. गाडी क्रमांक ०१४६७ विशेष ०३ एप्रिल रोजी पुणे येथून १५.५० वाजता सुटेल आणि नागपूर येथे दुसऱ्या दिवशी ०६.३० वाजता पोहोचेल. गाडी क्रमांक ०१४६८ विशेष गाडी दिनांक ४ एप्रिल रोजी नागपूर येथून ८ वाजता सुटेल आणि पुणे येथे त्याच दिवशी २३.३० वाजता पोहोचेल. या गाडीला उरुळी, दौंड कॉर्ड लाईन, अहिल्यानगर, बेलापूर, कोपरगाव, मनमाड, जळगाव, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला, बडनेरा, धामणगाव आणि वर्धा रेल्वेस्थानकावर थांबा राहील. दोन वातानुकूलित द्वितीय, चार वातानुकूलित तृतीय, आठ शयनयान, चार सामान्य द्वितीय आणि एक सामान्य द्वितीय श्रेणी-सह-गार्ड ब्रेक व्हॅन अशी गाडीची संरचना राहणार आहे.

### जुन्या वादातुन तरुणावर

चेतन यांच्यावर सपासप वार केले. या हल्ल्यात चेतन गंभीर जखमी झाले आणि त्यांना तत्काळ जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. घटनेनंतर, आरोपी मुकेश गावंडे यांनीही आपली तक्रार दाखल करून चेतन अरुणराव चोरे (वय ३८) यांच्याविरुद्ध मारहाणीचा गुन्हा नोंदवला आहे. या प्रकारामुळे परिसरात संताप आणि भीतीचे वातावरण पसरले असून पोलीस दोन्हीकडून तपास करत आहेत.

### आराधना शॉपिंग मॉल मध्ये

लाडली भगिनींनाच नव्हे, तर प्रत्येक ग्राहकाला प्रत्येक खरेदीवर हमीची भेटवस्तू दिली जात आहे. महाराष्ट्र तसेच विदर्भातील विविध भागांतून ग्राहक खरेदीसाठी येथे येत आहेत.

या योजनेत अनेक ग्राहकांना आकर्षक बक्षिसे मिळाली आहेत. नांदेड जिल्ह्यातील बरहाळी येथील अशोक रावणगावकर यांना वॉशिंग मशीन व रेफ्रिजरेटर मिळाले. वाशिम जिल्ह्यातील मनोरा येथील रवींद्र सदाशिवराव पाटील यांना रेफ्रिजरेटर मिळाला, तर अकोला येथील अरुण रावसाहेब देशमुख यांना वॉशिंग मशीन मिळाली.

लग्नसराईच्या पार्श्वभूमीवर शहरवासीयांसाठी ही योजना सुरू करण्यात आल्याची माहिती मॉलचे संचालक हबलानी परिवाराने दिली. या योजनेचा मोठ्या संख्येने ग्राहक लाभ घेत असल्याचेही त्यांनी सांगितले.

गेल्या अनेक वर्षांपासून कपड्यांच्या व्यवसायात विश्वासार्ह ब्रँड म्हणून ओळख असलेल्या आराधना होलसेल शॉपिंग मॉलमध्ये ग्राहकांच्या सोयी-सुविधांना नेहमीच प्राधान्य दिले जाते. प्रत्येक ग्राहकाला अगदी लहान खरेदीतूनही समाधानकारक अनुभव मिळावा, यासाठी मॉल व्यवस्थापन सातत्याने प्रयत्नशील आहे.

२१ फेब्रुवारीपासून सुरू करण्यात आलेल्या या योजनेअंतर्गत, ग्राहकांना एल-२, बिझीलँड तसेच जवाहर रोड येथील मॉलच्या शाखांमध्ये किमान ५,००० ची खरेदी केल्यास आकर्षक भेटवस्तू दिल्या जातात. ग्राहक जितकी जास्त खरेदी करतील, तितक्या अधिक भेटवस्तू मिळतील. या मॉलमध्ये बनारसी शाली, डिझायनर साड्या, घागरा-ओढणी, सलवार सूट, ड्रेस मटेरियल, रेडीमेड कपडे, शूटिंग-शर्टिंग, किशोरवयीन तसेच लहान मुलांचे कपडे, याशिवाय फॅशन ॲक्सेसरीज, दागिने, शूज-सँडल, गृहसजावट व मॅचिंग साहित्य एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात आले आहे.या योजनेचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन हबलानी परिवाराने केले आहे.

### पोलीस आयुक्तालयातील तक्रार

दुपारी तीन ते पाच वाजेपर्यंत पोलीस आयुक्तालयमध्ये हे आयोजन करण्यात येणार आहे. पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी नागरिकांना तक्रार निवारण दिनामध्ये आपल्या तक्रारी सादर करण्याचे आवाहन केले आहे.

### रमजान ईद मानवतेचा संदेश


हा सण समाजात शांतता आणि सौहार्द वाढविण्यासाठी प्रेरणादायी आहे,' असे मत त्यांनी व्यक्त केले.या कार्यक्रमात तालुकाध्यक्ष नामदेवराव तनपुरे,शहराध्यक्ष श्रीकांत झोडपे,राहुल गवई, कैलास आवारे, एहतेशाम नबिल, राहुल गाठे, नगरसेवक सईद मौलाना, कदीर पहेलवान, प्रमोद कांबळे, राजा वंदू, विशाल खानजोडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. सर्वांनी मुस्लिम बांधवांना शुभेच्छा देत सणाच्या आनंदात सहभागी होत सामाजिक एकतेचा संदेश दिला. अचलपूर शहरात सर्व धर्मीय नागरिकांनी एकत्र येऊन सण साजरे करण्याची परंपरा कायम असून, रमजान ईदच्या निमित्ताने सर्वांच्या आयुष्यात सुख, शांती आणि समृद्धी नांदो, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
अकोला । वाशिम । बुलडाणा
■ रविवार, २२ मार्च २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

# वनोजा येथे नळ योजनेला विलंब
# नागरिकांवर भीषण पाणीटंचाईचे संकट

■ प्रतिनिधी | मंगरूळपीर ■

**वाशिम जिल्ह्यातील मंगरूळपीर तालुक्यातील वनोजा गावात पाणीटंचाईचे गंभीर संकट निर्माण झाले असून, जल जीवन मिशन अंतर्गत सुरू असलेल्या नळ पाणीपुरवठा योजनेच्या कामाला झालेल्या विलंबामुळे नागरिकांच्या अडचणीत मोठी भर पडली आहे. तब्बल ४ कोटी ९५ लाख २४ हजार ३०० रुपयांच्या या योजनेचे काम जुलै २०२४ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र, निर्धारित मुदत उलटूनही हे काम अद्याप अपूर्णच असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण आहे.**



वनोजा गावात सध्या पाण्याची स्थिती अत्यंत चिंताजनक बनली आहे. वाढत्या उन्हामुळे येथील अनेक विहिरींनी तळ गाठला असून काही विहिरी पूर्णपणे कोरड्या पडल्या आहेत. त्यामुळे नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. जल जीवन मिशन अंतर्गत राबविण्यात येणारी नळ पाणीपुरवठा योजना ही ग्रामीण भागातील नागरिकांना शुद्ध व नियमित पाणी उपलब्ध करून देण्यासाठी महत्त्वाची मानली जाते. मात्र, वनोजा येथे या योजनेचे काम रखडल्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. यामुळे शासनाच्या हर घर जल नळ योजनेला अधिकारी जाणीवपूर्वक करतात की काय हा प्रश्न याचा निर्माण होऊ लागला आहे.

येत्या काही दिवसांत तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता असल्याने पाणीटंचाईची समस्या अधिक गंभीर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. जर वेळेत उपाययोजना केल्या नाहीत, तर गावात भीषण पाणी संकट उभे राहील यामुळे संबंधित विभागाने या योजनेच्या कामाला गती देऊन ते तातडीने पूर्ण करावे आणि गावाला लवकरात लवकर नळाद्वारे पाणीपुरवठा सुरू करावा, अशी मागणी वनोजा येथील नागरिकांनी केले आहे.

वनोजा येथे अनेक काळापासून पाणी टंचाई आहे त्यामुळे शासनाने मोठा खर्च करत जल जीवन मिशन अंतर्गत गावात तीन वर्षांपूर्वी नळ योजनेचे काम चालू केले मात्र ते अजूनही अपूर्ण अवस्थेत आहेत. प्रशासनाने याकडे लक्ष देऊन लवकरात लवकर हे काम पूर्ण करावे आणि ग्रामस्थांना याद्वारे पाणीपुरवठा करावा अन्यथा आम्हाला आंदोलन करावा लागेल.

**संजय काळे,** ग्रामस्थ वनोजा

....................

आमच्या गावात जल जीवन मिशन योजनेचे काम चालू आहे त्यांनी गावातील रस्तेही उकळून ठेवले आहेत. मात्र अजूनही पाण्याचा पत्ता नाही गावातील विहिरीही आटल्या आहेत. शासनाने याची दखल घेऊन पाण्याची व्यवस्था करावी.

**धिरज राऊत,** ग्रामस्थ वनोजा

# वाशीम जिल्ह्यात रमजान ईद उत्साहात साजरी !




■ प्रतिनिधी | वाशिम ■

दरवर्षीप्रमाणे यंदाही ईद-उल-फित्र हा पवित्र सण देशभरात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. वाशीम जिल्ह्यातही मुस्लिम बांधवांनी मोठ्या आनंदात आणि धार्मिक वातावरणात रमजान ईद साजरी केली. सकाळपासूनच ईदगाह परिसरात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. यावेळी मोठ्या संख्येने मुस्लिम बांधव नमाज अदा करण्यासाठी एकत्र आल्याचे दिसून आले.

वाशीम शहरातील ईदगाहवर सकाळी ९:३० वाजता ईद-उल-फित्र अर्थात रमजान ईदची सामूहिक नमाज अदा करण्यात आली. नमाज पठणानंतर जगात शांतता, सौहार्द आणि बंधुभाव नांदावा यासाठी विशेष दुआ करण्यात आली. त्यानंतर मुस्लिम बांधवांनी एकमेकांना गळाभेट देत 'ईद मुबारक'च्या शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी मोठ्या संख्येने मुस्लिम बांधव ईदगाहवर एकवटले होते. नवीन कपडे, अत्तराचा सुगंध आणि आनंदी वातावरणामुळे परिसरात सणाचा खास रंग दिसून येत होता. वाशीम शहरासह रिसोड, मालेगाव, मंगरूळपीर, कारंजा आणि मानोरा तालुक्यातही रमजान ईद शांततेत आणि उत्साहात साजरी करण्यात आली. सर्वत्र बंधुभाव, एकता आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.

दरम्यान, सणाच्या पार्श्वभूमीवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासनाकडून ईदगाह तसेच शहरातील महत्त्वाच्या ठिकाणी कडक बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. वाशीम जिल्ह्यात रमजान ईदचा सण उत्साह, आनंद आणि शांततेच्या वातावरणात साजरा झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

# पत्रकारांच्या मागण्या समस्या पोहोचल्या मुख्यमंत्री यांच्या दालनात



## पत्रकार निलेश सोमानी यांचा पुढाकार

■ प्रतिनिधी | वाशिम ■

लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ असलेल्या पत्रकारांच्या विविध प्रलंबित मागण्या व वृत्तपत्र विक्रेता यांच्या विविध मागण्या संदर्भात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते पत्रकार निलेश सोमानी यांनी वाशिम मंगरूळपीर विधानसभा आमदार श्याम खोडे यांच्या नेतृत्वात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वर्षा निवासस्थानी भेट घेऊन चर्चा केली व निवेदन दिले. वाशीम येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय अधिवेशनात घेतलेल्या ठरावाची प्रत मुख्यमंत्री यांना देण्यात आली पत्रकारांचे आर्थिक विकास महामंडळ व वृत्तपत्र विक्रेत्यांचे महामंडळ लवकर स्थापन करून पत्रकारांचे सर्व प्रश्न मार्गी लावावे अशी मागणी यावेळी निलेश सोमानी यांनी केली. आ. शाम खोडे व निलेश सोमानी यांच्या हस्ते पत्रकाराचे अधिवेशनात सर्वांना देण्यात आलेली विशेष भेटवस्तू किट देऊन मुख्यमंत्री यांचा सत्कार करण्यात आला.

# चालत्या बसमधील दागिने चोरी करणारी टोळी जेरबंद

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

■ प्रतिनिधी | वाशिम ■



चालत्या बसमध्ये प्रवाशांच्या पर्स व दागिन्यांची चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करण्यात स्थानिक गुन्हे शाखा, वाशिम यांना यश आले असून तीन महिलांना अटक करण्यात आली आहे. त्यांच्या ताब्यातून चोरी गेलेला मुद्देमालही जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमुळे जिल्ह्यातील बसप्रवाशांमध्ये दिलासा निर्माण झाला आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक १३ मार्च २०२६ रोजी निर्मला दिलीप श्रीनाथ (रा. रिसोड) या रिसोडहून उमरखेडकडे बसने प्रवास करत असताना अनसिंग परिसरात चालत्या बसमध्ये त्यांची पर्स चोरीस गेली होती. या पर्समध्ये सोन्याची पोथ व नगदी रक्कम होती. याप्रकरणी पोलीस स्टेशन अनसिंग येथे गुन्हा क्रमांक ८२/२०२६, कलम ३०३(२) भारतीय न्याय संहिता अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या गुन्ह्याचा समांतर तपास करताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अनसिंग परिसरात तपास सुरू केला असता बसमध्ये चोरी करणाऱ्या काही महिलांचा सहभाग असल्याची माहिती समोर आली. दरम्यान, २० मार्च २०२६ रोजी वाशिम बसस्थानक येथे काही महिला संशयास्पद हालचाली करत असल्याची गोपनीय माहिती मिळाली.

पोलीस निरीक्षक प्रदीप परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने तात्काळ बसस्थानक परिसरात सापळा रचून संबंधित महिलांना महिला पोलीस कर्मचाऱ्यांच्या मदतीने ताब्यात घेतले. पोलीस स्टेशन अनसिंग येथे नेऊन चौकशी केली असता त्यांनी १३ मार्च रोजी बसमध्ये चोरी केल्याची कबुली दिली. अटक करण्यात आलेल्या आरोपी महिलांमध्ये लक्ष्मी व्यंकटेश गड्डी (वय ३५), कविता अशोक गड्डी (वय ३०) व गंगम्मा उलगया गड्डी (वय ५०) या सर्व रा. चिखलठाणा, जि. संभाजीनगर येथील रहिवासी आहेत. त्यांच्या ताब्यातून चोरी गेलेले दागिने व इतर मुद्देमाल जप्त करण्यात आला असून पुढील तपास अनसिंग पोलीस करत आहेत. या महिलांकडून आणखी गुन्हे उघड होण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

दरम्यान, पोलीस स्टेशन रिसोड येथील गुन्हा क्रमांक ११८/२०२६ च्या तपासातही स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई करत संतोष सुदाम पवार (रा. रिसोड) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून चोरीस गेलेली मोटारसायकल जप्त करून ती रिसोड पोलिसांच्या ताब्यात देण्यात आली आहे. त्याच्याकडून परिसरातील इतर चोरीच्या घटनांबाबतही महत्त्वाची माहिती मिळण्याची शक्यता आहे.

# अंतरिक्ष पार्श्वनाथ संस्थानात चैत्र प्रतिपदेचे मंगल ध्वजारोहण उत्साहात

■ प्रतिनिधी | मालेगाव ■


शिरपूर येथील जगप्रसिद्ध दिगंबर जैन अंतरिक्ष पार्श्वनाथ संस्थानात १९ मार्च २०२६ रोजी चैत्र शुक्ल प्रतिपदा (गुढीपाडवा) निमित्त अत्यंत भक्तीमय वातावरणात मंगल ध्वजारोहण सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

सकाळी ठीक ९ वाजता दिगंबर जैन समाजाच्या मोठ्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. ध्वजारोहणाचा संपूर्ण विधी बालब्रह्मचारी तात्याभैय्या नेजकरजी यांच्या मार्गदर्शनाखाली शास्त्रोक्त पद्धतीने पार पडला. यावेळी देवेंद्र महाजन, आकाश महाजन व अनिल सातपुते यांना ध्वजारोहणाचा मान मिळाला. या सोहळ्याला उपाध्याय मुनिश्री १०८ विस्तृत सागरजी महाराज, मुनीश्री १०८ संकल्प सागरजी व मुनीश्री १०८ निर्वेद सागरजी यांचे पावन सान्निध्य लाभले. त्यांच्या उपस्थितीमुळे संपूर्ण परिसरात मांगल्याचे वातावरण निर्माण झाले होते.

यावेळी मार्गदर्शन करताना ऐलक श्री १०५ सिद्धांत सागरजी यांनी ध्वजारोहणाच्या ऐतिहासिक व न्यायालयीन पार्श्वभूमीवर प्रकाश टाकला. त्यांनी सांगितले की, दिगंबर जैन समाजाकडून हा ध्वजारोहण सोहळा शेकडो वर्षांपासून सातत्याने साजरा केला जात आहे. तसेच ४-१० प्रकरणात साक्षीदार बाळकृष्ण काळे यांनी दिलेल्या जबानीनुसार दरवर्षी त्यांच्या घरून ध्वज मंदिराकडे नेण्यात येत असल्याचे स्पष्ट पुरावे उपलब्ध आहेत. या ऐतिहासिक पुराव्यांच्या आधारे सन १९८२ मध्ये एसडीएम न्यायालयाने दिगंबर जैन समाजाला ध्वजारोहणाचा कायदेशीर अधिकार बहाल केला होता.

# अकोल्याचे सुनील गोहर यांचा 'ग्रीन पॅटर्न' राज्यासाठी आदर्श

■ प्रतिनिधी | अकोला ■



वैशाखातील कडक उन्हाची चाहूल लागताच मानवासह पक्ष्यांनाही पाण्यासाठी भटकंती करावी लागते. याच संवेदनशील जाणिवेतून अकोल्यातील वृक्षमित्र व सामाजिक कार्यकर्ते सुनील गोहर यांनी गेल्या दोन दशकांपासून पक्षी संवर्धनाची अनोखी चळवळ उभी केली आहे. जागतिक चिमणी दिनाचे औचित्य साधत यंदाही त्यांनी शहरातील विविध भागांत सुमारे २०० मातीची जलपात्रे बसवून मुक्या पाखरांसाठी दिलासा निर्माण केला आहे.

महानगरपालिका परिसरासह शहरातील प्रमुख ठिकाणी उभारण्यात आलेल्या या जलपात्रांमुळे चिमण्यांसह इतर पक्ष्यांची तहान भागत असून, उन्हाळ्यातील कठीण काळात हा उपक्रम जीवनदायी ठरत आहे. विशेष म्हणजे, हा संपूर्ण उपक्रम गोहर यांनी स्वखर्चातून राबविला आहे. सुनील गोहर यांचे कार्य केवळ जलपात्रांपुरते मर्यादित नसून, त्यांनी गेल्या २० वर्षांत अकोला शहरात २० हजारांहून अधिक वृक्षांची लागवड करून त्यांचे संगोपन केले आहे. आज हेच वृक्ष हजारो पक्ष्यांचे निवासस्थान बनले आहेत. त्यांच्या या कार्यात कुटुंबीय व मित्रपरिवारही सक्रियपणे सहभागी आहे. पर्यावरण संवर्धनासोबतच दिव्यांगांना मदत, 'बेटी बचाव' आणि व्यसनमुक्ती यांसारख्या सामाजिक उपक्रमांतही गोहर यांनी उल्लेखनीय योगदान दिले आहे. वाढत्या शहरीकरणामुळे नैसर्गिक जलस्रोत आटत असताना, त्यांच्या या उपक्रमामुळे पक्ष्यांना मोठा आधार मिळत आहे.

कोणत्याही प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता सातत्याने सुरू असलेला हा 'ग्रीन पॅटर्न' राज्यासाठी आदर्श ठरत असून, त्यांच्या कार्याची दखल शासनाने घेण्याची मागणी होत आहे. अशा निसर्गसेवकाचा सन्मान झाल्यास पर्यावरण संवर्धनाच्या चळवळीला नवी ऊर्जा मिळणार आहे.

### निसर्गपुत्राच्या सन्मानाची प्रतीक्षा

वृक्षारोपण आणि पक्षी संवर्धनाच्या क्षेत्रात सुनील गोहर यांनी केलेले कार्य ही एक व्यापक चळवळ ठरत आहे. २० हजार वृक्षांची जोपासना आणि हजारो पक्ष्यांची तहान भागविणाऱ्या या निसर्गपुत्राला आता शासनाच्या अधिकृत सन्मानाची प्रतीक्षा आहे.

# 'नामस्मरणातूनच आत्म्यात परमात्म्याचा दिव्य अनुभव' – सिद्ध सद्गुरू शांतिनाथ महाराज

■ प्रतिनिधी | कारंजा ■



कारंजा येथून जवळच असलेल्या रामगाव रामेश्वर येथील श्रीनाथ योगाश्रमात दि.१६ मार्च रोजी पार पडलेल्या भव्य आध्यात्मिक सोहळ्यात सिद्ध सद्गुरू शांतिनाथ महाराज यांच्या प्रभावी प्रवचनाने भक्तिमय वातावरण अधिकच भारावून गेले. आपल्या ओजस्वी वाणीने उपस्थित हजारो भक्तांना मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले की, देव आणि भक्त यांच्यात भेद नाही; नामस्मरणाच्या साधनेतूनच आत्म्यात परमात्म्याचा दिव्य अनुभव प्राप्त होतो.

मानवाने आयुष्यात नम्रता अंगीकारणे अत्यंत आवश्यक असल्याचे सांगताना महाराजांनी महाभारतातील धृतराष्ट्राला युद्धभूमीवरील सर्व घटनांची माहिती देणाऱ्या संजयाचे उदाहरण देत नम्रतेचे महत्त्व स्पष्ट केले. संतांच्या चरित्रातून आणि त्यांच्या अनुभवांतूनच खरी आध्यात्मिक दिशा मिळते, असेही त्यांनी नमूद केले. गीतेतील श्रीकृष्ण, अर्जुन, संजय आणि धृतराष्ट्र यांच्यातील संवाद त्यांनी अत्यंत सोप्या व प्रभावी भाषेत उलगडून सांगितल्याने श्रोते मंत्रमुग्ध झाले. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी श्री गुरुचरण पादुका व श्री काशीविश्वेश्वर शिवलिंगाच्या प्राणप्रतिष्ठा वर्धापन दिनानिमित्त दि.१४ ते १६ मार्च २०२६ या कालावधीत श्री नवनाथ ग्रंथ पारायण व शिव गायत्री महायज्ञाचे भव्य आयोजन करण्यात आले होते.

# शहरात विकासाची नवी पहाट : महावीर उद्यान व व्यापारी संकुलाच्या भूमिपूजन सोहळ्यांची घोषणा

■ प्रतिनिधी | कारंजा ■

शहराच्या सर्वांगीण विकासाला गती देणारे दोन महत्त्वपूर्ण प्रकल्प आता प्रत्यक्षात साकार होण्याच्या मार्गावर असून, रविवार दि. २२ मार्च रोजी त्यांच्या भूमिपूजन सोहळ्यांचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यांमुळे कारंजा शहराच्या सौंदर्यात आणि आर्थिक प्रगतीत भर पडणार असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

शहरातील महावीर उद्यान विकसित करण्याच्या कामाचा भूमिपूजन सोहळा सकाळी १० वाजता पार पडणार आहे. सुमारे १ कोटी रुपयांच्या निधीतून हा प्रकल्प साकार होणार असून, नागरिकांसाठी आधुनिक सुविधा, हरित वातावरण आणि विश्रांतीसाठी उत्कृष्ट जागा उपलब्ध होणार आहे. शहराच्या मध्यवर्ती भागात असलेले हे उद्यान भविष्यात नागरिकांचे आकर्षण केंद्र ठरणार आहे.

त्यानंतर सकाळी १०.१५ वाजता (पूर्वनियोजित वेळेनुसार) शहरातील शीट क्र. ११ डी, भूखंड क्र. १/३ (बस स्थानकाच्या शेजारी) येथे ५ कोटी रुपयांच्या व्यापारी संकुलाच्या बांधकामाचा भूमिपूजन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या प्रकल्पामुळे स्थानिक व्यापाराला चालना मिळणार असून, रोजगाराच्या नव्या संधीही निर्माण होणार आहेत.

दोन्ही सोहळे कारंजा-मानोरा विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सईताई प्रकाश डहाके यांच्या शुभहस्ते संपन्न होणार आहेत. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान दत्तराजजी डहाके (माजी नगराध्यक्ष) आणि नरेंद्रजी गोलेच्छा (माजी नगराध्यक्ष) भूषवणार आहेत.

यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून शालिनीताई ठाकरे (गटनेता, भाजपा नगर परिषद कारंजा तथा नगरसेविका) आणि अमितजी संगेवार (शहर अध्यक्ष, भाजपा) यांची उपस्थिती लाभणार आहे.

भारतीय जनता पार्टी, कारंजा शहर यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

एकूणच, या दोन्ही महत्त्वपूर्ण प्रकल्पांच्या माध्यमातून कारंजा शहराच्या विकासाला नवे बळ मिळणार असून, नागरिकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवून आणण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

# नवोदयच्या प्रवेश परिक्षेत सुजाता सरकटे जिल्ह्यात प्रथम

■ प्रतिनिधी | वाशिम ■



मालेगाव तालुक्यातील झोडगा खुर्द येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थीनी सुजाता भिमराव सरकटे हिने शिक्षक विकास वाझुळकर यांच्या मार्गदर्शनात नवोदयच्या प्रवेश परिक्षेमध्ये ९७.५० गुण मिळवून मागासवर्गीय मुलीमधून जिल्ह्यात प्रथम पटकावित गौरवशाली यश संपादन केले आहे. या यशाबद्दल शिक्षक व गुणवंत विद्यार्थीनीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

अतिशय कठीण समजल्या जाणाड्या स्पर्धात्मक परिक्षेत झोडगा येथील जिल्हा परिषद शाळेच्या सुजाता सरकटे हिने अतिशय जिल्ह्यातून एकूण विद्यार्थ्यांमधून १२ वा क्रमांक मिळविला. तर, मागासवर्गीय मुलींमधून प्रथम क्रमांक मिळवून शाळेचे तसेच गावाचे नाव शिक्षण पटलावर आणले आहे. जिद्द, मेहनत, चिकाटी आणि अभ्यासातील सातत्यामुळे तिने हे यश संपादन केले. जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी ससाणे, जिल्हा परिषद उपशिक्षणाधिकारी डाबेराव यांनी शाळा भेटी दरम्यान नवोदय परीक्षेची तयारी करणाऱ्या सर्व मुलांचे कौतुक करून त्यांना मार्गदर्शन केले. तसेच मालेगाव पंचायत समितीचे गट शिक्षणाधिकारी परांडे, अमानीचे केंद्र प्रमुख बोरकर यांच्या सतत होणाऱ्या भेटीमधून सर्व विद्यार्थ्यांना प्रेरणा व मार्गदर्शन मिळाले.

# मालेगावात बेकायदेशीर खनिज वापराचा मोठा प्रकार उघड
# प्रशासनावर कारवाईसाठी दबाव !

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

मालेगाव शहरातील सुरू असलेल्या रस्ते व नाली बांधकामांमध्ये मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर खनिजांचा वापर होत असल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे यासंदर्भात वंचित बहुजन आघाडीचे महासचिव संदीप पखाले यांनी तहसीलदार यांना निवेदन देत तात्काळ चौकशी व कठोर कारवाईची मागणी केली आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, शहरातील विविध भागांमध्ये सिमेंट रस्ते व नाली बांधकामे सुरू असताना मोठ्या प्रमाणात मुरूम, खडी, रेती यांचा वापर केला जात आहे मात्र, या खनिजांच्या वापरासाठी आवश्यक शासकीय परवानग्या घेतल्या गेल्या आहेत का, याबाबत गंभीर शंका व्यक्त करण्यात आली आहे विशेष म्हणजे, अनेक ठिकाणी रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणात खनिज साहित्य उतरवले जात असल्याचेही निदर्शनास आले आहे त्यामुळे महसूल विभागाला मोठ्या प्रमाणावर आर्थिक फटका बसत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच, संबंधित विभागातील काही कर्मचाऱ्यांकडून या प्रकाराकडे दुर्लक्ष होत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे या पार्श्वभूमीवर संबंधित बांधकामांची प्रत्यक्ष पाहणी करून, वापरण्यात आलेल्या खनिजांचे मोजमाप करावे, कंत्राटदारांकडे आवश्यक परवानग्या आहेत का याची खातरजमा करावी, आणि बेकायदेशीर वापर आढळल्यास संबंधितांवर दंडात्मक व फौजदारी कारवाई करावी, अशी मागणी संदीप पखाले यांनी केली आहे. तसेच, या निवेदनाची प्रतिलीपी
जिल्हाधिकारी, वाशिम, उपविभागीय अधिकारी (महसूल), वाशिम तसेच पोलीस निरीक्षक, मालेगाव यांना देण्यात आल्यामुळे या प्रकरणाची दखल उच्चस्तरावर घेतली जावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. नियमांचे उल्लंघन करून शासनाच्या महसुलात नुकसान करणाऱ्यांवर कठोर कारवाई करून महसूल वसूल करावा, अन्यथा



आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे या प्रकरणामुळे शहरातील विकासकामांच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, प्रशासन यावर काय भूमिका घेते याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ११४ ■ रविवार, २२ मार्च २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

# दिव्यांग सशक्तीकरणाचा नवा संकल्प; 'पर्पल फेअर २०२६' तून उभारीचा संदेश

## -शासनाच्या योजनांचा लाभ घ्या; दिव्यांगांना स्वावलंबी बनविण्यासाठी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांचे आवाहन

**वर्धा जनमाध्यम :** दिव्यांगांना स्वावलंबी व सक्षम करण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करत असून त्यांनी विविध शासकीय योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी केले. सामाजिक न्याय भवन येथे आयोजित पर्पल फेअर २०२६ उपक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालयाच्या दिव्यांगजन सशक्तीकरण विभागांतर्गत, अली यावर जंग राष्ट्रीय वाक व श्रवण दिव्यांगजन संस्था, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली नागपूर येथील समेकित क्षेत्रीय कौशल्य विकास, पुनर्वसन व दिव्यांगजन सशक्तीकरण केंद्राच्या वतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



या कार्यक्रमाला मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुरज गोहाड, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमोल भोसले, गटविकास अधिकारी समर्थ शेवाळे, जिल्हा समाज कल्याण अधिकारी प्रतिभा भागवतकर, संचालक प्रफुल शिंदे, आशिष कुचेवार, डॉ. संजय गाठे, संजय जाधव यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

पालकमंत्री डॉ. भोयर यांनी सांगितले की, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी जिल्हा परिषद शेष निधीतून किसान विकास पत्राचे वितरण करण्यात आले असून लवकरच आणखी २१ विद्यार्थ्यांना याचा लाभ देण्यात येणार आहे. यासाठी १० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली असून ४५५ लाभार्थ्यांची नोंदणी झाली आहे.

जिल्ह्यात प्रथमच राबविण्यात आलेल्या या उपक्रमात १२ दिव्यांग शाळांचा सहभाग होता. मतीमंद, मुकबधीर व इतर दिव्यांग विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे सादरीकरण करत उपस्थितांची मने जिंकली. यामुळे त्यांच्या प्रतिभेला व्यासपीठ मिळाले आहे.यावेळी दोन दिव्यांगांना स्कुटी, दृष्टीबाधित विद्यार्थ्यांना ब्रेल किट तसेच विविध योजनांचा लाभ वितरित करण्यात आला. उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षक व दिव्यांगांचाही सत्कार करण्यात आला.

दरम्यान, जिल्ह्यात अद्याप ६६२ दिव्यांगांनी यूडीआयडी कार्ड काढलेले नसल्याने त्यांनी तातडीने नोंदणी करून शासकीय योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

या उपक्रमामुळे वर्धा जिल्ह्यात दिव्यांग सशक्तीकरणाच्या दिशेने एक सकारात्मक पाऊल उचलले गेले असून समाजात आशेचा नवा किरण निर्माण झाला आहे.

### ३० वर्षं फक्त आश्वासनं...

# घर कुठेः भगवा गावात नाथजोगी समाजाचा संताप उसळला

## -पूरात वाहतो संसार, आणि 'कार्यसम्राट' फक्त घोषणांतच?

**वर्धा । हिंगणघाट । जनमाध्यम :** एकीकडे विकासाच्या घोषणा, स्मार्ट गावांचे गाजावाजा आणि दुसरीकडे भगवा गावात गेली तब्बल ३० वर्षे 'घर' या मूलभूत हक्कासाठी झगडणारा नाथजोगी समाज ही केवळ उपेक्षा नाही, तर प्रशासनाच्या संवेदनशीलतेवरच प्रश्नचिन्ह उभं करणारी वस्तुस्थिती आहे.





१९८६-८७ साली यशोदा नदीच्या काठावर अवघ्या पाच कुटुंबांनी तात्पुरता आसरा घेतला. आज ही संख्या वाढून सुमारे ७० कुटुंबांवर पोहोचली, पण परिस्थिती मात्र 'जैसे थे'च ना जमिनीचा हक्क, ना पक्कं घर फक्त झोपड्या आणि त्यात जगण्याची लाचारी,

दरवर्षी पावसाळा आला की या कुटुंबांसाठी तो सण नसून संकट ठरतो. यशोदा नदीला पूर आला की पाणी थेट घरात घुसतं आणि क्षणात संसार उद्धवस्त होतो. लेकरांना कवटाळून, रात्रभर जागून, जीव मुठीत धरून जगणं हीच त्यांची दिनचर्या शिक्षण, आरोग्य, रोजगार सगळंच पुराच्या पाण्यात वाहून जातं.

या अन्यायाविरोधात समाजाने ग्रामपंचायत, पंचायत समिती, तहसील कार्यालय अशी सगळी दारे ठोठावली. प्रस्ताव गेले, फाईल्स फिरल्या, आश्वासनं मिळाली, पण निर्णय मात्र शून्य, प्रशासनाचं ठरलेलं उत्तर ही जमीन वन विभागाची आहे,

मात्र, याच जागेवर काही सधनांनी दोन मजली पक्की घरे उभारल्याचं वास्तव समोर आलं की संताप आणखी भडकतो. आमच्यावरच अन्याय का असा प्रश्न नाथजोगी समाज विचारतोय.

याहून गंभीर बाब म्हणजे, हा सगळा प्रकार स्थानिक आमदार समीर कुणावर यांच्या मतदारसंघात घडतो आहे. 'कार्यसम्राट' म्हणून ओळख असलेल्या आमदारांच्या क्षेत्रातच गरीबांना घरासाठी तीन दशकं प्रतीक्षा करावी लागत असेल, तर ही केवळ प्रशासनाची चूक म्हणायची का, की लोकप्रतिनिधींचं अपयश?

विधानसभेत प्रश्न उपस्थित झाला, मंत्र्यांनी आश्वासनं दिली, पण प्रत्यक्षात काहीच हालचाल नाही. कागदोपत्री विकास आणि जमिनीवरील वास्तव यातली दरी भगवा गावात ठळकपणे दिसून येते.पूर आला की गावाचा संपर्क तुटतो. शाळा, बाजारपेठ, दवाखाने सगळं दूर जातं. लहान मुलांचं शिक्षण खंडित होतं, आजारपण वाढतं, आणि जीवन अक्षरशः ठप्प होतं. तरीही या समाजाला मिळतो तो फक्त 'वाट पाहा' हा सल्ला, तीस वर्षं उलटली पिढ्या बदलल्या पण प्रश्न तसाच आहे.

घर कधी मिळणार? न्याय कधी मिळणार?

भगवा गावातील नाथजोगी समाज आता शांत नाही. त्यांचा आक्रोश उफाळून आला आहे.

आता प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी निर्णय घ्यायची वेळ आली आहे.

# शासनाचा निर्णय की जनतेवर अन्याय : सिलिंडर मिळवताना नागरिक त्रस्त

## -गॅसच्या नावावर गोंधळ; एजन्सीसमोर रोजच 'आपत्कालीन' चित्र

**सेलू जनमाध्यम :** पहाटेचा उजेड पडायच्या आतच शहरातील गॅस एजन्सीसमोर ग्राहकांच्या लांबच लांब रांगा लागत असून गॅससाठी अक्षरशः झुंबड उडाल्याचे चित्र सध्या सर्वत्र दिसत आहे. आखाती देशातील युद्धजन्य परिस्थितीमुळे भविष्यात गॅस टंचाई निर्माण होईल या भीतीने नागरिकांमध्ये भीतीचे सावट पसरले आहे. मात्र शासनाने लागू केलेल्या ओटीपी अनिवार्य नियमामुळे परिस्थिती आणखी चिघळली आहे.

कच्चे तेल पुरवठादार देशांमध्ये सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने खबरदारीचा उपाय म्हणून गॅस बुकिंग कालावधी २५ ते ३० दिवसांवर नेला आहे. तसेच प्रत्येक ग्राहकासाठी ओटीपी आवश्यक करण्यात आला आहे. मात्र या नियमामुळे अनेकांना सिलिंडर मिळत नसल्याने संतापाची लाट उसळली आहे.



गॅस मिळत नाही, या अफवेने पेट घेतल्याने नागरिकांनी एजन्सीकडे धाव घेतली आणि सकाळ होताच एजन्सीसमोर रांगाच्यारांगा लागल्या. या दृश्याने नागरिकांना पुन्हा एकदा नोटबंदीच्या काळाची आठवण करून दिली.

शहरातील श्री जी गॅस एजन्सीत परिस्थिती अधिकच ताणली गेली. रोज २५० ते ३०० सिलिंडरची विक्री होणाऱ्या या ठिकाणी ती संख्या थेट ७०० ते ७५० वर पोहोचली. अनेकांना तांत्रिक अडचणींमुळे सिलिंडर न मिळाल्याने संतप्त ग्राहकांनी एजन्सीवरच नाराजी व्यक्त केली. परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात असल्याने गुरुवारी पोलिस बंदोबस्तात सिलिंडर वितरण करावे लागले.दरम्यान, नागपूरजवळील खापरी येथील एचपी गॅस डेपोची दररोज ८५ हजार सिलिंडर पुरवठा करण्याची क्षमता असली तरी अचानक वाढलेल्या मागणीमुळे वितरण यंत्रणेवर प्रचंड ताण पडला आहे. परिणामी डेपोतून नियमित लोड मिळणे कठीण झाले असून टंचाई चा भ्रम अधिकच गडद झाला आहे.

साठा आणि पुरवठा सुरळीत आहे. मात्र अफवांमुळे वर्षभर निष्क्रिय असलेली ग्राहकांची कार्डेही अचानक सक्रिय झाली आहेत. अनेकांकडे नोंदणीकृत मोबाईल नंबर नसल्याने ओटीपी प्रक्रियेत अडचणी येत आहेत. ग्राहकांनी परिस्थिती समजून घेतली पाहिजे, असे एजन्सी संचालक रितेश पालिवाल यांनी स्पष्ट केले.

एकूणच, अफवा, भीती आणि तांत्रिक अडथळ्यांच्या कोंडीत सापडलेली गॅस वितरण व्यवस्था सध्या नागरिकांसाठी डोकेदुखी ठरत असून प्रशासनाने तातडीने स्पष्टता देण्याची गरज निर्माण झाली आहे.

# थकबाकीदारांवर करडी नजर : महावितरणचा मार्च एंड ॲक्शन प्लॅन धडक

**वर्धा जनमाध्यम :** आर्थिक वर्ष संपण्याच्या उंबरठ्यावर असताना महावितरणने थकबाकीदारांविरुद्ध आक्रमक भूमिका घेतली आहे. वर्धा मंडळातील थकीत वीज बिलांची वसुली 'शून्य' पातळीवर आणण्यासाठी मार्च एंड ॲक्शन प्लॅन राबविण्याचे स्पष्ट निर्देश संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांनी दिले. ३१ मार्चपूर्वी घरगुती, वाणिज्यिक व औद्योगिक ग्राहकांकडील सर्व थकबाकी वसूल करण्यावर भर देण्यात आला आहे.



शुक्रवारी वर्ध्यातील 'विद्युत भवन' येथे पार पडलेल्या विशेष आढावा बैठकीत पवार यांनी अधिकाऱ्यांना स्पष्ट शब्दांत सुनावले की, वेळेवर महसूल न मिळाल्यास वीज सेवा सुरळीत ठेवणे कठीण होते. त्यामुळे वसुलीमध्ये कुठलाही ढिलाई नको, असे त्यांनी ठणकावले.

बैठकीत वर्धा मंडळातील तिन्ही विभागांच्या कामगिरीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. नगरपालिका व नगर परिषदांकडील पाणीपुरवठा योजना तसेच पथदिव्यांच्या थकबाकी वसुलीसाठी विशेष मोहीम राबविण्याचे आदेशही यावेळी देण्यात आले.

नागपूर परिमंडळाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके, अधीक्षक अभियंता स्मिता पारखी, कार्यकारी अभियंता (प्रशासन) शर्मिला इंगळे यांच्यासह विभागीय अधिकारी नरेश पारधी, प्रशांत गायकवाड व प्रदीप घोरुडे यांची यावेळी उपस्थिती होती.

बैठकीनंतर पवार यांनी वर्धा शहरातील शाखा कार्यालय क्रमांक ३ ला भेट देत कर्मचाऱ्यांशी थेट संवाद साधला. मार्च २०२५ मध्ये 'शून्य थकबाकी'चे लक्ष्य गाठल्याबद्दल त्यांनी कर्मचाऱ्यांचे कौतुक केले व यंदाही तेच उद्दिष्ट पूर्ण करण्याचे आवाहन केले.

दरम्यान, मार्च महिन्याचे उर्वरित १० दिवस महत्त्वाचे असल्याचे सांगत, प्रत्येक कर्मचाऱ्याने ग्राहकांशी थेट संपर्क साधून वसुली वाढवावी, असे निर्देश देण्यात आले. वीज ग्राहकांनीही थकबाकी त्वरित भरून कठोर कारवाई टाळावी, असे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले.

# ११ केव्हीच्या विजेच्या धक्क्याने शेतकऱ्याचा मृत्यू

**वडनेर जनमाध्यम :** काचनगाव शेतशिवारात घडलेल्या हृदयद्रावक घटनेत शेतकरी सुमेध जयदेव धाबर्डे (वय ४२) यांचा विजेच्या तीव्र धक्क्याने जागीच मृत्यू झाला. या घटनेने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत असून काचनगाव गाव शोकसागरात बुडाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सुमेध धाबर्डे हे आपल्या कुटुंबासह गावालगतच्या शेतात वास्तव्यास होते. ते शेतालगत असलेल्या सुबाभळीच्या झाडाची फांदी तोडत होते. याच वेळी त्या झाडावरून गेलेल्या वीज वितरण कंपनीच्या ११ केव्हीच्या उच्चदाब तारेमुळे फांदीत विद्युत प्रवाह उतरला आणि क्षणातच सुमेध यांना जोरदार विजेचा धक्का बसला.



धक्का इतका तीव्र होता की ते जागीच जमिनीवर कोसळले आणि त्यातच त्यांचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच वडनेर पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. ठाणेदार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पंचनामा करण्यात आला असून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी वडनेर ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला आहे.

या दुर्दैवी घटनेमुळे एका कुटुंबाचा कर्ता हरपला आहे. मृतकाच्या पश्चात पत्नी, एक मुलगा आणि वृद्ध आई असा परिवार असून त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

दरम्यान, शेतशिवारातून जाणाऱ्या उच्चदाब वीजतारा आणि त्यांची सुरक्षितता हा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून संबंधित विभागाच्या निष्काळजीपणावर संताप व्यक्त केला जात आहे. सुमेध धाबर्डे यांच्या आकस्मिक मृत्यूने काचनगावसह परिसरात शोककळा पसरली आहे.

### सत्ता आहे, पण रस्ता नाही

# पावडे ते छत्रपती चौक मुख्य रस्ता विकासापासून वंचित

## -कागदावर विकास, जमिनीवर विनाश : मध्यवर्ती रस्त्याची दयनीय कथा

**वर्धा जनमाध्यम :** शहरात विकासाच्या घोषणा ढोल-ताश्यांसारख्या वाजत असल्या, तरी प्रत्यक्षात मात्र पावडे चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक हा मुख्य रस्ता आजही धुळीत लोळतो आहे. गल्लोगल्ली सिमेंट रस्त्यांचा गाजावाजा करणाऱ्या सत्ताधाऱ्यांनी शहराच्या मध्यवर्ती भागाकडे मात्र जाणीवपूर्वक पाठ फिरवल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. नागरिकांनी जिल्हाधिकारी, नगरपरिषद, पालकमंत्री, खासदार अशा सर्वच स्तरांवर वारंवार निवेदने दिली. पण प्रत्येकवेळी आश्वासनांचा पाऊस आणि कामाचा दुष्काळच पाहायला मिळाला. धक्कादायक बाब म्हणजे, अजूनही या रस्त्याचे टेंडरही निघालेले नाही, सत्ता वरपासून खालपर्यंत तुमचीच, मग रस्ता का नाही, असा प्रश्न आता जनतेतून केला जात आहे. निवडणुकीच्या वेळी विकासाचे गोड बोल बोलणारे नेते आता मात्र या प्रश्नावर गप्प बसल्याने संताप अधिकच भडकला आहे. दररोज हजारो नागरिक या मार्गावरून जीव मुठीत धरून प्रवास करत आहेत. खड्डे, धूळ, वाहतुकीचा गोंधळ या सगळ्यांनी नागरिकांचे जगणेच त्रस्त केले आहे. पावसाळा आला की हा रस्ता म्हणजे अक्षरशः दलदल बनतो.



विकासाचा पप्पू बनवत जनतेला फसवणाऱ्या सत्ताधाऱ्यांना आता जाग येणार का की हा रस्ता निवडणुकीपुरताच मुद्दा राहणार असा जळजळीत प्रश्न वर्धेकर करत आहेत. जनतेचा संयम आता संपत चालला आहे. पावडे चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक रस्ता तात्काळ पूर्ण करण्याची मागणी जोर धरत असून, अन्यथा आंदोलनाचा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

# अठरा पुराणांचा महायज्ञ; रामनगरात भक्तीचा दिव्य सोहळा उजळला



**वर्धा जनमाध्यम :** रामनगर परिसर सध्या भक्ती, श्रद्धा आणि अध्यात्माच्या मंगलमय वातावरणाने भारावून गेला आहे. गिरीश अग्निहोत्री यांच्या निवासस्थानी '१८ महापुराण' पारायणाचा पवित्र सोहळा आयोजित करण्यात आला असून, परिसरात जणू धर्मभावनेची अखंड गंगा वाहत आहे.

१९ मार्चपासून सुरू झालेला हा सोहळा २६ मार्चपर्यंत दररोज सकाळी ७ ते सायंकाळी ७ या वेळेत पार पडत आहे. दिवसभर पुराणांचे पारायण, त्यानंतर आरती आणि महाप्रसादाचा लाभ असा नित्यक्रम सुरू आहे. या उपक्रमामुळे परिसरातील वातावरण पूर्णतः भक्तिमय झाले असून, नागरिक मोठ्या श्रद्धेने सहभागी होत आहेत.

सनातन धर्मात १८ महापुराणांना विशेष स्थान आहे. महर्षी वेदव्यास यांनी रचलेली ही पुराणे भारतीय संस्कृतीचा अमूल्य ठेवा मानली जातात. या पारायणात ब्रह्म, पद्म, विष्णु, शिव, भागवत, नारद, मार्कंडेय, अग्नि, भविष्य, ब्रह्मवैवर्त, लिंग, वराह, स्कंद, वामन, कूर्म, मत्स्य, गरुड आणि ब्रह्मांड या अठरा महापुराणांचे वाचन करण्यात येत आहे.

या पुराणांमधून धर्म, संस्कार, कर्तव्य आणि जीवनमूल्यांचा संदेश दिला जातो. विष्णु, शिव, भागवत आणि स्कंद पुराण विशेष महत्त्वाची मानली जातात. सत्त्व, रज आणि तम या तीन गुणांच्या आधारे पुराणांचे वर्गीकरण करण्यात आले आहे.

समाजात धर्मभावना वाढवणे आणि पुढील पिढीपर्यंत संस्कृतीचा वारसा पोहोचवणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे, असे आयोजक गिरीश अग्निहोत्री यांनी सांगितले. या पारायणामुळे रामनगर परिसरात श्रद्धेचे वातावरण अधिक बळकट झाले आहे.

# देवळीकरांचा विजयःवर्षांच्या प्रतीक्षेनंतर रेल्वे आरक्षण खिडकी सुरू

## -खासदार अमर काळे यांच्या पाठपुराव्याला अखेर यश

**देवळी (वर्धा) जनमाध्यम :** जनतेच्या प्रश्नांसाठी झगडणाऱ्यांचाच विजय होतो,' याची प्रचिती देवळीकरांना आज आली. वर्धा-नांदेड रेल्वेमार्ग सुरू होऊनही आरक्षण सुविधेअभावी प्रवाशांना होणाऱ्या हालअपेष्टांना अखेर पूर्णविराम मिळाला आहे. देवळी रेल्वे स्थानकावर आरक्षण खिडकी सुरू झाली असून, या सुविधेचे उद्घाटन खासदार अमर काळे यांच्या हस्ते करण्यात आले.



वर्षानुवर्षे देवळी व परिसरातील नागरिकांना आरक्षण तिकीटासाठी वर्धा गाठावे लागत होते. पोस्ट ऑफिसमधील नेटवर्कच्या सततच्या अडचणींमुळे तेथील सुविधा बंद झाल्याने प्रवाशांची गैरसोय असह्य झाली होती. तिकीटासाठी प्रवास हीच परिस्थिती निर्माण झाली होती.

या अन्यायकारक परिस्थितीविरुद्ध नागरिकांनी आवाज उठवत खासदार अमर काळे यांच्याकडे धाव घेतली. जनतेच्या वेदना ओळखत त्यांनी २९ डिसेंबर २०२५ रोजी रेल्वे विभागाला पत्र देत ठोस पाठपुरावा सुरू केला. त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे अखेर रेल्वे प्रशासनाने झुकत माप घेत देवळी येथे आरक्षण सुविधा मंजूर केली.

२१ मार्च २०२६ पासून सुरू झालेली ही आरक्षण खिडकी दररोज सकाळी ८ ते दुपारी २ या वेळेत सुरू राहणार आहे. उद्घाटन सोहळ्यास नगराध्यक्ष किरण ठाकरे, रेल्वे अधिकारी व असंख्य नागरिकांची उपस्थिती लाभली. उद्घाटनानंतर स्थानक परिसरात वृक्षारोपण करून विकासासोबत पर्यावरण संवर्धनाचा संदेशही देण्यात आला. देवळीकरांसाठी ही केवळ सुविधा नाही, तर त्यांच्या हक्कासाठी लढलेल्या संघर्षाचा हा जाज्वल्य विजय आहे. आता प्रवास सोपा, सुलभ आणि स्वाभिमानी झाला आहे,


### ग्रंथोत्सवात मराठी भाषा संवर्धनावर परिसंवाद

# महाराष्ट्रात मराठी हा विषय अनिवार्य असावा-डॉ. माळोदे

**वर्धा जनमाध्यम -** महाराष्ट्रात राहणाऱ्या प्रत्येकासाठी मराठी विषय अत्यावश्यक असला पाहिजे. केवळ दहावीपर्यंत नव्हे तर सर्व प्रकारच्या ज्ञानशाखांमध्ये पदवी अभ्यासक्रमापर्यंत मराठी हा विषय अनिवार्य करण्यात यावा, असे मत ज्येष्ठ समीक्षक डॉ. पुरुषोत्तम माळोदे यांनी जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाद्वारे आयोजित ग्रंथोत्सवातील परिसंवादात काढले. स्थानिक बजाज सार्वजनिक जिल्हा ग्रंथालयाच्या सभागृहात 'मराठी भाषेच्या संवर्धनाच्या दिशा' या विषयावर डॉ. पुरुषोत्तम माळोदे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित या परिसंवादात समीक्षक डॉ. वंदना पळसापुरे, साहित्यिक डॉ. प्रमोद नारायणे, डॉ. मेघा चुटे ब्राह्मणकर यांचा सहभाग होता.



जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय



# समुद्री मार्ग खुले ठेवा व्यापारात अडथळे नकोत

### पीएम मोदींचा इराणच्या राष्ट्राध्यक्षांना फोन, केले शांततेचे आवाहन

**नवी दिल्ली** -पश्चिम आशियामध्ये इस्त्रायल, अमेरिका आणि इराण यांच्यातील तणाव शिगेला पोहोचला असताना, भारताने या वादात शांतता प्रस्थापित करण्यासाठी मोठे राजनैतिक पाऊल उचलले आहे. पंतप्रधान नरेन्द्र मोदी यांनी शनिवारी इराणचे राष्ट्राध्यक्ष डॉ. मसूद पेजेश्कियन यांच्याशी फोनवरून सविस्तर चर्चा केली. गेल्या आठ दिवसांतील या दोन्ही नेत्यांमधील ही दुसरी चर्चा असून, भारताने या प्रदेशातील शांतता आणि स्थिरतेसाठी पुन्हा एकदा आग्रही भूमिका मांडली आहे.

पंतप्रधान मोदींनी राष्ट्राध्यक्ष पेजेश्कियन यांना ईद-उल-फितर आणि इराणचे नवीन वर्ष नवरोज निमित्त शुभेच्छा दिल्या. 'हा सण पश्चिम आशियात शांतता, स्थिरता आणि समृद्धी घेऊन येईल,' अशी आशा पंतप्रधान मोदींनी यावेळी व्यक्त केली. या शुभेच्छांसोबत पंतप्रधान मोदींनी पश्चिम आशियात बिघडत चाललेल्या सुरक्षा व्यवस्थेवर तीव्र चिंता व्यक्त केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या संवादादरम्यान पश्चिम आशियातील बिघडत चाललेल्या परिस्थितीवर भारताची भूमिका अत्यंत स्पष्टपणे मांडली. त्यांनी प्रामुख्याने प्रादेशिक सुरक्षा, जागतिक व्यापार आणि मानवी हित या तीन गोष्टींवर भर दिला.

पंतप्रधानांनी पश्चिम आशियातील महत्त्वाच्या पायाभूत सुविधांवर होणाऱ्या हल्ल्यांचा तीव्र निषेध केला. अशा हल्ल्यांमुळे केवळ प्रादेशिक स्थिरता धोक्यात येत नाही, तर जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत होऊन जगाच्या अर्थव्यवस्थेवरही विपरीत परिणाम होतो, असे त्यांनी नमूद केले. तसेच होर्मुझची सामुद्रधुनी हा समुद्री मार्ग सुरक्षित राहणे अनिवार्य असल्याचे मोदींनी सांगितले. युद्धामुळे होणारी निष्पाप नागरिकांची जीवितहानी आणि मालमत्तेच्या नुकसानीबद्दल पंतप्रधानांनी खोलवर दुःख व्यक्त केले. या कठीण काळात इराणमधील भारतीय नागरिकांची सुरक्षा आणि त्यांचे हित ही भारताची सर्वोच्च प्राथमिकता असल्याचे त्यांनी पुन्हा एकदा स्पष्ट केले.

■ आधी राजकीय संन्यासाची घोषणा

# ...पण सीएम फडणवीसांसोबत चर्चेनंतर निर्णय बदलला

### भाजप आ. संदीप जोशींची घोषणा



**नागपूर :** राजकारणातून संन्यास घेण्याची घोषणा करून चर्चेत आलेले भाजपचे विधान परिषदेचे आमदार संदीप जोशी यांनी आता आपल्या भूमिकेत मोठा बदल करत सहा महिन्यांच्या ब्रेकनंतर पुन्हा सक्रिय राजकारणात परतण्याचे संकेत दिले आहेत. '१३ मे पासून मी सहा महिन्यांचा ब्रेक घेत आहे. मात्र त्यानंतर नव्या उर्जेसह पुन्हा राजकारणात सहभागी होणार आहे,' असे स्पष्ट वक्तव्य करत त्यांनी राजकीय निवृत्तीच्या घोषणेनंतर घेतलेला यू-टर्न घेतला आहे.काही दिवसांपूर्वी जोशी यांनी राजकारणातून संन्यास घेण्याची घोषणा केली होती. या निर्णयामुळे नागपूरच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली होती. मात्र आता त्यांनी हा निर्णय तात्पुरता असल्याचे स्पष्ट करत पूर्णपणे राजकारण सोडण्याचा विचार नसल्याचे सांगितले आहे.

## संक्षिप्त

### पुणेकरांचा प्रवास अधिक वेगवान होणार

**पुणे :** पुणे शहराच्या वाहतूक व्यवस्थेत मोठा बदल घडवून आणणारा स्वारगेट-कात्रज मेट्रो मार्ग आता पुढे खेड शिवापूर टोलनाका परिसरातून प्रस्तावित रिंग रोडपर्यंत वाढवण्यास पुणे महापालिकेच्या शहर सुधारणा समितीने आज मंजुरी दिली. दक्षिण पुण्याच्या विकासाच्या दृष्टीने हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.शहर सुधारणा समितीच्या अध्यक्षा स्मिता वस्ते म्हणाल्या, 'दक्षिण पुणे, कात्रज परिसर; तसेच शिवापूर टोलनाका आणि प्रस्तावित रिंग रोडलगत झपाट्याने वाढणारी वसाहत व वाहतुकीचा ताण लक्षात घेता मेट्रोचा विस्तार आवश्यक आहे. प्रस्तावित रिंग रोडशी मेट्रोची कनेक्टिव्हिटी निर्माण झाल्यास शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला अधिक मदत होणार आहे. भाजपच्या नगरसेविका वर्षा तापकिर यांनी हा प्रस्ताव दिला होता. नगरसेवकांच्या मागणीवरून हा प्रस्ताव मंजुर करण्यात आला आहे. या मार्गाचा सविस्तर प्रकल्प आराखडा (डीपीआर) तयार झालेला नाही. तसेच प्रशासनाकडूनही त्यावर कार्यवाही करण्यात आलेली नाही.

### मधाचे पोळे बेतले जीवावर!

**भोर :** झाडावरून जमिनीवर पडून जखमी झालेल्या तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याचा प्रकार समोर आला आहे. ही घटना बनेश्वर देवस्थानच्या हद्दीत गुरुवारी घडली.विष्णू मारुती पवार (रा. वागजवाडी, ता. भोर) असे मृत्यू झालेल्याचे नाव आहे.



देवस्थानच्या परिसरात वन विभागाच्या मोठ्या झाडांवर मधमाशांची मोठी पोळी आहेत. या संदर्भात देवस्थानने वन विभागाला पत्र दिले होते. त्यावर पोळे काढण्यासाठी शिवाजीनगर येथील मध संचालनालयाकडे संपर्क करावा, असे वन विभागाने कळवले होते. दरम्यान कातकरी समाजाचे चार तरुण पोळे काढण्यासाठी झाडावर चढले होते. त्यातील विष्णू पाय घसरून जमिनीवर पडून गंभीर जखमी झाला. वन विभागाचे कर्मचारी व स्थानिकांनी त्याला नसरापूर येथील खासगी रुग्णालयात नेले. त्यानंतर पुण्यातील ससून रुग्णालयात नेले. परंतु उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

### लग्न होत नसल्याने नैराश्यात, तरुणाचे टोकाचे पाऊल

**जालना :** जालना जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यातील वडोदा तांगडा येथे एका ३५ वर्षीय युवकाने विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना काल शुक्रवारी घडली आहे. गणेश एकनाथ तांगडे असं आत्महत्या केलेल्या युवकाचं नाव आहे. त्याच्या जाण्याने संपूर्ण कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळलेला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, वडोद तांगडा येथे अल्पभूधारक तरुण शेतकरी गणेश एकनाथ तांगडे याने २



दिवसापूर्वी त्याच्या राहत्या घरी रात्रीच्या सुमारास विषारी औषध प्राशन केलं. सदरची बाब ही शेजारच्यांच्या व त्याच्या आईच्या लक्षात येताच आरडाओरड करत त्यांनी गणेशला तात्काळ गावातील एका खासगी रुग्णालयात नेलं. त्याठिकाणी डॉक्टरांनी त्याला तपासून त्याला तात्काळ बुलढाणा येथे पुढील उपचारासाठी नेण्याच्या सूचना केल्या. त्यावरून तात्काळ त्याला बुलढाणा येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केलं. त्याठिकाणी त्याच्यावर दोन दिवस डॉक्टरांनी शर्तीचे प्रयत्न केले. मात्र, प्रयत्न अपयशी ठरले आणि काल शुक्रवारी रोजी दुपारी तीन वाजेच्या सुमारास गणेश तांगडे याची मृत्यूशी झुंज अपयशी ठरली.

### पुण्यातील दोन खुनांची रहस्य २१ महिन्यांनी उलगडली

**पुणे :** दहिवडी (ता. शिरुर) येथील मांजरे वस्तीत गेल्या २१ महिन्यांपासून सुरू असलेले मृत्यूचे रहस्य आता एका भीषण सत्यासह समोर आले आहे. मागील वर्षी झालेल्या अल्पवयीन मुलाचा मृत्यू बिबट्याचा हल्ला नसून, तो खूनच होता, हे आता उघड झाले आहे. धक्कादायक म्हणजे, त्या अल्पवयीन मुलाचा खून ज्या क्रूर पद्धतीने



करण्यात आला होता, त्याच पद्धतीने दुसऱ्या बालकाचाही बळी घेण्यात आला. या दोन्ही घटनांमधील गुन्हेगार एकच असल्याचे निष्पन्न झाले असून, पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. सध्या त्याला पाच दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

### अल्पवयीन मुलीचे ३० वर्षांच्या व्यक्तीसोबत लग्न

**छत्रपती संभाजीनगर:** छत्रपती संभाजीनगरमध्ये माणुसकीला काळिमा फासणारी एक संतापजनक घटना समोर आली आहे. एका व्यसनाधीन पित्याने आपल्या अवघ्या १३ वर्षांच्या लेकीचा विवाह ३० वर्षांच्या व्यक्तीशी लावून दिला. धारेश्वर मंदिरात हा 'बालविवाह' उरकला गेला, मात्र पोलीस दलाच्या दामिनी पथकाने देवदूतासारखी धाव घेत या चिमुकलीची सासरच्या तावडीतून सुटका केली.

# 'ते तज्ज्ञ ज्योतिषी नाहीत, जवळच्याच माणसांनी त्यांच्या पाठीत...'- अशोक खरातची पत्नी

### शेकडो महिलांचे लैंगिक शोषण केल्याप्रकरणी अटकेत खरात



**नाशिक** -शेकडो महिलांचे लैंगिक शोषण केल्याप्रकरणी अटकेत असलेल्या भोंदू बाबा अशोक खरातच्या पत्नीने पहिल्यांदाच मौन सोडले. अशोक खरातचे महिलांसोबत संबंध ठेवतानाचे असंख्य व्हिडीओ पोलिसांच्या हाती लागलेले असताना त्याच्या पत्नीने मात्र त्याला फसवण्यात आल्याचा आरोप केला आहे. काही जवळच्या लोकांनी त्याच्या पाठीत खंजीर खुपसला असे खरातचे पत्नीचे म्हणणे आहे.

अशोक खरात याच्याशी संबंधित आणखी अनेक वादग्रस्त व्हिडीओ हाती लागल्याने अशा व्हिडीओंची संख्या १०० हून अधिक झाल्याची चर्चा आहे. अशोक खरातच्या अत्याचारांना बळी पडलेल्या पीडितांनी चौकशीसाठी पुढे यावे, त्यांची नावे गोपनीय ठेवून संरक्षण देण्यात येईल, असे आवाहन पोलिस यंत्रणेने केले आहे. खरात याच्याशी सातत्याने संपर्कात असणाऱ्यांचे कॉल डिटेल्स देखील तपासण्यात येणार आहेत. याच दरम्यान खरातच्या पत्नीने एक विधान केले आहे. अशोक खरातची पत्नी कल्पना यांनी सांगितले की, 'माझे पती काही व्यावसायिक किंवा तज्ज्ञ ज्योतिषी नाहीत. खूप जवळच्या काही सहकाऱ्यांनी त्यांच्या पाठीत खंजीर खुपसला आहे. त्यांची प्रतिमा उद्ध्वस्त करण्यासाठी हे करण्यात आले आहे.'

कल्पना खरात यांच्या व्यतिरिक्त कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीने या प्रकरणावर भाष्य केलेले नाही. अशोक खरात याच्या जवळच्या व्यक्तींनीही याबद्दल मौनच बाळगलेले आहे. मात्र, या प्रकरणाने महाराष्ट्राचे राजकारण ढवळून निघाले आहे. अनेक मोठ्या नेत्यांसोबतचे खरातचे फोटोंनी चर्चांना हवाच मिळू लागली आहे.

नगरसेविकेच्या पतीची एसआयटीकडून चौकशी

एसआयटी पथकाने शुक्रवारी (२० मार्च) एका नगरसेविकेच्या पतीला ताब्यात घेऊन त्याची चौकशी केल्याचे समजते. राजकीय लागेबांधे निर्माण करण्यासह महापालिका निवडणुकीसाठी या व्यक्तीने मध्यस्ती केल्यामुळेच त्याची चौकशी केल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.इंटरनेट आणि केबल जोडण्याच्या उपकरणांच्या साहाय्याने एका अल्पवयीन मुलीवर केलेल्या अघोरी उपचारांचा व्हिडीओ समोर आल्याचे सांगण्यात येत असून, त्यामुळे या प्रकरणाला अधिक गंभीर वळण मिळाले आहे.

# अधिवेशनापूर्वीच 'एसआयटी 'नेमली

### निम्मं मंत्रिमंडळ यात असल्याने प्रकरण बाहेर येऊ द्यायचं नव्...



नाशिक येथील अशोक खरात प्रकरणाने राज्यात खळबळ उडाली आहे. खरात याने अनेक महिलांवरती लैंगिक अत्याचार केल्याचे समोर आले आहे. अशोक खरात यांच्या ट्रस्टच्या सदस्या रुपाली चाकणकर असल्याचे समोर आले, यामुळे आता चाकणकर यांनी राज्य महिला आयोगाचे अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे. दरम्यान, आता ठाकरे गटाचे आमदार भास्कर जाधव यांनी एक मोठा दावा केला आहे.रुपाली चाकणकरांचा राजीनामा घेतला ते चांगलंच झालं, पण केवळ त्यांच्यापर्यंतच हे प्रकरण नाही. याप्रकरणात अनेक उच्चपसदस्थ अधिकारी आहेत, असा खळबळजनक दावा जाधव यांनी केला.

'अशोक खरात प्रकरणाच्या चौकशीसाठी विधिमंडळाच्या अधिवेशनापूर्वीच एसआयटी नेमण्यात आली आहे. मात्र, निम्मं मंत्रिमंडळ यात असल्याने हे प्रकरण बाहेर येऊ द्यायचे नव्हते. केवळ पत्रकार आणि पीडित महिलेमुळे हे प्रकरण बाहेर आले, अन्यथा हे प्रकरण सरकारने प्रकरण दाबले असते, असा गौप्यस्फोट आमदार भास्कर जाधव यांनी केला. या प्रकरणी एसआयटी कधी स्थापन केली याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी द्यावी अशी मागणी जाधव यांनी केली.

पत्रकार परिषदेत बोलताना भास्कर जाधव म्हणाले, अधिवेशन काळात सरकारने याबाबत वस्तुस्थिती मांडणे गरजेचे होते. कारण, यात फक्त रुपाली चाकणकर आणि राजकीय पुढारी आहेत असे नाही, यात उच्चपदस्थ अधिकारी देखील असून अशोक खरातची उठबस करण्यात ते गुंतले आहेत. केवळ चाकणकर यांचा राजीनामा घेऊन सरकारने या विषयावरील लक्ष दुसरीकडे वळवू नये, राजीनामा झाला म्हणजे प्रकरण संपले असे समजू नये. सरकारमधले अनेक मंत्री आणि अधिकारी यात असल्याने हे प्रकरण दडपवण्याचा प्रयत्न होत आहे.

'या प्रकरणात आयएएस, आयपीएस अधिकारी आहेत. हे प्रकरण पोलिसांना देखील माहित होते, म्हणून हे प्रकरण बाहेर आले नाही, असा खळबळजनक दावा भास्कर जाधव यांनी केला आहे. हे प्रकरण तडीस जावे यासाठी आमचा प्रयत्न आहे. मात्र, सरकारची एकूण वृत्ती पाहून काही पुढारी आणि अधिकाऱ्यांच्या फाईल्स आपल्या ढुंगणाखाली दाबून ठेवून ते राजकीय फायद्यासाठी वापरतील, असा आरोप जाधव यांनी केला.

# बायको म्हणजे घरची नोकर नाही!

### कोर्टाचा पतीला असा 'प्रसाद' की संपूर्ण देश हादरला

**नवी दिल्ली** - देशातील वैवाहिक नातेसंबंधांबाबत महत्त्वाचा संदेश देताना Supreme Court of India ने एका पतीला सुनावणीदरम्यान चांगलेच फटकारले. पत्नी घरकाम करत नाही किंवा स्वयंपाक करत नाही, या कारणावरून तिला मानसिक क्रूरतेचा ठपका ठेवणे आणि घटस्फोट मागणे अयोग्य असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. बदलत्या काळानुसार पतीनेही घरकामात समान सहभाग घ्यावा, असे स्पष्ट शब्दांत सांगण्यात आले.



पत्नी घरातील कामे करत नाही, या कारणावरून पतीने मानसिक छळाचा आरोप करत घटस्फोटासाठी याचिका दाखल केली होती. मात्र न्यायालयाने हा युक्तिवाद फेटाळून लावत, अशा कारणांवर घटस्फोट देणे चुकीचे असल्याचे स्पष्ट केले.

या प्रकरणाची अलीकडेच सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. यापूर्वी फॅमिली कोर्टाने पतीच्या बाजूने निर्णय दिला होता, मात्र उच्च न्यायालयाने तो निकाल रद्द केला होता. हा संपूर्ण खटला Supreme Court of India मध्ये चालू असून, यापूर्वी संबंधित प्रकरण फॅमिली कोर्ट आणि उच्च न्यायालयातही गेले होते. न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि संदीप मेहता यांच्या खंडपीठाने या प्रकरणाची सुनावणी केली. संबंधित जोडप्याचे लग्न २०१७ मध्ये झाले असून त्यांना एक मुलगा आहे.

# कॉपी विसरून जा! बोर्डाचा आतापर्यंतचा कठोर निर्णय

**नवी दिल्ली** - परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे, स्थिर पथके आणि भरारी पथके तैनात असूनही परीक्षेदरम्यान ३०० हून अधिक कॉपीचे प्रकार समोर आले आहेत. विशेषतः ग्रामीण भागातील केंद्रांवर हे प्रकार अधिक प्रमाणात घडल्याचे दिसून आले. या पार्श्वभूमीवर, आता फक्त पुरेशा सुविधा आणि किमान ५०० विद्यार्थ्यांची आसनक्षमता असलेल्या शाळांनाच दहावी-बारावी परीक्षेसाठी केंद्र म्हणून मान्यता देण्याचा निर्णय मंडळाने घेतला आहे. शक्यतो तालुक्याच्या मुख्य ठिकाणी, विशेषतः शहरी भागातच अधिक केंद्रे ठेवण्याचा विचार असून, यावर पुढील आठवड्यातील बैठकीत अंतिम निर्णय होणार आहे.



महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे राज्यभरात एकूण नऊ विभाग आहेत. पुणे, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण. कॉपीमुक्त परीक्षा घेण्यासाठी प्रयत्न करूनही बारावीच्या परीक्षेत कोकण वगळता इतर आठ विभागांत २३७ कॉपीचे प्रकार समोर आले आहेत. तसेच दहावीच्या परीक्षेतही ७४ परीक्षा केंद्रांवर गैरप्रकार उघड झाले आहेत.

अमरावती, पुणे, लातूर, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर विभागांमध्ये सर्वाधिक गैरप्रकार नोंदवले गेले आहेत. त्यामुळे कॉपीमुक्त परीक्षा सुनिश्चित करण्यासाठी मंडळाने कडक पावले उचलण्याचा निर्णय घेतला आहे. त्याअंतर्गत ग्रामीण भागातील अनेक परीक्षा केंद्रे कमी करण्याची तयारी सुरू आहे. सध्या ग्रामीण भागात ४० टक्के आणि शहरी भागात ६० टक्के केंद्रे आहेत. यापूर्वी २५० विद्यार्थ्यांमागे एक केंद्र होते, मात्र आता किमान ५०० विद्यार्थ्यांसाठी एकच केंद्र ठेवले जाणार आहे.

परीक्षा सुरू होण्याच्या दीड-दोन महिने आधी प्रत्येक जिल्ह्यातील शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी केंद्रांची तपासणी केली होती.

सीसीटीव्ही कॅमेरे, भक्कम कंपाऊंड भिंत, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था अशा मूलभूत सुविधांची पाहणी करून त्याचा अहवाल मंडळाकडे सादर करण्यात आला होता. मात्र, प्रत्यक्ष परीक्षेदरम्यान उघड झालेल्या गैरप्रकारांमुळे वास्तव स्थिती वेगळी असल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे आता राज्यभरातील सुमारे साडेपाच हजार परीक्षा केंद्रांची थेट तपासणी बोर्डाचे अधिकारी स्वतः करणार आहेत. आवश्यक सुविधा नसलेल्या केंद्रांची मान्यता रद्द करण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे.

# १८ वर्ष शेजारी राहिले, एकमेकांवर प्रचंड विश्वास होता पण सोने बघताच नियत फिरली

### कुर्ल्यामध्ये बंटी बबलीचा भयानक कांड

**मुंबई :** कुर्ला पश्चिम येथील जैन मंदिराजवळ राहणाऱ्या प्रवीण मतकर यांना त्यांच्या शेजाऱ्यांनीच फसवणूक केली आहे आपल्या वकिली करणाऱ्या मुलीच्या लग्नासाठी हौसेने दागिने बनवायला दिलेले २० तोळे सोने आणि इतर ग्राहकांचे ३० तोळे असे एकूण ५० तोळे सोने घेऊन सुकेंदू सामंता आणि त्याची पत्नी मधुमिता सामंता हे दांपत्य फरार झाले आहे. १८ वर्षांपासून शेजारी राहणाऱ्या या कुटुंबाने अशा प्रकारे पाठीत खंजीर उपसल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.



प्रवीण मतकर यांनी आपल्या मुलीच्या लग्नासाठी आईचे जुने २० तोळे सोने नवीन दागिने घडवण्यासाठी शेजारी राहणाऱ्या सुकेंदू सामंता याला दिले होते. सामंता दांपत्याने मतकर यांना दागिन्यांचे आकर्षक डिझाईन्स दाखवून महिनाभरात दागिने तयार करून देण्याचे आश्वासन दिले होते. १८ वर्षांपासूनचे कौटुंबिक संबंध असल्याने मतकर यांनी कोणत्याही शंकेविना हे दागिने त्यांच्या हवाली केले. मात्र, या विश्वासाचा फायदा घेत सामंता दांपत्याने चोरीचा कट रचला होता.

१७ फेब्रुवारीच्या पहाटे, जेव्हा संपूर्ण गाव गाढ झोपेत होती, तेव्हा सुकेंदू आणि मधुमिता यांनी आपले बिऱ्हाड गुंडाळले आणि सहकुटुंब घरातून पोबारा केला.

### मराठवाड्यात पुढील चार दिवस पाऊस

**छत्रपती संभाजीनगर:** मराठवाड्यात अवकाळी पावसामुळे पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. लातूर आणि धाराशिव जिल्ह्यात पुढील चार दिवस म्हणजेच २४ मार्चपर्यंत हलका ते मध्यम स्वरुपात पाऊस पडणार आहे. नांदेड, हिंगोली, परभणी, बीड जिल्ह्यातही पावसाची शक्यता आहे, असा अंदाज भारतीय हवामानशास्त्र विभागाने व्यक्त केला आहे. जिल्ह्यात पुढील चार दिवस म्हणजेच २४ मार्चपर्यंत विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम स्वरुपात पाऊस होण्याचा अंदाज आहे. या भागात सोसाट्याचा वारा वाहणार आहे.

सद्यस्थितीत वादळामुळे पिके आडवी झाली आहेत. तुरळक ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, हिंगोली, लातूर, धाराशिव आणि नांदेड जिल्ह्यात शुक्रवारी वेगवेगळ्या भागात पावसाने हजेरी लावली. वादळासह झालेल्या पावसामुळे पिकांचे नुकसान झाले आहे. जोरदार पाऊस आणि गारपीट झालेल्या भागात पिके आडवी पडली आहेत. आंब्यांची फळगळती झाली असून हिंगोली जिल्ह्यात केळी व हळद पिकाचे नुकसान झाले आहे. नांदेड, बीड जिल्ह्यात २३ आणि २४ मार्च रोजी हलक्या ते मध्यम स्वरुपात पावसाची शक्यता आहे. परभणी आणि हिंगोली जिल्ह्यात २४ मार्चला पावसाची शक्यता आहे.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## पराभवाची मिमांसा

राज्यसभेच्या रिक्त जागांसाठी नुकत्याच पार पडलेल्या चुरशीच्या निवडणुकीत विरोधकांच्या 'इंडिया आघाडी'ला मोठा धक्का बसला. विशेषतः बिहार, हरियाणा आणि ओडिसा या राज्यांमध्ये भाजपप्रणीत एनडीएकडे पुरेसे संख्याबळ नसताना विरोधकांना पराभवाची नामुष्की पत्करावी लागली. बिहारमध्ये आमदारांच्या गैरहजेरीचा काँग्रेस, राजद यांच्या 'महागठबंधन'ला फटका बसला. एकूण ५ जागांसाठी ६ उमेदवार रिंगणात होते. संख्याबळानुसार, पाचव्या जागेसाठी संघर्ष होणार हे स्पष्ट होते. तरीही मुख्यमंत्री नितीशकुमार (जदयू), नितीन नवीन (भाजप), रामनाथ ठाकूर (जदयू), उपेंद्र कुशवाह (राष्ट्रीय लोक मोर्चा) आणि शिवेश राम (भाजप) हे पाचही 'एनडीए'चे उमेदवार विजयी झाले. विरोधकांकडून ए.डी.सिंह यांना रिंगणात उतरविले होते. विजयासाठी ४१ मतांची गरज होती. राजद काँग्रेसच्या 'महागठबंधन'कडे ३५ मते होती, तर बसपासह अन्य अपक्षांच्या पाठिंब्यानंतर विरोधी पक्षाचे उमेदवार ए. डी. सिंह यांचा विजय निश्चित होईल असे वाटत होते. मात्र ऐनवेळी काँग्रेसचे तीन आणि राजदचा एक असे एकूण चार आमदार मतदानासाठी गैरहजर राहिल्याने, भाजपप्रणीत एनडीएचे पाच उमेदवार शिवेश राम यांच्या गळ्यात विजयाची माळ पडली. या पराभवानंतर विहारमध्ये राजद आणि काँग्रेस यांच्यातील अंतर्गत मतभेद पुन्हा चव्हाट्यावर आला. राजदने या पराभवासाठी काँग्रेसच्या धोरणांना जबाबदार धरल्याने आघाडीतील दरी अधिक रुंदावली आहे. ओडिसा राज्यात 'क्रॉस-व्होटिंग'मुळे समीकरणे बदलली. ओडिसात ४ जागांसाठी ५ उमेदवार रिंगणात होते. प्रत्येक उमेदवाराला विजयासाठी ३० मतांची गरज होती. भाजपचे मनमोहन सामल, सुजीत कुमार आणि बीजेडीचे संतृप्त मिश्रा विजयी झाले. एका अनपेक्षित निकालात, भाजपने पाठिंवा दिलेले अपक्ष उमेदवार दिलीप राय यांनीही विजय संपादन केला. १४७ सदस्य संख्या असलेल्या ओडिसा विधानसभेत, बिजू जनता दल आणि काँग्रेसकडे त्यांचे संयुक्त उमेदवार डॉ. दत्तेश्वर यांच्या विजयासाठी पुरेशी मते उपलब्ध होती. विजू जनता दलाचे आठ आमदार आणि काँग्रेसच्या ३ आमदारांनी आपापल्या पक्षांच्या आदेशाचे उल्लंघन करत दिलीप राय यांच्या बाजूने 'क्रॉस-व्होटिंग' केले. हरियाणातील राज्यसभा निवडणुकीतही काँग्रेसचे करमवीर सिंह बौद्ध यांना केवळ ०.३३ मतांच्या मूल्याने निसटता विजय मिळाला. काँग्रेसच्या कोट्यातील आमदारांची संख्या पुरेशी असताना सहज विजय मिळेल असे वाटत असताना, ५ आमदारांनी क्रॉस वोटिंग केले आणि ४ मते अवैध ठरवली. मात्र भाजपचे एक मत अवैध ठरल्याने काँग्रेसचे करमवीर यांचा पराभव टळला. राज्यसभा निवडणुकीच्या निमित्ताने विरोधी पक्षांची संघटनात्मक कमकुवत बाजू पुन्हा नव्याने जनतेपुढे आली. काँग्रेस पक्षासाठी क्रॉस वोटिंग (मत फुटणे) आणि त्यामुळे होणारा पराभव ही वाव नवीन नाही; याचा इतिहास खूप जुना आहे. राज्यसभेच्या निवडणुका १९९८ पर्यंत सहसा विनविरोध होत असतात; परंतु जून १९९८ मध्ये महाराष्ट्रात काँग्रेसच्या आमदारांनी पहिल्यांदा मोठ्या प्रमाणावर क्रॉस वोटिंग केले. यामुळे काँग्रेसचे अधिकृत उमेदवार माजी केंद्रीय गृहसचिव राम प्रधान यांचा पराभव झाला होता. २०१६ मध्ये हरियाणामध्ये आर. के. आनंद (काँग्रेस पुरस्कृत) यांच्या निवडणुकीत आमदारांनी चुकीच्या पेनचा वापर केल्याने त्यांची मते बाद होऊन पराभव झाला होता. तसेच, २०२२ मध्ये हरियाणातून काँग्रेसचे राज्यसभेचे उमेदवार अजय माकन यांना स्वतःच्याच पक्षातील मते फुटल्याने आणि एक मत अवैध ठरल्याने पराभवाचा सामना करावा लागला होता. काँग्रेस पक्षासाठी ही बाब चिंतेची ठरली असून, यामुळे पक्षातील अंतर्गत शिस्त आणि नेतृत्वाच्या पकडीवर वारंवार प्रश्नचिन्ह उपस्थित केले गेले आहे.सन २०२४च्या लोकसभा निवडणुकीत विविध राज्यांतील भाजप विरोधी पक्षांची मोट बांधून तयार झालेल्या इंडिया आघाडीला २३४ चा आकडा गाठता आला होता. बहुमतासाठी २७२ चा जादुई आकडा पार करणे शक्य नसल्याने, दहा वर्षांनंतरही विरोधी पक्षांना सत्तेची शिडी चढणे शक्य झाले नाही. त्यामुळे जनतेत विरोधी पक्ष म्हणून एकसंध राहून काम करण्याचा वेत इंडिया आघाडीतील घटक पक्षांनी आखला; परंतु लोकसभा निवडणुकीतील यशानंतर हरियाणा आणि महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकांमध्ये विरोधी पक्षांना मोठ्या पराभवाचा सामना करावा लागला. इंडिया आघाडीला राज्यसभेसाठी प्रभावी रणनीती आखता आली नाही. राज्यसभेच्या निवडणुकीत विरोधकांमधील घटक पक्षांमध्ये समन्वयाचा अभाव असल्याची वाव दिसून आली. त्यामुळे हा पराभव 'इंडिया आघाडी' साठी मोठा धक्का मानला जातो. या निकालातून काही गोष्टी अधोरेखित झाल्या. त्यापैकी एक म्हणजे ऐक्याचा अभाव. निवडणुकीत झालेली क्रॉस वोटिंग आणि मित्रपक्षांमधील समन्वय कमी पडल्याचे या निकालातून स्पष्ट झाले आहे. दुसरे कारण म्हणजे रणनीतीचा अभाव. भाजपने ज्या प्रकारे इतर पक्षांची मते आपल्याकडे वळवली, त्या तुलनेत इंडिया आघाडीची रणनीती कमकुवत ठरली. तिसरा मुद्दा म्हणजे प्रादेशिक पातळीवर अंतर्गत मतभेद दिसून आला. जागावाटपावरून किवा नेतृत्वावरून असलेले मतभेद दूर करणे विरोधकांना जमले नाही. अशा पराभवामुळे कार्यकर्त्यांमध्ये मरगळ येऊ शकते, ती झटकून पुन्हा संघटनात्मक बांधणी करणे हे मोठे आव्हान विरोधकांपुढे असणार आहे. आगामी लोकसभा निवडणुकांसाठी हा पराभव एक 'वेक-अप कॉल' मानायला हरकत नाही. उठसूठ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर तोंडसुख घेणाऱ्या विरोधकांची ही एकी केवळ कागदावरच आहे, असे म्हणायला आता वाव आहे.

# 'बाबू मोशाय'च्या राज्यात पुन्हा तृणमूल...?

पश्चिम बंगाल, आसाम,केरळ,तामीळनाडू आणि पुदूचेरी अशा पाच राज्यातील विधानसभा निवडणुका जाहीर झाल्या आहेत. मात्र देशाचे लक्ष 'बाबू मोशाय'च्या पश्चिम बंगालकडे आहे कारण तिथे तृणमूल काँग्रेस आणि भारतीय जनता पक्ष यांच्यात सरळ लढत आहे. ही निवडणूक स्वाभाविकपणे ममता बॅनर्जी यांच्यासाठी अतिशय प्रतिष्ठेची आणि निर्णायक देखील आहे. सलग चौथ्यांदा सत्ता राखण्यात ममता बॅनर्जी यशस्वी होतात की, नाही याकडे देशातल्या भाजपाच्या विरोधी पक्षांचेसुद्धा लक्ष आहे. भाजपसारख्या बलाढ्य प्रतिस्पर्ध्याला तोंड देऊन जर ममता बॅनर्जी यांनी ही निवडणूक जिंकली तर देशातील भाजपेत्तर आघाडीच्या पंतप्रधानपदाच्या उमेदवार म्हणून त्यांचे नाव अग्रक्रमाने समोर येऊ शकते. (अर्थात त्याला विरोध करणारेही विरोधी पक्षात आहेतच!) ममता बॅनर्जी जर निवडणूक हरल्या तरी त्यांच्या बाजूनी सहानुभूतीची लाट असेल कारण त्यांच्या विरोधात भारतीय जनता पक्षासारखा सर्वार्थाने बलाढ्य प्रतिस्पर्धी होता. भाजपविरोधी देशभरातील दिग्गज नेते मंडळी ममता बॅनर्जी यांच्या पाठीशी नेहेमीप्रमाणे असतीलच पण,एक लक्षात घेतले पाहिजे की, हा पाठिंबा केवळ सांकेतिकच आहे. कारण पश्चिम बंगालमध्ये हे पक्ष किंवा या नेत्यांची किमानही शक्ती मुळीच नाही .

ममता बॅनर्जी यांचा राजकीय इतिहास संघर्षाचा आहे. डाव्या आघाडीशी प्रदीर्घ काळ संघर्ष करुन, त्यासाठी भाजपा-काँग्रेस असे 'तळ्यात मळ्यात' करुन ममता बॅनर्जीनी पश्चिम बंगालमध्ये त्यांची सर्व शक्ती एकवटली. आणि अखेर २०११ मध्ये तृणमूल काँग्रेसला सर्वप्रथम सत्ता प्राप्त झाली. तेव्हा राज्यातले ३४ वर्षांचे डाव्या आघाडीचे सरकार ममता बॅनर्जी यांनी उलथवून टाकले. तेव्हा त्यांचा हा संघर्ष नेत्रदीपक राजकीय आदर्श मानला जात होता. एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, पश्चिम बंगालमधले राजकारण आणि सत्ताकारण हे नेहमी प्रतिष्ठेच्या मुद्दयावर चालते. जसे आपल्याकडे निवडणूक आली की मराठीचा प्रश्न उफाळून येतो किंवा स्वतंत्र विदर्भाचा मुद्दा उफाळून येतो, तसे पश्चिम बंगालमध्ये बंगालची भूमी आणि भाषाविषयक अनेक प्रतिष्ठेचे प्रश्न निर्माण होत असतात. ममता बॅनर्जी यांनी देखील मी या 'मातीची मुलगी' आहे असा प्रचार करत २०११ च्या निवडणुकीमध्ये विजय संपादन केला.आता पश्चिम बंगालचे अस्तित्वच भाजपने धोक्यात आणलेले आहे, असा ममता बॅनर्जी यांचा दावा आहे. थोडक्यात भाषक भावनात्मक साद घालण्यात आपल्या शिवसेना आणि मनसे यांच्याप्रमाणे ममता बॅनर्जी तरबेज आहेत. ममता बॅनर्जी या काही लेच्यापेच्या नेत्या नाही. त्यांची नाळ तिथल्या मातीशी, लोकांशी घट्ट आहे. गेली पंधरा वर्षे त्या सत्तेत आहेत आणि पश्चिम बंगालमधल्या जवळजवळ सर्वच गावांमध्ये त्यांचा संपर्क आहे .

आणखी एक महत्त्वाचा भाग म्हणजे ज्याप्रमाणे डाव्या आघाडीशी संघर्ष करुन ममता



**डावे आणि काँग्रेस पश्चिम बंगालात नामशेष असल्यासारखे आहेत. म्हणून ममता बॅनर्जी म्हणजे तृणमूल काँग्रेस विरुद्ध नरेंद्र मोदी म्हणजे भारतीय जनता पक्ष अशीच ही सरळ लढत आहे.**

बॅनर्जी यांनी नेतृत्त्व आणि स्थान निर्माण केले त्या संघर्षाला हिंसेची धार आहे. त्याचा उपयोग आता त्यांना भारतीय जनता पक्षाशी लढत देताना होणार आहे. कारण भाजपाला 'ठोशास ठोसा' देण्याची क्षमता ममता बॅनर्जीमध्ये आहे. प्रसंगी रस्त्यावर उतरुन संघर्ष करण्याची धमक त्यांच्यात आहे. ममता बॅनर्जींचा स्वभाव 'हट्टीसदृश्य जिद्दी' आहे. (या स्वभावाची तक्रार तत्कालीन पंतप्रधान दस्तुरखुद्द अटलबिहारी वाजपेयींनी त्यांच्या आईकडे केली होती.) या स्वभावामुळेच त्या आजवर इथवर प्रवास करु शकलेल्या आहेत. त्यांचा कारभार कांहीसा एककल्लीही आहे. कुठलीही भूमिका घेतांना त्या अगदी 'तारस्वरात' (म्हणजे आपल्या महाराष्ट्रातल्या देवेंद्र फडणवीस यांच्यासारख्या!) बोलत असतात. सर्वसामान्यांना नेत्याचे हे वागणे आवडते असते; अशा वागण्याची मोहिनी त्यांच्यावर पडत असते, हेही तेवढेच खरे. त्या कलावंत आहेत त्यामुळे अभिजनांमध्ये त्यांच्याबद्दल सहानुभूती आहे.

पण, यावेळेची परिस्थिती थोडीशी वेगळी आहे. कितीही नाही म्हटले तरी, तृणमूल काँग्रेसच्या पंधरा वर्षाच्या सत्तेची नाराजी लोकांत आहे. भारतीय जनता पक्ष गेल्या निवडणुकीपासून पश्चिम बंगालमध्ये खंबीरपणे पाय रोवून उभा आहे. भाजपच्या विधानसभेत ७७ जागा आहेत. शिवाय डावी आघाडी, काँग्रेस नाममात्रही नाहीत. गेल्या निवडणुकीत पश्चिम बंगालच्या मतदारांनी डावे आणि काँग्रेसला विधानसभेत एकाही जागी विजयी केलेले नाही. थोडक्यात डावे आणि काँग्रेस पश्चिम बंगालात नामशेष असल्यासारखे आहेत. म्हणून ममता बॅनर्जी म्हणजे तृणमूल काँग्रेस विरुद्ध नरेंद्र मोदी म्हणजे भारतीय जनता पक्ष अशीच ही सरळ लढत आहे. ममता बॅनर्जी यांच्या विरोधात प्रादेशिक पातळीवर भाजपाचा प्रभावी चेहरा नाही. ममता बॅनर्जी यांच्या विरोधात पंतप्रधान नरेंद्र मोदी (आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा) थेट मैदानात उतरलेले आहेत. म्हणजे देशाचा पंतप्रधान आणि गृहमंत्री विरुद्ध एका राज्याचा मुख्यमंत्री अशी ही विषम लढाई आहे.भाजपची निवडणूक लढवण्याची तयारी नेहमीच अडीच-तीन–चार वर्ष आधी सुरु होते तशीच ती पश्चिम बंगालमध्ये सुरु झालेली आहे.

निवडणुकांमध्ये एखादा मुद्दा अकारण किंवा सकारणही गाजत असतो आणि तो कुठला असेल हे कधीच सांगता येत नसते. सध्याच्या घटकेला (बांगला देशीयांची) घुसखोरी हा मुद्दा भाजपने लावून ठेवलेला आहे, त्यामुळे देशाच्या सुरक्षिततेला धोका असल्याचा भाजपचा दावा आहे. शिवाय ममता बॅनर्जी यांची राजवट 'जंगलराज' आहे अशी प्रचाराची राळ भारतीय जनता पक्षाने उडवली आहे ; यात राजकारण आहे की तथ्य, हे ठरवणे पश्चिम बंगालच्या मतदारांच्या हाती आहे.

निवडणूक आयोग आणि त्या निमित्ताने केंद्र सरकारवर ममता बॅनर्जी यांनी थेट तोफ डागलेली आहे.त्यासाठी न्यायालयात जाऊन त्यांनी वाकिलाचीही भूमिका वठवली.'देशाच्या निवडणूक आयोग केंद्र सरकारच्या हातातले बाहुले आहे',असा आरोप पूर्वी काँग्रेसच्या काळात होते असे,आता भाजपाच्या राजवटीत केंद्रातल्या सत्तेकडे निवडणूक आयोग झुकल्याच्या आरोपाला बळकटी मिळताना दिसत आहे. अर्थात या मुद्द्याला भाजप भीक घालत नाही हा अनुभव आहेच!

विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराने वेग पडण्याआधी पश्चिम बंगालमधील स्त्रोतांच्या म्हणण्याप्रमाणे, तृणमूल काँग्रेस म्हणजे ममता बॅनर्जी यांच्या काही जागा कमी होतील पण त्याच सत्तेत राहतील आणि भाजप १०० ते ११०-१५ जागांवर जाईल. (अर्थात मी असे विधान केल्याने भाजपचे ट्रोल खवळतील हा भाग वेगळा असो) याच स्त्रोतांनी गेल्या वेळेस ममता बॅनर्जी त्यांच्या मतदार संघात पराभूत होतील पण त्यांचाच पक्ष सत्तेत येईल अशी माहिती दिली होती आणि तसेच घडले होते हे उल्लेखनीय. शिवाय आणखी एक मुद्दा असा आहे की, २०१४ नंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना 'अरे' ला 'कारे' म्हणण्याचे धाडस जसे राहुल गांधींनी दाखवले तसेच अलिकडच्या काळामध्ये नरेंद्र मोदी आणि केंद्र सरकारच्या विरुद्ध बंडाचे निशाण फडकण्याचे धाडस ममता बॅनर्जी यांनी दाखवलेले आहे. केंद्र सरकारच्या संस्थांना त्यांनी राज्यात प्रवेश करु द्यायला नकार दिला. हे असे सगळे जास्त अनुकूल आणि काही उणे वातावरण सध्या ममता बॅनर्जी यांच्या बाजूने आहे .

भाजप एक राष्ट्रीय आणि सर्वार्थाने बलदंड पक्ष आहे. पश्चिम बंगाल काबिज करण्याची भाजपची योजना जुनी आहे.भारताच्या पूर्व भागातील काही राज्यात भाजपने सत्ता संपादन केलेली आहे. पश्चिम बंगाल राष्ट्रीय राजकारणाच्या दृष्टीकोनातून प्रमुख राज्य आहे. याचे कारण या राज्यात लोकसभेच्या ४२ जागा आहेत. २०२४ च्या निवडणुकीत त्या ४२ पैकी १२ जागा जिंकण्यात भाजपला यश आलेले आहे आणि मतांची टक्केवारी ४०.२ होती. पण, भाजपाच्या मतांच्या टक्केवारीमध्ये पश्चिम बंगालमधे सतत चढ-उतार आढळून येतो. त्याआधीच्या लोकसभा निवडणुकीत हा विजयी आकडा १८ होता.२०११ च्या निवडणुकीत भाजपला ४ टक्के तर २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत १६ टक्के मते मिळाली.२०१६ च्या विधानसभा निवडणुकीत मतांची ही टक्केवारी १० टक्क्यांवर आली ; हे चढउतार पक्षासाठी आव्हानात्मक आहेत.

पण,वर उल्लेख केल्याप्रमाणे भाजप निवडणुकीची तयारी अतिशय प्रदीर्घ काळापासून करतो.शिवाय भाजपाचे अशातले छोट्या जाती,जमाती,उपजाती,पोटजाती एकत्र करुन भक्कम मोठी बांधण्याच एक सूत्र आहे. जे महाराष्ट्रात उत्तर प्रदेशात दिसले. तोच फार्म्युला पुन्हा आता वापरला जाईल. २०१७ पासूनच भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंधित असणारे कार्यकर्ते पश्चिम बंगालमध्ये ठाण मांडून बसलेले आहेत. यांचा अर्थ भाजप अशा पद्धतीची काही एक सूत्रबद्ध रचना करुन, बांधणी करुन, रणनीती आखून ही निवडणूक लढवण्याची तयारी करत असणार हे अगदी स्पष्ट आहे. आणखी एक मुद्दा असा की, भाजपाच्या राजकारणाचा भर नेहमीच ध्रुवीकरणावर राहिलेला आहे. 'वन व्हर्सेस ऑल' अशा पद्धतीचे निवडणूक जिंकण्याचे ते धोरणात्मक सूत्र असते. त्याचा ते खूप अभ्यास करतात आणि त्याची पद्धतशीर बांधणी करतात. त्यांच्या संघटनात्मक बांधणीच्या चिकाटी व चातुर्याचे आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. पश्चिम बंगालमध्ये विविध अंदाजानुसार २८ ते ३० टक्के मुस्लिम मते आहेत आणि ती साहजिकच निर्णायक ठरतात. या निवडणुकीत हे मतांचे ध्रुवीकरण कसे केले जाते. ही २८ ते ३० टक्के विरुद्ध बाकीची मते आणि त्यातली भाजपाच्या पारड्यात किती पडतात किंवा 'पाडून घेतली' जातात यावरसुद्धा भाजपाचे यश मोठे अवलंबून आहे.

एक निर्विवाद आहे,यापुढे पश्चिम बंगालमध्ये तृणमूल विरुद्ध भाजपा अशी सरळ लढाई असेल. कारण काँग्रेस आणि डावे नेस्तनाबूत झाल्यातच जमा आहे. या निकालांनी भाजपची राज्याच्या राजकारणावरची पकड घट्ट होईल आणि पुढच्या निवडणुकीत भाजपला सत्ता प्राप्त करता येईल, अशी आजची स्थिती आहे. अर्थात हे सगळे 'जर तर' आहे. प्रत्यक्षात निकाल काय लागतील तोवर वाट बघायला हवी.

**प्रवीण बर्दापूरकर**
मो.९१९८२२०५५७९९

# सदस्य नोंदणी,निवडणूक यात पारदर्शकता हवी

**खलबत्ता**
**विनोद देशमुख**

सदस्य नोंदणीपासून निवडणुकीपर्यंत वि. सा. संघात सारा कारभारच कसा बोगस आणि एककल्ली आहे, हे गेल्या ३ भागात आपण पाहिले. पण, मतपत्रिकांची पळवापळवी यावेळी पहिल्यांदाच घडली, असे समजण्याचंही कारण नाही. गेल्या ४७ वर्षात फक्त ४ निवडणुका झाल्या. त्यातील पहिल्या, १९८० मधील निवडणुकीत एका गटाच्या मतपत्रिका दुस-्या गटाने पळवून विजय मिळवला होता, असे जुनेजाणते लोक सांगतात. तेव्हाचे (१९७७ ते ८०) विद्यमान अध्यक्ष डॉ. मधुकर आष्टीकर यांच्याविरुद्ध युवकांनी बंडाचा झेंडा उभारला आणि कवी डॉ. शिरीष गोपाळ देशपांडे यांना अध्यक्षीय उमेदवार केले. तेव्हा जिल्ह्याजिल्ह्यातील साहित्यिक कार्यकर्ते मतपत्रिका गोळा करून एकगठ्ठा मते नागपूरला आणायचे, अकोला येथून आलेला असाच ८० मतांचा गठ्ठा पळवला गेला अन् डॉ. आष्टीकर तेवढ्याच मतांनी विजयी झाले म्हणे याचा अर्थ, हे तेव्हापासूनच सुरू आहे. पण याचा फार गाजावाजा झाला नाही. कारण, मर्यादित सदस्यसंख्या आणि मध्यंतरीच्या काळात फक्त दोनदाच निवडणुका (एकदा प्राचार्य राम शेवाळकर आणि एकदा प्रा. सुरेश द्वादशीवार) झाल्या; त्याही एकतर्फी ! यंदा मात्र प्रथमच दोनपेक्षा जास्त अध्यक्ष, साडेतीन पॅनल, २२ कार्यकारिणी जागांसाठी ८३ इच्छुक आणि साडेसात हजार मतदार असा शतकातील विक्रम झाल्यानं एकच गदारोळ (वऱ्हाडी बोलीत 'दांगडो' !) झाला.

हा गदारोळ पाहता, विदर्भ साहित्य संघाची संपूर्ण निवडणूक प्रक्रियाच बदलण्याची गरज निर्माण झाली आहे, हे कोणीही मान्य करील. मूळ आजीव सदस्य यादी ताबडतोब दुरुस्त करून अद्ययावत बनवली गेली पाहिजे. २ वर्षांपेक्षा जास्त काळ सदस्य राहिलेलेच मतदार होऊ शकतात. त्यांची यादी करताना अचूक पत्ता, पिनकोड, फोन/मोबाईल नंबर, ईमेल यावर भर देणे आवश्यक आहे. आपण बाबा आदमच्या जमान्यात राहत नसून आधुनिक तंत्रयुगात राहतो आहोत. मतपेटीची जुनाट पद्धत बंद करून त्याऐवजी ऑनलाईन मतदान घेतले जाऊ शकते. यात वेळ आणि श्रम वाचून काम फटाफट होईल. (यावेळेसारखी २ दिवस मतमोजणी करावी लागणार नाही आणि मतपत्रिकांची तर समस्याच संपून जाईल.) जवळजवळ प्रत्येकाकडे आज मोबाईल/ईमेल असताना निवडणूक प्रक्रियेत अशी आधुनिकता आणणे फार कठीण नाही. फक्त सुधारणा करण्याची मानसिकता तेवढी हवी. गेलाबाजार विदर्भातील प्रत्येक जिल्हास्थानी, तालुकास्थानी आणि वि. सा. संघाची शाखा असलेल्या अन्य ठिकाणी ईव्हीएम किंवा मतपेट्यांद्वारेही मतदान घेता येऊ शकते. या सर्व बाबींचा विचार नवीन पदाधिका-्यांनी त्वरित केला पाहिजे आणि दोषपूर्ण घटनेत योग्य ते बदल करून वि. सा. संघाला बोगस मतप्रक्रियेतून बाहेर काढले पाहिजे. तरच वि. सा. संघासारख्या प्रतिष्ठित वैदर्भीय साहित्य संस्थेचा मलिन झालेला चेहरा स्वच्छ होऊ शकतो. तो तसा लवकर व्हावा, ही मराठी साहित्यप्रेमी जनतेची नवनिर्वाचितांकडून अपेक्षा आहे राजेहो !

**(समाप्त)**

# संवाद

## लोकसहभागाची अपेक्षा

महाराष्ट्रात अलीकडेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे कवित्व संपले आहे. मूळ मुद्दा नागरिकांच्या समस्यांची उकल होण्याचा आहे. त्याकडेच आता सर्वांनी अधिक लक्ष द्यावे लागणार आहे. राज्याचा शहरी टक्का वरचेवर वाढत चाललेला असताना सत्तेची केंद्रदेखील शहरी भागातच स्थिरावली आहेत. त्यामुळे शहर सुधारणा योजनांमध्ये लोकसहभाग आता महत्वाची गोष्ट झाली आहे. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती संजय करोल यांनी अलीकडेच याबाबत व्यक्त केलेले विचार लक्षात घेण्यासारखे आहेत. नागरी समस्या सोडविताना पायाभूत सोयी-सुविधा, पारदर्शक नागरी प्रशासन, कार्यक्षम सेवा आणि शाश्वत विकास यासाठी प्रशासनाने प्रयत्नशील राहण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे. शहरी सुधारणा करताना कर्तव्यदक्ष अधीकारी जसे आवश्यक असतात, तितकाच नागरिकांचा सहभागदेखील आता अनिवार्य व्हायला पाहिजे. वर्षानुवर्षे तुंबलेले खटले कमी होण्यावरही आपल्याकडे विचार व्हायला पाहिजे, हे सांगतानाच त्यांनी खटले लवकरात लवकर निकाली काढण्याबाबत भर दिला जावा, असेही सांगितले आहे. न्यायप्रक्रियेत सहभागी असलेल्या न्यायधीशांकडून नागरी विकासाबाबत करण्यात आलेली ही सूचना प्रत्येकाने लक्षात घेण्यासारखी आहे. विशेषतः महानगरपालिका आणि ग्रामपंचायतींचा कारभार नव्याने हाती घेतलेल्या पदाधिकाऱ्यांसाठीं या सूचना मार्गदर्शक ठराव्यात. लोकशाही व्यवस्थेमध्ये लोकांनी लोकांसाठी चालवलेले राज्य अपेक्षित असते. आणि त्यानुसार विकासकामांमध्ये लोकांचा अधिकाधिक सहभाग वाढत गेल्यास त्याचा अपेक्षित परिणाम दिसून येऊ शकतो. आणि त्याचबरोबर भ्रष्टाचाराचे प्रमाण देखील कमी होण्याच्या दिशेने पावले पडायला लागतील.

**प्रा. मधुकर चुटे**

## 'जल ही जीवन,जल ही अमृत'

आज मानवाच्या निष्काळजीपणामुळे व अतिरेकामुळे जंगले सुकली आहे.आज संपूर्ण जग बारूदच्या ढीगाऱ्यावर बसले आहे ही बाब सर्वांनाच ग्यात आहे.अनेक देशात गृहयुद्ध व आता महायुद्ध सुरू आहे.उदाहरण द्यायचे झाले तर रशिया -युक्रेन,अमेरिका-इजरायल-इराण- गाजा-इराण-हिज्बुला यांनी महायुद्धाचे स्वरूप घेतले आहे यामुळे युद्धाने जनुकाय रक्ताची नदी वाहत आहे की काय असे वाटत आहे.सध्याच्या परिस्थितीत या देशात आगडोंब उसळला असून अनेक क्षेत्र जळुन खाक झाले आहे. अशा परीस्थितीत भुमाता(पृथ्वी) पाण्याचे संग्रहन कसे काय करेल?भारतासह संपूर्ण जगाने विश्व जल दिवस साजरा करतांना पाण्याचे महत्व समजून घेतले पाहिजे.आज पाण्यासाठी मानव व प्राणी एकमेकांचे कट्टर शत्रू बनल्याचे दिसून येते.त्यामुळे संपूर्ण जगाने पाणी वाचविण्याचा संकल्प केला पाहिजे.असे भाकीत आहे की २०४० मध्ये भारतात प्यायला पाणी मिळणार नाही.अशी स्थिती येवू शकते याला नाकारता येत नाही.संयुक्त राष्ट्राने जगातील पाण्याच्या परीस्थितीच्या अहवालामध्ये ही भीती वर्तवली आहे. एका वर्षात पावसाचे पाणी अडवीता आले तर पाच वर्षे पुरेल इतका पाणी साठा आपल्याला उपलब्ध होवू शकतो. परंतु त्यासाठी योग्य नियोजन करणे अजुनही आपल्याला जमले नाही.आताही ८० टक्के पाणी प्रदूषित आहे.आज जगातील वाढती पाण्याची समस्या यामुळे अनेक पशुपक्षी लुप्त झाल्याचे दिसून येते. याकरीता जल विर्श्व दिनाच्या निमित्ताने वाढते प्रदुषण रोखण्याचा व पाणी वाचविण्याचा निर्धार सर्वांनीच अंगीकारला पाहिजे.

**रमेश लांजेवार**
मो.नं.९९२१६९०७७९

E-mail :-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

# चालत्या मिनी ट्रॅव्हलर्सला भीषण आग; १७ प्रवासी थोडक्यात बचावले

# 'द बर्निंग मिनी ट्रॅव्हलर्स'

**जनमाध्यम प्रतिनिधी**
**(विवेक वानखडे जि.प्र.)**

यवतमाळ - वर्धा ते नांदेड प्रवासाला निघालेल्या मिनी ट्रॅव्हल्सला यवतमाळजवळ अचानक भीषण आग लागल्याने "द बर्निंग ट्रॅव्हलर्स" असा थरारक प्रसंग घडला. काही क्षणांतच आगीने रुद्ररूप धारण करत संपूर्ण वाहन जाळून खाक केले. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.मात्र प्रवाशांचे सर्व साहित्य जळून नष्ट झाले.



मिळालेल्या माहितीनुसार, वर्धा येथून हेल्थ वेलनेस सेमिनारसाठी नांदेड येथे 17 प्रवासी मिनी ट्रॅव्हल्स (क्र. MH 27-BC-0059) ने निघाले होते. कळंब येथे अल्प विश्रांती घेतल्यानंतर प्रवास पुन्हा सुरू झाला. यवतमाळ जवळील भारी विमानतळ परिसरात पोहोचताच दुपारी 2.30 वाजता वाहनाच्या इंजिनमधून वायरिंग स्पार्क होत असल्याचे चालकाच्या निदर्शनास आले.चालकाने तत्काळ वाहन थांबवून पाहणी केली असता अचानक धूर निघू लागला. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून सर्व प्रवाशांना तातडीने खाली उतरवण्यात आले. काही क्षणांतच आगीने संपूर्ण वाहनाला वेढा घालत भीषण रूप धारण केले आणि ट्रॅव्हल्स जळून खाक झाली. घटनेची माहिती मिळताच शहर पोलीस आणि अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे आग नियंत्रणात आणण्यात यश आले, अन्यथा आसपासच्या परिसरालाही मोठा धोका निर्माण झाला असता.

या घटनेचा व्हिडिओ स्थानिक नागरिकांनी मोबाईलमध्ये कैद करून सोशल मीडियावर व्हायरल केला. थरारक दृश्य पाहण्यासाठी घटनास्थळी मोठी गर्दी झाली होती. वाहनामध्ये 2 लहान मुली, 3 महिला, 12 पुरुष आणि चालक असे एकूण 18 जण होते. सर्वजण सुखरूप बचावल्याने सुटकेचा श्वास सोडण्यात आला. मात्र या घटनेनंतर प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून त्यांनी पुढील प्रवास रद्द करत परत वर्ध्याकडे जाण्याचा निर्णय घेतल्याची माहिती मिळाली आहे.

### नियम असतानाही वाहनांमध्ये अग्निशमन सिलेंडर का नाहीत?

प्रवाशांच्या जीवाशी खेळ थांबवण्याची गरज मिनी ट्रॅव्हल्स सारख्या प्रवासी वाहनांमध्ये आग विझविण्यासाठी अग्निशमन सिलेंडर असणे हे वाहतूक नियमांनुसार बंधनकारक आहे. तरीही प्रत्यक्षात अनेक वाहनांमध्ये ही अत्यावश्यक सुविधा नसल्याचे वारंवार दिसून येते. परिणामी, छोट्या बिघाडातूनही मोठ्या दुर्घटना घडण्याची शक्यता वाढते. यामुळे गंभीर प्रश्न उपस्थित होतात नियम असतानाही अग्निशमन सिलेंडर का नसतात? वाहनांच्या फिटनेस तपासणीत याकडे दुर्लक्ष का होते? आणि अशा निष्काळजीपणामुळे मोठी दुर्घटना घडल्यास जबाबदार कोण? सदर घटनेत सुदैवाने सर्व प्रवासी बचावले, मात्र ही बाब भविष्यातील धोक्याची घंटा आहे. त्यामुळे प्रवाशांनी वाहनात बसण्यापूर्वी सुरक्षेच्या सुविधा तपासणे आवश्यक आहे. तसेच चालक व वाहन मालकांनी अग्निशमन सिलेंडर, इमर्जन्सी एक्झिट यांसारख्या सुविधा अनिवार्यपणे उपलब्ध करून द्याव्यात. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करणेही तितकेच गरजेचे आहे. अन्यथा अशा निष्काळजीपणामुळे मोठी जीवितहानी होऊ शकते.

# भरधाव आयशरची ऑटोला धडक!

### १६ जण जखमी, ५ महिलांची प्रकृती गंभीर, विडुळ मार्गावरील अपघात हळद काढणीसाठी निघालेल्या महिला मजुरांवर संकट

**जनमाध्यम प्रतिनिधी**

उमरखेड - उमरखेड-विडुळ मार्गावर शनिवारी सकाळी सुमारे १० वाजताच्या सुमारास भरधाव वेगाने येणाऱ्या आयशर ट्रकने ऑटोला जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात घडला. या दुर्घटनेत ऑटोतील १४ महिला मजूर, चालक आणि दुचाकीस्वार असे एकूण १६ जण जखमी झाले असून काही महिलांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती समोर आली आहे.

सदर अपघात गोपीकाबाई गावंडे कॉलेजसमोर, हनुमान मंदिराजवळ घडला. उमरखेडहून विडुळ शिवारात हळद काढणीसाठी जाणाऱ्या महिला मजुरांना घेऊन ऑटो जात असताना मागून येणाऱ्या आयशर ट्रक (क्र. एमएच ४० बीएल ५९८०) ने निष्काळजीपणे धडक दिली. या जोरदार धडकेमुळे ऑटो रस्त्याच्या कडेला पलटी झाला. या अपघातात सारिका जगताप, संगीता जेवे, प्रतीभा जाधव, धुपता दवने, माया गवंदे, सत्यशीला दिवेकर, रश्मी दिवेकर, सुनीता दिवेकर, बेबाबाई दिवेकर, जीजाबाई धुळे, वर्षा गायकवाड, अर्चना जगदाळे, लताबाई शिंदे (सर्व रा. उमरखेड) यांना विविध प्रकारच्या दुखापती झाल्या. तसेच ऑटो चालक गजानन हांडे यांनाही छातीला मार लागला. दरम्यान,





लक्ष्मण गायकवाड (रा. विडुळ) यांच्या दुचाकीलाही आयशरची धडक बसून तेही जखमी झाले. अपघातानंतर पोलिस व रुग्णवाहिका तात्काळ घटनास्थळी दाखल होऊन सर्व जखमींना उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले. यापैकी सुनीता दिवेकर, वर्षा गायकवाड, बेबाबाई दिवेकर, जीजाबाई धुळे व लताबाई शिंदे यांना पुढील उपचारासाठी नांदेड येथे तर गंभीर जखमी अर्चना जगदाळे यांना वर्धा येथे पाठविण्यात आले आहे. या प्रकरणी विद्या दिगांबर इंगोले (रा. आंबेडकर वॉर्ड, उमरखेड) यांच्या फिर्यादीवरून आयशर चालक रमेश सुखदेव लोखंडे (रा. लौबा, ता. दिग्रस, जि. यवतमाळ) याच्याविरुद्ध निष्काळजीपणे वाहन चालविल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उमरखेड पोलिसांनी संबंधित वाहनांना ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू आहे. दरम्यान, अपघातग्रस्त ऑटोमध्ये क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी असल्याचे समोर आले असून वाहन मालकी व नोंदणी संदर्भातही अनियमितता असल्याची प्राथमिक माहिती आहे. या सर्व बाबींचा तपास पोलीस करत आहेत.

## वेचक



### विद्यार्थ्यांचा पालकासह केला सत्कार

दिग्रस - जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रम हे विद्यार्थ्यांचे फलित आहे. नवोदय विद्यालयात प्रवेश ही मोठी संधी असून त्याचा योग्य उपयोग केल्यास भवितव्य उज्ज्वल होईल. विद्यार्थ्यांनी पुढील वाटचालीसाठी आत्मविश्वास, मेहनत आणि ध्येय यावर लक्ष केंद्रित केल्यास यश नक्कीच पदरात पडेल. १४ हजार विद्यार्थ्यांपैकी ८० विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून या शाळेतील २४ विद्यार्थ्यांपैकी १२ विद्यार्थ्यांचे यश यवतमाळ जिल्ह्यातून एकमेव या शाळेतील १२ विद्यार्थी असून नवोदय पात्र विद्यार्थ्यांच्या यशाने चिंचोली खुर्दचा अभिमान उंचावला असल्याचे मत जिल्हा नियोजन समिती सदस्य सुधीर देशमुख यांनी अध्यक्षस्थानावरून व्यक्त केले. तालुक्यातील चिंचोली खुर्द जिल्हा परिषद आदर्श शाळा व गट ग्रामपंचायत कळसा - चिंचोली यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१८ मार्च रोजी चिंचोली जिल्हा परिषद आदर्श शाळा येथे विद्यार्थी- पालक आयोजित गौरव सत्कार सोहळा समारंभात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. या कार्यक्रमास सरपंच तथा प्रशासक हरीश मनवर, ग्रामपंचायत सचिव संतोष साळुंके, सय्यद रफिक, मोतीराम खेकाळे, रमेश गावंडे, सुनील नाटकर, किशोर कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमा पूजनाने झाली. मुख्याध्यापक प्रकाश देशमुख यांनी प्रास्ताविकामध्ये विद्यार्थ्यांच्या यशामागील मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन व पालकांचे सहकार्य यांचा विशेष उल्लेख केला. सूत्रसंचालन संध्या तायडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सोनाली चिकने यांनी मानले. यावेळी विद्यार्थ्यांच्या यशात मोलाचे योगदान दिल्याबद्दल प्रशिक्षक नितीन डहाके व बळीरामनगर येथील संतोष मोरे यांचाही सत्कार करण्यात आला. नवोदय पात्र विद्यार्थी कृतिका वैदेही महेंद्र कांबळे, प्रणाली शंकर नीता होलगरे, जान्हवी सुषमा विष्णू बुट्टीकर, मानवी रेखा मनोज दरोडे, आदित्य दुर्गा चंपत गिरी, किरण शितल श्रावण बेले, वंश प्रकाश गंगा साबळे, सायली मनीषा निलेश बुट्टीकर, प्रशांत अष्टशिला राजू खंडारे, सोहम गीता राजू शिंदे, अर्जुन अर्चना माणिक सातपुते व प्रिया नीता संतोष गोरे यांचा शाल, श्रीफळ, गिफ्ट, पुष्पगुच्छ व पेढा भरवून त्यांचा सत्कार करण्यात आला. या यशामुळे चिंचोली खुर्द गावाच्या शैक्षणिक प्रगतीला नवे बळ मिळाले असून, भविष्यातही अशाच यशाची परंपरा कायम राहील, असा विश्वास शिक्षक हिराकांत बोबडे यांनी व्यक्त केला. या प्रसंगी शाळेचे शिक्षक -शिक्षकेत्तर , नागरिक व पालकवर्ग उपस्थित होता.

### पुसदमध्ये आज''स्त्री शक्तीचा जागर', २१ व्या शतकातील स्त्री सक्षमीकरणावर विशेष व्याख्यान!

पुसद : जागतिक महिला दिनानिमित्त देशमुख महिला मंडळ, पुसद यांच्या वतीने 'स्त्री शक्तीचा जागर' या प्रेरणादायी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. स्त्री सन्मान व सक्षमीकरणाच्या भावनेतून "२१ व्या शतकातील स्त्री : स्वातंत्र्य, समानता आणि आत्मनिर्भर सक्षमीकरणाचा प्रवास" या विषयावर विशेष व्याख्यान होणार आहे. या कार्यक्रमात संभाजीनगर येथील प्रख्यात वक्त्या ॲड. सौ.वैशालीताई डोळस या मार्गदर्शन करणार असून, त्यांच्या विचारप्रवर्तक भाषणातून आधुनिक स्त्रीच्या प्रगतीचा व संघर्षाचा प्रवास उलगडला जाणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान तहसीलदार सौ.रेखा वाणी भूषवणार असून, उद्घाटन सौ. संगीता जाधव यांच्या हस्ते होणार आहे. तसेच प्रमुख उपस्थितीमध्ये सौ. वैशालीताई संजय देशमुख, सौ. शुभांगीताई पानपटे, डॉ. सौ. आशाताई कदम, सौ. अर्चना जगताप व सौ. कल्पना शिकारे यांचा समावेश राहणार आहे. सदर कार्यक्रम रविवार, २२ मार्च २०२६ रोजी सायं. ४.३० वाजता नवजीवन कॉन्व्हेंट हॉल, दुबेवार लेआउट, पुसद येथे आयोजित करण्यात आला आहे. या प्रेरणादायी व्याख्यानाचा लाभ घेण्यासाठी पुसद शहरातील महिला व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन देशमुख महिला मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# घाटंजी-यवतमाळ रस्त्यावर भीषण अपघात ; महिला गंभीर जखमी

**जनमाध्यम प्रतिनिधी**

घाटंजी - २० मार्च २०२६ च्या रात्री सुमारे १० वाजून २० मी.च्या दरम्यान गिलानी कॉलेज च्या समोरून एक अल्पवयिन मुलगा भरधाव वेगात दूचाकी घेऊन यवतमाल मार्गे जात असताना साईधाम येथिल एक महीला तीच्या मुलासोबत शतपावली (फीरायला) निघाली असता सदर भरधाव वेगात जाणा-या दूचाकीने त्या महिलेला धडक दीली.या धडकेमध्ये महिला अतिशय गंभीर जखमी झाली आहे.

तसेच दूचाकीस्वार अल्पवयिन चालक असलेला मुलगाही गंभीर जखमी झाला आहे.याअपघातातील जखमींना उपस्थित नागरिकांनी व रुग्णसेवक म्हणून परिचीत असलेले मुज्जू पटेल व त्यांचे सहकारी मित्रांनी तात्काळ ग्रामीण



रुग्णालय घाटंजी येथे दाखल केले.रुग्णालयात प्राथमिक तपासणी करून महिलेची हालत गंभीरअसल्याने त्यांना यवतमाळ ग्रामीण रुग्णालय येथे पाठविण्यात आले. प्राथमिक माहीती नूसार या अपघातातील अपघात ग्रस्त महिलेचे नाव श्वेता प्रशांत बच्चेवार रा. साईधाम सोसायटी, घाटंजी व बाईकस्वार अल्पवयीन चालक मुलगा रोहित प्रभुदास राठोड रा. ईस्तारी नगर, घाटंजी असल्याचे कळते. या अपघाती घटनेमुळे घाटंजीत अल्पवयिन सुसाट बाईकस्वारांच्या समस्या बाबत पुन्हा घाटंजीकराना प्रश्न उपस्थित होत आहे. यावर घाटंजी पोलिस प्रशासन लक्ष देतील का?. नगर परिषदेने लाखोंचा निधी खर्च करून लावलेली मुख्य रस्त्यावरिल सीसीटीव्ही कॅमे-याचा सुसाट बाईकस्वारावर लगाम लावण्यासाठी काही उपयोग होणार का?. हा प्रश्न सर्वसामान्य नागरिक,व घाटंजीकराना पडलेला आहे.

# पांढरकवडा वनविभागात नव्या सफारी मार्गाचे उद्घाटन!

### निसर्ग पर्यटनाला चालना

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - जिल्ह्यातील समृद्ध वनसंपदेचा शाश्वत विकास साधत स्थानिक युवकांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने पांढरकवडा प्रादेशिक वनविभागाने जांब (हेटी) येथे नव्याने विकसित पर्यटन सफारी मार्गाचे भव्य उद्घाटन केले. जागतिक वन दिनाचे औचित्य साधून आर्णी-केळापूरचे आमदार राजूभाऊ तोडसाम यांच्या हस्ते हा सोहळा उत्साहात पार पडला.यावेळी मुख्य वनसंरक्षक डॉ. किशोर मानकर, उपवनसंरक्षक यशवंत बहाळे, सहायक वनसंरक्षक विशाल चव्हाण, स्थानिक पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान प्रवेशद्वाराचे उद्घाटन व सफारी वाहनांना हिरवा झेंडा दाखवून उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

सुमारे ३७ किमी लांबीचा हा सफारी मार्ग पारवा व घाटंजी वनपरिक्षेत्रातून जात असून पर्यटकांसाठी सुरक्षित



करण्यात आला आहे. सहा कृत्रिम पाणवठे, दिशादर्शक फलक आदी सुविधा उभारण्यात आल्या आहेत. टिपेश्वर अभयारण्यालगत असलेल्या या भागात वाघ, बिबट्या, अस्वल, लांडगा तसेच विविध पक्षी व वनस्पतींची समृद्ध जैवविविधता पाहायला मिळणार आहे. पर्यटकांसाठी २० नोंदणीकृत जिप्सी वाहने उपलब्ध असून १५ स्थानिक युवकांना मार्गदर्शक म्हणून प्रशिक्षण देण्यात आले आहे. प्रति वाहन ३००० रुपये, मार्गदर्शक शुल्क ४०० व शासकीय शुल्क १००० रुपये असे दर निश्चित करण्यात आले असून गुरुवारी सफारी बंद राहणार आहे.

या उपक्रमामुळे सुमारे ५० स्थानिक युवकांना रोजगार मिळणार असून स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल.

तसेच वन्यजीव संरक्षणात नागरिकांचा सहभाग वाढून मानव-वन्यजीव संघर्ष कमी होण्यास मदत होईल, असा विश्वास वनविभागाने व्यक्त केला आहे.

# महागाव येथे महिला दिनानिमित्त शिलाई मशीन व ब्युटी पार्लर किट वाटपाचा

**जनमाध्यम प्रतिनिधी**

महागाव - महिला सक्षमीकरणाला चालना देण्यासाठी जनसेवा फाउंडेशन आणि सक्षम फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने महिला दिनाचे औचित्य साधून शिलाई मशीन व ब्युटी पार्लर किट वाटपाचा भव्य कार्यक्रम फार मोठ्या उत्साहात संपन्न झाला. हा कार्यक्रम महागाव शहरातील सावित्रीबाई फुले कन्या विद्यालय येथे मोठ्या जल्लोषात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महागाव नगरपंचायतीच्या माजी नगराध्यक्ष सौ. सुनंदा दिलीपराव कोपरकर या होत्या , तर उद्घाटन म्हणुन महागाव तहसील कार्यालयाचे तहसीलदार अभय मस्के यांच्या हस्ते करण्यात आले.



कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून नगराध्यक्ष रंजना दीपक आडे, महागाव शहरातील ज्येष्ठ नेते तथा महागाव तालुका जिनिंग प्रेसिंग चे अध्यक्ष संभाजीराव नरवाडे, उपाध्यक्ष प्रमोद भरवाडे, उमरखेड येथील समाजसेविका सरोज देशमुख, सविता चंद्रे, केवटे, नगरसेविका जयश्री संजय नरवाडे, महागाव नगरपंचायतचे नगरसेवक तथा काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष शैलेश कोपरकर, माजी जिल्हा परिषद सदस्य अनिल नरवाडे, महागाव नगरपंचायत च्या माजी नगरसेविका आशाताई सुनील भरवाडे, समाजसेविका शीलाताई सुरेश भरवाडे, महागाव तालुका खरेदी-विक्री संघाच्या संचालिका सीमाताई नितीन नरवाडे, महागाव तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष गणेश भोयर, महागाव तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संजय कोपरकर , सुभाषराव शिंदे , यांच्या ज्येष्ठ पत्रकार गजानन वाघमारे तसेच संजय भगत, नगरसेविका सुरेखा विनोद कोपरकर, नगरसेविका करूना शिरबिरे, जान्हवी सुरोशे , यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमात संजय भगत यांनी आपल्या मनोगतातून महिला सक्षमीकरणाचे महत्त्व अधोरेखित करत अल्प शब्दांत प्रभावी विचार मांडले. महिलांनी स्वावलंबी होण्यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जनार्दन सुरोशे यांनी केले.

# बाभूळगाव पोलीस विभागाकडून मुस्लिम बांधवांचा गुलाबाचे फुल देऊन सत्कार



**जनमाध्यम प्रतिनिधी**

बाभूळगाव - रमजान ईद निमित्त येथील पोलीस विभागातर्फे मुस्लिम बांधवांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी पोलीस निरीक्षक दीपमाला भेंडे यांनी ईदची नमाज अदा करून ईदगाह मधून बाहेर येणाऱ्या प्रत्येक नागरिकाला गुलाबाचे पुष्प देऊन त्यांचा सत्कार केला.

याप्रसंगी जामा मशीद चे मौलाना मोहम्मद सलाउद्दीन, जामा मशीदचे अध्यक्ष आरिफ अली, नगरपंचायतीचे उपाध्यक्ष श्याम जगताप, नगर सेवक शेख कादर, नगर सेवक अक्षय राऊत, हाजी अबूबकर, प्रदीप नांदुरकर, जमादार दीपक आसकर, शेख जब्बार, माजी उपसरपंच सय्यद जहीर, अमजद मुल्ला, जमादार लोखंडे, अर्णव अहिरे, शहानवाज अली, अवसाफ अली प्रामुख्याने उपस्थित होते.

### नवनिर्मित मंदिरात देवतांचा प्राणप्रतिष्ठा सोहळा

यवतमाळ - यवतमाळच्या भोसा मार्गावरील अरुणोदय सोसायटीत मंदिराचे नवनिर्माण करण्यात आले असून, सोमवार दिनांक २३ मार्च पासून येथे देवतांच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यवतमाळ शहराच्या पूर्व दिशेला सुमारे ४० वर्षांपूर्वी अरुणोदय शासकीय गृहनिर्माण सहकारी संस्थेने अरुणोदय सोसायटीचे निर्माण केले. या ठिकाणी असलेल्या जुन्या हनुमान मंदिराशेजारी नव्या भव्य मंदिराचे निर्माण करण्यात आले असून, या मंदिरात श्री गणेश, श्री विठ्ठल रुक्मिणी, श्री मारोतीची मूर्ती आणि श्री शिवलींग स्थापित करण्यात येणार आहे. सोमवारी सकाळी ९.०० वा देवतांचे पुजन प्रारंभ आणि मंदिर वास्तु पुजन करण्यात येईल. सायंकाळी ४:०० वा शोभायात्रा आणि भजन कार्यक्रम होईल. मंगळवार दिनांक २४ मार्च ला सकाळी ९.०० वा. आवाहित देवतांचे हवन आणि भजन, सुंदरकांड होईल. तर बुधवार दिनांक २५ मार्चला प्राणप्रतिष्ठा विधी पूर्णाहुतीला सकाळी ९ वा. पासून प्रारंभ होईल. सायंकाळी ७:०० वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

# दूषित पाणीपुरवठ्याचा प्रश्न पेटला

### शहर काँग्रेसची जिल्हा कार्यालयावर धडक

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : गेल्या काही दिवसांपासून शहरात दृषीत पाणीपुरवठा होत असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. त्यामुळे नागरिकांना तातडीने स्वच्छ पाणी पुरवठा करण्यात यावा, या मागणीसाठी शहर काँग्रेस कमीटीने जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक दिली.

गेल्या काही दिवसांपासून शहरातील विविध प्रभागांमध्ये गढूळ आणि दुर्गंधीयुक्त पाणीपुरवठा होत आहे. या दूषित पाण्याच्या पुरवठ्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. या प्रश्नावर नागरिकांनी अनेक वेळा जीवन प्राधिकरण कार्यालयावर धडक दिली आहे. तसेच वारंवार तक्रारी केल्या आहे. मात्र, जीवन प्राधिकरण कार्यालयाकडून कोणताही प्रतिसाद मिळत नसल्याने नागरिकांना पिण्याचे पाणी विकत घेण्याची वेळ आली आहे. शहरात विविभ प्रभागांमध्ये अनेक ठिकाणी पाईप लाईनला गळीत आली आहे. प्राधिकरणाचे देखभाल दुरुस्तीकडे दुर्लक्ष होत आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रशासनाच्या अशा हलगर्जीपणामुळे संतप्त झालेल्या शहर काँग्रेस कमिटीने जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक दिली. तसेच शहरात स्वच्छ पाणी पुरवठा करण्याची मागणी केली. यावेळी काँग्रेसचे प्रा. अनिल देशमुख यांनी प्रशासकीय दिरंगाईवर तीव्र ताशेरे ओढले आणि नागरिकांना तातडीने स्वच्छ व सुरक्षित पाणीपुरवठा न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा दिला. निवेदन देतेवेळी गटनेत्या तथा विरोधी पक्षनेत्या वैशाली सवाई, नगरसेवक विशाल पावडे, अमृता तिवारी, करुणा तेलंग, शाईन पैलवान यांच्यासह अनुप नैताम, किशोर बडे, मुकुंद ठाकरे, नईम पैलवान, अनिल गायकवाड यांसह इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

# सावळेश्वरच्या ग्रामसेवकावर 'ॲट्रॉसिटी'चा गुन्हा

**जनमाध्यम प्रतिनिधी**

उमरखेड : विकासकामांची माहिती विचारल्याच्या कारणावरून सावळेश्वर येथील महिला उपसरपंचाला जातीवाचक शिवीगाळ करून अपमानित केल्याप्रकरणी, ग्रामसेवकावर तब्बल चार महिन्यांनंतर बिटरगाव पोलिसात 'ॲट्रोसिटी'चा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विनोद मोरे असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

विनोद मोरे हे सध्या सावळेश्वरसह बिटरगाव (बु.) येथेही ग्रामसेवक म्हणून कार्यरत आहेत. सावळेश्वर येथील उपसरपंच भाग्यरथाबाई मारोती काळबांडे (६०) या २८ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजेच्या सुमारास ग्रामपंचायत कार्यालयात मासिक बैठकीसाठी गेल्या होत्या. त्यावेळी सरपंच किंवा इतर सदस्य उपस्थित नव्हते. उपसरपंच भाग्यरथाबाई आणि त्यांचे पती मारोती काळबांडे यांनी गावातील रखडलेल्या विकासकामांबाबत ग्रामसेवक विनोद मोरे यांच्याकडे विचारणा केली. या साध्या विचारणेचा राग आल्याने ग्रामसेवक मोरे यांनी उपसरपंचांना सर्वांसमोर जातीवाचक शिवीगाळ करून त्यांचा अपमान केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. घटनेनंतर तत्काळ २८ नोव्हेंबर रोजीच भाग्यरथाबाई यांनी पोलिसांत धाव घेतली होती. दरम्यानच्या काळात हे प्रकरण आपापसात मिटवण्यासाठी विविध स्तरावर प्रयत्न झाले, मात्र तक्रारदार महिला आपल्या भूमिकेवर ठाम राहिल्या. अखेर चार महिन्यांच्या प्रतिक्षेनंतर १८ मार्च २०२६ रोजी बिटरगाव पोलिसांनी ग्रामसेवक विनोद मोरे यांच्याविरुद्ध अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे.

# इदगाह मैदानावर ईद-उल-फित्रची नमाज; हजारोंची उपस्थिती



**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - शहरातील इदगाह मैदानावर ईद-उल-फित्रचा सण मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरा करण्यात आला.

सकाळी ८:१० वाजता हाफिज तलहा यांच्या नेतृत्वाखाली विशेष नमाज अदा करण्यात आली. यावेळी यवतमाळ व परिसरातील हजारो मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. नमाजानंतर जागतिक शांतता, प्रगती आणि बंधुभावासाठी विशेष दुआ करण्यात आली. महिनाभराच्या रमजान उपवासाची सांगता करत मुस्लिम बांधवांनी एकमेकांना मिठी मारून ईदच्या शुभेच्छा दिल्या. इदगाह मैदानावर जनसागर उसळला होता. दरम्यान, प्रशासनाकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# संक्षिप्त

## अ. भा. समता परिषदेच्या मेळाव्यात पदाधिकाऱ्यांच्या नियुक्ती

**लेहेगाव**-अ.भा.समता परिषदेच्या वतीने मुंबई येथे एम. ई. टी. (मुंबई एज्युकेशन ट्रस्ट बांद्रा वेस्ट )आयोजित महाराष्ट्रातील पदाधिकाऱ्यांच्या मेळाव्या मध्ये मंत्री छगनरावजी भुजबळ (अन्न व नागरी पुरवठा मंत्री महाराष्ट्र राज्य ) तसेच पंकज भुजबळ, समीर भुजबळ (माजी खासदार राज्यसभा)यांच्या उपस्थितीत समता परिषदेच्या अमरावती जिल्ह्याच्या महिला जिल्हाध्यक्ष म्हणून नियुक्तीपत्र देण्यात आले.कार्यक्रमासाठी अ.भा.समता परिषदेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीला समता परिषदेचे प्रदेशाध्यक्ष गणेश खारकर. अमरावती जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष नंदू लेकुरवाळे,सोनाली नवले,तृप्ती वाट,खाडे, संजय वऱ्हाेकार,प्रभाकर वानखडे, ठाकरे दादा, सचिन वाट, गजानन नवले, सुरज लोखंडे इत्यादी उपस्थित होते.



## दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम

**अमरावती**-बंगळुरू येथे नुकत्याच झालेल्या दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमात अमरावतीचे वरिष्ठ बालरोगतज्ञ व केंद्रीय आयएपीच्या पर्यावरण समूहाचे अध्यक्ष डॉ सतीश अग्रवाल यांनी उपस्थितांचे मार्गदर्शन केले. त्यांनी प्रदूषित पाण्याचे आरोग्या वर होणाऱ्या दुष्परिणामांबद्दल माहिती दिली. याप्रसंगी पर्यावरण समूहाचे संस्थापक अध्यक्ष डॉ परमेश, डॉ चिन्नप्पा, डॉ विनोद रातागेरी, डॉ रमेश बजानिया, डॉ सोमशेखर, डॉ प्रमोद कुमार आदींनी मार्गदर्शन केले. इंडियन इन्स्टिटयूट ऑफ सायन्स येथे आयोजित या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या सफलतार्थ डॉ सतीश, डॉ परमेश, डॉ सुशी, डॉ राजकिशोर, डॉ रोहिणी मट्टू इ नी श्रम केले. संचालन डॉ भव्या डॉ नवीन व डॉ सुमन यांनी केले. डॉ अग्रवाल यांच्या या यशस्वीतेबद्दल आयएपी अमरावती शाखेच्या अध्यक्षा डॉ प्रतिभा काळे, सचिव डॉ आदित्य टांक, कोषाध्यक्ष डॉ सूरज बंसोड सहित सर्वांनी त्यांचे अभिनंदन केले.



## 'मॅग्नेट' प्रकल्पांतर्गत ३२ शेतकऱ्यांचा राज्यस्तरीय अभ्यास दौरा

**अमरावती**-महाराष्ट्र अॅग्री बिझनेस नेटवर्क प्रकल्पांतर्गत शेतकरी अभ्यास दौरा व प्रक्षेत्र भेटी पार पडल्या. प्रकल्पाच्या 'बाजार विकास व प्रोत्साहन' घटकांतर्गत दौऱ्यात ३२ शेतकऱ्यांनी सहभाग घेतला.या दौऱ्यात शेतकऱ्यांना शेतमाल प्रक्रिया, ब्रँडिंग, पॅकेजिंग आणि जागतिक बाजारपेठेतील संधींबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.शेतकऱ्यांनी चिखली येथील 'आभाळमाया शेतकरी उत्पादक कंपनी'ला भेट दिली. येथे भाजीपाला व फळे प्रक्रिया उद्योग, निर्यातीच्या संधी आणि आधुनिक शेती तंत्रज्ञानाबद्दल प्रत्यक्ष माहिती घेतली. त्यानंतर बदनापूर, जालना येथील मोसंबी संशोधन केंद्र आणि कृषी विज्ञान केंद्राला भेट देऊन फळबाग व्यवस्थापना विषयी माहिती घेतली. सिन्नर येथील कृषक मित्र अॅग्रो सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड येथे भेट देऊन परदेशातील निर्यात संधींची माहिती घेतली.त्यानंतर सह्याद्री फार्म्सला भेट देऊन शेतकरी बळकटीकरण, मूल्यवर्धन आणि मोठ्या प्रमाणावरील निर्यात साखळीचे प्रात्यक्षिक पाहिले. तसेच जैन हिल्स, जळगाव येथील टिश्यू कल्चर कंपनीला भेट देऊन केळीच्या महिला बळकटीकरण, नवीन जाती आणि दर्जेदार रोपांविषयी माहिती घेतली. जैन इरिगेशनमधील आधुनिक शेती तंत्रज्ञान आणि संशोधन कार्याची माहिती घेऊन जैन फूड पार्कमधील प्रक्रिया केंद्राला भेट दिली.दौऱ्यामुळे शेतकऱ्यांना शेतीकडे व्यवसाय म्हणून पाहण्याची दृष्टी मिळाली आहे. आधुनिक तंत्रज्ञान आणि थेट बाजारपेठेशी जोडले गेल्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात शाश्वत वाढ होण्यास मदत होणार आहे, असा विश्वास प्रकल्प उपसंचालक अरुण नादरे यांनी व्यक्त केला. सदर अभ्यास दौरा प्रकल्प संचालक विनायक कोकरे, अतिरिक्त प्रकल्प संचालक डॉ. अमोल यादव यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. दौऱ्यासाठी कृषि व्यवसाय तज्ज्ञ अक्षय गणेशपुरे आणि विद्या पुंड यांनी समन्वयक म्हणून जबाबदारी पार पाडली.

## गजानन महाराज संस्थानच्या वतीने इप्तार पार्टी

**खल्लार**-मुस्लीम बांधवांच्या पवित्र असलेल्या रमजान ईदनिमित्य खल्लार येथिल मुख्य बाजार चोकात श्री गजानन महाराज संस्थानच्या वतीने इप्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. इदग्यावर नमाज झाल्यावर खल्लार येथिल बाजार चौकातील जामा मस्जिद समोर सर्व बांधवांसाठी इप्तार पार्टीचे आयोजन श्री गजानन महाराज संस्थानच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी केले होते. गावातील सर्व मुस्लीम बांधवांसह हिंदू समाजातील नागरिक, पोलीस स्टेशन, बँक कर्मचारी सहभागी झाले होते. यानिमित्य गावात हिंदू मुस्लीम ऐकतेचे उदाहरण पाहायला मिळाले.




## अशासकीय सदस्यत्वासाठी अर्ज करा

**अमरावती**-जिल्हा प्राणी क्लेश प्रतिबंधक समिती अंतर्गत अशासकीय सदस्यांचा तीन वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झाला आहे. त्यामुळे रिक्त पदांवर नवीन सदस्यांची निवड करण्यासाठी इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे. यासाठी २ एप्रिलपूर्वी अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.समितीच्या तरतुदीनुसार आणि नियम २००१ मधील निकषांनुसार, प्राणी क्लेश व्यवस्थापकीय समितीवरील सदस्य, गौशाळा किंवा पांजरापोळ संस्थेचे अध्यक्ष, प्राणी विषयावर कार्य करणाऱ्या सेवाभावी संस्थेचे सदस्य, सर्वसाधारण समितीने नामनिर्देशित केलेल्या व्यक्ती, मानवहित किंवा प्राणीमात्रांवर प्रेम करणाऱ्या क्षेत्रात कार्यरत व्यक्ती अशासकीय सदस्यत्वासाठी अर्ज करू शकतील.इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज २ एप्रिलपर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करणे आवश्यक आहे. सदर अर्ज जिल्हा उपायुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय तथा सदस्य सचिव, जिल्हा प्राणी क्लेश प्रतिबंधक समिती, अमरावती या ठिकाणी स्विकारण्यात येतील. जिल्ह्यातील प्राणी कल्याण क्षेत्रात कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांनी अर्ज करावेत, असे आवाहन पशूसंवर्धन व दुग्धव्यवसाय जिल्हा उपायुक्त डॉ. एस. एम. कावरे यांनी केले आहे.

# १ लाख ७० हजार शिक्षकांसमोर 'टीईटी' चे आव्हान

**अमरावती/का.प्र.**

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार, पहिली ते आठवीच्या सर्व शिक्षकांना १ सप्टेंबर २०२७ पुर्वी शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे. राज्यातील सुमारे १ लाख ७० हजार शिक्षकांसमोर हे आव्हान असून, ही मुदत संपण्यापुर्वी त्यांना पात्रता सिद्ध करावी लागणार आहे. या पार्श्वभूमीवर जून महिन्याच्या अखेरीस 'टीईटी' घेण्याचे नियोजन महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने केले आहे. 'एमपीएससी' आणि 'यूपीएससी'च्या परीक्षांचे वेळापत्रक पाहून अंतिम तारीख जाहीर केली जाईल, अशी शक्यता आहे.




राज्यातील प्राथमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षकांसाठी अनिवार्य असलेल्या 'टीईटी'च्या उत्तीर्णतेच्या गुणांमध्ये कपात करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे. माजी सैनिकांनाा दिलेल्या ४५ टक्क्यांच्या सवलतीचा आधार घेत, सर्वच प्रवर्गांसाठी हा निकष लागू करण्याबाबत शिक्षण विभागाने चाचपणी सुरू केली आहे. मात्र, राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेच्या (एनसीटीई) निकषांना डावलून राज्याला असा निर्णय घेता येईल का, याबाबत तांत्रिक पेच निर्माण झाला आहे.

सध्या 'टीईटी'चे प्रत्येकी १५० गुणांचे दोन पेपर असतात. 'एनसीटीई'च्या नियमांनुसार, खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना किमान ६० टक्के (९० गुण) आणि आरक्षित प्रवर्गाला ५५ टक्के (८३ गुण) मिळवणे बंधनकारक आहे. तथापि, राज्य सरकारने ३० जून २०२२ रोजी विशेष निर्णय घेत माजी सैनिकांसाठी ही अट ४५ टक्क्यांपर्यंत खाली आणली होती. आता हाच नियम सर्वांना लागू करावा, अशी मागणी शिक्षक संघटनांनी लावून धरली आहे.

राज्य सरकारला निकषांमध्ये बदल करण्याचा अधिकार असल्याचा दावा शिक्षक संघटनांकडून केला जात आहे. यासाठी त्यांनी तामिळनाडू सरकारने घेतलेल्या निर्णयाचा संदर्भ दिला आहे. 'एनसीटीई'च्या निकषांशी तडजोड न करता राज्य स्तरावर अशी सवलत देता येते का, यावर सध्या शिक्षण विभागातील वरिष्ठ स्तरावर मार्गदर्शन मागवण्यात येत असल्याचे सूत्रांनी सांगितले.'एनसीटीई'च्या निकषांनुसार सध्या खुल्या प्रवर्गासाठी ६० टक्के आणि मागासवर्गीयांसाठी ५५ टक्के गुण आवश्यक आहेत. माजी सैनिकांप्रमाणेच सर्वांसाठी ४५ टक्क्यांची अट असावी, अशी मागणी होत आहे.

# विभागीय स्पर्धा परीक्षेत उत्तीर्ण उमेदवारांना माहिती भरण्यास मुदतवाढ

**अमरावती/का.प्र.**

पुणे येथील महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने समूह साधन केंद्र समन्वयक (केंद्र प्रमुख) मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा-२०२५ चा निकाल जाहीर केला असून तो परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर (www.mscepune.in) प्रसिद्ध करण्यात आला आहे. या परीक्षेत प्रविष्ट झालेल्या उमेदवारांना महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा महाटीइटी अथवा सीटीइटी उत्तीर्ण झाल्याची माहिती भरण्यासाठी २२ ते ३१ मार्च २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार जिल्हा परिषदांमध्ये कार्यरत प्राथमिक शिक्षकांना केंद्र प्रमुख पदावर विभागीय मर्यादित स्पर्धा परीक्षेद्वारे नियुक्ती देण्यासाठी समूह साधन केंद्र समन्वयक (केंद्र प्रमुख) मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा-२०२५ घेण्यात आली होती. ही ऑनलाइन परीक्षा ३ ते ४ फेब्रुवारी २०२६ दरम्यान तीन सत्रांत पार पडली.

परीक्षेसाठी एकूण ४६०६८ परीक्षार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज भरले होते, त्यापैकी ३८५५९ परीक्षार्थी प्रत्यक्ष परीक्षेला उपस्थित होते.

परिषदेकडून हा निकाल १३ मार्च २०२६ रोजी परिषदेचे अधिकृत संकेतस्थळ www.mscepune.in वर जाहीर करण्यात आला. परीक्षेत प्रविष्ट झालेल्या उमेदवारांनी महाटीइटी अथवा सीटीइटी ही सर्वात पहिली परीक्षा उत्तीर्ण झाल्याची माहिती पूर्वी १६ मार्च ते २१ मार्च २०२६ या कालावधीत https://mscepune.in/dtedola/KP2026Info.aspx या लिंकवर भरायची होती. मात्र, उमेदवारांकडून मुदतवाढीची मागणी झाल्याने आता ही माहिती २२ मार्च ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत भरण्याची अतिरिक्त संधी देण्यात आली असल्याचे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे अध्यक्ष डॉ. नंदकुमार बेडसे यांनी प्रसिद्धी पत्रकाव्दारे कळविले आहे.

# ५४५ वाहनधारकांकडून १.५८ लाखांचा दंड वसूल

**अचलपूर/वार्ताहर**

अमरावती ग्रामीण पोलिसांनी वाहतूक नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांविरोधात जोरदार मोहीम उघडली आहे. अमरावती जिल्हा ग्रामीण पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांच्या निर्देशानुसार जिल्हा वाहतूक शाखा व स्थानिक पोलिस ठाण्यांच्या संयुक्त पथकांनी गेल्या १७ मार्च रोजी व्यापक कारवाई केली.परतवाडा शहरातून जाणाऱ्या रस्त्यावर ग्रामीण पोलिसांनी राबविलेल्या या मोहिमेत ५४५ वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली.या कारवाईत १ लाख ५८ हजार १०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला असून, ३ लाख ५४ हजार ६०० रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे. परतवाडा, अचलपूर परिसरात ही मोहीम विशेषतः राबविण्यात आली. ही कारवाई पोलिस अधीक्षक विशाल आनंद, अप्पर पोलिस अधीक्षक पंकज कुमावत, सहायक पोलिस अधीक्षक शुभम कुमार यांच्या मार्गदर्शनात पार पडली.



# भोंदूबाबा खरातांची पाठराखण करणाऱ्या सर्व दोषीवर तातडीची कारवाई करा

## अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाची मागणी

**कुऱ्हा/वार्ताहर**

अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघ महिला मंच व केंद्रीय समितीच्या वतीने भोंदू बाबा अशोक खरात आणि त्यांची पाठराखण करणाऱ्या रूपाली चाकणकर यांच्या सह सर्व दोषीवर तातडीने कारवाई करावी व वृत्त संकलन करणाऱ्या पत्रकाराची जाहीर माफी मागावी अशा आशयाचे निवेदन मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना पाठविले आहे.

उच्च शिक्षित तसेच उच्चभ्रू रूपाली चाकणकर कायम समाजसेवेत अग्रेसर असतात, परंतु त्यांनी विज्ञान युगात एका भोंदूबाबाची पाठराखण करणे,बाबाचे पाय धुणे, अंधश्रद्धेला खतपाणी घालण्याचा प्रकार आहे. ४ मार्च २०२५ ला दत्ता खेमनार पत्रकाराने वृत्तपत्रात भोंदूबाबाची भोंदूगिरी उघडकीस आणण्यासाठी वृत्तपत्रात बातमी छापली असता रूपालीताई यांनी त्यांनाच धमकी दिल्याचे समोर आले आहे. यामुळे पत्रकारावर झालेला अन्याय पत्रकार संघ सहन करणार नाही. या घटनेची कसून चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करावी आणि पत्रकारांची जाहीर माफी मागितली पाहिजे. त्यांना महिला आयोग पदावरून पद मुक्त करावे. भोंदू बाबा सोबतच इतरही दोषींवर कठोर कारवाई करावी अशा आशयाचे निवेदन अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे महिला मंच महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष कंचन मूरके यांच्यासह पत्रकार संघ राज्य कार्यकारणी प्रदेश उपाध्यक्षा प्रा.डॉ. मंजुषा सागर, महिला मंच सुरेखा दामेधर,अक्षरा लहाने तथा महिला मंच सदस्य यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस यांना ई-मेलने पाठविले आहे.

# सकाळच्या शाळेच्या वेळेत बदल करा

## प्राथमिक शिक्षक समितीचे शिक्षणाधिकारी यांना निवेदन

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती जि.अमरावती च्या वतीने मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.अमरावती व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि.प.अमरावती यांना निवेदन सादर कडून सकाळच्या शाळेच्या वेळेत बदल करण्याची मागणी शिक्षक समितीने केली.

२० मार्च २०२६ पासून सकाळ सत्रातील शाळा सुरू झाल्या आहेत व शाळेची वेळ ही ७:१५ ते १२:१५ अशी ठरविण्यात आली आहे,अमरावती जिल्ह्यातील उष्णतेचे प्रमाण पाहता व प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचा वयोगट लक्षात घेता आणि बाहेर गावावरुन शाळेत येणारी मुले यांच्या करीता सकाळ शाळेतील वेळेत बदल करून ती वेळ ७ ते ११ अशी करण्यात यावी अशी मागणी निवेदनाच्या माध्यमातून करण्यात आली.निवेदन देतेवेळी अजयानंद पवार (जिल्हाध्यक्ष), शैलेंद्र स.दहातोंडे (जिल्हा सरचिटणीस) व मनोज ओळंबे (तालुकाध्यक्ष, अंजनगाव सुर्जी) उपस्थित होते

.असे शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी कळविले आहे.यावेळी राजेश गाडे व पंडीत भोयर उपस्थित होते.



### शिक्षण विभाग उठला लहान मुलांच्या जिवावर

अमरावती जिल्हातील प्राथमिक शाळा २०पासून तर माध्यमिक शाळा १६मार्चपासून सकाळ पाळीत सुरु झाल्या पण शाळेच्या वेळेत प्राथमिक व माध्यमिक शाळेत तफावत आहे.माध्यमिक शाळा सकाळी ७ते११वाजे पर्यंत भरत आहे. लहान मुलांची प्राथमिक शाळा ७.१५ते१२.१५ भरत आहे.लहान मुले भरउन्हात शाळेत राहतील आणि मोठी मुले ११वाजता घराच्या आत जातील.हा प्राथमिक शाळेतील शिकणाऱ्या विद्यार्थ्यांवर अन्याय आहे.प्राथमिक शिक्षण विभाग या मुलांच्या जिवावर उठला आहे काय?अशा प्रश्न पालक,शिक्षक यांनी उपस्थित केला आहे.

उष्मघातामुळे विद्यार्थ्यांच्या जिवाला काही घडले तर याला जबाबदार कोण?अशा प्रश्न शिक्षक,पालक विचारत आहे.

प्राथमिक शिक्षण विभागाने शाळेच्या वेळेत बदल करावा अशी मागणी शिक्षक संघटना यांनी केली आहे.

# अमरावती विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा

**अमरावती/का.प्र.**

चंदीगड युनिव्हर्सिटी, मोहाली येथे नुकत्याच संपन्न झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ ज्युदो स्पर्धेत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या संघाने चमकदार कामगिरी केली आहे. या स्पर्धेत दिग्रस येथील बी.बी. आर्ट्स, कला व वाणिज्य महाविद्यालयाचा खेळाडू श्री. सागर जाधव याने ६० किलो वजन गटात रौप्य पदक पटकावून विद्यापीठाच्या नावलौकिकात मोलाची भर घातली आहे. त्याला अमरावती येथील डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशनचे प्रसिद्ध प्रशिक्षक डॉ. जयंत इंगोले यांचे बहुमूल्य तांत्रिक मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सागरने स्पर्धेत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत अंतिम फेरीपर्यंत धडक मारली.रौप्य पदक विजेता सागर जाधव याने मिळवलेल्या या दैदिप्यमान यशाबद्दल विद्यापीठ स्तरावरून त्याचे अभिनंदन होत आहे. कुलगुरू डॉ. बारहाते, डॉ. ढोरे तसेच कुलसचिव डॉ. अविनाश असनारे व डॉ.राऊत यांनी रौप्य पदक पटकाविल्या बद्दल जाधव आणि त्याचे प्रशिक्षक डॉ. इंगोले यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले असून, भविष्यातील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.



**सागर जाधवला आंतर विद्यापीठ ज्युदो स्पर्धेत रौप्य पदक**

# 'शेतकरी वाचला तर देश वाचेल'



## अन्नत्याग आंदोलनातून ठाम संदेश

**लेहेगाव/वार्ताहर**

शेतकऱ्यांप्रती संवेदना व्यक्त करण्यासाठी आयोजित करण्यात आलेले 'अन्नदाता साठी अन्नत्याग' आंदोलन उत्स्फूर्त प्रतिसादात संपन्न झाले. हनुमान मंदिर परिसरात पार पडलेल्या या उपक्रमात शेतकरी, नागरिक व युवकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. शेतकऱ्यांवर ओढवलेल्या आर्थिक संकट, वाढता उत्पादन खर्च, शेतीमालाला न मिळणारा योग्य दर तसेच नैसर्गिक आपत्ती या पार्श्वभूमीवर सहभागी नागरिकांनी अन्नत्याग करून शेतकऱ्यांच्या वेदनांशी एकात्मता व्यक्त केली. यावेळी 'शेतकरी वाचला तर देश वाचेल' हा ठाम संदेश देण्यात आला.

या प्रसंगी प्रसिद्ध किर्तनकार विद्याराज कोरे यांनी गाडगेबाबांच्या वेषात उपस्थितांना मार्गदर्शन करत शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर प्रभावी भाष्य केले. तसेच डॉ. चंद्रकांत देशमुख यांनी शेतकऱ्यांच्या सद्यस्थितीवर प्रकाश टाकत त्यांच्या अडचणी मांडल्या. आंदोलनाच्या समारोप प्रसंगी प्रा. डॉ. संदीप राऊत यांनी प्रबोधनपर मार्गदर्शन केले. याशिवाय संजय कोल्हे,सदीप रोडे, मुरलीधर डहाने, सचिन ठोके बाळासाहेब पुंड,संदिप भदाडे, विजय सिरसाम, नयन लुंगे, अंकुश तेटु, विनोदराव पुंड, गोंडेकर गुरुजी,नुदुंभाऊ सोमवंशी यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन करत शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आपले विचार मांडले. कार्यक्रमाचे संचालन व आभारप्रदर्शन हरिष निशाण यांनी केले.या वेळी उपस्थितांनी शासनाने शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष देऊन शेतीमालाला योग्य भाव, कर्जमाफी व आवश्यक सुविधा तातडीने उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी केली. तसेच शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे वाढते प्रमाण थांबवण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशीही भूमिका मांडण्यात आली. कार्यक्रमादरम्यान शेतकऱ्यांच्या अडचणींवर चर्चा करण्यात आली व त्यांच्या पाठीशी समाज एकजुटीने उभा असल्याचे या आंदोलनातून दाखवून देण्यात आले.कार्यक्रमाचे आयोजन मुरलीधर डहाने, रघुपती लबडे, राहुल बारस्कर, संदिप अशोकराव रोडे, सचीन चरपे, संदिप भदाडे, रामदास चांगोले, सुधीर राऊत, श्रिकांत यावले, गोपी केळकर, विजय सिरसाम, मिलींद हेडाऊ, नंदकिशोर तिडके, ज्ञानेश्वर तिडके, अनील लांडे, अंकुश काळमेघ, नितीन कोहळे, प्रफुल्ल चिखले, नरेश झटाले, नितीन केनकर, प्रदीप सोळंके, सुनील झाडे, अतुल झटाले, नामदेव मोहिते,अशोक सुळे,वसंत निकम,नथ्थुजी ठोकळ,पंकज ठाकरे, प्रवीण सावरकर, दत्ता भोजेकर,सुधाकर भोवाळु, राजेंद्र रोकडे, ज्ञानेश्वर इंगोले, सुनील वाणखडे,विवेक उईके,अमोल चिखले,रमेश दळवी,तेजस भदाडे,राजेश कुचे,शंकरराव दळवी, सुनील झाडे, गणेश डरंगे, चंदन राऊत,पुरुषोत्तम ठाकरे, राजेश दळवी, वामनराव कुचे, किशोर ठाकरे, पंकज ठाकरे, किसनराव हिवसे, प्रशांत साबळे, प्रमोद कुचे, नंदू ठाकरे, विनायक ठाकरे, ज्ञानेश्वर साबळे, पिंटू ठाकरे, गजानन साबळे, मनोज साबळे, सुधीर सावरकर देविदास भुंबर,बाबाराव कुचे, प्रफुल्ल कुचे अन्य शेतकऱ्यांनी यात सहभाग घेतला.

# धर्मस्वातंत्र्य विधेयकाच्या निमित्ताने...

**म**हाराष्ट्र सरकारने १३ मार्च २०२६ रोजी 'महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक' विधानसभेत सादर केले. लवकरच त्याचे कायद्यात रुपांतर होऊन ते राज्यात लागू होईल. त्याबद्दल फडणवीस सरकारचे हार्दिक अभिनंदन आणि शुभेच्छा. ह्या विधेयकात ज्या तरतुदी दिल्या आहेत त्या फार कठोर नसल्या तरी सुरुवात म्हणून पुरेशा आहेत. यथावकाश प्रकरणांचे गांभीर्य पाहून तरतुदी अधिक कठोर करता येतील. ह्या विधेयकात जे धर्म सोडून नास्तिक किंवा अज्ञेयवादी बनतात त्यांच्या अधिकारांच्या संरक्षणाचीही तरतूद करायला हवी होती. अलिकडे इस्लाम मजहब सोडून एक्स मुस्लीम बनण्याची एक मोठी लाट आलेली आहे. पण ते लोक आपण एक्स मुस्लीम झालो असल्याचे सार्वजनिकरित्या सांगू शकत नाहीत. आपण इस्लाम सोडल्याचे सांगितल्यास आपली हत्या होईल अशी भीती ह्या एक्स मुस्लिमांना सतत सतावत असते आणि त्यात तथ्यही आहे. नुकतेच गाझियाबाद येथील एक एक्स मुस्लीम सलीम वास्तिक ह्याची हत्या करण्याचा प्रयत्न दोन कट्टरवादी मुस्लीम तरुणांनी केला. डॉक्टरांच्या अथक प्रयत्नांनी तो वाचला. एक्स मुस्लीम साहिल हा आणखी एक युट्यूबर जिहाद्यांच्या टार्गेटवर आहे. त्यामुळे तो आणि त्याच्यासारखे अनेक एक्स मुस्लीम युट्यूबर इस्लामची चिकित्सा करताना चेहरा लपवून सोशल मीडियावर व्यक्त होतात. कारण त्यांना सर तन से जुदा करण्याच्या धमक्या दिल्या जातात आणि ते आपण प्रत्यक्षात करू शकतो हे सलीम वास्तिकच्या प्रकरणात कट्टरपंथी मुसलमानांनी सिद्धही करून दाखविले आहे. त्यामुळे ह्या एक्स मुस्लिमांना संपूर्ण सुरक्षा दिली गेली पाहिजे आणि त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचे हल्ले झाल्यास किंवा त्यांना कोणत्याही प्रकारची जानमालाची इजा करण्यात आल्यास दोषींवर कठोरात कठोर कारवाई करण्याची तरतूदही ह्या विधेयकात केली पाहिजे. जीवे मारण्याच्या धमक्या, मारहाण, शिवीगाळ आणि हत्या आदिंसाठी जे प्रचलित कायदे आहेत ते एक्स मुस्लिमांच्या बाबतीत पुरेसे नाहीत. प्रस्तावित धर्मस्वातंत्र्य कायद्यात त्यासाठी विशेष तरतूद करण्याची गरज आहे. कारण ही प्रकरणे फक्त धर्म, पंथ, मजहबशीच विशेषत्वाने संबंधित आहेत. त्याचप्रमाणे 'एक्स-मुस्लीम' हा वर्ग सरकारी कागदपत्रांमध्ये नोंदला जाऊन त्याला वैधानिक स्वरूप प्राप्त करून दिले पाहिजे. सध्या एक्स मुस्लिमांची गणना मुसलमानांमध्येच होते. अल्पसंख्याकांसाठी असणारे फायदे मिळतात आणि मिळावे म्हणून हे एक्स मुस्लिमही कागदोपत्री मुस्लिमच असतात. वस्तूत: फक्त एक्स मुस्लीम ह्यांनाच अल्पसंख्यांकाचा दर्जा मिळायला पाहिजे आणि एक्स मुस्लीम शिवाय अन्य सर्व मुसलमानांचा अल्पसंख्यांक दर्जा काढून टाकला पाहिजे.

भारतात ख्रिस्ती मिशनरी मोठ्या प्रमाणावर हिंदूंचे अवैध रितीने धर्मांतरण करीत आहेत.



आर्थिक प्रलोभन, येशूचे चमत्कार, हिंदू देवीदेवतांची निंदा नालस्ती, सेवाकार्य आदि माध्यमातून ख्रिस्ती मिशनरी गोरगरीब, अशिक्षीत आणि भोळ्याभाबड्या हिंदूंचे धर्मांतरण करून त्यांना ख्रिस्ती बनवत आहेत. विशेषतः भारताच्या आदिवासी जनतेचे मोठ्या प्रमाणावर ख्रिस्तीकरण करण्यात येत आहे. त्यामुळे ह्या आदिवासींची आदिम संस्कृती नष्ट होत तर आहेच शिवाय त्यांच्या मनात हिंदू धर्माविषयी घृणा भरली जात असल्याने ह्या धर्मांतरित आदिवासी आणि अधर्मांतरित आदिवासी ह्यांच्यात संघर्षाची बीजे सुद्धा रोवली जात आहेत. अनेक हिंदू 'हिंदू' नावाने क्रिप्टो ख्रिस्ती होऊन समाजात वावरत आहेत आणि हिंदू धर्माविरुद्ध प्रचार प्रसार करत आहेत. राष्ट्रीय एकतेसाठी ही फार मोठी धोक्याची घंटा आहे. धर्मस्वातंत्र्य कायद्यात क्रिप्टो ख्रिस्ती संकल्पनेविरुद्ध कठोर शिक्षेची तरतूद केली जावी. कारण ख्रिस्ती धर्म स्वीकारल्यावरही हे धर्मांतरित लोक हिंदू जातींच्या आधारावर जातीय आरक्षणाचे लाभ घेत राहतात. त्यामुळे खऱ्या लाभार्थ्यांवर अन्याय होतो. जातीव्यवस्था फक्त हिंदू धर्मात आहे आणि एकदा धर्म बदलला की धर्मांतरित व्यक्ती हिंदू जातीव्यवस्थेच्या बाहेर पडतो. पण धर्मांतरण कागदोपत्री न झाल्यामुळे धर्मांतरित व्यक्ती हिंदू जातीव्यवस्थेच्या आरक्षणाचे लाभ घेत राहते. किंबहुना त्यासाठीच हे धर्मांतरित लाक कागदोपत्री धर्म बदलत नाहीत. हा हिंदूंशी आणि सरकारच्या सामाजिक न्यायाच्या धोरणांशी सरळसरळ धोका आहे. अशा विश्वासघाती लोकांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाईची तरतूद धर्मस्वातंत्र्य कायद्यात केली पाहिजे. सरकारने प्रत्येक शासकीय योजनांच्या अर्जामध्ये एक शपथपत्र देणे अनिवार्य करावे की 'मी हिंदू धर्म सोडून दुसरा धर्म स्वीकारलेला नसून तसे आढळल्यास हिंदू जाती प्रमाणपत्राच्या आधारावर मला मिळणारे शासकीय योजनांचे लाभ मिळवण्यास मी अपात्र ठरेन आणि मी ह्यापूर्वी मिळवलेले लाभ सरकारला आर्थिक स्वरूपात परत करीन. तसे करण्यास मी असमर्थ ठरलो तर मला आर्थिक दंडासहित तुरुंगवासाची शिक्षा होण्यास मी पात्र राहीन'. असे शपथपत्र घेतल्यास कोणाचीही क्रिप्टो ख्रिश्चन किंवा क्रिप्टो मुस्लिम होण्याची हिंमत होणार नाही आणि हिंदू जातिव्यवस्थेतील खऱ्या दलित आणि पिडित लाभार्थ्यांचा हक्क डावलला जाणार नाही. क्रिप्टो ख्रिस्ती होणे हे भारतीय संविधानाचे सरळसरळ उल्लंघन आहे. कारण भारतीय संविधान हे धर्मपालनाचे स्वातंत्र्य देते, धर्म लपवून समाज आणि शासनाची फसवेगिरी करण्याचे नाही. धर्म लपवणे हा कायद्याने दखलपात्र गुन्हा असायला हवा.

निव्वळ धर्मस्वातंत्र्य कायदा करून उपयोग नाही. त्याची अंमलबजावणी सुद्धा तातडीने झाली पाहिजे. ह्या कायद्यानुसार कारवाईसुद्धा नेटाने झाली पाहिजे. पोलिस अशा प्रकरणांत नेहमीच कच खातात असे आजवर दिसून आले आहे. कोणत्याही धार्मिक प्रकरणांत हिंदूंवर जेवढ्या तत्परतेने पोलिस कारवाई करतात तेवढ्याच तत्परतेने मुसलमानांवर किंवा कोणत्याही गैरहिंदूंवर कारवाई होताना दिसत नाही. कन्हैयालाल आणि उमेश कोल्हेच्या हत्याऱ्यांना अजूनपर्यंत कोणतीही शिक्षा झालेली नाही. नुपूर शर्माला धमक्या देणाऱ्यांना अजूनपर्यंत कोणतीही शिक्षा झालेली नाही. ह्याउलट अनेक गोरक्षक हिंदूंना मात्र कोर्टाच्या पायऱ्या झिजवाव्या लागत आहेत. गाईंच्या हत्या होऊ नये म्हणून ज्यांनी प्रयत्न केले त्यांच्यावरच कायदेशीर कारवाई करून त्यांचे आयुष्य बरबाद केले गेले आहे. त्यामुळे निव्वळ कायदा करून हिंदूंच्या जखमेवर फुंकर घालण्याचे प्रयत्न सरकारने करू नये. पोलिस प्रशासन जर ह्या कायद्यांतर्गत दोषींवर कारवाई करीत नसतील किंवा ढिलाई दाखवत असतील तर अशा बेजबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांना बरखास्त करण्यापर्यंतची कठोर कारवाई सरकारने केली पाहिजे. तरच ह्या कायद्याला काही अर्थ राहील आणि कायद्याचा धाक राहील.

**अतुल कावळे**
मो. क्र.९७३०५३५१९६

# गरदरेवाडी: जिद्दीने उजळलेले शिक्षणाचे दीपस्तंभ

**आ**जच्या घडीला मराठी शाळांच्या अस्तित्वाचा प्रश्न अनेक ठिकाणी गंभीर बनताना दिसतो. मोडकळीस आलेल्या इमारती, घटती पटसंख्या, पालकांचा कमी होत चाललेला विश्वास आणि यावरून सुरू असलेले आरोप-प्रत्यारोप या सगळ्या पार्श्वभूमीवर एक प्रश्न सतत उभा राहतो: 'आपल्या मराठी शाळांचे भवितव्य काय?' परंतु या प्रश्नांची उत्तरे केवळ चर्चेत नाहीत, ती कृतीत आहेत आणि याचे जिवंत उदाहरण म्हणजे पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यातील गरदरेवाडी.

'केल्याने होत आहे रे, आधी केलेच पाहिजे,' या उक्तीचा प्रत्यय जणू गरदरेवाडीच्या ग्रामस्थांनी जगाला दिला आहे. मोडकळीस आलेली, दुर्लक्षित झालेली जिल्हा परिषदेची शाळा जिच्याकडे पालक फिरकायलाही तयार नव्हते, तीच शाळा आज अवघ्या एका महिन्यात आंतरराष्ट्रीय दर्जाची बनून उभी आहे. हे केवळ परिवर्तन नाही, तर एक सामाजिक जागृतीचा दीप प्रज्वलित झाल्याचा क्षण आहे.



या यशामागे कुठलाही चमत्कार नाही, तर आहे ती सामूहिक इच्छाशक्ती आणि जिद्द. गरदरेवाडीच्या ग्रामस्थांनी ठरवले की, आपल्या मुलांना केवळ शिक्षण नव्हे, तर दर्जेदार, भविष्यवेधी आणि जागतिक स्तरावर स्पर्धा करू शकणारे शिक्षण मिळाले पाहिजे. या ध्येयासाठी प्रत्येकाने आपापली जबाबदारी उचलली.श्रमदान, आर्थिक मदत, नियोजन आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे एकजूट.

या परिवर्तनाच्या प्रवासात वारे गुरुजी यांचे मार्गदर्शन आणि इनोबल सोशल फाउंडेशनचे सहकार्य मोलाचे ठरले. त्यांच्या दूरदृष्टीमुळे शाळेचे केवळ भौतिक स्वरूप बदलले नाही, तर तिचा आत्माही नव्याने घडला. आधुनिक साधनसामग्री, आकर्षक वर्गखोल्या, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारे उपक्रम या सर्वांनी शाळेला एक नवीन ओळख दिली.पूर्वी ज्या शाळेकडे पालक पाठ फिरवत होते, त्या शाळेत आज पालक स्वतःहून येऊन वेळ घालवत आहेत. त्यांच्या चेहऱ्यावर दिसणारा विश्वास आणि समाधान हीच या उपक्रमाची खरी कमाई आहे.

गरदरेवाडीने संपूर्ण समाजासमोर एक आदर्श ठेवला आहे. मराठी शाळा मोडकळीस येत आहेत, असे म्हणणे सोपे आहे; परंतु त्या पुन्हा उभ्या करणेही तितकेच शक्य आहे, हे या गावाने कृतीतून सिद्ध केले आहे. जर प्रत्येक गावाने असा निर्धार केला, तर मराठी शाळांना अस्तित्वासाठी झगडावे लागणार नाही. त्या पुन्हा एकदा आपल्या वैभवशाली परंपरेचा अभिमानाने वारसा पुढे नेतील.या परिवर्तनाचा सर्वांत मोठा परिणाम म्हणजे समाजाच्या शेवटच्या घटकातील मुलांनाही आता आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण मिळण्याचा मार्ग खुला झाला आहे. शिक्षण हा केवळ काहींचा विशेषाधिकार न राहता, तो प्रत्येक घराचा अधिकार बनत आहे हीच या यशाची खरी ओळख आहे.

या अभिमानास्पद कार्याची दखल घेत, आज या शाळेचे उद्घाटन राज्याच्या उपमुख्यमंत्री ना. सुमित्राताई पवार आणि शालेय शिक्षण मंत्री नामदार दादाजी भुसे यांच्या शुभहस्ते संपन्न होणार आहे. हा क्षण गरदरेवाडीकरांसाठीच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्रासाठी अभिमानाचा आणि प्रेरणेचा ठरणार आहे.गरदरेवाडीने पेटवलेला हा शिक्षणाचा दीप आता प्रत्येक गावात, प्रत्येक शाळेत प्रज्वलित व्हावा हीच अपेक्षा. कारण बदल कुठेतरी बाहेरून येत नाही, तो आपल्या कृतीतूनच जन्म घेतो. आणि एकदा का समाजाने ठरवले, तर अशक्यही शक्य होते याचे जिवंत उदाहरण म्हणजे गरदरेवाडी.

**मयुर चौधरी**
अमरावती
मो.७७९८०६०५००

# जलसंवर्धनाची नवी दिशा

**मा**नवी जीवनाच्या अस्तित्वासाठी हवेच्या खालोखाल पाण्याला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. असे कोणतेही क्षेत्र नाही, जिथे पाण्याची आवश्यकता नाही. पाण्याशिवाय सजीव सृष्टीची कल्पनाच अशक्य आहे. म्हणूनच आपल्या संस्कृतीत पाण्याला 'जीवन' असे सार्थ नाव दिले गेले आहे. ग्रीक तत्त्ववेत्ता थेलीस म्हणतो, 'सर्व काही पाण्यातून येते आणि पाण्यातच परतते'. ('All comes from water and to water all returns')म्हणजेच सृष्टीची उत्पत्ती आणि अंत दोन्ही पाण्याशी जोडलेले आहेत. अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजांची निर्मिती असो किंवा औद्योगिक विकास-सर्व काही पाण्यावरच अवलंबून आहे.

दरवर्षी २२ मार्च हा दिवस जागतिक जलदिन म्हणून साजरा केला जातो. यावर्षी (२०२६) जलदिनाची मध्यवर्ती संकल्पना आहे, 'पाणी आणि लिंगभाव' (Water and Gender). या थीमद्वारे पाण्याच्या व्यवस्थापनात महिलांचा आणि मुलींचा समान सहभाग सुनिश्चित करणे, लिंग समानता प्रोत्साहित करणे आणि पाणीटंचाईमुळे त्यांच्यावर होणाऱ्या असमान परिणामांकडे लक्ष वेधणे हा मुख्य उद्देश आहे. जगातील अनेक भागांमध्ये आजही महिलांवर आणि मुलींवर पाणी आणण्याची जबाबदारी असते. दररोज अनेक किलोमीटर पायपीट करून पाणी आणणे, तासन्तास रांगेत उभे राहणे,या गोष्टी त्यांच्या दैनंदिन आयुष्याचा भाग बनल्या आहेत. यामुळे त्यांच्या आरोग्यावर परिणाम होतोच, पण शिक्षण, रोजगार आणि स्व-विकासाच्या संधीही मर्यादित होतात.विशेष म्हणजे, घरगुती पाणी व्यवस्थापनात महिलांचा मोठा सहभाग असूनही पाणीविषयक धोरणनिर्मिती आणि निर्णय प्रक्रियेत त्यांचे प्रतिनिधित्व अत्यल्प आहे. ही दरी भरून काढणे अत्यंत गरजेचे आहे. महिलांना निर्णयप्रक्रियेत समान स्थान दिल्यास पाणी व्यवस्थापन अधिक प्रभावी, शाश्वत आणि समावेशक ठरते, असे अनेक



अभ्यासांतून स्पष्ट झाले आहे.

पृथ्वीवर सुमारे ९७ टक्के पाणी सागरी (खारट) आहे, तर केवळ १ टक्का पाणीच मानवासाठी उपयुक्त आहे. याच अल्प प्रमाणातील पाण्यावर संपूर्ण मानवजातीचे जीवन आणि प्रगती अवलंबून आहे. परंतु वाढती लोकसंख्या, औद्योगिकीकरण आणि शहरीकरण यामुळे हेच पाणी झपाट्याने प्रदूषित होत आहे.आजच्या काळात पाणी ही केवळ नैसर्गिक संपत्ती नसून एक रणनीतिक संसाधन (Strategic Resource) बनली आहे. अनेक तज्ज्ञांच्या मते, भविष्यातील संघर्ष पाण्यासाठी होऊ शकतात. त्यामुळे आजच पाण्याचे महत्त्व ओळखून त्याचे जतन करणे अत्यावश्यक आहे.

विशेषतः महाराष्ट्रासारख्या राज्यात दरवर्षी उन्हाळ्यात पाणीटंचाईचे संकट अधिक तीव्र होत आहे. अशा परिस्थितीत काही उपाययोजना अत्यंत गरजेच्या आहेत. जसे की, पाण्याचा काटकसरीने वापर, पावसाचे पाणी साठवण (Rain-water Harvesting), नळगळती व पाईप फुटी त्वरित दुरुस्ती, नद्या, तलाव, विहिरी यांचे प्रदूषण रोखणे, शेतीमध्ये ठिबक व फवारणी सिंचनाचा वापर, सांडपाण्याचे पुनर्वापर (Recycle & Reuse),पाणी व्यवस्थापनात महिलांचा सक्रिय सहभाग वाढवणे.

'थेंब थेंब जपला तर सागर साठतो' ही उक्ती आज अधिकच महत्त्वाची ठरते. प्रत्येकाने स्वतःपासून सुरुवात करून पाण्याचा योग्य वापर केला, तर मोठा बदल घडू शकतो.जलदिनाच्या निमित्ताने आपण सर्वांनी जलसाक्षर होऊन जलसंवर्धनासाठी प्रत्यक्ष कृती करणे ही काळाची गरज आहे. कारण, जल आहे तरच उद्याचा उज्ज्वल भविष्य आहे.

**प्रा. विजय कोष्टी**

# जितेंद्र आव्हाड किती दिशाभूल करणार?

**प्र**लोभन, आमिष, जबरदस्तीने आणि अल्पवयीनाचे धर्मांतरण करण्यास प्रतिबंध करणारे व सर्वच धर्माला लागू असणारे महारष्ट्र धर्म स्वातंत्र्य विधेयक महाराष्ट्राच्या विधानसभेमध्ये नुकतेच मंजूर झाले आहे. त्यामुळे आता कायद्याने धर्मांतरबंदी झालेली आहे.परंतू विधानसभा अधिवेशनात सभागृहात धर्म स्वातंत्र्य विधेयकावर चर्चा करीत असतांना माजी मंत्री जितेंद्र आव्हाड यांनी शिवभक्तांची दिशाभूल करणारे , कोणताही सम कालीन ऐतिहासिक पुरावा नसणारे काल्पनिक वक्तव्य केलेले आहे.विधेयकावर चर्चा सुरू असताना आणि शिवकालीन इतिहासावर चर्चा करण्याचे कोणतेही औचित्य नसताना जितेंद्र आव्हाड यांनी आपली विकृत मानसिकता प्रदर्शित केली आहे.हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपति शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकाबद्दल जाणीवपूर्वक खोटे आणि अपमानास्पद भाष्य आव्हाड यांनी केले आहे.

'शिवरायांच्या राज्याभिषेकास विरोध झाला त्यांना पायाच्या अंगठ्याने कुंकुम तिलक केले होते. असा खोटा इतिहास समाजाच्या माथी मारण्याचा प्रयत्न सभागृहात केला आहे.त्यांच्या विकृत भाष्या मुळे संपूर्ण महाराष्ट्रात शिवप्रेमी मध्ये संतापाची लाट उसळली आहे. जितेंद्र आव्हाड जेव्हा सभागृहात



बरळले तेव्हाच मंत्री शंभूराजे देसाईंनी आव्हाडांना खडसावून माफी मागण्यास भाग पाडले. तसेच मंत्री नितेश राणे,दादा भुसे व भाजपा शिवसेना सदस्यांनी आक्रमक पवित्रा घेतला. सभागृहात जितेंद्र आव्हाडांना झालेला विरोध एक चांगली घटना म्हणावी लागेल.परंतु जितेंद्र आव्हाडांनी आपले वक्तव्य गांभीर्याने, आदरपूर्वक माफी न मागता केवळ दोन शब्दांत दिलगिरी व्यक्त केली आहे .त्यामुळे जितेंद्र आव्हाडांचा जेवढा निषेध करता येईल तेवढा कमीच आहे.आपल्या देशाचा शिवरायांचा शिवकालीन इतिहास देशात नव्हे तर जगात प्रसिद्ध असून जितेंद्र आव्हाड सारख्यांनी कितीही विकृत करण्याचा प्रयत्न केला तरी सत्य लपवता येणार नाही.

**आव्हाडांनी अनेकवेळा केली पोपटपंची**

आमदार जितेंद्र आव्हाड यांनी शिवप्रेमीमध्ये फूट पाडण्यासाठी आणि मुस्लिम समाजाला खुश करण्यासाठी अनेक वेळा भन्नाट पोपटपंची केलेली आहे.अफजल खान ते औरंगजेब यांचे उदात्तीकरण करण्याचा सुद्धा मोठा प्रयत्न केलेला आहे.शिवकालीन इतिहासाची मोडतोड करतांना त्यांनी तर औरंगजेब, अफजलखान आणि शाहिस्तेखान होते म्हणून शिवरायांचा इतिहास आहे,असा निर्लज्ज युक्तिवाद केला.अफजल खान जेव्हा स्वराज्यावर चाल करून आला होता त्या संबंधी सुद्धा जितेंद्र आव्हाड यांनी वादग्रस्त वक्तव्य केले होते.अफजलखान महाराष्ट्रात आपल्या सीमा वाढविण्यासाठी आला होता आणि तो धार्मिक संघर्ष नव्हता तर सत्तेचा संघर्ष होता असे निर्लज्जपणे आव्हाडानी टी.व्ही चॅनलवर सांगितले आहे.जितेंद्र आव्हाड विधानसभेत बोलले तसा समकालीन इतिहासात कुठेही उल्लेख नाही. महाराष्ट्रात गेल्या काही वर्षांत शिवकालीन इतिहासाची मोडतोड,काल्पनिक इतिहासाची मांडणी व मुळातच सहिष्णू असलेल्या शिवरायांना धर्मनिरपेक्ष ठरविणारी बांडगुळांची पैदास उदयास आली आहे.त्यासाठी त्यांनी शिवरायांच्या सैन्यात प्रचंड मुस्लिम होते, सेनापती,अंगरक्षक आणि वकील मुस्लिम असल्याचे खोटा इतिहास वारंवार मांडला.तसेच त्यांनी 'आम्ही सांगू तोच इतिहास आणि आम्ही देऊ तोच पुरावा' अशा दडपशाही पद्धतीने खोटा इतिहास समाजात प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे. कधी हल्ले करणे, तोंडास काळे फासणे, सभा उधळून लावणे, ठरवून मोबाईल फोनवर शिवीगाळ करून सोशल मीडियावर व्हायरल करणे अशा प्रकारे दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. महाराष्ट्रात अन्य वेळी इतिहासाची मोडतोड होते आहे अशी ओरड व कोल्हेकुई करणारी मंडळी आता जितेंद्र आव्हाडाच्या वक्तव्यावर मूग गिळून गप्प का बसली आहे?

**अशोक राणे**
मो.९४२३६५८३८५

## अंधश्रद्धेचा बळी विज्ञान युगातील शिक्षित समाज

**ना**शिक येथील स्वयंघोषित ज्योतिषी कॅप्टन अशोक खरात नावाचा एक ढोंगी, भोंदू, बुवा अंधश्रद्धेचा बाजार भरवत होता जो स्वतःला ज्योतिषी म्हणवत असे अंकशास्त्राच्या नावाखाली भविष्य सांगणाऱ्या अशोक खरात या भोंदू बाबाने महिलांना गुंगीचे औषध देऊन अत्याचार केल्याचा आणि त्यांचे अश्लील व्हिडिओ (जवळपास ५८ व्हिडिओ) तयार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. त्यामुळे महाराष्ट्रात मोठी खळबळ उडाली ज्याचे लाभार्थी सेलिब्रेटी,राजकीय नेते, क्लास वन अधिकारी व शिक्षित नोकरदार, माध्यमवर्गीय होते. हे उपलब्ध असलेल्या फोटो मुळे सिद्ध झाले. तो राजकीय पाठबळ असल्यामुळे श्रीमंता कडून पैसे व मधमवर्गीय महिलांचे शोषण करत असल्याचे बोलल्या जात पूर्वी आशिक्षित व्यक्ती अंधश्रद्धेला बळी पडायचे व आजच्या विज्ञान युगात शिक्षित ही चिंतनीय व विचारणीय बाब आहे.म्हणून आज गाडगेबाबांच्या अंधश्रद्धा निर्मूलन या विचाराची गरज समाजाला आहे. सध्याच्या स्वार्थी जगात सामाजिक सुधारणेसाठी आज अंधश्रद्धा आणि देव-धर्माच्या नावाखाली चालणाऱ्या कू-प्रथांना विरोध करून त्यांनी जो वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवला. ज्याची आज समाजाला खरी गरज आहे.

**- अमोल भारसाकळे,** अमरावती
मो. ८४४६५७९१८२

# विवेक : जीवनाचा सजग मार्ग

**म**नुष्याच्या जीवनात अनेक शक्ती असतात; परंतु त्यांपैकी सर्वात महत्त्वाची शक्ती म्हणजे विवेक. विवेकामुळेच माणूस योग्य-अयोग्य, सत्य-असत्य आणि हित-अहित यांचा विचार करू शकतो. म्हणून प्रत्येकाच्या जीवनात विवेक हा जणू सजग द्वारपालासारखा असणे आवश्यक आहे. आपल्या मनात, विचारात आणि आचरणात काय प्रवेश करतो आहे, यावर लक्ष ठेवणे हीच विवेकाची खरी भूमिका आहे.

दैनंदिन जीवनात आपल्यासमोर अनेक निवडी येतात. उदाहरणार्थ, समोर पेप्सी आणि ताक ठेवले असेल तर विवेक आपल्याला सांगतो की ताक हे शरीरासाठी हितकारक आहे, तर पेप्सी केवळ क्षणिक चव देणारी आहे. त्याचप्रमाणे दूध आणि मद्य यांपैकी निवड करताना देखील विवेकच योग्य मार्ग दाखवतो. म्हणजेच जीवनातील प्रत्येक निर्णय विवेकाच्या आधारेच घ्यायला हवा.योगशास्त्रात 'प्रत्याहार' या तत्त्वाचा उल्लेख आहे. प्रत्याहार म्हणजे आपल्या इंद्रियांवर नियंत्रण ठेवणे. डोळे, कान, जिभ आणि मन यांना जे काही आकर्षक वाटते ते सर्व स्वीकारणे योग्य नसते. विवेकाच्या साहाय्यानेच आपण इंद्रियांना योग्य मर्यादेत ठेवू शकतो आणि जीवनात संतुलन राखू शकतो.

आजची वास्तविकता पाहिली, तर एक वेगळेच चित्र समोर येते. सुट्टीच्या दिवशी हॉटेल किंवा मॉलमध्ये गेल्यावर लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांची प्रचंड गर्दी दिसते. अनेक ठिकाणी बसायलाही जागा



मिळत नाही. प्रत्येक टेबलवर मोठ्या प्रमाणात जंक फूड मागवलेले असते; मात्र त्यातील बरेचसे पदार्थ अर्धवट खाऊन तसेच सोडून दिले जातात. एवढेच नव्हे, तर पाण्याच्या बाटल्या, चाट, सिझलर यांसारखे पदार्थही मोठ्या प्रमाणात कचऱ्यात जाताना दिसतात.हे दृश्य पाहिल्यावर मनात एक प्रश्न उभा राहतो. अन्नाची किंमत आपल्याला खरंच कळते आहे का?

एका बाजूला अनेक लोकांना दोन वेळचे अन्नही सहज मिळत नाही, तर दुसऱ्या बाजूला सहज मिळालेल्या अन्नाची अशी उधळपट्टी होताना दिसते.आपली भारतीय संस्कृती 'अन्न हे पूर्णब्रह्म आहे' अशी शिकवण देते. अन्नाचा आदर करणे, त्याची नासाडी टाळणे आणि साधेपणाने जीवन जगणे हे आपल्या संस्कृतीचे मूलभूत तत्त्व आहे.आजच्या जगातील वाढती अस्थिरता आणि युद्धजन्य परिस्थिती लक्षात घेतली तर संसाधनांची किंमत अधिक जाणवते. अनेक देशांमध्ये अन्नटंचाई, महागाई आणि असुरक्षिततेचे वातावरण निर्माण होत आहे. अशा काळात विवेक, संयम आणि साधेपणा या मूल्यांचे महत्त्व अधिक वाढते.म्हणूनच पुढील पिढीला विवेक, संयम आणि संस्कार यांचे महत्त्व शिकवणे ही प्रत्येक कुटुंबाची जबाबदारी आहे. खरा सुजाणपणा म्हणजे केवळ खर्च करणे नव्हे, तर मिळालेल्या प्रत्येक गोष्टीची किंमत ओळखणे होय. विवेक जागृत असेल तरच माणूस संतुलित आणि अर्थपूर्ण जीवन जगू शकतो.म्हणून प्रत्येकाच्या जीवनात विवेक हा सदैव जागृत असलेला द्वारपाल असायला हवा, कारण तोच आपल्याला योग्य दिशा दाखवतो.

**डॉ.स्वाती देशमुख**
नागपूर

# वनपालाविरोधात वनमजुराचा एल्गार

## १४ एप्रिलपासून आमरण उपोषणाचा इशारा

■ प्रतिनिधी | अकोट ■

*वनविभागातील कथित भ्रष्टाचार आणि अन्यायाविरोधात अखेर वनमजुराने थेट संघर्षाचा मार्ग अवलंबला आहे. मागील दहा वर्षांपासून सेवा बजावणारे वाहन चालक व वनमजूर विकास जगन्नाथ मोरे यांनी वनपाल सुनील पांडुरंग राऊत यांच्या कारभाराविरोधात गंभीर आरोप करत १४ एप्रिल २०२६ पासून अमरावती येथील मुख्य वनसंरक्षक कार्यालयासमोर आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे.*

मोरे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे सांगितले की, भ्रष्टाचार उघड केल्याच्या रागातून त्यांना गेल्या तीन वर्षांपासून बेकायदेशीररीत्या कामावरून कमी करण्यात आले आहे. इतकेच नव्हे, तर त्यांचे वेतन दुसऱ्याच व्यक्तीच्या नावे काढण्यात आल्याचा धक्कादायक आरोपही त्यांनी केला आहे. त्यामुळे त्यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली असल्याचे त्यांनी नमूद केले.

दरम्यान, संबंधित वनपालावर यापूर्वीच बार्शीटाकळी पोलीस ठाण्यात भादंवि कलम ४२०, ४६७, ४६८ अंतर्गत गुन्हा दाखल (इंर्ई क्र. ०१९८/२०२२) असल्याचा दावा मोरे यांनी केला आहे. मात्र, अद्याप कोणतीही ठोस विभागीय कारवाई न झाल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

मोरे यांनी पुढे आरोप केला की, अकोट परिसरात वन्यप्राण्यांच्या शिकारीच्या प्रकरणात आरोपींना रंगेहात पकडूनही सोडून देण्यात आले, तसेच पंचनाम्यात फेरफार करण्यात आला. याशिवाय दहीखेड व बेलूरा राखीव वनक्षेत्रात जेसीबीच्या सहाय्याने अवैध उत्खनन करून वनसंपत्तीचे नुकसान केल्याचाही आरोप त्यांनी केला आहे.

याचबरोबर, 'सोमंत' नावाचा व्यक्ती वनपालाचा एजंट म्हणून काम करत असून, शेतकऱ्यांकडून पंचनाम्यासाठी पैसे उकळणे आणि अधिकाऱ्यांच्या नावाने खंडणी मागितली जात असल्याचा गंभीर आरोपही मोरे यांनी पुराव्यासह केला आहे.

> "तक्रारदार विकास मोरे हे शासकीय वाहनावर वाहनचालक म्हणून नाही, त्यांचा वनमजूर म्हणून कुठलाही रेकॉर्ड वनविभागात नाही. तर त्यांनी नमूद केल्याप्रमाणे माझ्यावर गुन्हा असून ते प्रकरण सद्यस्थितीत न्यायप्रविष्ठ आहे. मोरे यांनी इतर केलेले सर्व आरोप हे बिनबुडाचे असून वनविभागात कार्यरत होण्यासाठी ते ब्लॅकमेलिंग करीत आहे.
>
> **सुनील राऊत** वनपाल, वनविभाग अकोट

या प्रकरणी जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक आणि मुख्य वनसंरक्षक यांच्याकडे तक्रार सादर करण्यात आल्याचे सांगत, न्याय न मिळाल्यास १४ एप्रिलपासून आमरण उपोषणास बसण्याचा निर्धार मोरे यांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, या प्रकरणातील आरोपांची निष्पक्ष चौकशी करून सत्य समोर आणण्याची गरज व्यक्त होत आहे.

**प्रमुख मागण्या :** मोरे यांनी प्रशासनाकडे तीन ठोस मागण्या केल्या आहेत. त्यात स्वतःला तात्काळ कामावर पुनर्स्थापित करणे व मागील तीन वर्षांचा थकीत पगार देणे, संबंधित वनपालाला 'महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९७९' अंतर्गत निलंबित करणे आणि कथित 'सोमंत' नामे दलालाची चौकशी करून त्याच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करणे यांचा समावेश आहे.

# पक्षाच्या वाढीसाठी सर्वांनी एकत्र येऊन काम करावे : उपनेते गोपीकिशन बाजोरिया

## पक्षप्रवेश केलेल्या जिल्हाप्रमुखांसह नगरसेवकांचा सत्कार



■ प्रतिनिधी | अकोला ■

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली अकोला महानगरपालिकेत शिवसेनेने 'ऑपरेशन टायगर' यशस्वी केले असून, उद्धव ठाकरे गटाच्या विद्यमान जिल्हाप्रमुखांसह चार नगरसेवकांनी अधिकृतपणे पक्षात प्रवेश केला. या नगरसेवकांचा शिवसेनेचे उपनेते व माजी आमदार गोपीकिशन बाजोरिया यांच्या उपस्थितीत शनिवारी भव्य सत्कार करण्यात आला. 'पक्षाच्या वाढीसाठी सर्वांनी हेवेदावे विसरून एकत्र यावे,' असे आवाहन करत बाजोरिया यांनी स्थानिक पदाधिकाऱ्यांना पक्ष बांधणीसाठी १५ दिवसांचा 'अल्टिमेटम' दिला आहे.

अकोला महापालिकेच्या राजकारणात या प्रवेशामुळे मोठी उलथापालथ झाली आहे. ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख मंगेश काळे, नगरसेवक सागर भारुका, मनोज पाटील, सोनाली सरोदे आणि सुरेखा काळे यांनी समर्थकांसह शिवसेनेत प्रवेश केला. 'नव्याने आलेले नगरसेवक कोणत्याही स्वार्थासाठी आलेले नसून, केवळ विकासाच्या मुद्द्यावर त्यांनी हे पाऊल उचलले आहे,' असे बाजोरिया यांनी स्पष्ट केले.

पक्षांतर्गत निष्क्रियतेवर बाजोरिया यांनी कडक शब्दांत प्रहार केला. शहर प्रमुखांना ५ तारखेपर्यंत कामाचा अहवाल सादर करण्याचे आदेश देत ते म्हणाले, 'जर या काळात काम समाधानकारक नसेल, तर त्यांना पदावरून मोकळे करा.' कार्यकर्त्यांनी 'फोटोंच्या राजकारणात' न पडता तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचावे, असा स्पष्ट संदेश त्यांनी दिला. उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे 'कॉमन मॅन' असून, प्रभागांच्या विकासासाठी निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही, असे आश्वासनही त्यांनी दिले.

यावेळी माजी आमदार विप्लप बाजोरिया, जिल्हाप्रमुख नारायण गव्हाणकर, चंद्रशेखर पांडे, विठ्ठल सरप, ललित वानखडे, महिला जिल्हाध्यक्ष उषा विरक, रेखा राऊत, तरुण बगेरे, बाळासाहेब तायडे, युवासेनेचे जिल्हाप्रमुख अतुल एडणे, युवती सेना जिल्हाप्रमुख खुशी भटकर, अल्पसंख्यांक जिल्हाप्रमुख मोहसीन खान, शिक्षक सेनेचे सुनील बैस, अनुजाती मोर्चाचे रामकृष्ण डोंगरे यांच्यासह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन निवासी उपजिल्हा प्रमुख संतोष अनासने यांनी केले.

**'अमृत मंथन' करा, टीका नको!**

'ऑपरेशन टायगर'वरून सुरू असलेल्या अंतर्गत वादावर भाष्य करताना बाजेरिया यांनी 'अमृत मंथना'चा दाखला दिला. 'हे ऑपरेशन कोणी केले, यावर चर्चा करण्यापेक्षा त्यातून 'अमृत' काढण्याची गरज आहे,' असे ते म्हणाले. 'जर गुवाहाटी ऑपरेशनच्या वेळी प्रत्येकाला विचारत बसले असते, तर आज बाळासाहेबांचे विचार जिवंत राहिले नसते,' अशा शब्दांत त्यांनी 'विश्वासात घेतले नाही' म्हणणाऱ्या नाराजांना प्रत्युत्तर दिले.

**नगससेवक म्हणाले विकासासाठीच प्रवेश :**

'फेसबुकवर होणारी '५० खोके' ही टीका फेटाळून लावत, केवळ जनतेला दिलेली वचने पूर्ण करण्यासाठी मी हा निर्णय घेतला आहे,' असे नगरसेवक सागर भारुका यांनी सांगितले. तर, 'आम्ही ओरिजिनल शिवसैनिक असून जिथे कदर झाली नाही, तिथे राहण्यात अर्थ नव्हता,' अशी भावना मंगेश काळे यांनी व्यक्त केली.

# महिलांनी स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष देणे गरजेचे : डॉ. कविता मिसाळ

## सिल्वर फाउंडेशनचा महिला सन्मान सोहळा उत्साहात

■ प्रतिनिधी | अकोट ■

महिलांनी आपल्या आरोग्याकडे विशेष लक्ष देणे अत्यंत गरजेचे असून प्रत्येक महिलेने स्वतःसाठी वेळ काढणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन डॉ. कविता मिसाळ यांनी केले. अकोट तालुक्यात सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या सिल्वर फाउंडेशनच्या वतीने स्थानिक श्री शिवाजी विद्यालयाच्या सभागृहात जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी संस्थापक अध्यक्ष प्रभाकर पांडे अध्यक्षस्थानी होते. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. कविता मिसाळ (कारंजा), नुपूर देशपांडे (देशपांडे अकॅडमी), अंजली गावंडे (पर्यवेक्षक, शिवाजी विद्यालय) उपस्थित होत्या. तसेच महिला समूहाच्या



अध्यक्षा उज्ज्वला भिसे, उपाध्यक्ष अनिल पालेकर व सचिव रवींद्र कापसे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या २१ कर्तृत्ववान महिलांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह, भेटवस्तू व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. मार्गदर्शन करताना डॉ. मिसाळ यांनी महिलांच्या आरोग्याबाबत जागरूकता, नियमित तपासणी व गर्भसंस्काराचे महत्त्व अधोरेखित केले. नुपूर देशपांडे यांनी आधुनिक युगातील महिलांची भूमिका व विविध क्षेत्रातील योगदान यावर सविस्तर भाष्य केले.सत्कारमूर्ती महिलांनी आपल्या मनोगतात सिल्वर फाउंडेशनने त्यांच्या कार्याची दखल घेतल्याबद्दल समाधान व्यक्त केले. अशा प्रकारचा सन्मान प्रथमच मिळाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकाश गायकी व छाया राऊत यांनी केले. कार्यक्रमास मेहूल नगदिया, अनिल गोंडचर, प्राचार्य संजय वालसिंगे, गणेश भोरे, अमित पुरोहित, डॉ. अविनाश भिसे, चंद्रशेखर राऊत, दिनेश नागमते, सुबोध कराळे, राजकुमार भगत, डॉ. मुकुंद तळोकार, पंकज गिरी, शरद पांडे, सुरेश मकवाना, अनंत सपकाळ, संजीव खंडेराव, ज्ञानेश्वर सांगळे, अनिल हिंगणकर, डॉ. प्रमोद येऊल, अरुण खापरकर, संजय पांडे, निळकंठ काळे, वैशाली नागमते, सारिका पालेकर, आशा भगत आदी उपस्थित होते.

**यांचा झाला सन्मान :** जागतिक महिला दिनानिमित्त नगरसेविका नयना इंगोले, विजया बोचे, शुभांगी टेमझरे, कृषी अधिकारी सुकेशनी करवते, पटवारी विजया ईचोले, प्राध्यापिका कीर्ती काळबांडे, शिक्षिका वनिता सपकाळ, शारदा भवाने, समाजकार्यकर्त्या स्नेहा हिंगणकर, बँक कर्मचारी हर्षाली गये, वैष्णवी तळोकार, महिला पोलीस कर्मचारी पूनम गावंडे, अनिता जांभळे, जयश्री बीजेवार, वैशाली बहादूरे तसेच अनिता उंदरे, वैष्णवी पालेकर, ज्योती नागापुरे, शुभांगी अनासने, कल्याणी नवले आदींचा सन्मान करण्यात आला.

**जाहीर नोटीस**

सर्वत्र लोकांना, संस्था, बॅंक, सावकार व इतर यांना या जाहीर नोटीसव्दारे सुचीत करण्यात येते की, आमचे पक्षकाराने श्री. गणेश उत्तमराव गिते रा. विठ्ठल मंदीर, भिरड पेट्रोल पंप जवळ, जुने शहर, अकोला ता. जि. अकोला यांचेकडुन खालील वर्णनाची मालमत्ता (प्लॉट) विकत घेण्याचा सौदा श्री. विद्याधर मुरलीधर सरदार, श्री. विकास मुरलीधर सरदार व श्रीमती. रसिक उमेष सुरवाडे यांचे सोबत कायम केलेला आहे.

**सदरहु स्थावर मालमत्तेचे वर्णन :-**

मौजे अकोला प्र.ता.जी. अकोला येथील शेत सर्वे.न./ गट क. ७७/१/२५ मधील जमीनीचे एस.डी.ओ. साहेब अकोला यांचे फाईलवरील एन. ए. पी. ३४/अकोला/१२०/१९८१-८२ नि. ता. २४.०९.१९८२ प्रमाणे मंजुर झालेल्या लेआऊट नकाशातील लेआऊट प्लॉट नं. २५ असा खुला प्लॉट ज्याचे एकुण क्षेत्रफळ ३५६३ चौ. फु. असुन त्यापैकी २३६३ चौ.फु. क्षेत्र त्यास चतु:सिमा पुर्वेस - सर्विस लाईन, पश्चिमेस - २५ फुट सरकारी रस्ता, उत्तरेस - प्लॉट क्र. २५ ची उर्वरीत जागा, दक्षिणेस - सरकारी रस्ता असुन स्थावरचे वर्णन आहे.

तरी वरील मालमत्ते बाबत कोणीही कसल्याही प्रकारचा व्यवहार, हक्क, बोजा, उजर, अधिकार, वहीवाट, बक्षीसपत्र, गहाणखत, खरेदी, कर्ज व इतर कोणताही व कुठल्याही प्रकारचा अधिकार असल्यास खालील पत्यावर ७ दिवसाचे आत कळवावे अन्यथा कोणाचाही कुठलाही व्यवहार असल्यास ती जबाबदारी आमचे पक्षकाराची राहणार नाही व कुठल्याही प्रकारचा उजर व अधिकार मान्य केला जाणार नाही. या नंतर ७ दिवसानंतर आमचे पक्षकार सदरचे खरेदीखत केव्हाही करून घेवु शकतील. करीता जाहीर नोटिस.

अकोला
दिनांक : २०/०३/२०२६

**पक्षकारातर्फे अधिवक्ता**
**ॲड. अमर ओ. तिवारी,**
द्वारा- बार ऑफिस, जिल्हा व सत्र न्यायालय,
स्टेशन रोड, अकोला
मो.क्र. ९८५०३०७२६८

**जाहीर सूचना**

माझे पक्षकार यांनी दिलेल्या महिती वरून सर्व नागरिकांना तसेच वित्तीय संस्था व बँक यांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते कि, माझे पक्षकार श्री. मोहोमद जाफर शेख मोबीन, रा. अकोला, ता. आणि जि. अकोला यांच्या मालकी व ताब्यातील मालमत्ता मौजा / कसबे शिलोडा, ता. आणि जि. अकोला येथील सर्वे नं. २० / भाग, मधील अकृषक लेआउट प्लॉट नं. १५, एकूण क्षेत्रफळ ९२.९० चौ. मी. हा प्लॉट श्री. फातिमाबी अब्दुल रौफ याच्या कडून खरेदीने र.द.क्र. २०५०; दि. १७/०५/२०१० ने खरेदी केली असून सदर मालमत्तेची जुने मूळ नोंदणीकृत खरेदीखत ज्याचे र.द.क्र. ३८०६; दि. ०२/१२/२००४, हि गहाळ झाल्या आहेत, जर कोणलाही ती मिळाले असल्यास खाली संपर्क साधावा. तसेच सदर मालमत्तेवर AU Small Finance Bank Ltd, Akola मार्फत कर्ज घेत असून त्याकरिता माझे पक्षकार हे वरील नमूद मालमत्ता गहाण देत आहेत.

तरी जाहीर नोटीस द्वारे, आपणास कळविण्यात येते कि, सदर मालमत्तेवर कोणाचाही कुठल्याही प्रकारचा हिस्सा, अधिकार किवां गहाण, दान, बक्षीस, तोंडी करार केला असल्यास, तथा ताबा असल्यास, किंव्हा कुठलाही दिवाणी अथवा फौजदारी दावा प्रलंबित व निकाली असल्यास, संबंधित व्यक्तीने नोटीस वृत्तपत्रात जाहीर झाला तारखे पासून ७ दिवसांच्या आत संपर्क साधावा; तसे न केल्यास सदर मालमत्तेवर कोणाचाही कुठल्याही प्रकारे काहीहि ऐक हक्क, अधिकार,हित-संबंध आणि आक्षेप नसल्याचे समजले जाईल.तसेच भविष्यात सदर गहाळ दस्त विचारात घेऊन कुठलाही व्यवहार जसेकी खरेदी, गहाण, दान, बक्षीस, तोंडी करार केलेले आढळल्यास त्यास सर्वस्वी लिहून घेणार/देणार जबाबदार राहील.

अकोला
दिनक:- १८/०३/२०२६

**अँड. गौरव शि. देशमुख**
आळशी प्लॉट, गजानन महाराज फोटो जवळ,
दक्षता नगर चौक, ता. जि. अकोला.
मो. नं. ९०२८२३२२४६

# चरण इंगळे यांना मातृषोक



■ प्रतिनिधी | अकोट ■

वंचित बहुजन आघाडीचे अकोट तालुका अध्यक्ष चरन इंगळे याची आई नामे मनकर्णा श्रावण इंगळे यांचे वयाच्या ६८ व्या वर्षी शनिवारी दि.२१ मार्च रोजी दुपारी २:०० वाजता हृदय विकारच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या पच्यात पती, चार मुले, एक मुलगी, सुना, नातवंड असा आप्त परिवार आहे.

त्यांचा अंत्यविधिचा कार्यक्रम आज दि.२२ मार्च रोजी त्यांच्या राहत्या घरी विटाळी सावरगाव येथे ठीक ११:०० वाजता ठेवण्यात आले आहे.

**वार्षिक सर्वसाधारण सभा**

सदर नोटीसद्वारे अकोला गार्डन क्लब अकोलाचे पदाधिकारी, मुख्य कार्यकारिणी सदस्य तथा सर्व सभासदांना सूचित करण्यात येते की, अकोला गार्डन क्लब, अकोला संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा सभाध्यक्ष श्री संजय मदनलाल शर्मा यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात येणार आहे तरी, आपल्या क्लबच्या सर्व पदाधिकारी मुख्य कार्यकारिणी सदस्य व सर्व सभासदांनी या सभेकरिता उपस्थित रहावे ही विनंती.

**स्थळ :** बी. आर. हायस्कूल अकोला सभागृह, हेड पोस्ट ऑफिस मागे, अकोला
**सभावेळ :** सायंकाळी ५:०० वाजता
**सभा दिनांक :** २९/०३/२०२६ रविवार
**सभेचे विषय :** १) मागिल सभा दि. २८/०२/२०२५ च्या इतिवृत्तास मंजूरी देण्याबाबत. २) सन २०२५-२६ खर्चास मंजुरी देण्याबाबत. ३) ऑडिट अकाउंट वर्ष २०२४-२५ ला मंजूरी देण्याबाबत. ४) क्लबची घटना दुरूस्ती करण्याबाबत. ५) कार्यकारिणीचे फेरबदल करणेबाबत. ६) वृक्षांना पाणी देण्यासाठी टँकर फिरते वाहनाची व्यवस्था करणेबाबत ७) अध्यक्षांचे परवानगीने वेळेवर येणारे अन्य विषयांवर चर्चा करणे.
**टिप :** सभेकरिता आवश्यक असणारी गणसंख्या सभेच्या वेळी पूर्ण न झाल्यास सभा तहकूब करून त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर उपस्थित सभासदांसमोर सभा घेण्यात येईल त्याला फोरमची आवश्यकता राहणार नाही.

**नोटीस काढणाऱ्याची सही**
श्री संजय मदनलाल शर्मा, (अध्यक्ष)
अकोला गार्डन क्लब, अकोला रं. नं. एफ- ४७७, अकोला

# चिंताहरण शिवमहापुराण कथेला उत्स्फूर्त प्रतिसाद



**अकोला :** अकोला शहरातील तापडिया नगर येथे स्व. रामभाऊ हुसनाजी गवई व स्व. कलावतीबाई रामभाऊ गवई यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ भव्य श्री चिंताहरण शिवमहापुराण कथा आयोजित करण्यात आली आहे. भगवान शिवाची कृपा, आशीर्वाद आणि जीवनात सकारात्मक ऊर्जा लाभावी या उद्देशाने हा आध्यात्मिक सोहळा आयोजित करण्यात आला असून भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कथा श्रवणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. विश्वविख्यात आंतरराष्ट्रीय भागवत भूषण बालव्यास परम पूज्य श्री कृष्णा दुबे महाराज यांच्या पावन सानिध्यात ही कथा सुरू असून १९ मार्च ते २५ मार्च २०२६ दरम्यान दररोज सायंकाळी ७ ते १० या वेळेत कथा प्रवचन होत आहे.

# पातूर तालुक्यात रमजान ईद उत्साहात
## पोलिसांचा चोख बंदोबस्त, एकोप्याचा संदेश

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पवित्र रमजान महिन्याच्या पार्श्वभूमीवर पातूर शहरासह ग्रामीण भागात ईदचा सण मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरा करण्यात आला. खेट्री, शिरपूर, आलेगाव, मळसूर, विवरा, राहेर, अंबासी आदी गावांमध्ये मुस्लिम बांधवांनी एकात्मतेचा संदेश देत ईद साजरी केली. सणानिमित्त पातूर व चान्नी पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

रमजान महिन्यातील ३० दिवसांचे उपवास (रोजे) पूर्ण करत मुस्लिम बांधवांनी ईश्वरप्रार्थनेत स्वतःला अर्पण केले. पहाटेच्या सहरीपासून ते सूर्यास्तानंतरच्या इफ्तारपर्यंत संपूर्ण परिसरात आध्यात्मिक वातावरण अनुभवायला मिळाले. स्थानिक मशिदींमध्ये पाच वेळच्या नमाजसह विशेष तरावीह नमाज अदा करण्यात आली. कुरआन पठणाचे



कार्यक्रमही मोठ्या भक्तिभावाने पार पडले. युवकांसह ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत शिस्त आणि आत्मसंयमाचे दर्शन घडवले. इफ्तारच्या वेळी खजूर, फळे, फराळ आणि पारंपरिक खाद्यपदार्थांनी सजलेली ताटे एकत्र येण्याचा आनंद द्विगुणित करत होती. अनेक ठिकाणी सामूहिक इफ्तारचे आयोजन करण्यात आले असून, सर्वधर्मीय नागरिकांनी सहभाग घेत बंधुभावाची प्रचिती दिली.

रमजान महिन्यात दानधर्मालाही विशेष महत्त्व देण्यात आले. गरजू व वंचित घटकांना अन्नदान, कपड्यांचे वाटप करून मदतीचा हात पुढे करण्यात आला. या पवित्र पर्वानिमित्त तालुक्यात धार्मिकतेबरोबरच सामाजिक एकात्मतेचेही दर्शन घडले. विशेष म्हणजे, हिंदू बांधवांनीही इफ्तार पार्ट्यांचे आयोजन करून 'एकता आणि मानवता'चा संदेश अधिक दृढ केला.

# एकलारा येथे एक कोटीच्या विकासकामांचा शुभारंभ

## ग्रामीण भागाला शहरासारख्या सुविधा देण्याचा प्रयत्न – आ. रणधीर सावरकर

■ प्रतिनिधी | अकोला ■

ग्रामीण भागातील जनजीवन अधिक उज्वल करण्यासाठी मूलभूत सुविधांसह सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न सुरू असून, छोट्या गावांनाही शहरासारखे वातावरण निर्माण करण्यासाठी राज्य शासनाच्या माध्यमातून प्रामाणिकपणे काम करत आहोत. या कामासाठी जनतेचा आशीर्वाद हीच आपली खरी ताकद आहे, असे प्रतिपादन आमदार रणधीर सावरकर यांनी केले.

अकोला पूर्व विधानसभा मतदारसंघातील एकलारा येथे विविध विकासकामांच्या भूमिपूजन व लोकार्पण सोहळ्यात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच राजेश बेले होते. प्रमुख अतिथी म्हणून जयंतराव मसने, प्रवीण हगवणे, नितीन भांडे, भरत काळे, लव भटकर, संजय बेले, चव्हाण सर, विवेक भरणे आदी



उपस्थित होते. यावेळी आमदार सावरकर यांनी मतदारसंघातील समस्यांचा अभ्यास करून जनतेच्या अपेक्षांनुसार विकासाचा आराखडा तयार केला असून, त्यानुसार कामांना गती दिल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरणाऱ्या जिल्हा परिषद शाळांच्या दुरुस्तीपासून ते रस्ते, ग्रामपंचायत कार्यालय आणि स्मशानभूमीपर्यंत विविध कामांना प्राधान्य देण्यात येत असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमादरम्यान संत तुकडोजी महाराज, छत्रपती शिवाजी महाराज तसेच भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पूजन करून अभिवादन करण्यात आले. गावकऱ्यांनी आमदार सावरकर यांचे आतषबाजी व मातृशक्तीच्या औक्षणाने उत्स्फूर्त स्वागत केले. या प्रसंगी ग्रामपंचायत भवनासाठी २० लाख रुपये, जिल्हा परिषद शाळा दुरुस्तीसाठी १५ लाख रुपये, बंदूगोटा ते एकलारा रस्ता दुरुस्तीसाठी ५० लाख रुपये तसेच स्मशानभूमी कॉंक्रिट रस्त्यासाठी १५ लाख रुपये अशा एकूण कोटी रुपयांच्या विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सरपंच तथा कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक राजेश बेले यांनी केले. यावेळी एकलारा पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक- प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १०८**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# पाणी जपून वापरा : सिंदी रेल्वे नगर परिषदेचा 'शिस्तप्रिय' निर्णय

## नियम मोडल्यास होणार थेट कारवाई

**सिंदी (रेल्वे)/जनमाध्यम**

शहरात दिवसेंदिवस वाढत्या उन्हाची तीव्रता आणि भविष्यातील पाणी टंचाईचे संकट ओळखून, येथील नगर परिषदेने पाणी बचतीसाठी आता 'ॲक्शन मोड'वर येण्याचा निर्णय घेतला आहे. पाणी जपून वापरा, पाण्याचा अपव्यय टाळा या केवळ घोषणा न राहता, त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासनाने कठोर पावले उचलली आहेत. पाणीपुरवठा सभापती अकिल शेख यांच्या नेतृत्वात घेतलेल्या या निर्णयाचे सध्या सर्वत्र स्वागत होत आहे.

शहरातील अनेक भागांत नळाला तोटी नसल्यामुळे पाणी विनाकारण वाहून जाते. हा अपव्यय रोखण्यासाठी नगर परिषदेने आता नळाला तोटी लावणे बंधनकारक केले आहे. केवळ आवाहन करून न थांबता, अनावश्यक पाणी वाया घालवणाऱ्यांवर थेट दंडात्मक कारवाई करण्याचे आदेश प्रशासनाने दिले आहेत. ज्या भागात पाण्याचा दाब जास्त आहे, तिथे पाण्याचा नासाडी होण्याचे प्रमाण अधिक असल्याचे निदर्शनास आले असून, अशा परिसरांवर विशेष लक्ष ठेवले जात आहे.केवळ दंड करून न थांबता, नागरिकांमध्ये मानसिक परिवर्तन घडवण्यासाठी प्रशासनाने कल्पक मार्ग निवडला आहे. शहरात कचरा संकलनासाठी फिरणाऱ्या घंटागाडीद्वारे आता 'पाणी बचतीची' दवंडी दिली जात आहे. नळाला तोटी लावा, पाणी वाया घालवू नका अशा सूचना थेट घराघरापर्यंत पोहोचवल्या जात आहेत. यामुळे जनजागृती अधिक प्रभावीपणे होत आहे. पाणीपुरवठा सभापती अकिल शेख यांनी सिंदी शहराला टंचाईमुक्त करण्यासाठी विशेष मोहीम हाती घेतली आहे. याबद्दल बोलताना त्यांनी सांगितले की, पाणी हे अनमोल आहे. जर आपण आज बचत केली, तरच उद्याचे संकट टाळता येईल. शेवटच्या घरापर्यंत पाणी पोहोचावे, हेच आमचे उद्दिष्ट आहे. अपव्यय थांबल्यामुळे उंचावर किंवा शेवटच्या टोकावर असलेल्या घरांनाही पुरेसे पाणी मिळेल. रस्त्यावर पाणी साचून होणारा चिखल आणि डासांचा प्रादुर्भाव कमी होईल.

प्रशासनाच्या या शिस्तप्रिय भूमिकेमुळे सुज्ञ नागरिकांनी या निर्णयाचे स्वागत केले असून, हा निर्णय शहराच्या नियोजनासाठी 'मैलचा दगड' ठरेल अशी भावना व्यक्त होत आहे. नगर परिषदेच्या या पर्यावरणपूरक आणि कडक भूमिकेमुळे सिंदी रेल्वे शहरात सध्या शिस्तीचे वातावरण निर्माण झाले असून, सभापतींच्या कार्यतत्परतेची सर्वत्र प्रशंसा होत आहे.






नगर परिषदेचा हा निर्णय खरोखरच कौतुकास्पद आहे. अनेकदा नळाला तोट्या नसल्यामुळे पाणी रस्त्यावर वाहून जाते, ज्यामुळे चिखल होतो आणि डास वाढतात. आता शिस्त लागल्यामुळे पाण्याचा अपव्यय थांबेल आणि आमच्यासारख्या उंचावर राहणाऱ्या घरांनाही पुरेसे पाणी मिळेल. अकिल शेख साहेबांनी उचललेले हे पाऊल शहराच्या भविष्यासाठी खूप गरजेचे होते.

**अलका वासुदेव हिंगे,** गृहिणी सिंदी (रेल्वे).



पाणी हे अनमोल आहे आणि त्याची किंमत आपल्याला टंचाई जाणवल्यावरच कळते. घंटागाडीद्वारे होणारी जनजागृती ही एक उत्तम कल्पना आहे, कारण त्यामुळे संदेश थेट घराघरांत पोहोचतोय. दंड करण्यापेक्षा नागरिकांनी स्वतःहून जबाबदारी ओळखून नळाला तोट्या लावल्या पाहिजेत. प्रशासनाच्या या 'ॲक्शन मोड'मुळे शहरात पाण्याचे योग्य नियोजन होईल, यात शंका नाही.

**सुवर्णा ईश्वर भुते,** गृहिणी सिंदी (रेल्वे).

### सभापती अकिल शेख यांच्या तत्परतेचे शहरात कौतुक; घंटागाडीद्वारे जनजागृतीवर भर

# आज सावित्रीबाईंच्या स्मृतीतून स्त्रीशक्तीचा सन्मान

## आरोग्य हाच खरा दागिना

**सेलू-** स्त्रीशिक्षणाच्या क्रांतीची ज्योत पेटवणाऱ्या सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतीदिनानिमित्त सेलू नगरीत महिलांसाठी आरोग्याचा महाउत्सव सजणार आहे. उत्कर्ष जनकल्याण शिक्षण संस्था, वर्धा सोशल फोरम आणि कस्तुरबा रुग्णालय सेवाग्राम यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २२ मार्च २०२६ रोजी दीपचंद विद्यालय, सेलू येथे सकाळी ९ ते दुपारी १ या वेळेत भव्य मोफत महिला आरोग्य महाशिबिर व आशा सेविका सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या उपक्रमाच्या अध्यक्षस्थानी नवीन चौधरी राहणार असून प्रमुख पाहुणे म्हणून शैलेन्द्र दुप्तरी, चूडामण हांडे व मकरंदे उपस्थित राहणार आहेत. तसेच प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. अभ्युदय मेघे यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे.महाशिबिरात स्त्रीरोग, हृदयरोग, अस्थिरोग, नेत्ररोग व कर्करोग यांसह विविध आजारांची मोफत तपासणी केली जाणार आहे.

मासिक पाळीतील त्रास, गर्भाशयाचे विकार, छातीत दुखणे, श्वासाचा त्रास, सांधेदुखी, डोळ्यांचे आजार तसेच कर्करोगाच्या लवकर निदानावर विशेष भर दिला जाणार आहे. तज्ज्ञ डॉक्टरांकडून महिलांना सखोल मार्गदर्शनही मिळणार आहे.या शिबिराचे विशेष आकर्षण म्हणजे परिसरातील आशा सेविकांचा सन्मान सोहळा. आरोग्य क्षेत्रात अहोरात्र सेवा देणाऱ्या या सेविकांच्या कार्याचा गौरव करून त्यांना प्रेरणेचा मानाचा मुजरा दिला जाणार आहे.तसेच महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजना व आयुष्मान भारत योजना अंतर्गत पात्र महिलांना मोफत उपचारासाठी मार्गदर्शन केले जाणार आहे. मोतीबिंदू शस्त्रक्रिया, गुडघा व कंबर प्रत्यारोपणासाठी सवलतींची माहितीही दिली जाणार आहे.

याशिवाय ७० वर्षांवरील महिलांसाठी वयोवंदना योजना, महाराष्ट्र एसटी प्रवास सवलत, NCMC आणि संजय गांधी निराधार योजना यांसाठी ऑन-द-स्पॉट मोफत नोंदणी सुविधा उपलब्ध राहणार आहे.

आरोग्य हाच खरा दागिना आहे, या संकल्पनेतून उभा राहिलेला हा उपक्रम केवळ शिबिर नाही, तर स्त्रीआरोग्याबाबत जागृतीची नवी पहाट आहे. या सुवर्णसंधीचा लाभ घेण्यासाठी परिसरातील महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक श्याम परसोडकर, ज्योती सुर्वे व संबंधित संस्थांनी केले आहे.

### वर्धेचा दुहेरी डंका

# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सन्मान, विकासाला वेगवान पंख

**वर्धा/जनमाध्यम**

प्रगतीच्या रिंगणात झंकारणारा वर्धा जिल्हा आता राज्याच्या केंद्रस्थानी येऊन ठेपला आहे. उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर जिल्ह्याने दोन मानाचे पुरस्कार पटकावत दमदार उपस्थिती लावली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते जिल्हाधिकारी वान्मथी सी यांचा सन्मान करण्यात आला, आणि सभागृहात टाळ्यांचा कडकडाट घुमला. सन २०२४-२५ या कालावधीत जिल्हा विकास निर्देशांक गट ३ मध्ये लक्षणीय प्रगती करत वर्ध्याने स्वतःची ओळख ठळक केली. केवळ आकड्यांची किमया नाही, तर नियोजन, अंमलबजावणी आणि प्रशासनाच्या चिकाटीचा हा परिपाक असल्याचे मानले जात आहे.याचबरोबर सन २०२६ मध्ये सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्रात महिलांच्या नेतृत्वाखालील उद्योगांचे सर्वाधिक प्रमाण असलेला जिल्हा म्हणूनही वर्ध्याने बाजी मारली. महिलाशक्तीच्या बळावर उभ्या राहिलेल्या या उद्योगक्रांतीने वर्ध्याला वेगळीच ओळख मिळवून दिली आहे.जिल्हाधिकारी वान्मथी सी यांच्या नेतृत्वाखालील प्रशासनाने विकासाचा नवा आराखडा राबवत जिल्ह्याला उंच शिखरावर नेले. या दुहेरी यशामुळे वर्ध्याच्या प्रगतीची गाथा अधिकच दणदणीत झाली असून, आता थांबायचे नाही, पुढेच जायचे असा निर्धार जिल्ह्यात उमटताना दिसत आहे.



# 'जय श्रीराम'च्या घोषात वर्धा दुमदुमणार

## जन्मोत्सव व शोभायात्रेची जय्यत तयारी



**वर्धा/जनमाध्यम**

भक्ती, श्रद्धा आणि सांस्कृतिक परंपरेचा संगम अनुभवायला देणारा श्री राम जन्मोत्सव यंदा वर्ध्यात मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. मीरा नगर, सिंदी (मेघे) येथील श्री राम मंदिर संस्थान तर्फे १९ ते २७ मार्च २०२६ या कालावधीत विविध धार्मिक कार्यक्रमांची मालिका आयोजित करण्यात आली आहे.

उत्सवाच्या नऊ दिवसांत दररोज सकाळी ७ वाजता प्रभू श्रीराम यांच्या मूर्तीचा अभिषेक होणार असून, सकाळी ८ वाजता सामुदायिक हनुमान चालीसा पठण, विष्णूयाग, रामरक्षा पठण आणि दुपारी भजन अशा भक्तिमय कार्यक्रमांची रेलचेल अनुभवायला मिळणार आहे.यंदाचे खास आकर्षण ठरणार आहे, संगीतमय रामायण रामलीला' काशी येथील महंत पं. प्रवीण दुबेजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली १९ ते २५ मार्च दरम्यान सजीव नाट्यरूपात रामकथेचे दर्शन घडवले जाणार आहे.

जन्मोत्सव सोहळा २६ मार्च रोजी दुपारी १२ वाजता प्रभू श्रीरामाचा जन्मोत्सव पार पडणार पालखी पूजन दुपारी ४ वाजता ना. डॉ. पंकज भोयर यांच्या हस्ते भव्य शोभायात्रा दुपारी ४:३० वाजता मंदिरातून प्रारंभ होत शहरातील विविध मार्गांनी भव्य मिरवणूक ही शोभायात्रा मिशन नगर, वृंदावन नगर, मारोती समाधी, सार्वजनिक वाचनालय, देहनकर ले-आऊट, दुर्गामाता मंदिर व शिवमंदिर मार्गे पुन्हा मंदिरात परतेल. संपूर्ण मार्गावर भक्तांच्या जयघोषात वातावरण भक्तिरंगात न्हाऊन निघणार आहे.उत्सवाची सांगता २७ मार्च रोजी ह.भ.प. रामबुवा काळे यांच्या काल्याच्या कीर्तनाने होणार असून, सायंकाळी ६ वाजता महाआरती व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.श्रद्धेचा उत्सव, संस्कृतीचा जल्लोष आणि भक्तीचा महासागर असलेल्या या सोहळ्यात सहभागी होऊन दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री राम मंदिर संस्थान व शोभायात्रा समितीने केले आहे.

## संक्षिप्त



### ईद सण एकात्मतेचा, बंधुभावाचा संदेश देणारा'- खा.अमर काळे

**वर्धा-** रमजान ईद हा राष्ट्रीय एकात्मता व बंधुभाव वाढविणारा सण असल्याचे मत खा.अमर काळे यांनी व्यक्त केले. समाजसेवक इमरान राही यांच्या निवासस्थानी आयोजित सदिच्छा भेटीत ते बोलत होते. भारत विविधतेने नटलेला देश असून सर्वांनी एकत्र सण साजरे केल्यास प्रेम व सौहार्द वाढते, असे त्यांनी सांगितले. यावेळी नगराध्यक्ष सुधीर पांगुळ, अहसान राही, उस्मान राही, हुमेरा राही उपस्थित होते. ईदसारख्या सणांमुळे समाजात ऐक्य दृढ होते, असे मत व्यक्त करत नागरिकांना शुभेच्छा दिल्या.

### विविध कृषी पुरस्कारांकरीता ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ

**वर्धा-** कृषि विभागाच्यावतीने दरवर्षी शेती व पूरक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकरी महिला, व्यक्ती तसेच संस्थांचा विविध पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येतो. सन २०२५ पासुन या पुरस्कारासाठी ऑनलाईन प्रणाली राबविण्यात येत आहे. ऑनलाईन प्रणालीमध्ये येणाऱ्या अडचणी लक्षात घेता ३१ मार्च पर्यंत अर्ज सादर करण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे. पुरस्कारामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न, वसंतराव नाईक कृषिभूषण, जिजामाता कृषिभूषण, वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार, उद्यानपंडित पुरस्कार, कृषिभूषण (सेंद्रिय शेती) पुरस्कार, युवा शेतकरी पुरस्कार तसेच पद्मश्री डॉ.विठ्ठल विखे पाटील कृषी सेवारत्न पुरस्कार इत्यादी पुरस्कारांचा समावेश असून यासाठी दि.३१ मार्च पर्यंत तर डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषि सेवारत्न पुरस्कारासाठी १५ एप्रिल पर्यंत अर्ज सादर करता येणार आहे. पुरस्कारासाठी अर्ज सादर करण्याकरीता कृषी विभागाच्या संकेतस्थळावर (https://krishi.maharashtra.gov.in) कृषी पुरस्कार टॅब मध्ये उपलब्ध आहे. सदर संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून पुरस्कार प्रस्ताव सादरीकरण, तपासणी, मूल्यांकन तसेच अहवाल निर्मिती ही संपूर्ण प्रक्रिया डिजिटल स्वरूपात राबविणे शक्य होणार आहे. यामुळे मानवी हस्तक्षेप कमी होऊन पारदर्शकता वाढणार असून पुरस्कार प्रक्रियेची कार्यक्षमता, विश्वासार्हता व परिणामकारकता अधिक बळकट होणार आहे. या ऑनलाईन प्रणालीमुळे घरबसल्या अर्ज सादर करता येणार आहे. ऑफलाईन चार प्रतींमधील प्रस्ताव तयार करण्यासाठी लागणारा वेळ व खर्च वाचून प्रस्ताव सादरीकरण जलदगतीने होणार आहे. एकदाच अपलोड केलेली कागदपत्रे पुन्हा-पुन्हा देण्याची आवश्यकता पडणार नाही.

# '२५१ अखंड ज्योतींनी उजळला श्रद्धेचा गुढीपाडवा'

**वर्धा/जनमाध्यम**

गुढीपाडव्याच्या मंगलमय पर्वावर शहरातील शास्त्री चौक येथील हनुमान दुर्गा माता मंदिर भक्ती, श्रद्धा आणि दिव्य प्रकाशाने उजळून निघाले. चैत्रीय अखंड मनोकामना ज्योती महोत्सव सालाबादाप्रमाणे यंदाही मोठ्या उत्साहात पार पडला.

यावर्षी तब्बल २५१ भक्तांनी या पवित्र महोत्सवात सहभाग घेत, आपल्या मनोकामना पूर्ण व्हाव्यात या श्रद्धेने २५१ अखंड ज्योती प्रज्वलित केल्या. मंदिर परिसरात दिव्यांचा लखलखाट, मंत्रोच्चारांचा गजर आणि भक्तांच्या जयजयकाराने वातावरण पूर्णतः भक्तिमय झाले होते.महोत्सवाच्या निमित्ताने धार्मिक विधी, पूजा-अर्चा आणि सामूहिक प्रार्थना करण्यात आल्या. या वेळी विश्व हिंदू महासंघाचे महंत मुकेश नाथ, अनिल नरेडी, रामेश्वर पलेरिया, रमेश कछवा आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली. मान्यवरांनी उपस्थितांना आशीर्वाद देत श्रद्धा व संस्कृती जपण्याचे आवाहन केले.दरवर्षीप्रमाणे यंदाही हा ज्योती महोत्सव भक्तांसाठी आध्यात्मिक ऊर्जा देणारा आणि मनोकामना पूर्ण होण्याचा विश्वास दृढ करणारा ठरला. मंदिर परिसरात दिवसभर भक्तांची गर्दी उसळलेली दिसून आली.



### २५ मार्चची अंतिम मुदत

# 'ई-केवायसी' न केल्यास दिव्यांगांचा लाभ बंद



**सेलू/जनमाध्यम**

शासकीय योजनांचा लाभ अखंडितपणे सुरू ठेवण्यासाठी वर्धा जिल्ह्यातील दिव्यांग लाभार्थ्यांनी २५ मार्चपूर्वी 'ई-केवायसी' प्रक्रिया पूर्ण करावी, असे स्पष्ट आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयाने केले आहे. मुदतीत ही प्रक्रिया पूर्ण न केल्यास योजनांचे लाभ थांबण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

दिव्यांग लाभार्थ्यांसाठी UDID कार्ड आणि आधार कार्ड लिंक करणे अनिवार्य करण्यात आले आहे. तसेच DBT (Direct Benefit Transfer) पोर्टलवर माहिती अद्ययावत करणे आवश्यक आहे. शासनाच्या विविध योजनांमधील निधी थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा होत असल्याने पारदर्शकता राखण्यासाठी 'ई-केवायसी' प्रक्रिया अत्यावश्यक ठरते.

जिल्हाधिकारी कार्यालयाने स्पष्ट केले आहे की, २५ मार्च २०२६ ही अंतिम मुदत असून, सर्व लाभार्थ्यांनी UDID पोर्टलवर जाऊन तत्काळ 'ई-केवायसी' पूर्ण करावी. अन्यथा तांत्रिक कारणांमुळे लाभ मिळण्यात अडथळे निर्माण होऊ शकतात किंवा लाभ कायमचा बंद होण्याची शक्यता नाकारता येत नाही.दिव्यांग लाभार्थ्यांनी कोणत्याही अडचणी टाळण्यासाठी तात्काळ माहिती अपडेट करून 'ई-केवायसी' पूर्ण करावी,' असे आवाहन जिल्हाधिकारी, वर्धा यांनी केले आहे.

# जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी यांचा दौरा

**वर्धा/जनमाध्यम**

जैन अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष व महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोगाचे सदस्य ललित गांधी २७ मार्च रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम खालील प्रमाणे आहे.दि.२७ मार्च रोजी सकाळी ७ वाजता वर्धा येथे आगमन. सकाळी ८.३० ते ९.३० या कालावधीत वर्धा शहरातील विविध जैन मंदिरांना भेटी देतील. सकाळी ९.३० वाजता सेवाग्राम आश्रम बापू कुटी येथे भेट देतील. सकाळी १०.३० वाजता शासकीय विश्रामगृह येथे जैन समाज प्रतिनिधी व पदाधिकारी यांची बैठक घेतील. सकाळी ११.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे आयोजित आढावा बैठकीस उपस्थिती. दुपारी १.३० वाजता वर्धा येथून पुलगावकडे प्रस्थान करतील. दुपारी २.३० वाजता पुलगाव येथील जैन मंदिरास भेट व विश्वस्तांसोबत बैठक घेतील. दुपारी ३ वाजता खेर्डाकडे प्रयाण करतील.

# पहिल्या स्वातंत्र्य लढ्याच्या नायिका राणी लक्ष्मीबाई यांच्यावर आधारित सांस्कृतिक आणि बौद्धिक कार्यक्रम

**वर्धा/जनमाध्यम**

महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयाच्या व्यवस्थापन व वाणिज्य विभागातील विद्यार्थ्यांनी प्रथम स्वातंत्र्य संग्रामातील वीरांगना राणी लक्ष्मीबाई यांच्या जीवनावर आधारित सांस्कृतिक व बौद्धिक कार्यक्रमाचे आयोजन केले. या कार्यक्रमाचे संयोजन विद्यार्थी वैभव दीक्षित व जान्हवी मिश्रा यांनी केले, तर संचालन वैभव दीक्षित व अंकित शर्मा यांनी केले.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व सरस्वती वंदनेने झाली. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक सादरीकरणे केली, ज्यामध्ये भरतनाट्यम नृत्य तसेच राणी लक्ष्मीबाई यांच्या जीवनावर आधारित समूह नृत्याचा समावेश होता. विद्यार्थ्यांनी सुभद्रा कुमारी चौहान यांच्या कवितेचे नाट्यरूपांतर सादर केले तसेच कविता वाचनही केले.कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून प्रख्यात लेखक, विचारवंत, संस्कृती भारतीय न्याय काशीचे अध्यक्ष आणि 'मणिकर्णिका' या पुस्तकाचे लेखक डॉ. उपेंद्र विनायक सहस्त्रबुद्धे यांनी मार्गदर्शन करताना राणी लक्ष्मीबाई यांच्या व्यवस्थापन कौशल्य, नेतृत्वगुण आणि निर्णयक्षमता यावर प्रकाश टाकला.या प्रसंगी परीक्षा नियंत्रक डॉ. सुरेंद्र पी. गादेवार तसेच व्यवस्थापन विद्यापीठाचे अधिष्ठाता प्रो. गोपाल कृष्ण ठाकूर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. हिंदी साहित्य विभागाचे अध्यक्ष प्रो. अवधेश कुमार यांनी राणी लक्ष्मीबाई यांच्या संघर्षमय जीवनावर आपले विचार मांडले.कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या राणी लक्ष्मीबाई यांच्या जीवनावरील प्रभावी नाट्यप्रयोगाने उपस्थितांची मने जिंकली. व्यवस्थापन विभागाचे अध्यक्ष डॉ. रविंद्र बोरकर यांनी आभार प्रदर्शन केले.

या कार्यक्रमास विद्यापीठातील प्राध्यापक, शोधार्थी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक ११४
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com, abhiramdeshpande@gmail.com

# विदर्भातील पहिले ZEISS VISION EXPERT स्टोअर सरोदे ऑप्टीकल्समध्ये सुरू

## डोळ्यांची निगा राखणारे कुटूंब - सरोदे ऑप्टीकल्स

**अमरावती/प्रतिनिधीः-** गेल्या आठ दशकांपासून अमरावतीकरांच्या डोळ्यांची निगा घेणारे सरोदे ऑप्टीकल्स सदैव विश्वसार्हता व गुणवत्तेसाठी प्रसिध्द आहेत. वामनराव सरोदे यांनी अमरावती शहरात चष्म्यांचे छोटेसे दुकान सुरु केले होते. त्यानंतर त्यांचे हे छोटेसे रोपटे वाढत वाढत आज वटवृक्षामध्ये रुपांतरीत झाले आहे. आज सरोदे कुटूंबाची तिसरी पिढी या व्यवसायात आली आहे व अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज अशा इक्युपमेंट सोबत आज सरोदे ऑप्टीकल विदर्भासह संपूर्ण महाराष्ट्रात सुप्रसिध्द झाले आहे.

सदैव ग्राहकालाच आपला देव मानून या ग्राहकांची सेवा हिच पुजा मानून ग्राहकांच्या संतुष्टीचाच सदैव विचार सरोदे ऑप्टीकलच्या संचालकांनी केला आणि म्हणूनच ग्राहकांच्या सोईसाठी आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातुन कॉन्टॅक्ट लेंसेस, नंबरचे चष्मे, गॉगल्स व इतर सोयी अमरावतीकरांसाठी उपलब्ध करुन दिल्या.

आधुनिक डिजीटल उपकरणांचा आपल्या दैनंदीन जीवनातील वापरामुळे आज प्रत्येकालाच आपल्या डोळ्यांची काळजी घेण्याची गरज आहे, त्यातच ऑनलाईन शिक्षणाच्या निमित्ताने व मनोरंजनासाठीच्या मोबाईल, टॅबलेट, लॅपटॉप इ. च्या अतिवापरामुळे डोळ्यांवर होणार विपरीत परिणाम व त्यापासूनच होणारे इतर त्रास वाढले, जसे की, निद्रानाश, डोकेदुखी, डोळे चुरचुरणे, डोळ्यांचा थकवा असे अनेक समस्या उद्भवल्या. तंत्रज्ञानाच्या या वाइट परिणामांसोबतच आपल्याला जगणे आहे. त्यामुळे योग्य संरक्षण घेवून आधुनिकतेकडे वाटचाल करतांना या यंत्रासोबत जुळवुन घेणे आवश्यक आहे. त्यासाठीच सरोदे ऑप्टीकल नव्या युगातील आधुनिक तंत्रज्ञानासोबत डोळ्यांची निगा घेण्यासाठी सज्ज झाले आहे.




ब्ल्यु व अल्ट्राव्हायलेट प्रकाश हा डोळ्यांसाठी घातक असू शकतो. त्यामुळे या ब्ल्यु रेंज व अल्ट्राव्हायलेट रेंज पासून संरक्षणाकरीता ब्ल्यु ब्लॉक लेंस सरोदे ऑप्टीकलमध्ये उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. आधुनिकते बरोबरच फॅशनचीही येथे योग्य सांगड घातलेली आपल्याला दिसते. आधुनिक तंत्रज्ञानाने बनलेले लेंस व त्याबरोबरच फॅशनेबल अशी फ्रेम असा संगम या ठिकाणी पहायला मिळते. त्यामुळे तरुणांपासून तर वयस्कांपर्यंत सर्वांनाच चष्मे व गॉगल्स साठी सरोदे ऑप्टीकल्स हेच नाव समोर येते.

डोळ्यांची निगा राखण्यासोबतच चष्मे हे योग्य व आधुनिक बनला जावा याकडे सरोदे ऑप्टीकल्सचा कल असतो. त्यासाठीच सरोदे ऑप्टीकल्स ves Zeiss या सुप्रसिध्द लेंस बनविण्याऱ्या कंपनीचे अत्याधुनिक तंत्रज्ञानाने निर्मित Zeiss Vision Expert हे स्टोअर अमरावती करांच्या सेवेत उपलब्ध करुन दिले आहे. यामुळे अमरावती करांना आता अधिक सुस्पष्ट व आचूक नंबरचे चश्मे आधुनिक तंत्रज्ञाने मिळतील. विदर्भातील एकमेव मशीन उपलब्ध करुन दिलेली आहे. वामनराव सरोदे यांचे नंतर सरोदे ऑप्टीकल्सची धुरा सुनील सरोदे, अभय सरोदे व सचिन सरोदे आणि यश सरोदे यांनी सांभाळली व जवाहर रोड, राजकमल चौक आणि शेगाव नाका येथे ग्राहकांना सेवा देत आहेत. ग्राहकांना अधिक चांगल्या सेवा देण्याचा मानस संचालकांनी बोलून दाखविला.

# 'गौमाता रक्ततुला' कार्यक्रमाची रूपरेषा ठरवण्यासाठी आज बैठक

**अमरावती/प्रतिनिधीः-** गोमातेच्या पवित्र सेवेसाठी आणि संरक्षणाच्या उदात्त उद्देशाने 'गौमाता रक्ततुला' या भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार असून, कार्यक्रमाची रूपरेषा ठरवण्यासाठी एक महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली आहे. ही बैठक रविवार, २२ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ५:०० वाजता अमरावती येथील महेश्वरी भवन, धनराज लाईन, सक्करसाथ येथे पार पडणार आहे. या बैठकीस सनातन धर्माचे पालन करणाऱ्या सर्व आदरणीय बंधू-भगिनींना उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. गोसेवा आणि गोरक्षण या पवित्र कार्यासाठी समाजातील विविध घटकांनी एकत्र येऊन ठोस नियोजन करावे, या उद्देशाने ही बैठक अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. आयोजकांच्या वतीने नातेवाईक, गोप्रेमी, समाजसेवक आणि सर्व धर्माभिमानी नागरिकांना नम्र विनंती करण्यात आली आहे की, त्यांनी आपल्या उपस्थितीने या बैठकीची शोभा वाढवावी. तसेच, 'गौमाता रक्ततुला' हा कार्यक्रम अधिक प्रभावी, अर्थपूर्ण आणि भव्य करण्यासाठी आपले मार्गदर्शन व सहकार्य द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. आयोजकांच्या मते, गोमातेच्या संरक्षणासाठी समाजातील प्रत्येक घटकाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. या पुण्यकार्याच्या यशासाठी सर्वांनी एकजुटीने पुढे येणे गरजेचे असून, उपस्थिती हीच सर्वात मोठी प्रेरणा आणि ताकद ठरणार आहे. या बैठकीचे आयोजन गाय संरक्षण संस्था, माहेश्वरी पंचायत, रामचरित मानस परिषद, अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ आणि सकल हिंदू समाज, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. या सर्व संस्थांनी नागरिकांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

# बेरोजगारीतून व्यवसायाकडे झेप

## -सात तरुणांनी घडवली नवी ओळख

**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर तालुक्यातील शिवर येथील चेतन वाघमारे या युवकाने बेरोजगारीला न जुमानता स्वतःच्या जिद्दीच्या जोरावर यशस्वी व्यवसाय उभा करत इतरांसाठीही प्रेरणादायी उदाहरण निर्माण केले आहे. सहा वर्षांपूर्वी त्याने दर्यापूर शहरात युवा बेरोजगार या नावाने चहा व कॉफी स्टॉल सुरू केले होते . या वेगळ्या नावामुळे सुरुवातीला शहरवासीयांमध्ये कुतूहल निर्माण झाले होते.

युवा बेरोजगार या नावावरून अनेकांनी विनोद केले. चर्चा रंगल्या मात्र चेतन वाघमारे यांनी या सर्वांकडे दुर्लक्ष करत ग्राहकांना दर्जेदार चहा कॉफी देण्यावर भर दिला. हळूहळू ग्राहकांचा प्रतिसाद वाढत गेला आणि या व्यवसायातून त्याला स्थिर आर्थिक उत्पन्न मिळू लागले.

स्वतःच्या पायावर उभे राहताना त्यांने इतर बेरोजगार युवकांनाही सोबत घेतले. आज त्याच्या मार्गदर्शनाखाली तब्बल सात तरुणांची टीम तयार झाली असून, चहा कॉफीबरोबरच नाश्ता व सिट कव्हर अशा विविध व्यवसायांमध्ये त्यांनी विस्तार केला आहे. या उपक्रमातून चांगली उलाढाल निर्माण होत असून, अनेक युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे.




लाथ मारेल तिथे पाणी काढणारे अशी ओळख निर्माण करणाऱ्या वाघमारे कुटुंबियांच्या या यशोगाथेची सध्या शहरात जोरदार चर्चा सुरू आहे. बेरोजगारीवर मात करून स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या या तरुणांचा प्रवास इतरांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.चेतन वाघमारे राहुल वाघमारे,ओम वाघमारे, रोहित इंगळे,मीठा कराळे, श्याम सावरकर, आनंद शेलोकार,रामेश्वर मेसरे, सारंग कुरील या युवकांनी बेरोजगारी वर मात करत जागेच्या अभावी त्यांच्या संकल्पनेतील व्यवसाय सुरुवात होण्याला थोडा विलंब होत आहे.

वास्तविकता अशी की पहाटे सहा ते सायंकाळी सहा पर्यंत व्यवसाय सुरू असून स्वतःच्या आहाराकडे दुर्लक्ष होत आहे. भल्या पहाटेपासूनच ग्राहकांच्या लांबच लांब रांगा चहा कॉफी नाश्त्याच्या गाडीवर दिसत आहेत. संपूर्ण एका कट्टयाचे पोहे दिवसभर त्यांना लागतात तर १०० लिटरच्या वर दुधाची त्यांना आवक पाहिजे. चहा कॉफीला स्वतःच्या वागवणीतील म्हशीचे दूध ते वापरत असून पूर्णपणे नैसर्गिक रित्या चहा कॉफी नाश्ता ते ग्राहकांना देण्यावर भर देत आहेत. एकंदरीत पाहता ह्या युवकांचा आदर्श इतरही बेरोजगार युवकांनी घेतल्यास नक्कीच बेरोजगारीवर मात मिळवणे शक्य होईल.

# राज्यस्तरीय ज्युनियर बास्केटबॉल स्पर्धेसाठी अमरावतीत निवड चाचणी

**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र राज्य बास्केटबॉल असोसिएशन यांच्या वतीने दिनांक ३१ मार्च ते ४ एप्रिल २०२६ दरम्यान नाशिक येथे राज्यस्तरीय ज्युनियर मुले व मुली अजिंक्यपद बास्केटबॉल स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेसाठी अमरावती जिल्हा संघ निवडण्यासाठी निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे.



अमरावती जिल्हा बास्केटबॉल संघटनेतर्फे ही निवड चाचणी दिनांक २४ व २५ मार्च २०२६ रोजी श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ येथील बास्केटबॉल कोर्टवर पार पडणार आहे. मंडळाच्या सचिव तसेच जिल्हा बास्केटबॉल संघटनेच्या अध्यक्षा डॉ. माधुरी चेंडके यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवड प्रक्रिया होणार आहे.

या निवड चाचणीत जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभागी व्हावे, असे आवाहन संघटनेतर्फे करण्यात आले आहे. इच्छुक खेळाडूंनी दिनांक २४ मार्च रोजी सायंकाळी ४.३० वाजता हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या बास्केटबॉल मैदानावर उपस्थित राहावे, असे आवाहन संघटनेचे सचिव डॉ. मधुकर बुरनासे ९४२३६४९४१० व उपाध्यक्ष नितीन पोटे यांनी केले आहे.

# दुय्यम निबंधक कार्यालये सुट्टीच्या दिवशी सुरू राहणार

**अमरावती/प्रतिनिधीः-** आर्थिक वर्षाच्या शेवटी मालमत्ता खरेदी दस्त नोंदणीचे प्रमाण वाढण्याची शक्यता असल्याने सुट्टीच्या दिवशी दुय्यम निबंधक कार्यालये सुरू ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार दि. २६ मार्चपासून सलग ही कार्यालये सुरू राहतील.

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांत नियंत्रक यांच्या निर्देशानुसार, इष्टांक पूर्तीच्या दृष्टीने दि. २६ मार्च, दि. २८ मार्च, दि. २९ मार्च आणि दि. ३१ मार्च या चार सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी दुय्यम निबंधक कार्यालये चालू राहतील. तसेच ज्या कार्यालयांची साप्ताहिक सुट्टी ही शनिवार आणि रविवार सोडून अन्य दिवशी आहे. ती कार्यालये त्यांच्या दोन साप्ताहिक सुट्ट्यांपैकी एक दिवस चालू ठेवावीत. उपरोक्त दिवसांसाठी दुय्यम निबंधक कार्यालयांवर नियंत्रण व देखरेख ठेवण्यासाठी तसेच अभिनिर्णय व कमी पडलेले मुद्रांक शुल्क इत्यादी कामकाज विहीत वेळेत पूर्ण होण्यासाठी सहजिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालये देखील कार्यरत राहणार आहे. सुट्टीच्या दिवशी सर्व दुय्यम निबंधक कार्यालय आणि सह जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय चालू राहणार आहे.

**पाहिजे**

अमरावती, अचलपूर व वरूड येथे नामांकित लॉ फर्म मध्ये युवक व युवतींना पार्ट टाईम काम करण्याची संधी.
शिक्षण- १२ वी पास
पगार- १०,००० + टिए डिए + कमीशन (ट्रेनिंग झाल्यावर पगार वाढ व ईतर इन्क्रिमेंट्स)
**संपर्क - ९६०७५८२०९४**

# कौशल्य विकास केंद्राचा मंगळवारी टीसीएस प्लेसमेंट ड्राईव्ह

**अमरावती/प्रतिनिधीः-** सुशिक्षित बेरोजगारांसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रामार्फत पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मोहिमेंतर्गत रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या स्वामी विवेकानंद विद्यार्थी भवनात मंगळवार, दि. २४ मार्च रोजी सकाळी १० वाजता हा मेळावा होणार आहे.

या मेळाव्यामध्ये टाटा कंसल्टंसी सर्व्हीसेस या नामांकित आयटी कंपनीमार्फत बीपीएस पदासाठी भरती प्रक्रीया राबविण्यात येणार आहे.

सदर भरती प्रक्रियेसाठी वयोमर्यादा १८ ते २८ वर्षे असून शैक्षणिक पात्रता बीए, बीकॉम, बीबीए, बीसीसीए, बीव्हीओसी, बीएससी जनरल आहे. यात २०२३ आणि २०२४ यावर्षात उत्तीर्ण, तसेच एमए, एमकॉम २०२४ आणि २०२५ उत्तीर्ण पात्रता निकष राहणार आहे.

निवड प्रक्रिया ही कागदपत्र पडताळणी, योग्यता परीक्षा, प्रत्यक्ष मुलाखतीतून होणार आहे. नोंदणीसाठी surl.li/lxxjb लिंक वरूनही नोंदणी करता येणार आहे. अधिक महितीसाठी विभागीय रोजगार मेळावा कक्ष प्रमुख अजय चव्हाण (८९८३४१९७९९) तसेच विभागीय कौशल्य विकास सहायक अक्षय डोईजड (७९७२७५५७८७) यांच्याशी संपर्क साधावा.

रोजगार मेळाव्यात उमेदवारांनी सहभागी होऊन टाटा कंसल्टंसी सर्व्हीसेस या कंपनीमध्ये नोकरी मिळविण्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजीव बोरकर, विभागीय उप आयुक्त द. ल. ठाकरे, कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर यांनी केले आहे.

# जिल्हा प्राणी क्लेश प्रतिबंधक समितीवर अशासकीय सदस्यत्वासाठी अर्ज करा

## पशूसंवर्धन विभागाचे आवाहन

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हा प्राणी क्लेश प्रतिबंधक समिती अंतर्गत अशासकीय सदस्यांचा तीन वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झाला आहे. त्यामुळे रिक्त पदांवर नवीन सदस्यांची निवड करण्यासाठी इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे. यासाठी दि. २ एप्रिलपूर्वी अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

समितीच्या तरतुदीनुसार आणि नियम २००१ मधील निकषांनुसार, प्राणी क्लेश व्यवस्थापकीय समितीवरील सदस्य, गौशाळा किंवा पांजरापोळ संस्थेचे अध्यक्ष, प्राणी विषयावर कार्य करणाऱ्या सेवाभावी संस्थेचे सदस्य, सर्वसाधारण समितीने नामनिर्देशित केलेल्या व्यक्ती, मानवहित किंवा प्राणीमात्रांवर प्रेम करणाऱ्या क्षेत्रात कार्यरत व्यक्ती अशासकीय सदस्यत्वासाठी अर्ज करू शकतील. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज २ एप्रिलपर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करणे आवश्यक आहे. सदर अर्ज जिल्हा उपायुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय तथा सदस्य सचिव, जिल्हा प्राणी क्लेश प्रतिबंधक समिती, अमरावती या ठिकाणी स्विकारण्यात येतील. जिल्ह्यातील प्राणी कल्याण क्षेत्रात कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांनी अर्ज करावेत, असे आवाहन पशूसंवर्धन व दुग्धव्यवसाय जिल्हा उपायुक्त डॉ. एस. एम. कावरे यांनी केले आहे.

# पाडव्याला बाजारपेठेमध्ये कोट्यावधीची उलाढाल

## -कपडे, दागिने, इलेक्ट्रॉनिक साहित्यांची जोरदार विक्री

**अमरावती/प्रतिनिधीः-** साडेतीन मुहूर्तापैकी एक असलेल्या गुढीपाडव्याच्या सणानिमित्त नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण दिसून आले. पाडव्यानिमित्त ग्राहकांनी खरेदीची 'गुढी' उभारल्याने बाजारपेठेमध्ये कोट्यवधींची उलाढाल झाली. सोने, वाहन, इलेक्ट्रॉनिक्स वस्तू, सदनिका आदी घेण्याकडे नागरिकांचा विशेष कल दिसून आला. बाजारामध्ये प्रचंड उत्साहाचे वातावरण गुरुवारी दिसले आहे. खरेदीसाठी जागोजागी ग्राहकांची गर्दी पाहायला मिळाली आहे. गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर नागरिक मोठ्या प्रमाणावर खरेदी करतात. त्यामुळे बाजारपेठेत चांगलीच वर्दळ असते. मुहूर्तावर वाहन खरेदीला ग्राहकांची पसंती असते. शहरातील वाहनांच्या दालनांमध्ये गत चार ते पाच दिवसांपासून ग्राहकांची गर्दी वाढली. वाहने बघून त्याची नोंदणी करून ठेवली. आज गुढीपाडव्यानिमित्त वाहने घरी नेण्यात आली.

**१३०० दुचाकी ,४०० कारांची डिलिव्हरी-** गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर जिल्ह्यात वाहनांची जोरदार विक्री झाली आहे. पेट्रोलची, इलेक्ट्रिक दुचाकींची सह १३०० टू व्हीलर ची विक्री झाली आहे तर ४०० कार डिलिव्हर करण्यात आल्या आहे. इलेक्ट्रिक दुचाकींना अधिक मागणी होती. चारचाकी वाहने





घेण्यासाठीही नागरिक उत्सुक दिसून आले.

**कमी वजनाच्या दागिन्यांची खरेदी-** गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर सुवर्ण पेढ्या ग्राहकांनी गजबजल्या होत्या. दागिने, शुद्ध सोन्याचे क्वॉइन, अंगठी, मनी डोरले आदींची ग्राहकांनी खरेदी केली. कमी वजनांच्या दागिन्यांच्या खरेदीकडे ग्राहकांचा कल दिसला आहे. सुवर्ण दालनांमध्ये दाखल होत ग्राहकांनी सुवर्ण खरेदीचा योग साधला. सोन्याचे दर स्थिर असल्याने ग्राहकांनी सोने खरेदी केले. आगामी काळातील लग्नसराई लक्षात घेता अनेक ग्राहकांनी मुहूर्तावर दागिन्यांची नोंदणी केली.

**सदनिका नोंदणी व गृहप्रवेशाचा योग-** गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर सदनिका नोंदणीचे प्रमाण चांगलेच वाढले. शहरात गृहप्रकल्पांची मोठ्या प्रमाणात उभारणी होत आहे. स्वतंत्र घरे व सदनिकांची मोठ्या प्रमाणात उभारणी होत आहे. अनेक जण प्लॉट खरेदी करुन घरे बांधत आहेत. गुढीपाडव्याचा मुहूर्त साधण्यासाठी अनेक सदनिकाधारकांनी अगोदरच नोंदणी केली होती. त्यामुळे आज मुहूर्तावर त्यांनी गृहप्रवेश केला.

**इलेक्ट्रॉनिक्स वस्तू घेण्यासाठी गर्दी -** गुढीपाडव्यानिमित्त इलेक्ट्रॉनिक्स वस्तू घेण्यासाठी देखील नागरिकांची दुकानांमध्ये गर्दी दिसून आली. मोबाईल, टीव्ही, फ्रिज, वॉशिंग मशीन, एसी आदींसह विविध इलेक्ट्रॉनिक्स वस्तू नागरिकांनी खरेदी केल्या. अनेक नागरिकांनी इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंची ऑनलाइन खरेदी केली.

---

प्रो.नं. ८६०/२०२६
दिवाणी न्यायालय व. स्तर, दर्यापूर
दि. १६/०३/२०२६

## जाहीर नोटीस

### वि. दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि. अमरावती यांचे न्यायालय

किरकोळ अर्ज क. १३८/२०२६ ने.ता. १५/०४/२०२६

अर्जदारः- **१प्रदीप केशवराव लाखे,** वय -६७ वर्ष, व्यवसाय - व्यापार रा. फ्लॅट नं. ए-१०१, विजय सहनिवास, गेट वेल हॉस्पिटल मागे, धंतोली, नागपूर

**२. अनीता अनिल सिन्नरकर,** वय ६९ वर्ष, व्यवसाय - घरकाम रा. प्लॉट नं. ३१, नवीन स्वस्तिक नगर जवळ, विष्णू नगर, साई नगर, अमरावती

**३.वृषाली सतिष व्यवहारे,** वय ७२ वर्ष, व्यवसाय - डॉक्टर रा. प्लॉट नं. ६, सेक्टर-१, रोड नं. ८, नवीन पनवेल, रायगड **४. मीना दिलीप लाखे,** वय ७० वर्ष,व्यवसाय - घरकाम

५ .चेतन दिलीप लाखे, वय ४३ वर्ष, व्यवसाय - नोकरी

अ.क्र. ४ व ५ रा. एम.एस.ई.बी. कॉलनी, प्रकाश नगर, खापरखेडा, नागपूर

**गैरअर्जदारः- निरंक**

या जाहीर नोटीस व्दारे सर्वांना कळविण्यात येते की, **केशवराव कृष्णराव लाखे** हे **दिनांक १६/११/२००३** रोजी व त्यांची **पत्नी प्रमिला केशवराव लाखे** ह्या **दिनांक १७/०१/२०१५** रोजी मरण पावलेले आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट VIII १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत** न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यास येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. १६/०३/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
**सहा. अधिक्षक (प्रशासन)**
**दिवाणी न्यायालय व.स्तर दर्यापूर**

---

## दिवाणी न्यायालय (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडे, वारसाचे प्रमाणपत्राबाबत जाहीरनामा

आर. एम. जे.सी. क्रमांक : ५१/२०२६ ने.ता. -०८/०४/२०२६

**अर्जदार -१) प्रमोद अनिरुद्ध देशमुख (मुलगा)**
वय-६१, व्यवसाय सेवा निवृत्त रा. सोनेगाव, नागपूर, ता. जि. नागपूर

**२) सुधीर अनिरुद्ध देशमुख (मुलगा)** वय ५० व्यवसाय - नोकरी रा. वाना डोंगरी हिंगणा नागपूर, ता. जि. नागपूर

**३) उज्वला विनायक देशमुख (मुलगी)** वय ५७ व्यवसाय - गृहिणी वा साखळी खुर्द बुलढाणा, ता. जि. बुलढाणा

**४) सुचिता रामेश्वर आवारे (मुलगी)** वय- ४९, व्यवसाय गृहिणी वा वडुरा ता. चाँदूर बाजार जि. अमरावती

**.... विरुध्द...**
**गैरअर्जदार :- निरंक**

ज्याअर्थी **अनिरुद्ध गणपतराव देशमुख हे दि. ०५/०८/२०१५** रोजी व अर्जदार यांच्या **आई सरिता अनिरूध्द देशमुख या दि. ०६/०४/२०१७** रोजी त्यांचे मुलाचे घवी नागपूर येथे मरण पावले आहेत. अर्जदार यांचे आई व वडील यांचा कायमचा पत्ता हा श. नौढसावंगी ता. नाँढनाव खंडे, जि. अमरावती असा आहे त्यांना अर्जदार यांच्या व्यतिरीक्त कोणीही वारस नाही. अर्जदार हे उपरोक्त मयताचे कायदेशिर वारस आहेत. उपरोक्त मयताचे कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणे करीता अर्जदारांनी विद्यमान व्यायालयात मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ पारित अंतर्गत दिनांक ०३/०२/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारा विरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी दिनांक ८/०४/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता दिवाणी न्यायालय क. स्तर, नांदगाव खंडे येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्वाष्ठ केलेल्या वकिलांमार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवुन निकाल दिला जाईल.

आज दिनांक ११/०२/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्र्या निशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
**सहाध्यक अधिक्षक मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर**

---

## जाहिरनामा / सायटेशन

### दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती
### वि. श्री. एस.बी. कळदाते २ रे सह दिवाणी न्यायाधीश व कनिष्ठ स्तर अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्रमांक ५१७/२०२६ **अनिल व इतर विषय निरंक** पुढील तारीख २४.०४.२०२६

**अर्जदार - 1. Anil Pundlikrao Kalbande**
Age: 48 yrs, Occ-Private Job
R/o Parvati Nagar No. 1, Sai Nagar Amravati
**2. Kalpana Gajanan Hadke**
Age-55 years Occu- Household
R/o Parvati Nagar No. 1, Sai Nagar Amravati

**विरुध्द**
**गैरअर्जदार**
**निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की **मयत पुंडलिकराव निधनजी काळबांडे** हे **दि. २३.०७.२०२३** रोजी अमरावती, येथे मयत झाले. अर्जदार अनिल व इतर विरुध्द निरंक यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सवहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अनिल व इतर विरूध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदर्हु मयत मांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल .

आज दि. १३.०३.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर अमरावती**

---

## जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की मी, माझे पक्षकार नामे **सुरज शालीकराम गुप्ता** यांचे वतीने सादर जाहीर नोटीस देतो ती येणेप्रमाने,**मिळकतीचे वर्णनः मौजे तारखेडा, प्रगणे- बडनेरा, शेत सर्वे क्रं. ६/१ आणि ६/२, प्लॉट क्रं. 90-B, सबडीवायडेड प्लॉट क्रं. ९०/B/२, ता. आणि जिल्हा. अमरावती.**

सदर मिळकत माझे पक्षकार नामे सुरज शालीकराम गुप्ता यांच्या मालकीची आहे. तदनंतर **सुरज शालीकराम गुप्ता** यांनी **PIRAMAL FINANCE LTD. BR. AMRAVATI.** येथे गृह कर्जासाठी अर्ज केला असता, **सदर मिळकतीचे पूर्वीचे मूळ खरेदी खत दि. ३०/०८/२००५ रोजीचे दस्त क्र. १७४४ सदर मुळ खरेदी खत गहाळ झालेले आहे.** तसेच सदर खरेदीखत कोणाला सापडल्यास किवा कुठे गहान, पतसंस्था/राष्ट्रीयकृत/ सहकारी अथवा खाजगी बँक, संस्था बोजा, या मालमत्तेविषयी शासकीय-निमशासकीय काही भानगड, कोणाचा मालकी किवा वारस हक्क असल्यास, इतर कोणती हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मोबाईल क्रं. वर हि जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या **७ दिवसाच्या** आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. तदनंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही आणि सदर मालमत्ता **PIRAMAL FINANCE LTD. BR. AMRAVATI.** येथे गहाण करण्यात येईल. करिता हि जाहीर सूचना देत आहे.

दि. २१/०३/२०२६

शिक्का

**आपला**
**ॲड.रवींद्र रू. वाटाणे**
स्नेहगंधा कॉलनी,
अमरावती मो. नं. ९८२३६९८७४५

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक १९३**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## संक्षिप्त



### मातोश्री इंदिराबाई कडू यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ चिमणी दिन उत्साहात


**आसेगाव पूर्णा -** येथील छत्रपती शिवाजी कला महाविद्यालयात मातोश्री स्वर्गीय इंदिराबाई बाबारावजी कडू यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ जागतिक चिमणी दिन उत्साहात साजरा करण्यात आला.दरवर्षीप्रमाणे यंदाही विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण व पक्षीसंवर्धनाबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.अमरावती येथील पर्यावरण तज्ञ ॲडव्होकेट राज मेहर निशाने यांनी पीपीटीच्या माध्यमातून चिमणीचे पर्यावरणातील योगदान व निसर्गचक्रातील तिचे महत्त्व विषद केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. रवींद्र इचे होते. त्यांनीही विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व पटवून दिले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. भारत कल्याणकर, डॉ. आशिष काळे, प्रा. अतुल चराटे व मुक्ता निंभोरकर उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रवीण सदार यांनी केले, तर संचालन प्रा. सागर भुसारी तर आभार प्रा. अतुल चराटे यांनी केले. या उपक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.

### विद्यापीठात ‘दशसूत्रै व सेवाभावी संस्थांची भूमिका’ विषयावर कार्यशाळा

**अमरावती-** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील ‘संत गाडगेबाबा अध्यासन केंद्रा’च्या वतीने येत्या २५ मार्च २०२६ रोजी एका विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ‘संत गाडगेबाबांची दशसूत्रै व सेवाभावी संस्थांची भूमिका’ हा या कार्यशाळेचा मुख्य विषय असून, डॉ. श्रीकांत जिचकार मेमोरियल रिसर्च सेंटर येथे ही र्कायशाळा पार पडणार आहे.सकाळी ११ ते १ दरम्यान कार्यशाळेचे उद्घाटन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांच्या हस्ते होणार असून, अध्यक्षस्थान प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे भूषवणार आहेत. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून छत्तीसगड रजककार विकास बोर्डाचे अध्यक्ष राजमंत्री दर्जा प्रल्हाद रजक, भारत सरकारचे सेवानिवृत्त विशेष सचिव अनिल जोशी, महाराष्ट्र शासनाचे माजी अप्पर पोलीस महासंचालक टी. एस. भाल यांच्यासह विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. व्ही.एम. उपाख्य भैय्यासाहेब मेटकर व डॉ. विद्या शर्मा, संतश्री गुलाबराव महाराज सेवा संस्था, बोराळाचे अध्यक्ष रविंद्र इंगोले व पुणे खेड येथील` अशोक दशमाने उपस्थित राहणार आहेत.

### आज पवनपाल महाराज यांचे कीर्तन

**टाकरखेडा संभू -** श्रीराम मंदिर संस्थानच्या वतीने गावात



समाज प्रबोधनपर सप्तखंजेरी कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे कीर्तन २२ मार्च २०२६ रोजी रात्री ८ वाजता श्रीराम मंदिर संस्थान परिसरात पार पडणार आहे.या कीर्तनासाठी प्रबोधनकार म्हणून आकोट येथील प्रसिद्ध कीर्तनकार पवनपाल महाराज वडाळीकर उपस्थित राहणार आहेत. ते सत्यपाल महाराज यांचे शिष्य असून आपल्या प्रभावी कीर्तनशैलीतून समाजप्रबोधनाचा संदेश देणार आहेत.या कार्यक्रमात अध्यात्म, संस्कार, सामाजिक मूल्ये आणि जनजागृती यांवर आधारित विचार मांडले जाणार असून ग्रामस्थांना प्रेरणादायी मार्गदर्शन मिळणार आहे.या भव्य कीर्तनाचा लाभ घेण्यासाठी परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन श्रीराम मंदिर संस्थानतर्फे करण्यात आले आहे.

### विद्यापीठात ‘शहीद दिन’ व्याख्यान

**अमरावती-** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने २४ मार्च २०२६ रोजी शहीद दिनानिमित्त विशेष व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर कार्यक्रम दुपारी २.३० वाजता विद्यापीठ परिसरातील डॉ. श्रीकांत जिचकार स्मृती संशोधन केंद्र येथील सभागृहात होणार आहे.‘शहीदांच्या स्वप्नातील भारत’ या विषयावर व्यंकटेश महाविद्यालय, देऊळगाव राजा येथील मराठी विभागाचे प्रमुख प्रा. मधुकर बाळासाहेब जाधव अभ्यासपूर्ण व्याख्यान देणार आहेत. याप्रसंगी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे अध्यक्षस्थान भूषवणार असून याप्रसंगी विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. विजय नागरे, तसेच अधिसभा सदस्य नितीन टाले आणि कैलास चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.`



**अमरावतीत रमजान ईद मोठ्या उत्साहात आणि शांततेच्या वातावरणात साजरी झाली. ईदगाह मैदान आणि मशिदींमध्ये हजारो मुस्लिम बांधवांनी सामूहिक नमाज अदा करून देशातील बंधुता आणि समृद्धीसाठी प्रार्थना केली.**

## दिव्यांग कर्मचारी, शिक्षकांना जनगणनेच्या कामातून वगळण्याची मागणी

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटना, मुंबई-३२ (जिल्हा शाखा, अमरावती) यांच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन देत जिल्ह्यातील दिव्यांग कर्मचारी व शिक्षकांना जनगणनेच्या कामातून वगळण्याची मागणी करण्यात आली आहे.

संघटनेच्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या २७ सप्टेंबर २०२० च्या निर्देशानुसार दिव्यांग कर्मचाऱ्यांना जनगणनेच्या कामात न नेमण्याबाबत स्पष्ट सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच, दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ नुसार दिव्यांगांना त्यांच्या क्षमतेनुसार अनुकूल कार्यपरिस्थिती देणे ही शासनाची जबाबदारी आहे.तथापि, प्रत्यक्षात काही ठिकाणी दिव्यांग कर्मचारी व शिक्षकांना जनगणनेच्या कामासाठी नियुक्त केले जात असल्याचे संघटनेच्या निदर्शनास आले आहे. जनगणना कार्यात



मोठ्या प्रमाणावर फिरती, घरभेटी व दीर्घकाळ काम करावे लागते, त्यामुळे हे काम दिव्यांग कर्मचाऱ्यांसाठी कष्टदायक ठरत असून त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

यामुळे जिल्ह्यातील सर्व दिव्यांग कर्मचारी व शिक्षकांना जनगणनेच्या कामातून तत्काळ वगळण्याचे आदेश देण्यात यावेत, तसेच सर्व संबंधित विभागांना याबाबत स्पष्ट सूचना देण्यात याव्यात, अशी मागणी संघटनेने केली आहे.सदर निवेदन जिल्हाध्यक्ष राजेंद्र दिक्षित, जिल्हा सचिव किशोर मालोकार व जिल्हा प्रसिद्धी प्रमुख राजू डांगे यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आले.जिल्हा प्रशासनाने या मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार करून लवकरात लवकर योग्य तो निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

## प्राथमिक शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न तात्काळ निकाली काढा

### राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर यांना निवेदन

**अमरावती/का.प्र.**

टीईटी, संचमान्यता, पदवीधर वेतन श्रेणी, शिक्षण सेवक पद रद्द करणे, BLO व अन्य अशैक्षणिक/ऑनलाईन कामे यासह केंद्रप्रमुख विभागीय स्पर्धा परीक्षेसाठी टीईटी ची अन्यायकारक अट या संबंधाने डॉ. पंकज भोयर यांची शासकीय विश्रामगृह, वर्धा येथे महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती च्या प्रतिनिधींनी निवेदन देऊन भेट घेतली.

मंत्री महोदयांनी याबाबत वरिष्ठ स्तरावर शिक्षकांच्या संबंधाने सकारात्मक निर्णय घेण्यात येईल असे आश्वस्त केले. तसेच शिक्षक संघटना प्रतिधिंसह चर्चा केल्या जाईल असेही स्पष्ट केले.केंद्र प्रमुख (केंद्र समन्वयक) मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेसाठी TET अनिवार्य नाही. कारण ही परीक्षा पदोन्नती नसल्याचे शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय १ डिसेंबर २०२२, ग्राम विकास विभागाची अधिसूचना दि. १८ जुलै २०२५ व तत्संबंधी अन्य शासन



निर्णयात स्पष्ट केले आहे.राज्य परीक्षा परिषदेने २०२३, जुलै २०२५ मध्ये परीक्षेसंबंधी प्रसिद्धी पत्र काढताना सुद्धा कुठेही TET अनिवार्यतेचा उल्लेख केलेला नाही. जर या परीक्षेसाठी टीईटी आवश्यक होती; तर परीक्षेचे आवेदन पत्र भरतानाच तसा उल्लेख पाहिजे होता आणि त्यांना परीक्षेसाठी अपात्र ठरवणे गरजेचे होते.

राज्य परीक्षा परिषद केवळ शासनाने दिलेल्या आदेशाप्रमाणे परीक्षा घेणारी एक संस्था आहे. परीक्षेचे नियोजन करणे, परीक्षार्थी कडून शुल्क आकारून परीक्षा घेणे व निकाल जाहीर करणे ही परीक्षा परिषदेची जबाबदारी आहे. परीक्षा परिषदेला शैक्षणिक, व्यावसायिक आणि वयोमर्यादेचे निकष बदलवता येत नाही. ते शासनाने ठरविलेल्या नियमाप्रमाणेच निश्चित केले असतात.त्यामुळे आता गुणानुक्रमे निकाल जाहीर केल्यानंतर टीईटी/सीटीईटी ची माहिती मागणे व त्याप्रमाणे संभाव्य टीईटी/सीटीईटी धारकांनाच पात्र ठरवणे चुकीचे ठरणार आहे. प्रत्येक जिल्ह्यात विभागीय स्पर्धा परीक्षेत उच्च गुण धारण करणाऱ्या अनेक शिक्षकांनी टीईटी दिली नाही आणि दुसरीकडे कमी गुण मिळवलेल्या शिक्षकांनी टीईटी दिली आहे. टीईटीचा निकष लावल्यास टीईटी/सीटीईटी न देणाऱ्या; मात्र केंद्र प्रमुख परीक्षेत उच्च गुण प्राप्त करणाऱ्या शिक्षकांना केंद्रप्रमुख पदापासून वंचित रहावे लागेल. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती ने शासनाकडे पत्रव्यवहार केला आहे.

शिक्षण मंत्री,ग्राम विकास मंत्री, शिक्षण राज्यमंत्री, ग्राम विकास राज्यमंत्री यांना E-Mail द्वारा पत्र पाठविले आहे.यावेळी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती चे राज्याध्यक्ष विजय कोंबे, राज्य कार्यकारिणी सदस्य सुधीर सगणे, नागपूर विभागीय उपाध्यक्ष अजय मोरे, वर्धा जिल्हा शाखेचे अध्यक्ष अजय बोबडे, जिल्हा सल्लागार चंद्रशेखर ठाकरे, जिल्हा उपाध्यक्ष सुदेश खोब्रागडे, वर्धा तालुका शाखेचे अध्यक्ष राजेश महाबुधे, जिल्हा कार्यालयीन चिटणीस प्रशांत निंभोरकर, समाज माध्यम प्रभारी पवन बानोकर उपस्थित होते.असे प्राथमिक शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी कळविले आहे.

## घोडगव्हान ग्रामपंचायत ने केला ‘जल अर्पण’दिन साजरा



**लेहेगाव -** मोर्शी पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या ग्रामपंचायत घोडगव्हाण येथे मिशन भारत सरकार अभियानांतर्गत ‘जल अर्पण’ दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख उद्घाटक मोर्शी पंचायत समितीचे खंडविकास अधिकारी स्वप्निल मगदूम कार्यक्रमाचे अध्यक्ष घोडगव्हाण ग्रामपंचायत चे सरपंच विजयराव टेकाडे यांचे प्रमुख उपस्थितीत मिशन भारत सरकार उपक्रमा अंतर्गत जलअर्पण दिनाचे औचित्य साधून जमानापूर गट ग्रामपंचायत घोडगव्हाण येथे पाणीपुरवठा योजनेचा हस्तांतरित कार्यक्रम मोठ्या उत्साहात झाला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी मोलाचे मार्गदर्शन केले पाणी ‘मुरवा पाणी जिरवा’ या विषयावर ग्रामस्थांना मोर्शी पंचायत समितीचे खंडविकास अधिकारी साहेब यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला उपस्थित प्रतिक मावळ,जयंत गोरल,महेश मेरथ,लक्ष्मणराव बोकार, भिवगडे,भिडेंकर, यांनी उपस्थित नागरिकांना स्वच्छ पाण्यासंबंधी व पाण्याच्या बचावासंबंधी सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला उपस्थित ग्रामपंचायतच्या उपसरपंच मंगला ढोमणे, सारिका टेकाडे, शीला ढोमणे यांचे कार्यक्रमाकरिता मोलाचे सहकार्य लाभले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका सौ माधुरी टेकाडे यांनी केले. तर आभार प्रदर्शन ग्रामविकास अधिकारी राऊत यांनी केले.

## कौंडण्यपूर अंबिका देवी मंदीरामध्ये ‘चैत्र रामनवमी देवी नवरात्र महोत्सव’

**कुऱ्हा/वार्ताहर**

भिमक राजाचे आराध्य दैवत रूख्मीणीचे माहेर घर असलेल्या प्राचीन पुरातन विदर्भाची पंढरी श्री तिर्थक्षेत्र कौंडण्यपूर येथील श्री अंबिका देवी संस्थान रुक्मीणी हरण मंदिर येथे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी चैत्र राम नवमी देवी नवरात्र महोत्सव दि.१९ते २६ मार्च पर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यांत आले. तसेच कार्यक्रमात स ६:३० ते ५ वा देवी सहस्त्रनाम, स. ७ ते ८ वा महापुजा स. ८.३० वा. महा पुजा आरती, स. ते ९ ते दु. १२ वा .दुर्गा शप्तशती पाठ दु. १२ ते १२.३० धूप आरती नवैध, सायंकाळी ७ ते ७.३०वा आरती सार रात्री ८ ते ९ वा विष्णू सहस्त्रनाम व हरिपाठ रात्री ९ चे नंतर भजन होईल.चैत्र राम नवमी देवी नवरात्र महोसव निमीत्य श्री मनोकामना सिद्धी निमीत्य अखंड दिप ज्योत व श्रीराम कथा प्रवचन ज्ञानयज्ञ महोत्सवात कथा वाचक स. ९ ते दु. १२ वा. व दु. ३ ते ५ वाचक ह.भ.प. सुधाकर



महाराज ठाकरे (जवरा) व संप अमरावती यांचे राहील.तसेच दि १९ मार्च २०२६ ला स. ८ ते ९ श्री पुजा पुजेचे यजमान विश्वस्त मंडळ कौंडण्यपूर व गिरीधरजी अग्रवाल (आर्वी) स.९.३० ते १९ वा. घटस्थापना विश्वस्त मंडळ कौंडण्यपूर दिपज्योती प्रज्वलन यजमान रमेशचंद्र राठी आर्वी, भैय्यासाहेब ठाकरे,रमेशभाऊ सोनी (आर्वी) रामायण पुजन यांचे हस्ते रात्रीचे भजन करण्यात आले. २० मार्च २०२६ ला स. ६.३० ते ८ वा.पाद्यपुजा दैनिक यजमान रात्रीचे भजन लहानुजी महाराज भजन मंडळ देऊरवाडा अंबिका भजन मंडळ (आर्वी) दि. २१ मार्च ला तर महिला भजनी मंडळ (कौंडण्यपूर) दि.२२ मार्च ला श्री गुरुदेव भजनी मंडळ (अहिरवाडा) दि. २३ मार्च ला श्री गुरुदेव सेवा भजनी मंडळ (सर्कसपूर) दि.२४ मार्च ला जिवन विकास भजन मंडळ (मिर्चापूर) दि.२५ मार्च ला देऊरवाडा, कौंडण्यपूर वारकरी भजन मंडळ दि २६ मार्च २०२६ ला होईल.होमहवन दि.२५ मार्च ला रात्री पूर्णाहूती दि.२६ मार्च ला महाप्रसाद दुपारी १२ ते ३ वा.पर्यंत करण्यात येईल. तसेच ज्योत विसर्जन कार्यक्रम दि. २६ मार्च ला दुपारी ४ वा.करण्यात येईल.तरी भाविक भक्तांनी चैत्र रामनवमी देवी नवरात्र महोत्सवात होणाऱ्या मनोकामना सिद्धी अखंड दिपज्योत तसेच श्रीराम कथा प्रवचन ज्ञानयज्ञ आदी कार्यक्रमांचा अवश्य लाभ घ्यावा असे संस्थानचे अध्यक्ष व विश्वस्त मंडळ यांनी केले आहे.

## सर्वरोग निदान व उपचार शिबिराचे आयोजन

**टाकरखेडा संभू/वार्ताहर**

श्रीराम मंदिर संस्थानच्या वतीने आणि दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्था संचालित आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय, सावंगी (मेघे), जि. वर्धा यांच्या संयुक्त विद्यमाने सर्वरोग निदान व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबीर २२ मार्च २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत श्रीराम सभागृह, श्रीराम मंदिर संस्थान येथे पार पडणार आहे.

या शिबिरात विविध तज्ञ डॉक्टरांकडून रुग्णांची मोफत तपासणी केली जाणार आहे. मेडिसीन तज्ञांकडून रक्तदाब, ब्लड शुगर, किडनीचे आजार, हृदयरोग आदींची तपासणी होईल. नेत्ररोग तज्ञांकडून डोळ्यांची तपासणी, मोतियाबिंदू शस्त्रक्रिया व तिरळेपणा यावर उपचार केले जातील. तसेच अस्थिरोग तज्ञांकडून संधिवात, मणक्याचे विकार, फ्रॅक्चर आदींची तपासणी केली जाणार असून स्त्रीरोग तज्ञांकडून महिलांच्या विविध आजारांवर मार्गदर्शन व उपचार केले जाणार आहेत.

शिबिराची विशेष बाब म्हणजे मोतियाबिंदू शस्त्रक्रिया पूर्णपणे मोफत केली जाणार आहे. तसेच शिबिरात नोंदणी व तज्ञ डॉक्टरांकडून तपासणी मोफत असेल.भरती रुग्णांना एक्स-रे, रक्त, लघवी तपासणी व सोनोग्राफी यांसारख्या चाचण्या मोफत उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. रुग्णांच्या राहण्याची, जेवणाची तसेच खाट शुल्काची सुविधा देखील मोफत राहणार आहे. आवश्यकतेनुसार सिटी स्कॅन, एमआरआय यांसारख्या अतिविशिष्ट चाचण्यांवर ५० टक्के सवलत दिली जाणार आहे.महात्मा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत पात्र रुग्णांना विनामूल्य उपचार मिळणार असून कॅन्सर व मुखविकृतीवरील शस्त्रक्रियाही मोफत करण्यात येणार आहेत. भरती रुग्णांसाठी रुग्णालयात ने-आण करण्यासाठी मोफत वाहनाची सोय उपलब्ध राहणार आहे.

शिबिरातून भरतीसाठी निवड झालेल्या रुग्णांनी आधार कार्ड, राशन कार्ड व आयुष्यमान कार्डच्या प्रती सोबत आणाव्यात, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

या शिबिराचा लाभ जास्तीत जास्त नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन श्रीराम मंदिर संस्थानतर्फे करण्यात आले आहे.

## मुरके भवनात गंणगौर उत्सव साजरा

**अमरावती/प्रतिनिधी**

येथील माहेश्वरी महिला मंडळाच्या वतीने गणगौर सण मुरके भवन येथे उत्साहात साजरा करण्यात आला. या सणाची सुरुवात शीतला सप्तमीपासून झाली. या काळात दररोज सायंकाळी महिलांनी पारंपरिक



वेषभूषा करत गौरीच्या मुखवट्यांचे पुजन करत लोकगीते गात होळीच्या राखेपासून सोळा पिंड बनवून या पिंडांची कुंकू, काजळ, मेंदीने पूजा केली. गणगौर उत्सवाच्या पहिल्या दिवशीच ‘सिंजारा’ हा दिवस साजरा झाला. ‘सिंजारा’च्या दिवशी घरात मिष्टान्न करून दुसऱ्या दिवशी म्हणजेच तृतीयेला ‘गौर’ची वाजत गाजत पूजन करून पाठवणी करण्यात आली.याप्रसंगी दुर्गा मुरके, सरला मुरके, डॉ.करूणा मुरके, रेखा मुरके, पुष्पा मुंधडा, सोनल मुरके,विणा मुरके, डॉ.मानसी मुरके, कीर्ती टवानी, डॉ.आरती काबरा, मीरा पनपालीया, नम्रता लाहोटी, डॉ.सुनिता मंत्री, डॉ.सुषमा राठी, ज्योती जाजू, चंचल जाजू, सारिका हरकुट, सिमा जाजू, वर्षा राठी, समृद्धी मुरके, कंचन मुरके, रेवा मुरके, यांसह मोठ्या संख्येने महिला भगिनी व कन्या उपस्थित होत्या.उद्यापनाच्या स्नेहभोजनाने गणगौर उत्सवाची सांगता करण्यात आली.

## श्री स्वामी समर्थ महाराजांचा प्रगट दिवस उत्साहात

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

शहरातील श्री स्वामी समर्थ नगर मध्ये नव्याने उभारलेल्या श्री स्वामी समर्थ अध्यात्मिक व बालसंस्कार सेवा संस्थान येथे अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थ महाराजांचा प्रगट दिन मोठ्या भक्तिमय आणि उत्साहवर्धक वातावरणात झाला.

या निमित्याने प्रगट दिनी अभिषेक आरती, नैवद्य आरती, सारामृत पाठाचे पठन,काल्याचे कीर्तन करून गोपाळ काल्याचे वितरण केले.अनेक भक्तांच्या उपस्थितीत श्री स्वामी समर्थांची महाआरती करून भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.परिसरातील स्वामीं समर्थ महाराजांना मानणारा तसेच ग्रामीण भागातील भक्त परिवाराने मोठ्या संख्येने उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घेतला.ह्या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता



संस्थानाचे अध्यक्ष अतुल चांडक,प्रमोद देशमुख, प्राविण्य देशमुख,रविकिरण डुबे,नितीन महल्ले,अनिल गावंडे, सचिन होले,केतन चव्हाण,अनंत कडूकर, जितेंद्र गोरे,शाम जगताप, जगदीश होले, दत्ता जोशी, विजय चव्हाण, उमेश टाले, अमोल वानखडे, प्रशांत जोशी, दिगंबर डुबे, विजय मिसाळ, पवन देशमुख हि मंडळीने सातत्याने प्रयत्न केले. सिद्धेश भैसे,समर्थ जोशी, अथर्व बोडखे, कौस्तुभ गावडे, आदित्य वानखडे, सोहम महल्ले, बंडूभाऊ भोयर, नामदेव सुरोशे कौस्तुभ गावंडे, प्रियंका देशमुख, माधुरी महल्ले, आशा देशमुख, प्रतिभा चव्हाण, कविता चौधरी,रिता कडुकार, प्रांजली राजुरकर, सरिता गावंडे, प्रियंका टाले, वृषाली वानखडे,वृषाली डुबे, सीमा बोडखे,रेणुका गायकवाड,अनघा जगताप, अनुराधा वंजारी,जानवी उईके, रिया ढोकणे ह्या महिला सेवेकऱ्यांनी सुद्धा हा कार्यक्रम यशस्वी बनविण्यासाठी परिश्रम घेतले.

GHARKUL Masale
पाहिजेत
ब्रँडेड अगरबत्ती घरोघरी विक्रीकरिता महिला व पुरुष पाहिजे.
: संपर्क :
घरकुल मसाले फॅक्टरी,
एमआयडीसी. अमरावती

# जिल्ह्यात संघटित गोतस्करी टोळया सक्रिय

## हिवरखेड येथे नागठाणा जवळ केंद्र, -खासदार डॉ.अनिल बोंडे यांचे पोलिस अधीक्षकांना पत्र

### गुन्हेगारांविरुद्ध मोक्का लावण्याची मागणी

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती जिल्ह्यात गेल्या तीन महिन्यांपासून वरुड-मोर्शी रस्त्यावरून मोठ्या प्रमाणात गाईची तस्करी सुरू असताना पोलीस यंत्रणा ढिम्म असल्याचे चित्र आहे. या गंभीर प्रकाराची दखल घेत भाजपचे राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक (ग्रामीण) यांना कडक पत्र लिहून तातडीने कारवाई करण्याची



मागणी केली आहे. या पत्राने अमरावती जिल्ह्यातील गोतस्करीचे संपूर्ण रॅकेट उघडकीस आले असून पोलीस यंत्रणेच्या कार्यक्षमतेवरच प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

खासदार अनिल बोंडे यांनी पत्रात नमूद केले आहे की, टेम्पो-ट्रक्ससारख्या मोठ्या वाहनांमधून जनावरांना दाबून तस्करी होत असताना पोलिसांनी यापूर्वी गोरक्षा पथक स्थापन केले होते. मात्र काही कारणास्तव हे पथक बरखास्त करण्यात आले. पथक बरखास्त होताच तस्करांनी पुन्हा डोके वर काढले आणि तस्करी पूर्वीपेक्षाही मोठ्या प्रमाणात सुरू झाली. पथक बरखास्त करण्याचा निर्णय नेमका कोणाच्या सांगण्यावरून झाला हा प्रश्न ☞(पान २ वर)

#### मोक्काची मागणी का?

खासदार अनिल बोंडे यांनी पत्रात स्पष्ट केले आहे की ही, तस्करी एकट्या-दुकट्याची नाही. एकाच गाडीमागे पंधरा ते वीस लोक सक्रिय असतात. गाई पकडणे, त्यांना आणणे, गाडड्यात भरणे, विक्री करणे आणि मास विकणे, प्रत्येक टप्प्यावर वेगळी माणसे काम करतात. हे सुसंघटित रॅकेट असल्यामुळे साध्या कलमांऐवजी थेट मोक्का लावण्याची मागणी त्यांनी केली आहे. मोक्का लागल्यास जामीन मिळणे जवळपास अशक्य होते. हाच या मागणीचा मूळ उद्देश आहे.

#### मध्यप्रदेश सीमेपर्यंत पसरलेले रॅकेट

ही तस्करी केवळ अमरावती जिल्ह्यापुरती मर्यादित नाही. वरुड मधील मध्यप्रदेश सीमेवरील मेन रस्त्यावरून गाड्या वेगाने नेल्या जातात आणि थेट अमरावती येथे गाई पोहोचवल्या जातात, असे डॉ.अनिल बोंडे यांनी नमूद केले आहे. एका गाडीच्या पाठीमागे तब्बल पंधरा ते वीस लोक काम करत असल्याचे खासदारांनी निदर्शनास आणून दिले आहे. हे एक सुसंघटित रॅकेट असून त्यांच्याविरोधात संघटित गुन्हेगारी कायद्याअंतर्गत म्हणजेच मोक्का अंतर्गत कारवाई करण्याची मागणी अनिल बोंडे यांनी केली आहे.

# दहशत पसरविण्याच्या उद्देशाने उमेश कोल्हेंची हत्या

## न्यायालयाने फेटाळला मुख्य सूत्रधार इरफान खानचा आरोप मुक्ततेचा अर्ज

**अमरावती/प्रतिनिधीः-** विशेष राष्ट्रीय तपास संस्था न्यायालयाने २०२२मध्ये शहरातील औषध विक्रेते उमेश कोल्हे यांच्या हत्येचा कथित सूत्रधार असलेल्या इरफान खान याचा आरोप मुक्ततेचा अर्ज फेटाळला. ही हत्या दहशत पसरवण्याच्या स्पष्ट उद्देशाने करण्यात आली असून, विशेषतः हिंदूंना लक्ष्य करण्यात आले. त्यामुळे हा गुन्हा बेकायदेशीर क्रियाकलाप (प्रतिबंध) कायदा (यूएपीए) तसेच भारतीय दंड संहिते अंतर्गत दहशतवादी कृत्य म्हणून वर्गीकृत करण्यात आला आहे.

विशेष न्यायाधीश चकोर बाविस्कर यांनी म्हटले की, आतापर्यंत समोर आलेले पुरावे



म्हणजे 'हिमनगाचे केवळ टोक' आहे आणि खटल्यादरम्यान आणखी महत्त्वाचे पुरावे समोर येण्याची शक्यता आहे. तसेच खटल्याच्या शेवटी खान निर्दोष सुटेल, याबाबत शंका आहे, असे न्यायालयाने म्हटले आहे.

हत्या २१ जून २०२२ रोजी करण्यात आली. नुपूर शर्मा यांच्या वादग्रस्त वक्तव्यांना समर्थन देणाऱ्या सोशल मीडिया पोस्टच्या पार्श्वभूमीवर कोल्हे यांची हत्या करण्यात आल्याचा आरोप आहे. २१ जून २०२२ रोजी हत्या करण्यात आली होती. नुपूर शर्मा यांच्या वादग्रस्त वक्तव्याचा समर्थन देणाऱ्या सोशल मीडिया पोस्ट या पार्श्वभूमीवर कोल्ह्याची हत्या करण्यात आल्याचा आरोप आहे. सुरुवातीला हा गुन्हा साधा खून म्हणून नोंदवण्यात आला होता. मात्र, नंतर ☞(पान २ वर)

# शिव केसरी कुस्ती स्पर्धा २४-२५ मार्च ला

## नमो युवक संस्था व हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे आयोजन

**अमरावती/प्रतिनिधीः-** विदर्भ कुस्तीगीर संघ यांच्या मान्यतेने हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ यांच्या सहयोगाने व नमो युवक संस्था यांच्या वतीने शिव केसरी पुरुष व महिला कुस्ती स्पर्धाचे आयोजन मंगळवार २४ व बुधवार २५ मार्च रोजी नेहरू मैदान येथे करण्यात आले असल्याची माहिती आज शनिवार २१ मार्च रोजी पत्रकार परिषदेमध्ये आयोजकांनी दिली.

त्यांनी सांगितले की, दरवर्षी



प्रमाणे यंदाही पहलवान करण डेंडवाल व त्यांच्या मित्रपरिवारा तर्फे ही स्पर्धा घेतली जात आहे. पुरुष व महिला गटात केसरी कुस्ती सामने रंगणार आहेत. या स्पर्धा मध्ये राज्यस्तरीय व विदर्भस्तरीय अशा विविध गटांचा समावेश करण्यात आला आहे. स्पर्धेतील बक्षिसांची रक्कम आकर्षक ठेवण्यात आली आहे. वरिष्ठ पुरुष राज्यस्तरीय गटात प्रथम पुरस्कार☞(पान २ वर)

# शहरात रमजान ईद उत्साहात साजरी





**अमरावती/प्रतिनिधीः-** देशभरात ईद-उल-फितर आज शनिवार २१ मार्च रोजी उत्साहाने साजरी करण्यात आली. यानिमित्त शनिवारी सकाळी हैदरपुरा येथील मुख्य ईदगाह

## -सुख शांती व समृद्धीसाठी प्रार्थना

मैदानावर मौलाना हाफिज सय्यद अख्तर मुरादाबादी यांनी ईदची नमाज अदा केली. हजारो समाज बांधवांनी एका रांगेत उभे राहून नमाज पठण केले आणि विश्वात सुख शांती समृद्धी राहण्याची प्रार्थना केली. रमजान महिन्यातील शिस्त आणि संयमाचे महत्त्व यावेळी अधोरेखित झाले. ३० दिवसाच्या इबादत, आत्मसंयम आणि धैर्यानंतर रमजान ईद उत्साहात साजरी करण्यात आली. नमाज पठण नंतर समाज बांधवांनी ☞(पान २ वर)

# अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समितीत साकारणार भव्य 'शेतकरी भवन'

## १ कोटी ५७ लाखाच्या खर्चातून उभारणी

**अचलपूर/प्रतिनिधीः-** अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात सुसज्ज 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन' उभारले जाणार आहे. राज्याच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने या भवनाच्या बांधकामासाठी १ कोटी ५७ लाख ५५ हजार ४०७ रुपयांच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. अनेकदा शेतकरी आपला शेतमाल घेऊन बाजार समितीत



येतात. मात्र, रात्रीच्या वेळी मुक्कामाची योग्य सोय नसल्याने अडचणींचा सामना करावा लागतो. या उणिवा आता दूर होतील.प्रशासकीय मान्यता मिळाल्यापासून १ वर्षाच्या आत हे बांधकाम पूर्ण करणे बंधनकारक आहे. शासनाकडून एकूण ५० टक्के म्हणजेच ७६.४६ लाख रुपयांचे ☞(पान २ वर)

# मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांच्या संभाव्य बदली चर्चेला उधाण

## -एप्रिलमधील जनरल ट्रान्सफरमध्ये बदलाची शक्यता

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिकेच्या आयुक्त सौम्या शर्मा यांच्या संभाव्य बदलीबाबत शहरात आणि प्रशासकीय वर्तुळात जोरदार चर्चा रंगू लागली आहे. मागील काही दिवसांपासून या संदर्भात विविध कयास लावले जात असून, अद्याप कोणताही अंतिम निर्णय झालेला नसल्याचे स्पष्ट होत



आहे.

प्राप्त माहितीनुसार, आयुक्त सौम्या शर्मा या मार्च महिन्याच्या अखेरीस मातृत्व रजेवर जाणार आहेत. सुरुवातीला त्यांच्या रजेच्या काळातच बदली होण्याची ☞(पान २ वर)

# उन्हाळयातील सुट्ट्यामध्ये धावणार विशेष रेल्वे गाड्या

**अमरावती/प्रतिनिधीः-** उन्हाळ्यातील सुट्ट्या व लग्न सराईतील गर्दीच्या वेळी मध्य रेल्वेने प्रवाशांना मोठा दिलासा दिला आहे. मध्य रेल्वे कडून लोकमान्य टिळक टर्मिनस – नागपूर आणि पुणे – नागपूर दरम्यान विशेष गाड्या चालवल्या जाणार आहेत. प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वेने हा निर्णय घेतला. विशेष गाड्यांसाठी आरक्षण २४ मार्च पासून सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि रेल्वेच्या अधिकृत संकेतस्थळावर सुरू होणार आहे. विशेष रेल्वे गाड्यांमुळे गर्दीच्या काळात प्रवाशांना मोठी सुविधा होईल. लोकमान्य टिळक टर्मिनस – नागपूर विशेष गाडीच्या दोन सेवा होतील. गाडी क्रमांक

## २४ पासून सुरु होणार आरक्षण



०१०२१ विशेष गाडी ३ एप्रिल रोजी लोकमान्य टिळक टर्मिनस येथून ००.५५ वाजता सुटेल आणि नागपूर येथे त्याच दिवशी १५.४५ वाजता पोहोचेल. गाडी क्रमांक ०१०२२ विशेष गाडी दिनांक ३ एप्रिल रोजी नागपूर येथून २०.०० वाजता सुटेल आणि लोकमान्य टिळक टर्मिनस येथे दुसऱ्या दिवशी ११.४५ वाजता पोहोचेल. या गाडीला ठाणे, कल्याण, नाशिक रोड, मनमाड, जळगाव, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला, मूर्तिजापूर, बडनेरा, धामणगाव आणि वर्धा येथे थांबा राहील. एक ☞(पान २ वर)

# जुन्या वादातुन तरुणावर चाकू हल्ला

## दोन्हीकडून गुन्हे दाखल

**अमरावती/प्रतिनिधीः-** चांदूर रेल्वे पोलीस ठाण्याच्या हद्दीत सोनगाव परिसरात १९ मार्च रोजी जुन्या वादातून एका तरुणावर प्राणघातक हल्ला करण्यात आला. यामध्ये चेतन अरुणराव चोरे (रा. सोनगाव, ता. चांदूर रेल्वे) हा चाकूच्या वाराने गंभीर जखमी झाला आहे. या घटनेत दोन्ही बाजूंच्या तक्रारीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहेत.

माहितीनुसार, चेतन चोरे सकाळी नव्या घरासाठी पाणी घेऊन आणि गहू दळण्यासाठी



दुचाकीने जात असताना सोनगाव मार्गावर आरोपी मुकेश मारोतराव गावंडे यांनी (वय ४४) ई-बाईकवरून मागून येऊन त्यांना अडवले. थोड्याच क्षणात जुन्या वादाचा राग पेटला आणि मुकेशने चाकू काढून☞(पान २ वर)

# आराधना शॉपिंग मॉल मध्ये अनेकानी मिळविले एसी,वॉशिंग मशीन,फ्रीझ

## हर खरेदी पर उपहार पक्का योजनेला ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**अमरावती/प्रतिनिधीः-**





विदर्भातील मोठ्या शोरूमपैकी एक असलेल्या आराधना होलसेल शॉपिंग मॉल यांच्या 'प्रत्येक खरेदीवर भेटवस्तूची हमी' या योजनेला ग्राहकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या योजनेअंतर्गत आता केवळ☞(पान २ वर)

# पोलीस आयुक्तालयातील तक्रार निवारण दिन आता मंगळवारी

**अमरावती/प्रतिनिधीः-** नागरिकांच्या तक्रारीचे तात्काळ निवारण होण्याच्या दृष्टीने पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या संकल्पनेनुसार तक्रार निवारण दिन दर शनिवारी दुपारी ३ ते ५ वाजेपर्यंत घेण्यात येत होता, पण आता शनिवारच्या जागी मंगळवारी दुपारी ३ ते ५ वाजे पर्यंत तक्रार निवारण दिन घेण्यात येणार आहे. शहरातील नागरिकांच्या तक्रारीचे तात्काळ निवारण व्हावे जनतेमध्ये पोलिसांच्या कामाचे प्रती विश्वास निर्माण होण्याच्या दृष्टीने ७ फेब्रुवारी पासून दर शनिवारी दुपारी ३ ते ५ वाजेपर्यंत तक्रार निवारण दिन घेण्यात येत होता. तक्रार निवारण दिनामध्ये अंशतः बदल करण्यात आला असून आता प्रत्येक आठवड्याच्या मंगळवारला ☞(पान २ वर)




# रमजान ईद मानवतेचा संदेश देणारा पवित्र उत्सव -काँग्रेस जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांचे प्रतिपादन

### अचलपूरमध्ये रमजान ईद उत्साहात

**अचलपूर/प्रतिनिधीः-** मानवता, प्रेम आणि बंधुभावाचा संदेश देणारी पवित्र रमजान ईद अचलपूर शहरात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त शहरातील ईदगाह येथे मुस्लिम बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून नमाज अदा केली. नमाजनंतर एकमेकांना आलिंगन देत ईदच्या शुभेच्छांची देवाणघेवाण करण्यात आली आणि परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. या प्रसंगी जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष बबलू देशमुख यांनी ईदगाह येथे भेट देऊन मुस्लिम



बांधवांशी संवाद साधला व त्यांना शुभेच्छा दिल्या. समाजात सलोखा, ऐक्य आणि परस्पर आदर टिकवून ठेवण्यासाठी अशा सणांचे महत्त्व अत्यंत मोठे असल्याचे त्यांनी सांगितले. 'रमजान ईद हा केवळ धार्मिक सण नसून मानवतेचा संदेश देणारा पवित्र उत्सव आहे. संयम, त्याग आणि बंधुभावाची शिकवण देणारा ☞(पान २ वर)

# पोलीस पथकावर हल्ला

## गोवंश तस्करी प्रकरणात दोघांविरुद्ध गुन्हा

**अमरावती/प्रतिनिधीः-** शिरजगाव कसबा पोलीस ठाण्याच्या हद्दीत १९ मार्च रोजी सायखेडा ते करजगाव कच्च्या मार्गावर धक्कादायक घटना घडली. गोवंश तस्करी रोखण्यासाठी गेलेल्या पोलीस पथकावर हल्ला करून आरोपींनी पोलीसांच्या ताब्यातील गोवंश हिसकावून नेल्याची घटना उघडकीस आली.माहितीनुसार, सायखेडा येथून गोवंश नेले जात असल्याची गोपनीय माहिती पोलीस पथकाला मिळाली होती. पोलीस कर्मचारी दीपक सुदर्शन गवई व सहकारी यांनी घटनास्थळी धाड टाकली. तेथे चार गोवंश पायी नेणारा युवक आढळून आला, परंतु चौकशीस समाधानकारक उत्तर देऊ शकला नाही. दरम्यान, पोलीस पंचनाम्याच्या प्रक्रियेदरम्यान आरोपी अब्दुल सलीम शेख सलीम (वय ४५) आणि मोहम्मद आझाद अब्दुल रहेमान (वय ४८, दोघेही रा. मच्छीसाथ, करजगाव) घटनास्थळी दाखल झाले. या वेळी अब्दुल सलीमने पोलीस दीपक गवई यांच्या हातात असलेल्या गोवंशाच्या दोरीवर लाठीने प्रहार करून धक्का दिला आणि आरोपी दोघांनी गोवंश पळवून नेले. शिरजगाव कसबा पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# सारांश

जनमाध्यम — एक प्रतिष्ठित सवय

रविवार, २२ मार्च २०२६ ▢ E-paper - www.janmadhyam.com







# 'कुरतडलेली' आरोग्य व्यवस्था!

पंधरा दिवसांपूर्वीच सादर झालेल्या अर्थसंकल्पात महाराष्ट्रातील जनतेला जागतिक दर्जाच्या आरोग्य सुविधा देणार, अशा वल्गना राज्य सरकारने केल्या. प्रत्यक्षात स्थिती काय आहे? रुग्णालयात उंदरांचा सुळसुळाट आहे, व्हेंटिलेटरवरील वृद्ध रुग्ण महिलेचा हात उंदीर कुरतडत असताना कर्मचारी दुर्लक्ष करत आहेत आणि त्या बेफिकिरीतून त्या वृद्धेचा दुर्दैवी मृत्यू होत आहे. हीच या मंडळींची जागतिक दर्जाची आरोग्य सुविधा म्हणायची का? एकीकडे अर्थसंकल्पात सार्वजनिक आरोग्याच्या तरतुदीत सुमारे पाच हजार कोटींनी कपात करायची आणि दुसरीकडे जागतिक दर्जाच्या आरोग्य सेवेच्या बाता मारायच्या. राज्यातील सार्वजनिक आरोग्य 'व्हेंटिलेटर'वर आहे. सरकारची आरोग्य व्यवस्था भ्रष्टाचार आणि गैरकारभाराने 'कुरतडलेली' आहे. आधी ती नीट करा आणि मग जागतिक दर्जा वगैरेच्या वल्गना करा!



दोन आठवड्यांपूर्वी सादर झालेल्या राज्याच्या अर्थसंकल्पात सरकारने आरोग्य सेवासुविधांबाबत मोठ्या घोषणा केल्या. मात्र भाईंदर येथील एका थरकाप उडविणाऱ्या घटनेने घोषणांची पोलखोलच केली. भाईंदर येथील पंडित भीमसेन जोशी रुग्णालयात सुहासिनी माठेकर या वृद्ध महिलेला अतिदक्षता विभागात व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले होते. मात्र त्या ठिकाणी त्यांचा हात उंदराने कुरतडला आणि त्यामुळे झालेल्या अतिरक्तस्रावामुळे त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. रुग्णालयाचा अतिदक्षता विभाग चौथ्या मजल्यावर आहे. तरीही एक उंदीर तेथील व्हेंटिलेटरवरील रुग्णाचा हात कुरतडतो, ड्युटीवर असलेल्या कोणाचेही त्याकडे लक्ष जात नाही. सुहासिनी यांच्या हातातून रक्तस्राव सुरू राहतो, सकाळी त्यांना भेटायला आलेल्या नातेवाईकांच्या लक्षात आल्यावर धावाधाव होते, परंतु तोपर्यंत उशीर झालेला असतो आणि अतिरक्तस्रावाने सुहासिनी यांचा दुर्दैवी मृत्यू होतो. हे सगळेच भयंकर आणि सरकारी आरोग्य व्यवस्थेच्या अब्रूची लक्तरे वेशीला टांगणारे आहे. रुग्णालय प्रशासनाचे यासंदर्भातील स्पष्टीकरण आणि सारवासारव हास्यास्पद आणि लज्जास्पदआहे. आजूबाजूला अनेक इमारतींची बांधकामे सुरू आहेत. त्यामुळे तेथील बिळांमधील उंदीर रुग्णालयात घुसले असावेत, असे अजब तर्कट रुग्णालयातर्फे मांडले गेले ते त्या ठिकाणी उपचार घेत असलेल्या इतर रुग्णांचा जीव टांगणीला लावणारे आहे. रुग्णालयातील उंदरांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी औषध फवारणीचे कंत्राट दिले होते, असा खुलासाही प्रशासनाने केला आहे. रुग्णालयात उंदरांचा सुळसुळाट असल्याची ही कबुलीच आहे. त्यामुळे सुहासिनी माठेकर यांच्या मृत्यूसाठी रुग्णालयालाच जबाबदार धरायला हवे आणि तसाच गुन्हा दाखल व्हायला हवा.

राज्यातील सरकारी रुग्णालयांमध्ये उंदरांचा, तर सरकारच्या आरोग्य विभागात भ्रष्टाचाराचा सुळसुळाट झाला आहे. आरोग्य सुविधांपेक्षा ठेकेदार आणि पुरवठादारांच्या 'आर्थिक आरोग्या'ची काळजी घ्यायची आणि आपलेही उखळ पांढरे करून घ्यायचे हाच सत्ताधाऱ्यांचा एककलमी कार्यक्रम सुरू आहे. त्यामुळे आरोग्य सेवासुविधांसाठी वर्षानुवर्षे हजारो कोटी खर्च होऊनही आदिवासी भागात माता-बालकांचा कुपोषणाने, तर मुंबईच्या शेजारी असलेल्या भाईंदर येथे व्हेंटिलेटरवर असलेल्या वृद्धेचा उंदराने हात कुरतडल्याने मृत्यू होत आहे. केंद्रातील सत्ताधारी देशाची आरोग्य व्यवस्था आमूलाग्र सुधारल्याचा दावा करीत असतात, परंतु सकल देशांतर्गत उत्पादनाच्या फक्त अडीच टक्के खर्च सार्वजनिक आरोग्यावर केला जात आहे. १४० कोटींच्या आपल्या देशात आजही एकूण इस्पितळ 'बेड'ची संख्या जेमतेम १३-१४ लाख एवढीच आहे. राज्यातील सत्ताधारीही महाराष्ट्राचे 'आरोग्य' सुधारणार असल्याचे ढोल पिटत असतात. पंधरा दिवसांपूर्वीच सादर


झालेल्या अर्थसंकल्पात महाराष्ट्रातील जनतेला जागतिक दर्जाच्या आरोग्य सुविधा देणार, अशा वल्गना राज्य सरकारने केल्या. प्रत्यक्षात स्थिती काय आहे? रुग्णालयात उंदरांचा सुळसुळाट आहे, व्हेंटिलेटरवरील वृद्ध रुग्ण महिलेचा हात उंदीर कुरतडत असताना कर्मचारी दुर्लक्ष करत आहेत आणि त्या बेफिकिरीतून त्या वृद्धेचा दुर्दैवी मृत्यू होत आहे. हीच या मंडळींची जागतिक दर्जाची आरोग्य सुविधा म्हणायची का? एकीकडे अर्थसंकल्पात सार्वजनिक आरोग्याच्या तरतुदीत सुमारे पाच हजार कोटींनी कपात करायची आणि दुसरीकडे जागतिक दर्जाच्या आरोग्य सेवेच्या बाता मारायच्या. राज्यातील सार्वजनिक आरोग्य 'व्हेंटिलेटर'वर आहे. सरकारची आरोग्य व्यवस्था भ्रष्टाचार आणि गैरकारभाराने 'कुरतडलेली' आहे. आधी ती नीट करा आणि मग जागतिक दर्जा वगैरेच्या वल्गना करा!


# आखाती युद्ध चिघळल्यामुळे शेअर बाजारात हाहाकार

आखातात इराणने विविध देशांच्या तेल आणि नैसर्गिक वायू प्रकल्पा च्या पायाभूत सुविधा उद्ध्वस्त करण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे जागतिक ऊर्जा सुरक्षा धोक्यात आली आहे. अशा परिस्थितीत जागतिक शेअर बाजाराबरोबरच भारतीय शेअर बाजाराचे निर्देशांक गुरुवारी कोसळले. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्स २,४९६ अंकांनी म्हणजे ३.२६ टक्क्यांनी कोसळून ७४,२०७ अंकावर बंद झाला. जून २०२४ नंतर निर्देशांक प्रथमच एका दिवसात इतका कोसळला आहे. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक निफ्टी ७७५ अंकांनी म्हणजे ३.२६ टक्क्यांनी कोसळून २३,००२ अंकावर बंद झाला. ईटर्नल, बजाज, महिंद्रा, एचडीएफसी बँक, लार्सन अँड ट्यूबरो, बजाज फायनान्स या कंपन्यांच्या शेअरच्या भावात घट झाली. खनिज तेलाचे दर ११४ डॉलरच्या जवळपास गेले आहेत.



इराणने कतार आणि कुवेतमधील नैसर्गिक वायू प्रकल्पावर हल्ले केले आहेत. इराणने सौदी अरेबियाच्या नैसर्गिक वायू आणि तेल प्रकल्पावरही हल्ले चढविल्यामुळे परिस्थिती हाताबाहेर जाण्याचे वातावरण निर्माण झाले आहे. शेअर बाजारावर नोंदलेल्या ३,१९२ कंपन्यांच्या शेअरच्या भावात घट झाली तर १,०५१ कंपन्यांच्या शेअरच्या भावात थोडीफार वाढ होऊ शकली. जियोजीत वित्तीय सेवा या संस्थेचे संशोधन प्रमुख विनोद नायर यांनी सांगितले की काल अचानक इराण आणि इस्त्राईलने तेल आणि नैसर्गिक वायू क्षेत्रावर हल्ले सुरू केल्यानंतर जगभर असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले.

दक्षिण कोरिया, शांघाय, हाँगकाँग, युरोप, अमेरिका येथील शेअर बाजाराचे निर्देशांक कोसळल्यानंतर भारतीय शेअर बाजारातही सकाळपासून विक्रीचा जोर वाढला होता.

अगोदरच अस्थिर असलेले परदेशी संस्थागत गुंतवणूकदार विक्री वाढवित असून बुधवारी या गुंतवणूकदारांनी २,७१४ कोटी रुपयांच्या शेअरची विक्री केली. देशातील संस्थागत गुंतवणूकदारांनी ३,२५३ कोटी रुपयांच्या शेअरची खरेदी करून निर्देशांकांना आधार देण्याचा प्रयत्न केला

# रसायन चिकित्सा

सध्या वजन कमी करण्यासाठी अनेक आधुनिक उपाय प्रचलित आहेत, परंतु आयुर्वेदातील नियमांनुसार आहारविहार असल्यास व त्यानुसार उपाय असल्यास अपेक्षित परिणाम नक्कीच साधता येतो. डॉक्टर !! एक चपाती, थोडासा भात एवढेच माझे दोन वेळचे जेवण आहे. मध्ये काही खातही नाही तरी वजन का कमी होत नाही? पोटाची चरबी का वाढते आहे? यावर समाधान होणारी उत्तरे फक्त आयुर्वेद देऊ शकतो. त्यासाठी हा लेख प्रपंच! रस, रक्त, मांस, मेद, अस्थी, मज्जा, शुक्र असे सात धातू आयुर्वेदात वर्णन केले आहेत. ज्यामुळे शरीर बनले आहे.

हे सर्व धातू स्वत स्वतचे पोषण करतात. ते करण्यासाठी प्रत्येकाचे वेगवेगळे पचन करणारे अग्नी आहेत. जसे की, वेगवेगळ्या चुलीच! त्याला आम्ही धात्वग्नी असे म्हणतो. जठराग्नी हा प्रमुख पचन करणारा अग्नी अन्नावर प्रक्रिया करतो आणि नंतर त्यातील पोषक अंश या सप्त धात्वग्नीकडे पाठवून दिले जातात. प्रत्येक धातू स्वतला पोषण करण्यासाठी त्या अन्नावर प्रक्रिया करतात आणि आपल्या आवश्यक असलेला भाग काढून उरलेला भाग मल स्वरूपात बाहेर पडतो. ही अतिशय गुंतागुंतीची प्रक्रिया सामान्य भाषेत समजावण्याचा प्रयत्न केला आहे. मग एक चपाती खाऊन मेद वाढतो कसा हे आपण पाहू. जसे की, चूल पेटवण्यासाठी फुंकर मारावी लागते तसेच अग्नी प्रज्वलित राहण्यासाठी वात दोष फुंकर मारण्याचे काम करत असतो. त्याच्यात जर काही विकृती झाली तर तो फक्त मेदासारख्या एकाच धात्वग्नीला प्रज्वलित करतो आणि अन्नाचा बराचसा भाग मेद तयार करण्यासाठी वापरला जातो. त्यासाठी वाढलेल्या वात दोषाचा योग्य प्रकारे उपचार करणे आवश्यक आहे. त्यासाठी पंचकर्म चिकित्सा अत्यंत उपयुक्त ठरते.परंतु सध्या वजन कमी करण्यासाठी अनेक आधुनिक उपाय प्रचलित आहेत, ज्यात अन्न, स्निग्ध पदार्थ कमी करून वात वाढविण्याचे काम केले जाते आणि मेद कमी न होता वाढत राहतो.



**डॉ. आशुतोष कुळकर्णी**

त्यासाठी वात दोष आणि धात्वाग्नी चिकित्सा करणे महत्त्वाचे ठरते. या रसरक्तादी सप्तधातूंची चिकित्सा म्हणजे रसायन चिकित्सा. याला आयुर्वेदात अत्यंत महत्त्व आहे. आयुर्वेदात रसायन म्हणजे केमिकल नव्हे. रसादी धातूंचे अयन म्हणजे पोषण याला रसायन चिकित्सा म्हणतात. योग्य आहार, विहार, औषधे, पंचकर्म चिकित्सा कराव्या लागतात. प्रत्येक धातूचे स्वतचे वैशिष्ट्य आहे. त्यांचे योग्य पोषण होत असेल तर मनुष्य निरोगी असतो. साधारण सप्तधातू योग्य असण्याची लक्षणे तुम्हीसुद्धा निरीक्षण करू शकता. उदाहरणार्थ, रसरक्त धातू सुस्थितीत असले तर त्वचा निरोगी, सतेज दिसते. मांस, मेद योग्य असेल तर शरीर बांधेसूद, बळकट सांधे दिसून येतात. शरीराची बांधणी योग्य दिसून येते. अस्थींचे पोषण होत असेल तर हाडे बळकट असतात, बळकट दात केस दिसतात. नखांची चांगली वाढ होत असते.

मज्जा धातूचे योग्य पोषण होत असेल तर बुद्धिमत्ता दिसून येते आणि महत्त्वाचा धातू शुक्र धातू. त्याचे योग्य पोषण होत असेल तर चेह-यावरचा ओज, तेजस्वीपणा दिसून येतो. संतती चांगली असते. ही ढोबळमानाने केलेली परिमाणे आहेत. याचबरोबर रक्तादी धातूंच्या कमतरतेमुळे अनेक विकृत लक्षणे आयुर्वेदात वर्णन केलेली आहेत, त्यायोगे रोगांचे योग्य निदानही करता येते. कुठलाही व्याधी झाला की, पहिल्यांदा वात, पित्त, कफ दोषांमध्ये असमानता येऊन धातूंमध्ये बिघाड दिसू लागतात आणि त्याच्या कमतरतेची लक्षणे शरीर दाखवते. म्हणून या सर्व गोष्टींचे अत्यंत महत्त्व आहे. ऋतूनुसार शरीरशुद्धी, गुळवेल, च्यवनप्राश, त्रिफळा इत्यादी अनेकविध औषधे योग्य निदानानंतर वैद्य वापरतात.

प्रत्येक धातूचे किती महत्त्व आहे ते एका उदाहरणाने पाहू. संतती होत नाही म्हणून अथवा लैंगिक दुर्बलता असेल तर शुक्र धातूची पुष्टी होणे आवश्यक असते. तो या सप्तधातूंमधील सर्वात शेवटचा धातू आहे. त्यामुळे सर्व धातूंची पुष्टी झाल्यावर शुक्र धातू पुष्टी करावी लागते.

प्रकृतीविषयी रुग्णाला कुठलाही प्रश्न पडला तर त्याला उत्तर देण्यासाठी आयुर्वेदाचा भरभक्कम आधार आहे. अधिक

# मुकी.... बिचारी

अमेरिका, इस्त्रायल विरुद्ध इराण या युद्धाची झळ सर्व जगाला बसायला लागलेली आहे. प्रत्येक वर्तमानपत्र, न्यूज चॅनेल आणि सोशल मीडिया युद्धाच्या बातम्यांनी भरभरून वाहू लागले आहेत. कोणी युद्धाची भयानकता दर्शवत आहे, तर कोणी आतल्या गोटातल्या बातम्या सांगत आहे. प्रत्यक्ष युद्धभूमीवर मरत असलेल्या नागरिकांचे आणि सैनिकांचे व्हिडीओ कोणी दाखवत आहे, तर कोणी नॉस्त्रॅडेमस व बाबा वेंगाच्या भविष्यवाण्या सांगून घबराट पसरवत आहे. मात्र या सगळ्यात या युद्धाची प्रत्यक्ष झळ बसत असलेल्या मुक्या प्राण्यांविषयी मात्र फारसे कोणी बोलताना दिसत नाही. युद्धाचे ढग इराणमुळे आता दुबई, सौदी अरेबिया, कतार अशा देशांवरदेखील पसरू लागले आहेत. जिवाच्या भीतीने अनेकांनी दुबईसारखे एकेकाळी सर्वात सुरक्षित मानले गेलेले देशदेखील सोडायला सुरुवात केली आहे. मात्र देश सोडताना हे लोक आपल्या पाळीव प्राण्यांना मात्र सर्रास रस्त्यावर सोडून देत आहेत. दुबईमधील अनेक प्राण्यांच्या धर्मदाय संस्था अशा परिस्थितीत पुढे आलेल्या आहेत आणि त्या अशा प्राण्यांना आसरा देत आहेत. दुबईमध्ये एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे प्राण्यांचे हस्तांतरण करण्याची प्रक्रिया फार किचकट आणि वेळखाऊ आहे. त्यामुळे अनेक लोक देश सोडून जाताना आपल्या पाळीव प्राण्यांना पाळीव प्राण्यांना दुबईमध्येच सोडून जाणे



रस्त्यावर अथवा वाळवंटात सोडून जाणे पसंत करत आहेत. यापैकी अनेक प्राण्यांना मायक्रोचीपदेखील बसवलेली आहे. सोडून दिलेल्या अशा प्राण्यांमध्ये मांजरी आणि कुत्र्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे. गेल्या आठवड्यात ब्रिटिश सरकारने आपत्कालीन विमान व्यवस्था सुरू करून आपल्या ४५ हजार नागरिकांना दुबईबाहेर काढले आहे. यापैकी अनेकांनी आपल्या पसंत केले आहे. एका बातमीनुसार अनेक मालकांनी आपल्या निरोगी असलेल्या पाळीव प्राण्यांनादेखील इच्छामृत्यू द्यावा यासाठी हजारोंनी अर्ज केल्याचे समोर आले आहे. धर्मदाय संस्थांचे फोन मिनिटा मिनिटाला वाजत असल्याचे आणि या संस्थांच्या सर्व खोल्या अशा सोडून दिलेल्या प्राण्यांनी भरल्याचे एका कार्यकर्त्याने सांगितले.

# यूपीएससी'च्या निकालात 'मराठी' मागे का?

मराठी माध्यमातून परीक्षेची तयारी करणाऱ्या उमेदवारांमध्ये इंग्रजीविषयी असलेला न्यूनगंड, प्रयत्नांची गुणवत्ता आणि लेखन-वाचन कौशल्याचा अभाव याकडे झालेले दुर्लक्ष यंदाच्या 'यूपीएससी'च्या निकालात अधोरेखित होते. लोप पावत चाललेल्या सांस्कृतिक-भाषिक व्यवहारांचे हे प्रतिबिंबच.'यूपीएससी'त मराठी माध्यमातून परीक्षा देण्याची सोय कोणत्या टप्प्यावर आहे? 'यूपीएससी'च्या परीक्षेत पूर्वपरीक्षा, मुख्य परीक्षा आणि मुलाखत असे टप्पे असतात. पूर्वपरीक्षेत सी-सॅट ही पात्रता परीक्षा आणि सामान्य अध्ययनाचा २०० गुणांचा मुख्य पेपर द्यावा लागतो. त्यानंतर मुख्य परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना भारतीय भाषांसह मराठी माध्यमातून उत्तरे लिहिण्याची सोय असते.

# एलिस आयपीएलमधून आऊट

आयपीएलचा नवा हंगाम सुरू होण्याआधीच चेन्नई सुपर किंग्सला जबर धक्का बसला आहे. ऑस्ट्रेलियन वेगवान गोलंदाज नॅथन एलिस हॅमस्ट्रिंग दुखापतीमुळे संपूर्ण स्पर्धेतून बाहेर पडला आहे. फ्रेंचायझीने अद्याप त्याच्या जागी पर्याय जाहीर केलेला नसल्याने संघाच्या रणनितीवर मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. एलिस हा डेथ ओव्हर्समधील सीएसकेचा मुख्य अस्त्र मानला जात होता. त्याच्या अनुपस्थितीमुळे शेवटच्या षटकांतील गोलंदाजी कमकुवत होण्याची भीती आहे. आता मॅनेजमेंट पर्याय शोधण्यात व्यस्त असून मॅट हेन्रीला अंतिम संघात नियमित संधी मिळण्याची शक्यता प्रबळ झाली आहे.एलिसचा टी-२० कारकीर्दीतील विक्रम प्रभावी आहे. १८० पेक्षा अधिक सामन्यांत २०० पेक्षा अधिक विकेट्स, तर आंतरराष्ट्रीय स्तरावरही ५० हून अधिक विकेट घेणा? या या गोलंदाजाची उणीव सीएसकेला नक्कीच जाणवणार. सीएसकेकडे खलील अहमद, मुकेश चौधरी, गुरजपनीत सिंग यांसारखे वेगवान पर्याय आहेत. शिवम दुबे, जेमी ओव्हरटन यांच्यासारखे अष्टपैलूही गोलंदाजी करू शकतात.

# महाराष्ट्र केसरीचा थरार

घोली येथील 'स्व. अजितदादा पवार क्रीडानगरी'त सुरू असलेल्या ६८ व्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत गुरुवारी चुरशीच्या लढती पाहायला मिळाल्या. माती आणि गादी अशा दोन्ही विभागात रोमांचक सामने पाहायला मिळाले. कुस्ती शौकीनांच्या नजरा लागलेल्या माती विभागात सोलापूरच्या मल्लांचे वर्चस्व पाहायला मिळाले, मात्र एका अनपेक्षित निकालाने सर्वांनाच चकित केले.माती विभाग: सिकंदरचा दरारा, माऊलीचा पराभव –माती विभागातील अत्यंत महत्त्वाच्या लढतीत सोलापूरच्या सिकंदर शेखने पुणे जिल्ह्याच्या अनिकेत मांगडेचा ८-१ असा पराभव करत आपले वर्चस्व सिद्ध केले. दुसऱ्या एका लढतीत महेंद्र गायकवाडने विशाल बनकरवर ६-१ अशी मात करत पुढची फेरी गाठली.

# प्रदर्शनापूर्वी धुरंधर- २ चे कलाकार झाले अंडरग्राऊंड!




बॉलिवूडमध्ये चित्रपट प्रदर्शनापूर्वी अनेकवेळा आपल्याला चित्रपटातील कलाकार मुलाखती देताना दिसतात. परंतु 'धुरंधर २' ने एक पूर्णपणे वेगळा मार्ग अवलंबलेला आहे. १९ मार्चला होणाऱ्या चित्रपट प्रदर्शित होणार आहे. त्याआधी चित्रपटातील सर्व कलाकार आणि तंत्रज्ञ गायब झाले आहेत. सामान्यतः, चित्रपटाच्या प्रदर्शनाच्या शेवटच्या आठवड्यात कलाकार टीव्ही शो आणि मॉल्समध्ये दिसतात, पण दिग्दर्शक आदित्य धरच्या रणनीतीने सर्वांनाच आश्चर्यचकित केले आहे. चित्रपटाबद्दल लोकांमध्ये असलेली उत्सुकता अबाधित राहावी, यासाठी त्याने आपल्या संपूर्ण टीमला कोणत्याही माध्यमाशी संवाद न साधण्याचा सल्ला दिला आहे. मुख्य म्हणजे कुठेही बाहेर फिरु नये आणि कोणत्याही कार्यक्रमांना उपस्थितही राहू नये असे आदेश देण्यात आले आहेत.

बॉलिवूड हंगामाच्या वृत्तानुसार, दिग्दर्शक आदित्य धरने आपल्या टीमला 'धुरंधर द रिव्हेंज' प्रदर्शित होईपर्यंत प्रसिद्धीपासून पूर्णपणे दूर राहण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या आहेत. यामध्ये केवळ मोठे कार्यक्रमच नव्हे, तर मुलाखती आणि सार्वजनिक कार्यक्रमांचाही समावेश आहे. ही टीम इतकी घाबरलेली आहे, किंवा अधिक योग्य शब्दात सांगायचे तर, इतकी शिस्तबद्ध आहे की चित्रपटाशी संबंधित प्रश्नांच्या भीतीने ते सार्वजनिक ठिकाणी जाणे टाळत आहेत. हे जुन्या बॉलिवूड पद्धतीच्या अगदी विरुद्ध आहे, जिथे मार्केटिंगवर कोट्यवधी रुपये खर्च केले जातात.

एका प्रसिद्ध चित्रपट अभिनेत्याने परिस्थितीबद्दल उघडपणे भाष्य केले. तो म्हणाला की परिस्थिती इतकी गंभीर आहे की अभिनेते आता वैयक्तिक किंवा कौटुंबिक कार्यक्रमांनाही टाळत आहेत. त्याच्या मते, 'आम्ही आता लग्न समारंभ किंवा मंदिरांमध्ये जाणेही टाळत आहोत. फक्त घरीच राहा, हाच आमचा मंत्र आहे. आम्हाला चित्रपटाबद्दल कोणत्याही अवघड प्रश्नांना सामोरे न जाण्याची सूचना देण्यात आली आहे.' लोक या सिक्वेलबद्दल खूप उत्सुक आहेत आणि ते काहीही विचारू शकतात, त्यामुळे प्रदर्शनापर्यंत माध्यमांच्या नजरेपासून दूर राहणेच उत्तम आहे.

विशेष म्हणजे, 'धुरंधर' या पहिल्या चित्रपटाच्या वेळी वातावरण पूर्णपणे वेगळे होते. दिग्दर्शक वगळता, प्रत्येक लहान-मोठा कलाकार माध्यमांशी मोठ्या प्रमाणावर संवाद साधत होता. चित्रपटातील गाण्यांमध्ये दिसलेल्या नर्तकांनाही इतकी लोकप्रियता मिळाली होती की, त्यांना रि?लिटी शो आणि खाजगी कार्यक्रमांमध्ये सादरीकरण करण्यासाठी मोठी रक्कम दिली जात होती. पहिल्या भागाच्या यशामुळे प्रत्येकाला प्रसिद्धीच्या झोतात राहण्याची भरपूर संधी मिळाली, पण सिक्वेलसाठी नियम पूर्णपणे बदलले आहेत.

पूर्वी राकेश बेदी आणि नवीन कौशिक यांच्यासारखे कलाकार मुलाखती देत ??होते, पण आता त्यांनीही माघार घेतली आहे. अक्षय खन्ना सहसा आपले वैयक्तिक आयुष्य खाजगी ठेवतो, पण पूर्वी खूप सक्रिय असलेले संजय दत्त, अर्जुन रामपाल आणि आर. माधवन हेदेखील आता अंतर राखून आहेत. पूर्वी मुलाखतींमध्ये दिसणारा दानिश पांडोर, चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख जवळ आल्याने आता शांत झाला आहे.

# अभिनेत्री दिपिका कक्कड भावूक

टेलिव्हिजनची लोकप्रिय अभिनेत्री दीपिका कक्कड हिला २०२५ मध्ये आपल्याला कॅन्सर असल्याचे समजले. नुकताच यासंबधित तीची एक सर्जरी पार पाडली आहे. दरम्यान अभिनेत्री दीपिकाआणि पति शोएब इब्राहिम सोशल मिडियावर सक्रिय असून ते आपल्या ब्लॉगच्या माध्यमातून दीपिकाच्या फॅन्सना तिच्या आरोग्याबाबत माहिती देत असतात.



नुकताच आपल्या एका ब्लॉगमध्ये दीपिकानं तिच्या आरोग्याबाबतची माहिती फॅन्ससोबत शेअर केली आहे. यावेळी तिने सांगितलं आहे की या आजारामुळे तिला भूख लागत नाही. तसेच, यावेळी ती योग्य तो आहार घेत असून या आजारामुळे तिला सतत थकवा जाणवत आहे. या आजारामुळे तिला मानसिक ताण येत असल्याचं सांगत दिपिका भावूक झाल्याचे पाहायला मिळाले.

दिपिकानं तिच्या आरोग्याविषयी चिंता व्यक्त करत या ब्लॉगमध्ये बोलताना पुढे सगळं व्यवस्थित होवो अशी आशा दीपिकानं व्यक्त केली आहे.

# नोराच्या 'सरके चुनर' वर कंगना रणौत यांची परखड टीका

रॅपर बादशाहच्या 'तेत्तिरी' गाण्यानंतर आता नोरा फतेही आणि संजय दत्त यांचे 'सरके चुनर तेरी सरके' हे गाणे वादात सापडले आहे. 'केडी: द डेव्हिल' या कन्नड चित्रपटातील या गाण्याचे बोल आणि नृत्याच्या स्टेप्समुळे सोशल मीडियावर एक नवीन वाद निर्माण झाला आहे. गाण्याचे बोल आणि अश्लील नृत्याच्या स्टेप्समुळे केवळ सामान्य जनताच नाही, तर अनेक सेलिब्रिटींचाही रोष ओढवला आहे, ज्यामुळे गाण्याची हिंदी आवृत्ती यूट्यूबवरून काढून टाकण्यात आली आहे. दरम्यान, बॉलिवूड अभिनेत्री आणि भाजप खासदार कंगना रणौत यांचीही या गाण्यावरील प्रतिक्रिया चर्चेत आहे, कारण त्यांनी गाण्याच्या अश्लील बोल आणि नृत्याच्या स्टेप्सवर तीव्र प्रतिक्रिया दिली आहे.



## कंगना राणौतची सरके चुनार तेरी सरकेवर नाराजी व्यक्त

नोरा फतेही आणि संजय दत्त यांच्यावर चित्रित झालेल्या गाण्यावर कंगना रणौतने जोरदार टीका केली आहे. बॉलिवूडने अश्लीलतेच्या सर्व मर्यादा ओलांडल्या आहेत, असे ती म्हणाली. अशा गाण्यांवर कठोर नियमनाची मागणी करत, अभिनेत्री म्हणाली की चित्रपट आणि गाण्यांमध्ये अश्लील आणि आक्षेपार्ह सामग्री सादर करण्यावर कठोर नियम असले पाहिजेत. अभिनेत्री म्हणाली की, आता अशी सामग्री सादर केली जात आहे की कुटुंबांना एकत्र बसून टीव्ही पाहणे कठीण झाले आहे.

## 'अश्लीलतेने सर्व मर्यादा ओलांडल्या'

कंगना रणौतने 'सरके चुनर' या गाण्यावरून निर्माण झालेल्या वादावर प्रतिक्रिया दिली आहे. ती म्हणाली, 'बॉलिवूडने अश्लीलता, प्रसिद्धीचे डावपेच आणि लक्ष वेधून घेण्याच्या बाबतीत सर्व मर्यादा ओलांडल्या आहेत. संपूर्ण देश त्यांचा निषेध आणि टीका करत आहे, पण मला नाही वाटत की त्यांना याची काही लाज वाटत असेल. यात काही नवीन नाही, कारण आपण लहानपणापासून अशी गाणी ऐकत आलो आहोत. मात्र, अशा आशयावर वेळोवेळी बंदी घालण्यात आली आहे आणि मला वाटते की आता आणखी कठोर कारवाई केली पाहिजे.'

कंगना पुढे म्हणाली, 'ज्या प्रकारे ही अश्लीलता सादर केली जात आहे, त्याचा सामाजिक संस्कृतीवरही परिणाम होत आहे. परिस्थिती इतकी गंभीर झाली आहे की कुटुंबांना एकत्र बसून टीव्ही पाहणेही अवघड झाले आहे. मला वाटते की बॉलिवूडला लगाम घालण्याची गरज आहे.'


## अरमान मलिकनेही केली नाराजी व्यक्त

कंगनाच्या आधी, गायक अरमान मलिकनेही या गाण्यावर उघडपणे टीका केली होती. त्याने या गाण्याला व्यावसायिक गीतलेखनाचा नीचतम स्तर म्हटले होते आणि हे गाणे आपण कधीच ऐकले नसते तर बरे झाले असते, असे म्हटले होते. या गाण्यावर प्रतिक्रिया देताना त्याने लिहिले, 'हे गाणे माझ्या टाइमलाइनवर आले आणि मी ते बरोबर ऐकले आहे याची खात्री करण्यासाठी मला ते पुन्हा ऐकावे लागले. व्यावसायिक गीतलेखन इतक्या खालच्या पातळीवर गेलेले पाहून वाईट वाटते.' दुसऱ्या एका ट्वीटमध्ये त्याने पुढे म्हटले, 'मला खरोखरच धक्का बसला आहे. मी याकडे दुर्लक्ष करू शकलो असतो तर बरे झाले असते.'

'सरके चुनार तेरी सरके' हे नोरा फतेही आणि संजय दत्त अभिनीत, कन्नड पॅन-इंडिया चित्रपट 'केडी: द डेव्हिल' मधील एक गाणे आहे. या गाण्यात, नोरा एका डान्स बारमध्ये संजय दत्त आणि काही बॅकग्राउंड डान्सर्ससोबत नाचताना दिसते. या गाण्याचा प्रोमो १३ मार्च रोजी प्रदर्शित झाला.

# Tv इंडस्ट्रीत अभिनय नाही तर 'कुंडली' पाहून काम

मनोरंजन विश्वात कास्टिंगच्या पद्धतीवरून नेहमीच काहीना काही वाद झाल्याचे आपण ऐकले असेल. एखाद्या कलाकाराची मनोरंजन विश्वात निवड होण्यासाठी त्याच्या अभिनय पाहिला जातो, हे सर्वांनाच माहित आहे. मात्र आता एका अभिनेत्रीने केलेल्या दाव्यामुळे सर्वांनाच धक्का बसला आहे. 'बिग बॉस ओटीटी २' फेम अभिनेत्री फलक नाझ हिने टीव्ही इंडस्ट्रीतील कास्टिंग प्रक्रियेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत.



फलकच्या मते, सध्या इंडस्ट्रीत कलाकारांचे टैलेंट किंवा अभिनय कौशल्य नाही, तर चक्क त्यांची जन्मकुंडली पाहून त्याला काम दिले जात असल्याचा दावा तिने केला आहे.

फलक नाजने तिच्या इंस्टाग्राम अकाउंटवर एक व्हिडिओ शेअर करत एका हिट निर्मात्यावर निशाणा साधला आहे.

तिने म्हटले की, 'पूर्वी कलाकारांना त्यांच्या कामाच्या जोरावर भूमिका मिळायच्या, पण आता काळ बदलला आहे.

आता तुमचे इंस्टाग्राम फॉलोअर्स आणि तुमची जन्मकुंडली पाहून तुम्हाला काम दिले जाते. इंडस्ट्रीतील एक अतिशय हिट निर्माते आहेत, ज्यांच्याकडे ही नवी पद्धत सुरू आहे.' फलकनने या निर्मात्याचे नाव थेट घेतले नसले तरी, सोशल मीडियावरील अनेक तर्क वितर्क लावले जात आहेत.आपला अनुभव सांगताना फलक पुढे म्हणाली की, 'नुकताच मला एका प्रोडक्शन हाऊसचा फोन आला होता. त्यांनी मला एका चॅनलवरील शो आणि त्यातील पात्राबद्दल माहिती दिली.

साधारणपणे अशा वेळी कलाकारांना लुक टेस्ट किंवा ऑडिशनसाठी बोलावले जाते, पण त्यांनी मला माझी जन्मतारीख, जन्मवेळ आणि जन्मस्थान विचारले.

# नोरा फतेहीचे अश्लील गाणे यूटयुबवरून हटवले



नोरा फतेही-संजय दत्तचे 'सरके चुनर तेरी' हे अश्लील गाणे यूटयुबवरून हटवण्यात आले आहे. 'केडी – द डेव्हिल' चित्रपटातील या गाण्यावर टीका होत आहे. या गाण्याविरोधात दिल्ली पोलिसांच्या सायबर सेलमध्ये तक्रार दाखल झालेली आहे. हे गाणे लैंगिकतेला प्रोत्साहन देत असून समाजाची नकारात्मक प्रतिमा दर्शवते, असे तक्रारीत म्हटले होते. गाण्याचा गीतकार रकीब आलाम, दिग्दर्शक प्रेम, संगीतकार अर्जुन जन्या आणि गायिका मंगळी यांच्यावरही कारवाईची मागणी करण्यात आली. वादविवादानंतर गाण्याचे हिंदी व्हर्जन यूटयुबवरून काढून टाकण्यात आले.

# दीपिका-आलिया-साई पल्लवीला एकत्र आणणार अश्विनी अय्यर तिवारी?




एका फिल्म फेस्टिव्हलदरम्यान त्यांनी ही इच्छा व्यक्त केली. त्यांनी सांगितले की, 'माझ्या विश लिस्टमध्ये अनेक कलाकार आहेत, पण सध्या दीपिका, आलिया आणि साई पल्लवी या तिघी आहेत. मला आशा आहे की त्या माझं म्हणणं ऐकत असतील.' त्यांनी ही इच्छा 'युनिव्हर्स'मध्ये पाठवत असल्याचंही मजेशीरपणे सांगितलं. बॉलिवूडमधील प्रसिद्ध दिग्दर्शिका अश्विनी अय्यर तिवारी यांनी नुकताच आपल्या ड्रीम प्रोजेक्टचा खुलासा केला आहे. 'निल बटे सन्नाटा' आणि 'बरेली की बर्फी'सारख्या यशस्वी चित्रपटांसाठी ओळखल्या जाणाऱ्या अश्विनी यांनी सांगितले की, त्यांना मोठ्या बजेटची फिल्म बनवायची आहे आणि त्यात त्या दीपिका पादुकोण, आलिया भट्ट आणि साई पल्लवी यांना एकत्र कास्ट करू इच्छितात.

एका फिल्म फेस्टिव्हलदरम्यान त्यांनी ही इच्छा व्यक्त केली. त्यांनी सांगितले की, 'माझ्या विश लिस्टमध्ये अनेक कलाकार आहेत, पण सध्या दीपिका, आलिया आणि साई पल्लवी या तिघी आहेत. मला आशा आहे की त्या माझं म्हणणं ऐकत असतील.' त्यांनी ही इच्छा 'युनिव्हर्स'मध्ये पाठवत असल्याचंही मजेशीरपणे सांगितलं.

या प्रोजेक्टबद्दल बोलताना अश्विनी यांनी फिल्म इंडस्ट्रीतील जेंडर विषमतेवरही भाष्य केलं. त्या म्हणाल्या, '१०० किंवा १००० कोटींचा चित्रपट एखादी महिला का बनवू शकत नाही? फक्त पुरुष दिग्दर्शकच का मोठे प्रोजेक्ट करतात?' त्यांच्या या वक्तव्याने अनेकांचं लक्ष वेधलं आहे. विशेष म्हणजे त्यांचे पती नितेश तिवारी हेही मोठ्या बजेटच्या चित्रपटांवर काम करत आहेत. अश्विनी यांनी सांगितलं की, मोठा प्रोजेक्ट बनवण्यासाठी फक्त कल्पना पुरेशी नसते, तर प्रोडक्शन स्टुडिओचं मजबूत समर्थनही तितकंच गरजेचं असतं. बजेट, प्लॅनिंग आणि दीर्घकालीन धोरण या गोष्टी महत्त्वाच्या असतात. त्याचबरोबर त्यांनी भविष्यात अ?क्शन चित्रपट करण्याची इच्छा व्यक्त केली. त्यांना अ?क्शनसोबत इमोशन असलेले चित्रपट आवडतात. त्यांनी 'स्पायडर-मॅन' आणि 'शहंशाह'सारख्या चित्रपटांचा उल्लेख करत आपली आवड स्पष्ट केली. तसेच त्यांनी गीतू मोहनदास यांच्या 'टॉक्सिक' या चित्रपटाचं कौतुक केलं आणि यश यांचंही अभिनंदन केलं.

अश्विनी म्हणाल्या की, चांगली कथा आणि दिग्दर्शकावर विश्वास असेल, तर चित्रपट मोठा होऊ शकतो. त्यासाठी दिग्दर्शक पुरुष आहे की महिला, याला महत्त्व नसतं.

त्यांनी हेही सांगितलं की, प्रेक्षकांची आवड समजून घेण्यासाठी त्या स्वतः थिएटरमध्ये जाऊन चित्रपट पाहतात. अश्विनी अय्यर तिवारी या मूळच्या मुंबईतील असून त्यांनी जाहिरात क्षेत्रात अनेक वर्ष काम केलं आहे. त्यानंतर त्यांनी चित्रपटसृष्टीत प्रवेश केला आणि आज त्या एक यशस्वी दिग्दर्शिका व निर्माती म्हणून ओळखल्या जातात. त्यांच्या या ड्रीम प्रोजेक्टची चर्चा सध्या जोरात असून, जर हा प्रोजेक्ट साकार झाला तर बॉलिवूडमध्ये मोठा बदल घडू शकतो.

# ‘या’ फळाचे नियमित सेवन ठरेल फायदेशीर



आपल्या आरोग्यासाठी फळे ही अंत्यत फायदेशीर असतात. त्यामुळे फळांच सेवन करणं महत्वाचं मानलं जातं. यापैकीच चिकू हे फळ अनेकांना आवडतं. तसेच, चिकू हे फळ चवीलाही स्वादिष्ट असून हे आपल्या शरीरासाठी गुणकारी फळ आहे. चिकू हे फळ हृदय आणि रक्तवाहिन्यांपासून ते किडनीपर्यंतच्या आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर मानले जाणारे फळ आहे.

चिकू फळाचं सेवन केल्यानं हृदयविकाराचा धोका कमी होण्यास आणि हृदयाचे आरोग्य सुधारण्यास मदत मिळते. या फळामुळे हृदय आणि रक्ताभिसरण प्रक्रिया सुरळीत होण्यास मदत होते. तसेच, चिकू हे फळ दिसायला छोटं असलं तरी यामध्ये पोटॅशियम, मॅग्नेशियम, लोह, व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन ए आणि फायबर हे घटक मोठ्या प्रमाणात असतात. हे सर्व घटक एकत्रितपणे हृदय आणि रक्तवाहिन्यांचे आरोग्य सुधारण्यास फायदेशीर ठरतात. पोटॅशियममुळे रक्तदाब नियंत्रित राहतं. तसेच, यामुळे उच्च रक्तदाबाचा धोका कमी होण्यास मदत होते. मॅग्नेशियम रक्तवाहिन्यांना आराम देतं आणि धमन्यांमध्ये ’प्लाक’ जमा होण्यापासून रोखण्यास मदत करते. आयुर्वेदताही चिकूला फार महत्व असून हे फळ आपल्या शरीरातील रक्ताची कमतरता किंवा ?निमियाची समस्या दूर करण्यासाठी उपयुक्त ठरते. तर, यामध्ये असलेले लोह आणि फॉलिक ॲसिडमुळे लाल रक्तपेशींच्या निर्मिती होण्यास मदत मिळते. चिकू फळाचं सेवन नियमितपणे केल्याने शरीरातील हिमोग्लोबिनची पातळी वाढण्यास मदत होते. तसेच, शरीरातील ऑक्सिजनचा पुरवठाही सुधारण्यासाठी चिकू फायदेशीर ठरते. चिकू फळात असणारे अँटी-ऑक्सिडंट्स शरीरातील विषारी घटक बाहेर टाकण्यास उपयुक्त ठरतात. तसेच, यामुळे किडनीवरील अतिरिक्त ताण कमी होण्यास मदत होते.

चिकू हे फळ एक स्वस्त आणि मस्त असं फळ असून यामुळे आपली पचनसंस्थाही निरोगी राहते. तसेच, चिकूमुळे पचनासंबधित असलेल्या समस्या कमी होण्यास मदत होते.

# ‘अंडे का फंडा’ बिघडला!!



आखाती युद्धाचा परिणाम हिंदुस्थानातील मार्केटवर झाला आहे. देशभरात अंडय़ांच्या किमतीत अचानक ३० ते ४० टक्क्यांची घसरण झाल्याने ग्राहकांना मोठा दिलासा मिळाला असला तरी व्यापाऱ्यांसाठी ही परिस्थिती चिंतेची ठरत आहे. बाजारात अंडय़ांची किंमत प्रति अंडे सुमारे ७ रुपयांवरून घसरून ५ रुपयांपर्यंत आली आहे. युद्धामुळे पोल्ट्री उद्योगासाठी परिस्थिती अस्थिर बनली आहे. मध्यपूर्वेतील संघर्षामुळे खाडी देशांकडे होणा-या अंडय़ांच्या निर्यातीवर मोठा परिणाम झाला आहे. दरम्यान निर्यात ठप्प झाल्याने मोठय़ा प्रमाणात अंडी देशांतर्गत बाजारात उपलब्ध झाली असून त्याचा थेट परिणाम किमतींवर झाला आहे. १०० अंडी सुमारे ५०० रुपयांत उपलब्ध होत आहेत. किरकोळ बाजारातही अंडय़ांच्या दरात घट झाली असून, पूर्वी ८ ते ९ रुपयांना विकले जाणारे अंडे आता ५.५० ते ६ रुपयांच्या दरम्यान मिळत आहे.

दिवसाला एक कोटी अंडय़ांची निर्यात

निर्यात घसरणीमागे आखाती देशातील वाढते तणावपूर्ण वातावरण कारणीभूत आहे. सुरक्षेच्या कारणांमुळे आणि वाहतूक मार्गांमध्ये अडथळे निर्माण झाल्याने संयुक्त अरब अमिरात, ओमान, कतार आणि बरीन यांसारख्या देशांशी होणारा व्यापार मोठय़ा प्रमाणात बंद झाला आहे. युद्धाआधी दररोज सुमारे १ कोटी अंडय़ांची निर्यात केली जात होती. विशेष म्हणजे देशातील एकूण निर्यात योग्य अंडय़ांपैकी जवळपास ८० टक्के अंडी ही केवळ आखाती देशांमध्ये पाठवली जात होती. मात्र सध्या निर्यात थांबल्यामुळे हा मोठा साठा देशांतर्गत बाजारात आणला जात आहे. या परिस्थितीत व्यापा-यांना तोटा सहन करावा लागत असला तरी सामान्य ग्राहकांसाठी ही दिलासादायक बाब आहे. किमती कमी झाल्यामुळे अंडय़ांची मागणी पुन्हा वाढू लागली आहे.



## उन्हाळ्यात वाळ्याचा वापर करण्याचे आरोग्यवर्धक फायदे

वाळा हे एक सुगंधी गवत असून, त्याच्या वाळलेल्या मुळांचा वापर मुख्यत्वे उन्हाळ्यात नैसर्गिक थंडावा मिळवण्यासाठी केला जातो. हे सुगंधी, उष्णताश्मक आणि औषधी गुणधर्मांनी भरलेले आहे. माठातील पाणी थंड करण्यासाठी तसेच सरबत बनवण्यासाठी, तसेच त्वचेच्या आरोग्यासाठी आणि सुगंधी तेल आणि अत्तर बनवण्यासाठी वाळाचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जातो.

वाळ्यामध्ये शीतलता असल्याने उन्हाळ्यात शरीराचे तापमान तसेच शरीराला थंडावा देण्यासाठी वाळ्याचे पाणी उपयुक्त ठरते.

उन्हाळ्यात जर पित्ताचा त्रास होत असेल तर, भिजवलेल्या वाळाचे पाणी प्यावे. यामुळे पित्त कमी करण्यास मदत होते.

वाळ्याचे पाणी प्यायल्याने शरीरातील पचनक्रिया सुधारते. तसेच बद्धकोष्ठता यांसारख्या समस्यांपासून आराम मिळण्यास मदत होते.

वाळ्यामध्ये रोगप्रतिकारशक्ती वाढवणारे गुणधर्म असतात ज्यामुळे शरीराला अनेक आजारांशी लढण्याची ताकद मिळते

वाळ्यामध्ये झिंक असल्यामुळे डोळ्यांना थंडावा मिळतो आणि डोळ्यांबाबतीत काही समस्या असतील तर त्या देखील कमी होण्यास मदत होते.

उन्हाळ्यातील लागणारा थकवा कमी करण्यासाठी वाळाचे सरबत उपयुक्त ठरते.

उन्हाळ्यात येणाऱ्या घामामुळे शरीराला दुर्गंधी येते. ही दुर्गंधी कमी करण्यासाठी वाळाचा उपयोग होतो. तसेच अत्तर म्हणुन देखील वाळाचा वापर केला जातो.

# सब्जा सिड्स खाणे गरजेचे



सब्जा सीड्स ज्याला तुळशीच्या बिया किंवा फालुदा बिया असेही म्हणतात. सब्जा सीड्स पोषक तत्वांनी समृद्ध असून प्रामुख्याने शरीराला थंडावा देण्यासाठी, पचनक्रिया सुधारण्यासाठी आणि वजन कमी करण्यासाठी उत्तम मानले जाते. यात फायबर, ओमेगा-३ फॅटी ॲसिडस्, आणि अनेक जीवनसत्त्वे असतात. सब्जा खाल्ल्याने शरीराला कोणते आरोग्य फायदे होतात जाणुन घ्या.

**शरीराचे तापमान टिकवून ठेवण्यास मदत**

सब्जाच्या बियांवर असलेल्या बुळबुळीत जेलसारखे आवरणात पाण्यात भिजवल्यावर त्यांमध्ये नैसर्गिक शीतलता देणारे गुणधर्म येतात. हा बुळबुळीत पदार्थ शरीरातील ओलावा शोषून घेतो आणि त्वचेला आर्द्रता प्रदान करतो. यामुळे शरीरातीत तापमान टिकवून ठेवण्यास मदत होते.

**शरीराला हायड्रेट ठेवते**

सब्जाच्या बियांमध्ये पाणी शोषुन घेण्याची क्षमता जास्त असते. पाण्यात भिजवलेला सब्जा खाल्याने शरीराला हायड्रेट करण्यास मदत होते. तसेच भिजवलेला सब्जा लिंबू सरबत व नारळाचे पाणी यांसारख्या पेयांनमध्ये घातल्यावर या पेयांची चव आणखी वाढवते.

**पचनास मदत करते**

सब्जाच्या बियांमध्ये डायटरी फायबर असते. ज्यामुळे आतड्यांचे आरोग्य सुधारते, पोट फुगणे कमी होते आणि तीव्र उष्णतेशी संबंधित समस्यांमध्ये देखील सब्जाची मदत होते.

**वजन नियंत्रित ठेवण्यस मदत होते**

सब्जाच्या बियांमध्ये भरपूर फायबर असल्यामुळे त्या तुमचे वजन नियंत्रित ठेवण्यास मदत करू शकतात. याम्रुळे पोट जास्त वेळ भरल्यासारखे वाटते.

आम्लपित्त कमी करण्यास मदत होते.सब्जाच्या बियांचा थंड स्वभाव पोटातील आम्ल कमी करण्यास मदत करतो. त्यामुळे उन्हाळ्यात त्या प्रभावी ठरतात. सब्जाचे पाणी पिल्याने शरीरातील आम्लपित्त आणि छातीत जळजळ कमी करण्यास मदत करतात.

**रक्तातील साखरेची पातळी सुधारते**

सब्जाच्या बिया खाल्याने शरीरात कर्बोदकांचे ग्लुकोजमध्ये होणारे रूपांतर मंदावते. ज्यामुळे रक्तातील साखरेची पातळी स्थिर राहण्यास मदत होते.

**त्वचेच्या आरोग्यासाठी मदत करते**

सब्जाच्या बियांमध्ये डिटॉक्सिफायिंग गुणधर्म आणि अँटीऑक्सिडंट्स असतात. जे त्वचेच्या पेशी दुरुस्त करण्यास आणि त्वचेला स्वच्छ व चमक देण्यास मदत करतात.


## चारशे वर्ष जुनी शिवकालीन भत्कम पुरणपोळी

भत्कम पुरणपोळी म्हणजे तांदळाच्या पीठापासून बनवलेली पारंपारिक पुरणपोळी. या पुरणपोळीचा उल्लेख शिवकालीन काळात झाला आहे.

**साहित्य –** तांदूळ, मीठ, तूप, गूळ, तांदळाचं पीठ, जायफळ

**कृती –** तांदूळ स्वच्छ धुवून वाळवून घेतले. तांदूळ वाळल्यानंतर तुपात भाजून घ्या व नंतर मिक्सरमधून त्याची भरडी करा.

त्यानंतर कढईत तूप घालून ती भरड टाका, त्यात गरम पाणी व किसलेला गूळ घाला. त्यात जायफळ, मीठ टाकून पुरण तयार करून



घ्या.

दुसऱ्या बाजूला कढईत गरम पाणी करून मीठ व तूप टाकून उकड काढून घ्या. पीठ हलके थंड झाले तकी चांगले मळून घ्या.

या उकडीचे मोठे गोळे घेऊन त्याची वाटी तयार करा.

त्यात पुरणाचा गोळा भरा व त्याचा गोळा तयार करा. त्याची पुरणपोळी लाटून गरम तव्यावर तूप घालून शेकून घ्या.

अशा प्रकारे आपली भत्कम पुरणपोळी तयार झाली.अशी पुरणपोळी चारशे वर्षापूर्वी आपल्याकडे बनविल्या जात असे जी आवडीने खायचे.

# डिटॉक्स वॉटर घेतल्याने शरीरात कोणते बदल होतात?

उन्हाळा सुरू झाला आहे. या ऋतूमध्ये शरीराला निरोगी आणि हायड्रेट ठेवण्याची आवश्यकता असते. म्हणूनच, अनेकदा आपण आहारात डिटॉक्स वॉटरचा समावेश करतो. पण तुम्हाला माहित आहे का की डिटॉक्स वॉटर प्राशन केल्याने केवळ विषारी पदार्थ बाहेर पडत नाहीत तर शरीराला इतर फायदे देखील मिळतात.

आरोग्य आणि तंदुरुस्तीबद्दल लोकांमध्ये जागरूकता पूर्वीपेक्षा वाढली आहे. विशेषतः उन्हाळ्यात लोक त्यांचे शरीर आतून हायड्रेटेड आणि निरोगी ठेवण्यासाठी विविध पद्धतींचा अवलंब करतात. अशीच एक पद्धत म्हणजे डिटॉक्स वॉटर जी अनेकांच्या दैनंदिन दिनचर्येचा भाग बनवली आहे. लिंबू, काकडी, पुदिना, आले किंवा काही फळे पाण्यात मिसळून तयार केलेले हे ड्रींक ताजेतवाने ठवतेच, तसेच शरीर निरोगी ठेवण्यासही मदत करते. तुम्ही डिटॉक्स वॉटर पित असाल किंवा या उन्हाळ्यात ते पिण्याचा विचार करत असाल तर जाणुन घ्या डिटॉक्स वॉटर पिण्याचे फायदे.

**शरीर हायड्रेटेड ठेवते**

डिटॉक्स वॉटर प्राशन केल्याने शरीरातील डिहायड्रेशन भरून काढण्यास मदत करते. पाण्यात लिंबू, काकडी किंवा पुदिना सारखे घटक घातल्याने पाणी चवदार बनते. ज्यामुळे शरीर जास्त काळ हायड्रेट राहण्यास मदत होते आणि थकवा टाळता येतो.

**पचन सुधारते**

डिटॉक्स वॉटर पचनसंस्था सक्रिय ठेवण्यास मदत करते. त्यातील नैसर्गिक घटक पोट हलके ठेवण्यास मदत करतात आणि गॅस, अपचन किंवा जडपणा यासारख्या समस्या कमी करण्यास मदत करू शकतात.

शरीरातील विषारी पदार्थ



काढून टाकण्यास मदत करते

डिटॉक्स वॉटर शरीरातील हानिकारक पदार्थ काढून टाकण्याच्या प्रक्रियेला मदत करते. पुरेसे पाणी पिल्याने मूत्रपिंड आणि यकृताचे कार्य सुरळीत होण्यास मदत होते. ज्यामुळे शरीर आतून निरोगी राबण्यास मदत होते.

**पोटफुगी कमी करते**

जर तुम्हाला पोटोत पाणी साचून राहण्याची किंवा पोट फुगण्याची समस्या असेल तर डिटॉक्स वॉटर फायदेशीर ठरू शकते. ते शरीरातील द्रवपदार्थांचे संतुलन सुधारण्यास मदत करते आणि सूज आणि पोट फुगणे कमी करू शकते.

# उन्हाळ्यात दही खाणे का फायदेशीर?

उन्हाळ्यात रोजच्या आहारात दहीचा समावेश केल्यास पचन सुधारते, शरीराला थंडावा मिळतो आणि आरोग्य चांगले राहण्यास मदत होते. त्यामुळे उन्हाळ्याच्या दिवसांत दही खाणे हा एक सोपा आणि आरोग्यदायी पर्याय ठरू शकतो. आपल्या घरांमध्ये रोजच्या जेवणात दह्याचा समावेश असतो. दही हे कमी कॅलरीचे आणि अत्यंत पौष्टिक अन्न मानले जाते. विशेषतः उन्हाळ्यात दही खाणे आरोग्यासाठी खूप फायदेशीर ठरते. दही शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यास, पचनसंस्था निरोगी ठेवण्यास आणि वजन नियंत्रणात ठेवण्यास मदत करते. उन्हाळ्यात दही खाल्ल्याने शरीराला थंडावा मिळतो आणि उष्णतेमुळे होणाऱ्या अनेक त्रासांपासूनही संरक्षण मिळते.



दही हे पचनासाठी अत्यंत चांगले अन्न मानले जाते. दह्यामध्ये जिवंत बॅक्टेरिया म्हणजेच प्रोबायोटिक्स असतात, जे आतड्यांच्या आरोग्यासाठी फायदेशीर ठरतात. हे प्रोबायोटिक्स अन्न पचवण्यास मदत करतात आणि शरीराला पोषक घटकांचे शोषण अधिक चांगल्या प्रकारे करता येते. तसेच दही आतड्यांमध्ये हानिकारक बॅक्टेरियांची वाढ रोखण्यास मदत करते, त्यामुळे बद्धकोष्ठता, पोटफुगी आणि जुलाब यांसारख्या समस्या कमी होतात. दही हे कमी फॅट आणि कमी कॅलरी असलेले अन्न आहे. त्यामध्ये प्रथिनांचे प्रमाण चांगले असल्याने ते पोट जास्त वेळ भरल्यासारखे ठेवते. त्यामुळे वारंवार भूक लागत नाही आणि वजन नियंत्रणात ठेवण्यास मदत होते.

दह्यातील कॅल्शियम हार्मोनच्या संतुलनावरही सकारात्मक परिणाम करून वजन व्यवस्थापनात मदत करते. दह्यामध्ये ट्रिप्टोफॅन नावाचे अमिनो असते, जे ताण आणि चिंतेची पातळी कमी करण्यास मदत करते.

# लाचखोरी थांबवा

**सर्व राज्यांनी आर्थिक शिस्त बाळगावी अशी सूचना नीती आयोगाने केली आहे. यासाठी जी नियमावली तयार केली आहे, त्याचे पालन करावे आणि करसंकलन वाढवण्याचा प्रयत्न करावा, असेही आयोगाने म्हटले आहे. सध्या देशाच्या आणि जगाच्या अर्थव्यवस्थेसमोर मोठे प्रश्न निर्माण झाले आहेत. अगदी अस्थिर आणि अनिश्चित असे वातावरण आहे. त्यामुळे केंद्र सरकारची व सर्व राज्यांची जबाबदारी अधिकच वाढली आहे. तिचे निर्वहन प्रामाणिकपणे करणे आवश्यक असताना राज्यांकडून बेजबाबदारपणाचा आणि बेफिकिरीचाच कारभार पाहायला मिळतो आहे. विविध योजना जाहीर केल्या जात आहेत. त्या कल्याणकारी असेल तर ठीक, पायाभूत सुविधा अथवा दीर्घकालीन लाभ देणाऱ्या योजना असतील तर त्यालाही ना नाही; तथापि, राज्यांकडून सरसकट फुकटात वाटप कार्यक्रम चालू आहे. राज्ये आणि तेथील राजकारणी त्यांच्या कथित योजनांना कितीही आकर्षक आणि भावनेला हात घालणारी नावे देत असलीत तरी अंततः त्यांच्याकडून जे दिले जाते आहे तो लाचेचाच प्रकार असून ही लाच राजरोसपणे आणि गाजावाजा करत दिली जाते आहे.**



राज्यांचा आणि देशाचा विकास करावयाचा असेल आणि देशाला दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर जाऊ द्यायचे नसेल तर नीती आयोग म्हणते त्याप्रमाणे आर्थिक शिस्त अंगिकारावी लागेलच, त्यातही सरकारी लाचखोरीला प्रथम लगाम घालावा लागेल. दुर्दैवाने हेच होणे शक्य नसल्याचे दिसते आहे. निवडणुकांच्या सुमारास राजकीय पक्षांकडून मतदारांना आमिष दाखवले जाते. पंतप्रधानांनी स्वतः या आमिषांना व त्यासंदर्भातील घोषणांना रेवडी संस्कृती म्हणून हिणवले होते. गमतीचा भाग असा की खुद्द त्यांच्याच पक्षाची सरकारे असणाऱ्या राज्यांनीही ही रेवडी संस्कृती पावन करून घेत तिचा स्वीकार केला.

मध्य प्रदेश आणि राजस्थान ही राज्ये त्याची ठळक उदाहरणे. महाराष्ट्रानेही विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर हाच रेवडीचा मार्ग पत्करला. रेवडीची लाचखोरी किती शिगेला गेली आहे त्याची बोलकी आकडेवारी समोर आली आहे. तमिळनाडूसाठी हे वर्ष निवडणुकीचे वर्ष असल्यामुळे तेथील द्रमुक सरकारने आपल्या अर्थसंकल्पात तब्बल ९९ हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. ही सगळीच रक्कम जनतेला म्हणजेच मतदारांना विविध योजनांच्या माध्यमातून जे काही मोफत द्यायचे आहे त्यासाठी खर्च केली जाणार आहे.

यातला मजेशीर भाग असा की विकासकामांसाठी केवळ ४७ हजार कोटींची सोय केली आहे. म्हणजे मोफत वाटण्यासाठी जी तरतूद केली आहे त्याच्या निम्मे ही रक्कम आहे. कर्नाटक राज्यावरचा कर्जाचा बोजाही जवळपास ७ लाख कोटींवर पोहोचला असून गेल्या दहा वर्षांतील सगळ्यात वाईट स्थितीत राज्य पोहोचले आहे. त्यालाही कारण अडीच वर्षांपूर्वी झालेल्या विधानसभा निवडणुकीत जाहीर केलेल्या रेवड्याच आहेत. मध्य प्रदेशचे बजेट साडेचार लाख कोटींचे आहे. यातील ८० हजार कोटींची रक्कम लाडली बहना, लाडली लक्ष्मी, तीर्थयात्रा अशा लोकप्रिय योजनांवर खर्च होणार आहे.

दोन दिवसांपूर्वीच्या महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पातही लाडक्या बहिणींसाठी अशीच मोठी तरतूद करण्यात आली आहे. ममता बॅनर्जी यांनीही बंगालमध्ये महिला आणि तरुणांसाठी अशाच रोख रकमेच्या योजना जाहीर केल्या आहेत. काही महिन्यांपूर्वी बिहार विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर तेथील सरकारने महिलांच्या खात्यात १० हजार रुपये जमा केले होते. तोच प्रकार कालच आसाम सरकारने केला आहे.

पुढच्या चार महिन्यांत या राज्यात निवडणूक होणार आहे. त्याच्या अगोदरच राज्य सरकारने ४० लाख महिलांच्या खात्यावर प्रत्येकी ९ हजार रुपये जमा केले आहेत. ज्या राज्यांत निवडणुका झाल्या आहेत तेथे ज्या पक्षांनी मोफत पैसे दिले त्यांना जनतेने निवडून दिले. ज्या राज्यांत निवडणुका होणार आहे तेथेही मोफत पैशाची घोषणा केली जाते आहे. पंजाब आणि तमिळनाडू या राज्यांनी मोफत वीज देण्याचे जाहीर केले.

तमिळनाडूला सर्वोच्च न्यायालयाने फटकारले तरी त्या राज्याने न्यायालयाला वळसा घालून ९९ हजार कोटींची तरतूद करावी याचा अर्थ निवडणुका जिंकणे हा एकमेव उद्देश त्यामागे आहे.

नीती आयोग, अर्थ तज्ज्ञ अथवा रिझर्व्ह बँक काय म्हणते याची या राज्यांना अथवा त्यांच्या नेत्यांना कल्पना नाही अशातला भाग नाही. तथापि, सत्तेचा स्वार्थ त्यांना वास्तवाकडे पाठ करण्याकरता भाग पाडतो. न्यायालयेही येथे काही करू शकत नाहीत. ते फारतर ताशेरे ओढू शकतात. मात्र, कायद्याने राजकीय पक्षांना तसे कोणते बंधन घालू शकत नाहीत.

मतदारांना आश्वासने अथवा हमी देण्याच्या नावावर जोपासली जाणारी ही नवी राजकीय संस्कृती दिवसेंदिवस धोकादायक होत चालली आहे. त्याचे कारण तिने मतदारांच्या विचारशक्तीवरच आता नियंत्रण मिळवण्यास सुरुवात केली आहे. सरकार नावाची जी यंत्रणा आहे त्याचे कार्य काय, त्यांचे कर्तव्य काय आणि त्यांच्या जबाबदाऱ्या काय याचा विचार मतदारांकडून होणे अपेक्षित आहे. त्यानुसारच त्यांनी आपले सरकार निवडणे आवश्यक आहे. लाचखोरीच्या संस्कृतीने हाच मतदारही आता वैयक्तिक लाभ आणि लोभाच्या आहारी जाऊन निर्णय घेऊ लागला आहे.

सरकारची कार्यकुशलता आणि पारदर्शकता याऐवजी मोफत काय मिळते याचे त्यांना आकर्षण आहे. मतदार भरकटला असल्यामुळेच राजकीय पक्ष राज्य आणि राष्ट्रहिताला तिलांजली देत लाच देत आपला स्वार्थ साधत आहेत. अगोदर जी मंडळी याला विरोध करत होती त्यांनीही आता या तडजोडीच्या राजकारणाशी जुळवून घेतले आहे. नीती आयोग आणि अन्य जबाबदार संस्थांनाच आता यावर अंकुश आणावा लागेल.

# जगावे की... मरावे...?

प्रख्यात ब्रिटिश नाटककार विल्यम शेक्सपियर याने आपल्या लोकप्रिय 'हॅम्लेट' या नाटकामध्ये 'टू बी ऑर नॉट टू बी' म्हणजेच 'जगावे की मरावे हाच खरा प्रश्न आहे' हा संवाद लोकप्रिय केला. आपल्या रुग्णाविषयी कितीही काळजी वाटत असली तरी त्याची एकदा सुटका व्हावी असेही त्यांना वाटत असते.

रुग्णाने दुःखात जगावे की शांतपणे मरावे हा प्रश्न त्याच्या नातलगानाच पडलेला असतो. या प्रकरणामध्येही हरीश



बुधवारी सर्वोच्च न्यायालयाने इच्छामरणाबाबत एक लँडमार्क निकाल देताना शेक्सपियरच्या या नाटकाचा आणि या संवादाचा संदर्भ दिला आहे. हरियाणातील ३३ वर्षीय हरीश राणा या युवकाला पॅसिव्ह पद्धतीने इच्छामरण देण्यात यावे अशी परवानगी सर्वोच्च न्यायालयाने दिल्यामुळे भारतातील हा पहिला निकाल ठरला आहे. २०१८ मध्ये सर्वोच्च न्यायालयानेच आपल्या एका निकालामध्ये मरण हा मूलभूत हक्क असल्याचे मान्य केले होते. इच्छा मरणाबाबत गाइडलाइन्स तयार कराव्यात असे आदेशही सरकारला दिले होते.

पण त्यानंतर इच्छा मरणाबाबत सुप्रीम कोर्टाने किंवा अन्य कोणत्याही न्यायालयाने अशा प्रकारचा निकाल दिला नव्हता. पण या केसमध्ये मात्र सर्वोच्च न्यायालयाने हरीश राणा याचे सर्व वैद्यकीय उपचार थांबवून त्याला एक शांत मरण द्यावे, असे सुचवले आहे. वयाच्या विसाव्या वर्षी शिक्षण घेत असताना इमारतीच्या चौथ्या मजल्यावरून पडून ब्रेन डेड झालेल्या हरीश राणावर गेल्या १३ वर्षांपासून उपचार सुरू होते. त्याचे वयोवृद्ध आई-वडील त्याची संपूर्णपणे काळजी घेत होते. पण त्याच्या प्रकृतीत कोणतीही सुधारणा होत नव्हती.

नाका तोंडाला नळ्या लावूनच त्याच्या आहाराची काळजी घेतली जात होती. हरीशवर अजून कितीही उपचार केले तरी त्याच्या प्रकृतीत कोणतीही सुधारणा होणार नाही, अशा प्रकारचा अहवाल मेडिकल बोर्डाकडून आल्याने आणि हरीशच्या आई-वडिलांनीच इच्छामरणाला परवानगी देण्याची मागणी केल्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने सर्व गोष्टींचा विचार करून हा महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. या निकालाच्या निमित्ताने केंद्र सरकारने पॅसिव्ह युथेनेशिया म्हणजेच पॅसिव्ह पद्धतीचे इच्छामरण देणे याबाबत आणखी काही मार्गदर्शक तत्त्वे तयार करावीत असेही सांगितले आहे.

रुग्णावर उपचार करणाऱ्या कोणत्याही डॉक्टरचे प्रथम ध्येय जरी रुग्णाचा जीव वाचवणे हेच असले तरी, डॉक्टर जे उपचार करत आहेत त्याचा फायदा होणार नसेल तर काय करावे हा प्रश्न नेहमीच निर्माण होतो. हरीशला तेरा वर्षे अशाच प्रकारे जगवले जात होते. खरं तर शेक्सपियरने म्हटल्याप्रमाणे अशा रुग्णांबाबतच नेहमी जगावे का मरावे हा प्रश्न निर्माण होत असतो. त्याच्या जवळच्या नातेवाईकांना या राणाच्या आई-वडिलांनीच पुढाकार घेऊन इच्छामरणाची मागणी केल्यामुळे सर्वोच्च न्यायालयाला हा महत्त्वाचा निर्णय द्यावा लागला. रुग्णाचे सर्वोच्च हित हा एकमेव विषय समोर ठेवून सर्वोच्च न्यायालय निर्णय घेत आहे असे निकाल पत्रात न्यायालयाने म्हटले आहे.

म्हणजेच जर एखाद्या रुग्णाची प्रकृती सुधारण्याची शक्यता असेल तर त्याला कधीच इच्छामरणाला परवानगी दिली जाणार नाही. पण उपचाराला अजिबात प्रतिसाद मिळत नसेल तर लाइफ सपोर्ट सिस्टीम काढून घेऊन आणि वैद्यकीय उपचार थांबून अशा रुग्णाला शांतपणे मरण्याची परवानगी दिली जाऊ शकते असे सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निकाल पत्रात सुचवले आहे. गेल्या अनेक वर्षांत सर्वोच्च न्यायालयाने आतापर्यंत जे लँडमार्क निकाल दिले त्यापैकी हा एक अत्यंत महत्त्वाचा निकाल मानावा लागेल.

आगामी कालावधीमध्ये याबाबत चर्चा होणे अपेक्षित आहे आणि या निमित्ताने केंद्र सरकारने आपल्या पातळीवर हालचाली करून इच्छामरणाबाबत काही आदर्श मार्गदर्शक तत्त्वे तयार करणेसुद्धा महत्त्वाचे आहे. अर्थात हा विषय नेहमीच सर्वोच्च न्यायालयासमोर जाणार आहे. २०१८ च्या महत्त्वपूर्ण खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने मरण स्वीकारणे हा मूलभूत हक्क मानला होता. तेव्हाही देशात इच्छामरणाची चर्चा सुरू झाली होती. पण आता त्याआधारे पहिलाच निर्णय झाला असल्यामुळे आगामी कालावधीमध्ये हा विषय अधिक स्पष्ट करावा लागणार आहे.

इच्छामरणाला सरसकट परवानगी दिली असती तर त्याचा गैरवापर होण्याची शक्यता अधिक होती. भारत असो किंवा इतर कोणताही देश असो, रुग्णाच्या मालमत्तेवर लक्ष ठेवून इच्छामरणासारखे शस्त्र चुकीच्या पद्धतीने वापरले जाऊ शकत होते. म्हणूनच सर्वोच्च न्यायालयाने आतापर्यंत भारतात हा विषय अत्यंत काळजीपूर्वक पद्धतीने हाताळला आहे.

देशातील पहिला इच्छा मरणाला परवानगी देणारा निर्णय देतानासुद्धा सर्वोच्च न्यायालयाने भावपूर्ण शब्दात हा विषय स्पष्ट केला आहे. तब्बल तेरा वर्षे लोळागोळा होऊन पडलेल्या हरीश राणासारख्या तरुणाच्या प्रकृती मध्ये कोणतीही सुधारणा होण्याची शक्यता नसल्यानेच मरण हाच त्याच्या समस्येवर उपचार उपाय असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

# काई बी मुमकीन... हाये!

**'मी तुले सांगतो माय, ग्यास गिस लय हाये लोकायकडं, पन मोदीले बदनाम करा ले, या लोकायनं मुद्दाम ग्यास लपवला हाये. घरातल्या बादल्या, डबे डुबे, बंब, गिलास, पिशव्या समद्यातनी लवपून ठिवला ग्यास. आन् शिलेंडर केले रिकामे?'**




'मायवं, ज्यवाले वाढ बरं मले, लय जोऱ्याची भूक लागली.'

'यवडी जोऱ्याची भूक लागली आसंन तुले तं मंग मलेच काऊन नाही खात?'

'काई बी बोला लागली का वं तू? तोंडाले यील ते बोलू नको आशी.'

'मंग दम धर जरा, त्वा बाप गेला लाकडं आनाले, त्यानं लाकडं आनले का चूल पेटवते आन बडवते चार भाकरी.'

'बाप्पा! चूल कायले पेटवतं? आपल्या घरी उज्ज्वला ग्यास हाये ना, त्येच्यावर आशी काडी धरली का आसा ग्यास पेटते.'

'म्या मंगापासनं चार येळा आश्शी काडी धरली आन् तश्शी बी धरली, तरी ग्यास पेटला नाही.'

'काऊन नाही पेटला पन?'

'शिलिंडरातला ग्यास संपला.'

'संपला तं मंग भरुन आनाचा ना. त्याले काय टाइम लागते? जंगलातनी जाऊन लाकडं आनाले घंटाभर लागंल, ग्यास तं दाहा मिन्टात आला आसता.'

'त्वा बापानं इचारलं ग्यासवाल्याले, तं तो म्हने का तिकडं कुटं तरी लडाई सुरु हाये, तं ग्यास नाही आला.'

'तो काईबी सांगते आन् तुमी काई बी आयकून घेता.'

'आरं बाबा, कोनीतरी टरम्प नावाचा तात्या हाये म्हन्ते तिकडं आमरिकंत, त्यानं लय बाम फोडले म्हने.'

'माईत हाय मले, म्या पायलं ते टीवीवर.'

'तुले कोनं सांगितलं आसे बाम गिम फोडते ते पाहाले. चांगल्या शिरियल पाहाच्या तं लोकायची भांडनं पाहात बसते काट्टं. अशानं तुहं बी डोकं फिरल ना रे बाबू.'

'आवं शिरियलमंदी बी तं भाडनंच आस्ते. सासू सूनेले म्हन्ते का त्वा माह्या पोराले माह्यापासून तोडलं आन् सून सासूले म्हन्ते का पोराले आजून बी पदराखालीच ठेवता का तुमी?'

'बाम फोडन्यापेक्षा ते चांगलं हाये. पन मले सांग, त्वा वाला ते टरम्प तात्या कायले भांडते?'

'आता आपला तो चौकातला तात्या हाये, त्याचं आईकलं नाही तं त्याले राग येते का नाही? कोन्ते बी तात्या आसेच असते. त्यायचं आयकाच लागते.'

'मले हेच नाही समजा लागलं, का त्या तात्यानं बाम फोडले, तं ग्यास काऊन बन झाला. तुमाले काय फोडाचं ते फोडा बाप्पा, पन गरिबायचा ग्यास काऊन बन करता?'

'तुले सांगतो माय, हा आपला ग्यासवालाचं लय बदमास हाये. आपन कसं यका दुकानातल तेल संपलं आसंन तं दुसऱ्या दुकानातून आनतो ना. तं तसं येका दुकानातला ग्यास संपला होता. मंग आपल्या मोदीनं फोन केला ट्रम्प तात्याले आन इचारलं, का तात्या मी दुसऱ्या दुकानातून ग्यास घिऊ का?'

'काउन इचारलं पन त्या तात्याले? पैसे का तो तात्या देनार हाये गॅसचे?'

'म्या च्यानलवर पायलं ते सांगत हाओ तुले, उगा वाकड्यातनी कायले जातं तू?'

'बरं बाप्पा सांग.'

'तं आपल्या मोदीनं तात्याले इचारलं का तुमी बाम फोडल्यानं येक दुकान बन झालं तं आमी आता पुतीनच्या दुकानातून ग्यास घेऊ का?'

'आता हा पुतीन कोन बाप्पा? आन त्याचं दुकान मले कस्काय माहीत नाही? आयुक्श ग्येलं माह्यावालं याच गावातनी, कोन्ता पुतीन व्हय हा?'

'तुले काय कराचं हाये त्येचं, आसंन कोन्ता बी. मी म्हन्तो का आपल्या ग्यासवाल्यानं काउन नाही आनला ग्यास त्या पुतीनच्या दुकानातून? तू जाय दुकानात आन् त्या ग्यासवाल्याले सांग, का आमाले भंडवू नको. जाय पुतीनच्या दुकानात आन् आनून दे आमाले ग्यास.'

'जाऊ दे बाप्पा, आपन म्हन्तो ना ज्यानं चोच देल्ली तो चारा बी देईल.

तं ज्यानं शिलिंडर देल्ला तोच ग्यास बी देईल.'

'तुले तेचं तं म्हना लागलो मी. आपल्याले मोदीनं शलिंडर देल्ला तं ग्यास बी मोदीच देनार हाये. पन या वक्ताले तो येगळ्या दुकानातून घिऊन देनार हाये.'

'कुटून का दे नं बाप्पा पन आमाले ग्यास दे.'

'हे टीवीवालेबी हाय नं सगळं आर्दं आर्दं सांगते. मी आता जातो भाईर आन इचारुन पाह्यतो का पुतीनचं ग्यासचं दुकान कुटं हाये..'

'पन हा टरम्प तात्या कोन हाये रे?'

'आपल्या मोदीचा दोस्त हाये तो. दोगं गळ्यात गळा घालून हिंडत आसते न्यूयार्कात.'

'कुटं हिंडते? हे कोन्त यार्क व्हय?'

'जाऊ दे, तुले नाही समजनार ते. लय दूरचं गाव हाये ते. तू पाह्य त्वावाल्या शिरियल.'

'बाप्पा, मले तं वाटत होतं का मोदी लयच मोठा मानूस हाये.'

'हायेच मंग तो...'

'कायचा मोठा हाये? त्वा वाला बाप गेल्ता काल आप्पाच्या पानठेल्यावर तंबाकू आनाले. आप्पा म्हने का तंबाकू संपला. मंग त्वा बाप गेला राम्याच्या ठेल्यावर आन् घ्येतला इकत तंबाकू. त्यानं कोनाले जाऊन इचारलं का घिऊ का म्हनून? मंग, मोदी कायले इचारते टरम्प तात्याले? पैसे द्याचे आन् ग्यास घ्याचा.'

'मी तुले सांगतो माय, ग्यास गिस लय हाये लोकायकडं, पन मोदीले बदनाम करा ले, या लोकायनं मुद्दाम ग्यास लपवला हाये. घरातल्या बादल्या, डबे डुबे, बंब, गिलास, पिशव्या समद्यातनी लवपून ठिवला ग्यास. आन् शिलेंडर केले रिकामे?'

'बाप्पा! ग्यास पिशव्यातनी भरला?'

'मोदीले बदनाम कराले, काई बी मुमकीन हाये,

तुले माईत नाही का?'

तंबी दुराई